कांड ६

प्रपाठक १

ज्या मंडपावर पूर्वेस शेंडे करून वासे घातलेले असतात तो 'प्राग्वंश' नांवाचा मंडप होय. या मंडपाला प्राग्वंशशाला असेही म्हणतात. प्राग्वंश मंडप हा सोमयागसंबंधी यजन जेथे व्हावयाचे असते, त्या देवयजनभूमीपैकीच एक भाग होय. अर्थात् या मंडपावर घातलेला प्रत्येक वासा देवयजनभूमीशी संबध्द असा होतो.

देव व मनुष्ये यांनी दिशांचे विभाग केले. पूर्व दिशा देवांनी, दक्षिण दिशा पितरांनी, पश्चिम दिशा मनुष्यांनी आणि उत्तर दिशा रुद्रांनी आपणासाठी विभागून घेतली, यास्तव सोमयाग करणाऱ्या यजमानाने प्राग्वंश मंडपावर जर पूर्वेस शेंडे करून वासे घातले तर त्याने जणू काय देवलोक म्हणजे देवांना राहण्यासाठी निवासस्थान किंवा गृहच निर्माण केल्यासारखे होते.

देव जेथे राहतात तो स्वर्गलोग मनुष्यांची वस्ती असलेल्या या भूलोकापासून अदृश्य असतो. यास्तव प्राग्वंश मंडपाला स्वर्गलोकाचे स्वरूप येण्यासाठी त्या मंडपाच्या चार बाजूंनी कूड घालून तो बंदिस्त करावा.

सामान्य मनुष्याला घर, जमीन, मुले बाळे, इत्यादिकापासून मिळणारे सुख इहलोकी प्रत्यक्ष अनुभवास येत असते. स्वर्गलोकी मिळणारे सुख हे संदिग्ध म्हणजे अनुमानगम्य असते. आणि ते स्वर्गसुख देखील मरणानंतर प्राप्त व्हावयाचे असते. शिवाय मरणोत्तर मिळणारे ते स्वर्गसुख देखील, सोमयागासारखे सत्कर्म यथासांग पार पडले तरच प्राप्त होण्याचा संभव असतो. आणि त्या सत्कर्मामध्ये नरकप्रद असे जर काही पातक घडले, तर त्या मरणोत्तर प्राप्त होणाऱ्या स्वर्गसुखाचा लाभ होण्याचा संभवही नाहीसा होत असतो. यास्तव, सोमयागासारखे कर्म करण्याच्या वेळीच इहलोकाशी असलेला संबंध सर्वस्वी सोडून स्वर्गलोकावर सोमयाग करणाराने दृष्टी ठेवू नये, असे बुध्दिमंत विद्वान म्हणत असतात. कारण स्वर्गलोकी मिळणारे ते सुख भोगण्याचे आपल्या नशीबात आहे, किंवा नाही, हे निश्चितपणे कोण जाणणार? यास्तव इहलोकही आपल्या दृष्टीस पडावा, आणि या इहलोकातील सुखावरची आपली दृष्टी नष्ट होऊ नये, म्हणून यजमानाने प्राग्वंश मंडप जरी सर्व बाजूंनी बंदिस्त करावयाचा असला तरी, त्याच्या चार दिशांना चार व्दारे ठेवावीत. म्हणजे त्या यजमानाला इहलोक व स्वर्गलोक हे दोनही लोक जिंकता येतात.

सोमयाग करणाऱ्या यजमानाने आपल्या मस्तकावरील केस व मुखावरील मिशा काढाव्यात. हातापायाची नखेही काढवावीत. कारण केस, मिशा किंवा नखे हा मनुष्याच्या शरीरावरील त्वचेचा एक मृत म्हणजे निरुपयोगी व अपवित्र असाच भाग असतो. यजमानाने जर केशश्मश्रुरूप असा आपल्या त्वचेचा मृत अर्थात् अपवित्र झालेला भाग काढून टाकला तर त्या यजमानाचा देह यज्ञयोग्य असा होऊन तो यजमान सोमयाग करण्याच्या अधिकारास प्राप्त होतो.

केस, श्मश्रू म्हणजे मिशा यांचे मुंडण करणे, इत्यादि जो संस्कार त्याला 'दीक्षा' अशी संज्ञा असून आहारादिकांविषयी करण्यात येणाऱ्या नियमपालनास 'तप' असे नांव आहे.

स्वर्गलोकी जाऊ इच्छिणाऱ्या अंगिरसांनी उदकामध्ये स्नान करून दीक्षा आणि तप या दोघांच्याही ठिकाणी प्रवेश केला. यास्तव, सोमयाग करणाऱ्या यजमानाने उदकामध्ये स्नान करावे. म्हणजे त्याने दीक्षा व तप या दोहोंचाही प्रत्यक्ष अवलंब केल्यासारखे होते.

तीर्थाच्या ठिकाणी स्नान करावे. कारण त्या दीक्षेच्या ठिकाणी प्रवेश करताना, म्हणजे दीक्षा ग्रहण करताना, अंगिरसांनी तीर्थाच्याच ठिकाणी स्नान केले होते. शिवाय, दीक्षा ग्रहण करताना जर यजमानाने तीर्थाच्या ठिकाणी स्नान केले तर तो आपल्या बरोबरीच्या मनुष्यांना तीर्थाप्रमाणेच सेवनीय होतो.

'क्षुमा' या नांवाच्या वनस्पतीच्या (किंवा रेशमाच्या) धाग्यांनी विणलेल्या वस्त्रास 'क्षौम' अशी संज्ञा आहे. सोमयाग करणाऱ्या यजमानाने क्षौम वस्त्राचे परिधान करून दीक्षेचे ग्रहण करावे. कारण, क्षौम वस्त्र हे सोमदेवतात्मक आहे. देवतेच्या दृष्टीने ते क्षौम वस्त्र म्हणजे सोमदेवतेचे जणू शरीरच आहे. यास्तव क्षौम वस्त्र परिधान केले असता दीक्षा ग्रहण करणारा तो यजमान सोमदेवतेला प्राप्त होतो.

जिच्यामध्ये तंतू ओवावयाचे असतात त्या फणीला 'तूषा' असे नांव असून त्या फणीमध्ये तंतू ओवण्याच्या क्रियेस 'तूषाधान' असे नांव आहे. खळ लावलेले तंतू वाऱ्याने सुकविण्याच्या क्रियेस 'वातपान' अशी संज्ञा असून लांब तंतूंच्या मध्ये जे बांध घातलेले असतात त्यांना 'नीवी' असे म्हणतात. वस्त्र विणीत असताना तंतू किंवा धागे घट्ट बसावेत म्हणून दांड्याने किंवा फणीने जो ठोका मारतात त्याला 'प्रघात' अशी संज्ञा असून लांब पसरलेले जे तंतू असतात त्यांना 'प्राचीन तान' असे नांव आहे. वस्त्र विणताना आडवे जे तंतू पसरले जातात म्हणजे घातले जात असतात त्यांना 'ओतु' अशी संज्ञा असून आडव्या उभ्या तंतूंच्या मध्ये असलेल्या छिद्रांना 'अतीकाश' असे नांव आहे.

तूषाधानाच्या ठिकाणी अग्नीचे आधिपत्य असून वातपानाच्या ठिकाणी वायूचे आधिपत्य आहे. नीवीवर पितरांचे आधिपत्य असून प्रघातावर औषधिदेवतांचे

अधिपत्य आहे. प्राचीन तानांवर आदित्यांचे आधिपत्य असून ओतूंच्यावर विश्वेदेवांचे आधिपत्य आहे. त्याचप्रमाणे अतीकाशांच्यावर नक्षत्रदेवतांचे आधिपत्य आहे. सारांश, क्षौम वस्त्र हे सर्वदेवतात्मक आहे. यास्तव, यजमानाने क्षौम वस्त्राचे परिधान करून दीक्षाग्रहण केले असता सर्व देवतांनीच त्या यजमानाला दीक्षाग्रहण करविल्यासारखे होते. मनुष्य हा बहिःप्राण आहे. म्हणजे बाह्य प्राणाने तो जगत असतो. अन्नभक्षण हाच तो मनुष्याचा बहिःप्राण होय. यासाठी यजमानाने दीक्षाग्रहणांगभूत अन्न भक्षण करावे. म्हणजे भोजन करावे. म्हणजे बाह्य प्राणासह त्याने दीक्षाग्रहण केल्यासारखे होते. एवं च, दीक्षाग्रहण करणाऱ्या यजमानाने भोजन करावे. त्या योगाने त्या यजमानाचा जेवढा म्हणून प्राण आहे तेवढ्या प्राणासह तो यजमान सोमयागाला प्राप्त होतो.

अग्नीच्या उष्णतेने पूर्ण कढल्या गेलेल्या लोण्यास 'घृत' असे नांव असून ते देवांना प्रिय असते. कमी कढलेल्या लोण्याला 'मस्तु' अशी संज्ञा असून ते पितरांना प्रिय असते. अन्य एखादा पदार्थ टाकून किंचित् कढविलेल्या लोण्याला 'निष्पक्व' असे नांव असून ते मनुष्यांना प्रिय असते. सारांश, लोणी हे सर्वदेवतात्मक आहे. यास्तव, दीक्षाग्रहण करणाऱ्या यजमानाने आपल्या सर्व शरीराला लोणी चोळावे: म्हणजे त्या यजमानाने सर्व देवतांना संतुष्ट केल्यासारखे होते.

स्वर्गलोकप्राप्तीला साधनभूत अशा सोमयागांगभूत दीक्षाग्रहण करण्यास जो प्रवृत्त होतो, तो यजमान या मनुष्यलोकापासून च्युत होत असतो. आणि सोमयागाची पूर्णता अद्यापि व्हावयाची असल्यामुळे त्याला देवांचा निवास जेथे असतो त्या स्वर्गलोकाचीही प्राप्ती झालेली नसते. एवं च, या प्रसंगी त्या यजमानाची ' ना इहलोक ना परलोक ' अशी अवस्था होऊन तो मध्य स्थितीला प्राप्त होत असतो. निष्पक्वसंज्ञक लोणीही अशाच प्रकारचे म्हणजे मध्यमावस्थेला प्राप्त झालेले असते. मूळच्या दुग्धस्वरूपापासून ते च्युत झालेले असते पण पूर्णपणे कढले न गेल्याने घृतभावालाही प्राप्त झालेले नसते. यास्तव, दीक्षा ग्रहण करणाऱ्या यजमानाने आपल्याशी समान अवस्था असलेल्या लोण्याने अभ्यंग करणे, म्हणजे लोणी अंगाला चोळणे हे अवश्य होय.

अंगाला लोणी चोळताना जर मंत्र पठण करावयास सांगितले असते तर अनुलोम पद्धतीने म्हणजे केसांचे वळण जसे वरून खाली असते, त्याप्रमाणे शरीराच्या ऊर्ध्व भागापासून अधोभागाकडेच लोणी चोळीत जाणे अवश्य झाले असते. परंतु लोणी चोळताना मंत्राची व्यावृत्ती असल्यामुळे म्हणजे मंत्र म्हणावयास सांगितलेला नसल्याने अंगाला लोणी चोळावयाचे ते आपल्या इच्छेनुरूप उलट सुलट वाटेल तसे चोळावे.

इंद्राने वृत्रासुराचा वध केला. तेव्हा त्याच्या डोळ्यातील बाहुली भूमीतर गळून पडली. तीच अंजनरूपाने उत्पन्न झाली म्हणजे त्या बाहुलीपासूनच अंजन निर्माण

झाले. अंजन म्हणजे डोळ्यात घालावयाचा सुरमा. यजमानाने आपल्या दोनही डोळ्यांत सुरम्याचे अंजन घालावे. यजमानाने आपल्या डोळ्यांत अंजन घातले असता त्याने आपल्या शत्रूचे डोळेच काढून टाकल्याप्रमाणे होते. डोळ्यात अंजन घालतांना मनुष्याची प्रवृत्ती सामान्यतः डाव्या डोळ्यात प्रथम अंजन घालण्याची असते. स्त्रिया अंजन घालतेवेळी प्रथम ते डाव्या डोळ्यात घालतात हे तर आपण पाहतोच. परंतु, या वेळी तसे न करता यजमानाने आपल्या उजव्या डोळ्यात प्रथम अंजन घालून नंतर डाव्या डोळ्यात घालावे. तसेच अंजन घालताना ते ज्या बोटाने घेतले असेल ते बोट डोळ्यात मागेपुढे फिरवून अंजन घालण्याची सामान्यतः प्रवृत्ती असल्याचे दिसून येते. परंतु तसे न करता यजमानाने आपल्या डोळ्यात अंजन घालतांना बोट मागे पुढे फिरवू नये. सरळ एका कडेने दुसऱ्या कडेपर्यंत बोट नेऊन अंजन घालावे. दोनही डोळ्यांत मिळून पांच वेळ अंजन घालावे. चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने पंक्ती छंद हा पांचच अक्षरांचा असून यज्ञही पांच प्रकारच्या हविर्द्रव्यांनीच संपादिला जात असतो. यासाठी पांच वेळ अंजन केले असता पंक्ती छंदाच्या व्दारा यजमानाने पांच हविर्द्रव्यांनी संपादिला जाणारा यज्ञ आपल्या स्वाधीन करून घेतल्यासारखे होते. मनुष्याची सामान्यतः प्रवृत्ती अनियमित वेळा डोळ्यात अंजन घालण्याची असते. तसे न करता यजमानाने मोजक्या पांचच वेळ अंजन करावे. नुसत्या काडीने अंजन डोळ्यात घालण्याची मनुष्यांची सामान्यतः सवय असते. परंतु तसे न करता, यजमानाने जिच्या टोकाला कापूस वेष्टिलेला आहे अशा काडीने आपल्या डोळ्यांत अंजन घालावे. कापूस न लावता काडीने किंवा सळईने अंजन घातले तर त्या काडीचे किंवा सळईचे टोक वज्रासारखे कठिण असल्यामुळे त्या टोकाचा धक्का लागून डोळ्यांना इजा होण्याचा बहुधा संभव असतो. यासाठी त्या काडीचे किंवा सळईचे डोळ्यांच्याशी मित्रत्व असावे, तिने डोळ्यांना त्रास न देता मित्राप्रमाणे सुखप्रद व्हावे म्हणून टोकाला कापूस लावलेल्या काडीने किंवा सळईने अंजन घालावे.

इंद्राने वृत्रासुराला मारले. तेव्हा तो उदकात पडून मेला. त्या उदकामध्ये यज्ञयोग्य देवांना प्रिय असा जो अंश होता, तो त्या उदकातून वर आला. व त्या यज्ञयोग्य व देवप्रिय अशा अंशापासून दर्भ उत्पन्न झाले. यास्तव, यजमानाने दर्भांच्या पातींनी जर आपले शरीर शुद्ध केले तर यज्ञयोग्य व देवांना प्रिय अशा उदकांनीच जणू यजमानाने आपले शरीर शुद्ध केल्याप्रमाणे होते. दर्भांच्या दोन पातींनी यजमानाने आपले शरीर शुध्द करावे. म्हणजे दर्भांच्या दोन पाती आपल्या शरीरावरून फिरवाव्यात. दोन पातींनी शरीर शुद्ध केले असता, दिवस व रात्र यांच्याकडून शरीर शुद्ध केल्यासारखे होते. दर्भांच्या तीन पातींनी शरीर शुद्ध करावे. कारण पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु असे तीन लोक आहेत. म्हणून दर्भांच्या तीन पातींनी शरीर शुद्ध केले असता, तीनही लोकांच्या कडूनच आपले शरीर यजमानाने शुध्द केल्यासारखे होते. दर्भांच्या पांच पातींनी शरीर

शुद्ध करावे. पंक्ती छंद पांचअक्षरी चरणांचा असतो. व यज्ञही पांच हविर्द्रव्यांनी केला जात असतो. यास्तव, दर्भांच्या पांच पातींनी शरीर शुद्ध केल्यान पंक्तीछंदाशी स्वरूपसाम्य असलेल्या व पांच हविर्द्रव्यांनी संपादन केल्या जाणाऱ्या यज्ञासाठीच यजमानाने आपले शरीर शुद्ध केल्यासारखे होते. सहा पातींनी शरीर शुद्ध करावे. कारण ऋतू सहा आहेत. म्हणून दर्भांच्या सहा पातींनी शरीर शुध्द केल्यास सहा ऋतूंच्या कडूनच शरीर शुद्ध केल्यासारखे होते. दर्भांच्या सात पातींनी शरीर शुद्ध करावे. कारण. गायत्री,त्रिष्टुप्, जगती, अनुष्टुप्, पंक्ति,बृहती आणि उष्णिक् किंवा ककुत् यांपैकी एक मिळून मुख्य छंद सात आहेत. यास्तव, दर्भांच्या सात पातींनी शरीर शुध्द केले असता, सात छंदांच्या कडूनच ते शुद्ध केल्यासारखे होते. दर्भांच्या नऊ पातींनी शरीर शुद्ध करावे. जेथून वायूचा संचार होतो, अशी मनुष्याच्या ठिकाणी नऊ स्थाने आहेत. दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या, मुख, जननेन्द्रिय, व गुदद्वार ही ती नऊ स्थाने होत. या स्थानांतून वायूचा संचार होत असल्याने मनुष्यांच्या ठिकाणी स्थानभेदाने नऊ प्राण आहेत असे म्हटले जाते. यास्तव, दर्भांच्या नऊ पातींनी शरीर शुद्ध केल्यास नऊही प्राणांसहवर्तमान असे आपले शरीर यजमानाने पवित्र केल्यासारखे होते. दर्भांच्या एकवीस पातींनी शरीर शुद्ध म्हणजे पवित्र करावे. कारण हातांच्या दहा अंगुली, पायांच्या दहा अंगुली व शरीर अशा एकवीस अवयवांनी मनुष्य निर्माण झाला आहे. यास्तव, दर्भांच्या एकवीस पातींनी शरीराची शुद्धी केली असता यजमानाने मनुष्यप्राणी हा जेवढ्या म्हणून अवयवसमूहाने निर्माण झाला आहे, तेवढ्या सर्व अवयवसमूहाने आपले शरीर शुद्ध केल्यासारखे होते.

दर्भांच्या पाती आपल्या शरीरावरून फिरवून ते पवित्र करीत असताना 'चित्पतिस्त्वा पुनातु' असा मंत्र यजमानाने म्हणावा. कारण मनुष्याच्या ठिकाणी असलेल्या चैतन्याचे मन हे पालक आहे, यास्तव आता सांगितलेला मंत्र म्हटला असता, मनाकडून यजमानाने आपले शरीर शुध्द केल्यासारखे होते. 'वाक्पतिस्त्वा पुनातु' हा दुसरा मंत्र म्हणावा. म्हणजे वाणीकडून यजमानाने आपले शरीर शुध्द केल्यासारखे होते. नंतर 'देवस्त्वा सविता पुनातु' हा तिसरा मंत्र म्हणावा. म्हणजे सविता देवाच्या प्रेरणेनेच यजमानाने आपले शरीर शुद्ध केल्यासारखे होते. 'तस्य ते पवित्रपते पवित्रेण यस्मै कं पुने तच्छकेयम्' असा चौथा मंत्र म्हणावा. म्हणजे यजमानाने या मंत्रात व्यक्त केलेल्या आशीर्वादाचीच आशा म्हणजे याचना केल्यासारखे होते.(अनुवाक १).

जितक्या देवांनी यज्ञ करण्यासाठी आपले शरीर पवित्र केले, म्हणजे दर्भांच्या पाती समंत्रक आपल्या शरीरावरून फिरवून त्याला शुद्ध केले, तितके देव ऐश्वर्याला प्राप्त झाले. हे जाणून जो यज्ञ करण्यासाठी आपले शरीर पूर्वोक्त प्रकारे पवित्र करतो तो ऐश्वर्याला प्राप्त होतोच होतो. प्राग्वंशशाळेच्या बाहेर यजमानाचा

शुध्दीसंस्कार म्हणजे त्याचे शरीर दर्भांच्या पातींनी शुद्ध करण्याचा विधी करून मग अध्वूर्य त्यास प्राग्वंशशाळेत घेऊन जातो. असे केल्याने अध्वर्यूने जणू काय मनुष्यलोकी यजमानाला प्रथम पवित्र करून नंतर पवित्र अशा देवलोकाच्या ठिकाणी त्याला नेल्यासारखे होते.

दीक्षांगभूत म्हणून आहवनीच्या ठिकाणी जर एकच आहुती दिली तर तो यजमान दीक्षित होत नाही, असे विद्वान याज्ञिक म्हणतात. यासाठी यजमानाला दीक्षितत्व प्राप्त व्हावे म्हणून अध्वर्यूने आहवनीयाग्नीवर स्रुव्याने चार आज्याहुती द्याव्यात. आणि नंतर स्रुचीने पांचवी आहुती द्यावी. पंक्ती छंदाची पांचच अक्षरे असून धाना,करंभ, परिवाप, पुरोडाश, व पयस्या म्हणजे आमिक्षा या पांचच हविर्द्रव्यांनी यज्ञ संपादिला जात असतो. यासाठी पांच आहुती दिल्या असता, पांक्त म्हणजे पांच हवींनी .युक्त असा यज्ञच अध्वर्यूने यजमानाला प्राप्त करून दिल्याप्रमाणे होते.

' आकू त्यै प्रयुजेऽग्नये स्वाहा 'या मंत्राने पहिली आहुती द्यावी. आकूती म्हणजे प्रबळ इच्छा होय. प्रबळ अशा इच्छेने प्रेरित झालेला पुरुषच यज्ञ करण्याविषयी आपल्या डोळ्यापुढे तीव्र ध्येय ठेवून ऋत्विजांना 'मजकडून यज्ञ करवावा ' असे म्हणत असतो.

' मेधायै मनसेऽग्नये स्वाहा ' या मंत्राने दुसरी आहुती द्यावी. प्रखर अशा स्मरणशक्तीला मेधा असे नांव आहे. ' मला यज्ञ करावयाचा आहे, ' याविषयी ज्याची स्मरणशक्ती प्रखरतेने जागृत असते तोच पुरुष यज्ञाकडे जाण्यास प्रवृत्त होतो. म्हणजे यज्ञ यावच्छक्य त्वरेने करण्यास प्रवृत्त होतो.

'सरस्वत्यै पूष्णेऽग्नये स्वाहा ' हा मंत्र म्हणून तिसरी आहुती द्यावी. वाणी हीच सरस्वती म्हणजे मंत्रोच्चारणसिद्धी असून पृथ्वी ही पूषारूप म्हणजे यज्ञाला लागणाऱ्या भूमीची व व्रीहीयवादि द्रव्यांची सिद्धता करून देणारी आहे. यास्तव, या मंत्राने आहुती दिली असता, सरस्वतीरूप वाणी आणि पूषारूप पृथ्वी यांच्या अनुकूलतेने यजमानाने यज्ञाचा प्रारंभ केल्यासारखे होते.''आपो देवीर्बृहतीर्विश्वशं भुवः 'या मंत्राने चौथी आहुती द्यावी. आता प्रदर्शित केलेला हा मंत्राचा एक अंश आहे. या अंशाचा उच्चार आहुती देताना केला जात असून वर्षाऋतूमध्ये द्युलोकातून पर्जन्यरूपाने जी उदके भूमीवर पडत असतात ती, देदीप्यमान व अखिल विश्वाचे कल्याण करणारी असतात, असा त्या अंशाचा अर्थ आहे. हा मंत्रांश जर म्हटला नाही तर द्युलोकातून ती पर्जन्योदके अशांत म्हणजे विजेप्रमाणे प्रखर होऊन या भूलोकावर आदळतील. शिवाय 'आपो देवीर्बृहतीर्विश्वशं भुवः 'हा अंश पठण केला असता,अध्वर्यूने इहलोकाच्या कल्याणासाठी त्या उदकांना शांत केल्यासारखे होते. आणि मग ती शांत झालेली उदके पर्जन्यवृष्टीच्या रूपाने या भूलोकावर येतात.

पूर्वोक्त मंत्रामध्ये ' द्यावापृथिवी' व 'ऊर्वन्तरिक्षं' असे दोन अंश पठण करावयाचे असतात. कारण द्यावापृथिवींच्या पासून यज्ञनिष्पत्ती होत असल्यामुळे तीच यज्ञरूप आहेत. भूमीच्या ठिकाणी देवांचे यजन केले जाते, अन्तरिक्षामध्ये अर्थात् विस्तीर्ण अशा मोकळ्या जागेत अनुष्ठानाला वाव मिळतो, व द्युलोकात .यज्ञाचे फळ मिळते. एवं च, यज्ञ हा तीनही लोकांशी संबद्ध असा आहे.

'बृहस्पतिर्नो हविषा वृधातु ' असा पूर्वोक्त मंत्राचा शेवटचा अंश अध्वर्यूकडून म्हटला जातो. बृहस्पती हा देवांचा ब्राह्मण आहे. अर्थात या अंशाचे पठण केले असता अध्वर्यूने जणू काय बृहस्पतीकडून आपल्या यजमानासाठी यज्ञाचा प्रारंभ करविल्यासारखे होते.

दुसऱ्या एका शाखेमध्ये पूर्वोक्त मंत्राच्या शेवटी 'हविषा विधेः ' असा पाठ आहे. या पाठानुसार जर अध्वर्यूने मंत्र म्हटला तर यज्ञाचा आधारस्तंभ असलेल्या यजमानावरच विघ्नांचा घाला येईल. कारण त्या पाठात 'वृधातु' हे अभिवृद्धिवाचक पद नाही. यास्तव, अध्वर्यूने 'हविषा विधेः' या पाठाचा आदर न करता 'हविषा वृधातु' याच स्वशाखीय पाठाचा अवलंब करून मंत्र म्हणावा. म्हणजे यज्ञाचा आधारस्तंभ असलेल्या यजमानावर येणारा विघ्नांचा घाला दूर होऊन त्याची अभिवृद्धी होईल,

प्रजापतीने यज्ञ निर्माण केला. परंतु निर्माण होताच तो यज्ञ प्रजापतीपासून लांब पळाला. त्या यज्ञरूपी पुरुषाला पकडण्यासाठी प्रजापतीने ऋङ्मंत्ररुप, यजुर्मंत्ररुप आणि साममंत्ररुप असे तीन मंत्रपुरुष पाठविले. त्या तिघांपैकी यजु व साम या दोघा मंत्रपुरुषांनी त्या यज्ञरूपी पुरुषाला अडविला. आणि ऋङ्मंत्ररूप पुरूषाने त्याला पकडून प्रजापतीच्या स्वाधीन केले. ज्या ऋङ्मंत्ररूपाने, त्या यज्ञपुरुषाचे उद्ग्रहण केले, म्हणजे त्याला पकडण्याचे कार्य केले, त्या ऋङ्मंत्राला 'औद्ग्रहण' म्हणजे यज्ञपुरुषाला पकडणारा, अशी संज्ञा रूढ झाली. यज्ञपुरुषाचे उद्ग्रहण करणे, हेच त्या औद्ग्रहणसंज्ञक मंत्राचे औद्ग्रहणत्त्व होय. अर्थात् औद्ग्रहण मंत्राने दिल्या जाणाऱ्या आहुतिरूप अनुष्ठानालाही औद्ग्रहण असे नांव याज्ञिकांच्या परिभाषेत रूढ झाले.

सारांश, यजमानाच्या हाती यज्ञ यावा, त्याच्यापासून दूर जाऊ नये म्हणून औद्ग्रहणसंज्ञक ऋचेने आज्याहुती द्यावी. यज्ञपुरुषाला पकडणारा ऋङ्मंत्र म्हणजे औद्ग्रहणसंज्ञक ऋचा ही अनुष्टुप्छंदात्मक होती म्हणून अनुष्टप् छंदाने यज्ञपुरुषाला पकडले, असे लोक बोलू लागले. यास्तव अनुष्टप्छंदात्मक ऋचेने आहुती द्यावी म्हणजे ती आहुती यजमानाच्या हाती यज्ञ देण्याला कारणीभूत होते.

वासराला एकाच पाशाने म्हणजे दाव्याला असलेल्या फासाने बांधतात. त्याचप्रमाणे औद्ग्रहण मंत्राने आपल्या ठिकाणच्या बारा वात्स बंधांनी म्हणजे बारा पाशांनी यज्ञपुरुषाला बद्ध केला. वासरांप्रमाणे यज्ञपुरुषाला बद्ध करणारे ते 'वात्सबंध' पाश होत. यज्ञपुरुषाला बद्ध करणाऱ्या त्या अनुष्टुप्छंदात्मक ऋचेच्या ठिकाणी असणारी बारा पदे म्हणजेच त्या छंदोमंत्राच्या ठिकाणी असणारे वात्ससंज्ञक पाश किंवा दावी होत. सारांश, बारा वात्स बंधांनीच यज्ञपुरुषाला बद्ध केले, असे लोक बोलू लागले. यास्तव, अनुष्टुप्छंदोमंत्रातील वात्सबंधसंज्ञक बारा पदांचे माहात्म्य जाणणारे अध्वर्यू या वात्सबंधसंज्ञक पदाने युक्त असलेल्या मंत्राने आहुती देऊन यजमानाला दीक्षा देत असतात.

यज्ञपुरुषाला बद्ध करणारी ऋचा अनुष्टुप् छंदातील आहे हे सांगितलेच आहे. अनुष्टुप् छंद हे एक वेदवाणीचे विशिष्ट रूप आहे. यास्तव, अनुष्टुप्छंदात्मक ऋचेने आहुती देऊन जर अध्वर्यूने यजमानाला दीक्षा दीली तर त्याने जणू सर्व वेदवाणीनेच आपल्या यजमानाला दीक्षा दिल्यासारखे होते.

आता वर्णिलेल्या अनुष्टुप्छंदात्मक ऋचेत ' विश्वे देवस्य नेतुः' असा पहिला अंश पठण केला जात असतो. या अंशात सविता देवतेचा पर्याय असणारा नेतृ षष्ठ्यन्त रूपाने समाविष्ट झाला असल्याने ही ऋचा सवितृदेवतात्मक आहे. 'मर्तो वृणीत सख्यम् ' असा त्या ऋचेतील दुसरा अंश आहे. या अंशात मृत पितरांचा सूचक ' मर्त' हा शब्द आला असल्याने ही ऋचा पितृदेवतात्मक आहे. 'विश्वे राय इषुध्यसि ' हा त्या ऋचेतील तिसरा अंश होय. या अंशात 'विश्व' शब्द उच्चारला जात असल्यामुळे ती ऋचा विश्वेदेवदेवतात्मक आहे. 'द्युम्नं वृणीत पुष्यसे' हा त्या ऋचेतील चौथा अंश आहे. या अंशात 'पुष्यसे' असा क्रियापदरूप शब्द आहे. त्यामुळे ही ऋचा पूषादेवतात्मकही आहे.

अनुष्टुप्छंदात्मक असणारी, 'विश्वे देवस्य नेतुर्मर्तोही ऋचा सर्वछंदस्वरूप आहे. ती अशी की, या ऋचेचा पहिला चरण सात अक्षरी आहे. तथापि, छंदःशास्त्राचा नियम असा आहे की, अक्षर न्यून असले तरी तो चरण पूर्णच आहे असे मानावे. या दृष्टीने तो पहिला चरण आठअक्षरी आहे असेच समजावे. गायत्री छंदाच्या एकेका चरणाची आठच अक्षरे असतात. या पहिल्या चरणाचे गायत्री छंदाच्या एकेका चरणाशी स्वरूपसाम्य असल्याने ही सर्वच ऋचा गायत्रीछंदात्मक आहे असे मानावे. शिवाय या ऋचेचे पुढचे तीन चरण आठअक्षरी असल्याने काही चरणांचे पर्यायाने गायत्री छंदाशी साम्य आहेच. आता दुसऱ्या चरणात सातच अक्षरे असताना तो चरण अष्टाक्षरी आहे असे का मानावे ? अशी शंका येईल. परंतु सख्यं हे पद सखियं असे तीन अक्षरी आहे असे समजावे. म्हणजे तो चरण आठ अक्षरांचा आहे असे म्हणावयास हरकत वाटणार नाही. आता अष्टाक्षरी ठरलेल्या या दुसऱ्या चरणात पहिल्या चरणाची तीन अक्षरे मिळविली म्हणजे तोच

चरण अकराअक्षरी होईल. त्रिष्टुप् छंदाचा चरण अकराअक्षरीच असतो. अशा रीतीने या ऋचेचे त्रिष्टुप्छंदाशी साम्य होत असल्याने ही ऋचा त्रिष्टुप्छंदरूप आहे, असे समजण्यास हरकत नाही. या ऋचेचा तिसरा चरण आठ अक्षरांचा आहेच. त्यामध्ये पहिल्या चरणातील पुढची चार अक्षरे मिळविली म्हणजे तो चरण बाराअक्षरी होईल. जगती छंदाचा प्रत्येक चरण बारा अक्षरांचा असतो. अशा प्रकारे जगती छंदाशीही या ऋचेचे स्वरूपसाम्य असल्याने ही ऋचा जगतीछंदस्वरूप आहे असे मानावयास हरकत नाही. एवं च, 'विश्वे देवस्य'ही ऋचा म्हणजे सर्वछंदस्वरूप आहे असे समजावे. या ऋचेने आहुती देऊन अध्वर्यूने यजमानाला दीक्षा दिली म्हणजे सर्व छंदांनी त्या यजमानाला दीक्षा दिल्यासारखे होते. ही ऋचा शक्वरीछंदरूप देखील आहे. कारण ऋचेचा पहिला चरण सातअक्षरी आहे. शक्वरी छंद हा सातचरणी असतो. अर्था या ऋचेच्या चरणातील एकेक अक्षर हे शक्वरी छंदाच्या एका चरणाचेच प्रतीक आहे असे मानले तर शक्वरी छंदाशी या ऋचेचे साम्य होत असल्याचे दिसून येईल. तात्पर्य, ही ऋचा शक्वरीछंदस्वरूप आहे. शक्वरी छंद हा पशूंची प्राप्ती करून देणारा असल्याने ऋचेची आहुती देऊन यजमानाला दीक्षा दिली असता, अध्वर्यूने आपल्या त्या यजमानाला पशूंचीही प्राप्ती करून दिल्यासारखे होते.

ज्या अर्थी या ऋचेचा पहिला चरण एका अक्षराने न्यून, अर्थात् अपूर्ण आहे, त्या अर्थी मनुष्याच्या वाणीचे स्वरूपही अपूर्ण असेच आहे. मनुष्याच्या शरीरात असलेल्या मूलाधारापासून म्हणजे नाभिस्थानापासून मस्तकाग्रापर्यंत जो वायू पसरलेला असतो, तो त्या त्या स्थानांच्या ठिकाणी वर्णाचे उत्पादन करीत असतो. मनुष्याच्या मुखातून जो वर्ण अभिव्यक्त होत असतो तो वाणीचे चौथे पद किंवा स्वरूप आहे. त्यापूर्वीची वाणीची पदे किंवा स्वरूपे कंठाच्या खाली असतात. त्यामुळे त्या त्या स्थानाच्या ठिकाणी वाणीचा उत्पन्न होणारा शब्द मुखावाटे बाहेर उत्पन्न होणेच शक्य नसते. एवं च, पूर्वोक्त ऋचेच्या पहिल्या चरणाचे व वाणीच्या स्वरूपाचे अपूर्णतेच्या दृष्टीने स्वरूपसाम्यच आहे.

आतापर्यंत वर्णिलेल्या ' विश्वे देवस्य नेतुः' या पूर्ण ऋचेने आहुती द्यावी. कारण प्रजापती हा पूर्ण आहे. यास्तव, पूर्ण ऋचेने अध्वर्यूने आहुती दिली तर ती यजमानाला प्रजापतीची प्राप्ती करून देण्याला कारणभूत होते. पहिल्या चरणाच्या ठिकाणी एका अक्षराने न्यून असलेल्या या ऋचेचे पठण करून अध्वर्यूने आहुती द्यावी. कारण सृष्टत्वाच्या दृष्टीने न्यून असलेल्या जगद्बीजापासून प्रजापती प्रजा निर्माण करीत असतो. यास्तव, न्यून अशा ऋचेने दिलेली आहुती यजमानापासून पुत्रपौत्रादि प्रजांची उत्पत्ती होण्याला कारणभूत होते. (अनुवाक २).

देव करीत असलेल्या यज्ञात आपण जाऊ नये असा विचार करून ऋग्देवता व सामदेवता या दोघींनी आपले स्वरूप झाकून घेण्यासाठी कृष्णमृगाचे म्हणजे

काळवीट जातीच्या हरिणाचे स्वरूप धारण केले. आणि त्या देवांच्यापासून दूर अशा एका गुप्त स्थळी निघून गेल्या. ऋक् व साम या दोनही देवता ज्याला प्राप्त होतील त्यालाच यज्ञाचे फळ प्राप्त होईल, असे देवांनी विचाराअंती ठरविले. आणि ते ऋक् व साम या देवतांचा शोध करण्याच्या खटपटीस लागले. ऋक् व साम या देवता ज्या गुप्त स्थळी जाऊन बसल्या होत्या तेथपर्यंत देव नाना प्रकारचे उपाय करून गेले. देवांनी आपल्याला गाठले, हे ऋक्सामदेवतांनी जाणले. तेव्हा त्या दोनही देवतांनी धारण केलेल्या आपल्या मृगशरीराच्या ठिकाणी अहोरात्रांच्या श्रेष्ठत्वाचे निदर्शक असे शुक्लकृष्णवर्णात्मक चिन्ह धारण केले. आणि त्या दोनही मृगशरीरधारी देवता देवांच्याजवळ आल्या. सारांश, कृष्णाजिनाच्या ठिकाणी शुभ्रवर्ण असे जे चिन्ह दिसत असते ते, ऋग्देवतेने स्वीकारलेल्या दिवसाचे निदर्शक असून कृष्णवर्ण असे दिसत असलेले चिन्ह सामदेवतेने स्वीकारलेल्या रात्रीचे निदर्शक होय.

दीक्षा ग्रहण करणाऱ्या यजमानाने आपल्या बसावयाचे जागी कृष्णाजिन पसरावे आणि त्या कृष्णाजिनावर असलेल्या शुक्ल व कृष्णवर्णी पट्ट्यांना हाताने स्पर्श करून ' हे शुक्लकृष्ण वर्ण हो, तुम्ही ऋक् व साम या देवतांनी निर्माण केलेले हस्तकौशल्यच आहात ' , अशा अर्थाचा ' ऋक्सामयोः शिल्पे स्थः' हा मंत्र म्हणावा. म्हणजे ऋक् व साम या दोनही मंत्रदेवतांचे संपादन केल्यासारखे होते.

कृष्णाजिनावर जो पांढऱ्या रंगाचा पट्टा असतो, तो दिवसाचा वर्ण असून, काळ्या रंगाचा जो पट्टा असतो, तो रात्रीचा वर्ण होय. यजमान ज्यावेळी या दोनही पट्ट्यांना आपल्या हाताने स्पर्श करतो, त्यावेळी तो जणू काय, ऋक्सामदेवतांनी आपल्या ठिकाणी गुप्त करून ठेवलेले अहोरात्रांचे सारच आपल्या स्वाधीन करून घेतो.

अध्वर्यूने आपल्या यजमानाला कृष्णाजिनाने दीक्षा द्यावी. म्हणजे त्याला कृष्णाजिनावर बसवावे व कृष्णाजिनच त्याला पांघरावयास द्यावे. कारण कृष्णाजिन हे वेदांचेच स्वरूप आहे. यास्तव, यजमानाला कृष्णाजिनाने दीक्षा दिली असता, अध्वर्यूने जणू काय, वेदांकडूनच त्याला दीक्षित केल्यासारखे होते.

कृष्णाजिनावर आरोहण करताना यजमानाने ' इमां धियं शिक्षमाणस्य देव' म्हणजे ' हे वरुणदेवा, अग्निष्टोमविषयाचे बौध्दिक शिक्षण देण्यास योग्य अशा मज यजमानाला ' इत्यादि अर्थ व्यक्त करणारा मंत्र पठण करावा. म्हणजे त्या मंत्रात जे फल त्याने अपेक्षित केलेले असते ते त्याला प्राप्त होते.

दीक्षा ग्रहण केलेला यजमान हा जणू गर्भच आहे. त्याने आपल्या अंगावर पांघरलेले कृष्णाजिन हे जणू काय त्या गर्भावरून वेष्टित असलेले तलम वस्त्रासारखे उल्बसंज्ञक चर्मच होय. आणि म्हणून चर्मवेष्टित असे गर्भच मातेच्या जननेंद्रियातून बाहेर येऊन जन्म पावत असतात.

सोमराजा विकत घेण्याचा विधी झाल्यानंतरच गर्भरूप असा यजमान जन्मास येत असतो. यास्तव, सोमराजा विकत घेतला गेल्यानंतरच यजमानाने आपल्या अंगावर पांघरलेले कृष्णाजिन दूर करावे. तोपर्यंत करू नये. सोमराजा विकत घेण्यापूर्वी जर यजमानाने आपल्या अंगावर पांघरलेले कृष्णाजिन दूर केले तर, त्याला होणाऱ्या प्रजांचे गर्भ व्यर्थतेला प्राप्त होऊन मातेच्या जननेंद्रियातून बाहेर पडतात. त्यांच्यापासून प्रजा जन्मास येत नाही. यास्तव, सोमराजा विकत घेतला गेला म्हणजे त्याने आपल्या अंगावरचे कृष्णाजिनाचे पांघरूण दूर करावे. कारण, सोमराजा विकत घेण्याचा विधी झाल्यानंतरच तो संस्काररूप असा नवा जन्म होत असतो. शिवाय, एखादा अत्यंत धनवान पुरुष किंवा राजा आपल्या सभास्थानी येऊन बसल्यानंतर ज्याप्रमाणे तो लोकांच्या दृष्टीस पडावा म्हणून त्याचे सेवक पडदा दूर करतात, तशाच प्रकारचे औचित्य यजमानाने आपला संस्काररूप जन्म झाल्यानंतर आपल्या अंगावरील कृष्णाजिनरूप पडदा दूर करण्यात निष्पन्न होत असते.

अंगिरस महर्षी जेव्हा स्वर्गलोकी जावयास निघाले तेव्हा त्यांनी आपल्या जवळ असलेला अन्नरस परस्परात वाटून घेतला. त्यापैकी जो भाग अवशिष्ट राहिला तोच ' शर ' नामक तृणाच्या रूपाने आविर्भूत झाला. म्हणजे त्या अवशिष्ट अन्नरसापासून ' शर ' नांवाचे तृण उत्पन्न झाले. एवं च, ' शर ' जातीचे तृण म्हणजे दर्भ हे अन्नरसरूपच असल्यामुळे यजमानाने आपल्या कमरेस बांधावयाची ' मेखला ' म्हणजे रज्जू (दोरी) शरनामक विशिष्ट जातीच्या दर्भाची करावी. शरमय अशी ती मेखला धारण केल्याने यजमानाने जणू अन्नरसाचे संपादन केल्यासारखे होते.

यजमानाने ती शरमय मेखला आपल्या शरीराच्या मध्यभागी गुंडाळावी. म्हणजे ती त्याच्या शरीराच्या मध्यभागी अन्नरसाची स्थापना करते. आणि म्हणूनच सर्व मनुष्ये आपल्या शरीराच्या मध्यभागीच अन्नरसाचे धारण करीत असतात. आता, शरीराचा मध्यभाग म्हणजे कोणता ? हा प्रश्न उपस्थित होतो. परंतु त्याचे समाधान असे की , पुरुषाच्या नाभीच्या ऊर्ध्व भागास ' मध्य ' असे नांव आहे. नाभीच्या वरचा भाग मेध्य म्हणजे पवित्र असून खालचा भाग अपवित्र असतो. यास्तव, यजमानाने नाभीच्या वरच्या भागी मेखला बांधली म्हणजे त्याने पवित्र भागाचा स्वीकार करून अपवित्र भागाचा त्याग केल्यासारखे होते.

इंद्राने वृत्रासुरावर जेव्हा आपल्या वज्राचा प्रहार केला तेव्हा ते वज्र भग्न होऊन त्याचे तीन तुकडे झाले. तीन तुकड्यांपैकी एका तुकड्यापासून ' स्फ्य ', दुसऱ्या तुकड्यापासून ' रथ ' व तिसऱ्या तुकड्यापासून ' यूप ' निर्माण झाला. इंद्राच्या त्या वज्राचे तुकडे होताना त्यातील जो बारीक चूर खाली जमिनीवर पडला, त्या चुरापासून शर नांवाचे दर्भ उत्पन्न झाले. वज्राच्या चुरापासून उत्पन्न

होणे हेच त्या शरांचे शरत्व होय. वज्राच्या चुरापासून उत्पन्न झालेले दर्भ हे वज्ररूपच होत. खरोखर क्षुधा ही मनुष्याचा शत्रूच आहे. यास्तव यजमानाने 'शर' नामक दर्भांची मेखला जर धारण केली तर त्याने जणू काय शरीराच्या मध्यभागी त्रास देणाऱ्या क्षुधारूप शत्रूला मेखलारूपी वज्राने प्रहार करून नष्ट केल्यासारखे होते.

मेखला तिपेडी म्हणजे तीनपदरी वळलेली असावी. कारण प्राणवायू हा त्रिगुण आहे. प्राण, अपान व व्यान या तीन वृत्तींनी तो युक्त आहे. यास्तव तीनपदरी मेखला यजमानाने आपल्या शरीराच्या मध्यभागी बांधली असता, ती यजमानाच्या ठिकाणी त्रिगुणात्मक प्राणाचे स्थापन करते. ही मेखला चांगली जाडी असावी. अगदी बारीक नसावी. अध्वर्यूने यजमानाला मेखलेने व पत्नीला योक्त्राने दीक्षा द्यावी. म्हणजे यजमानाकडून मेखलेचे व पत्नीकडून योक्त्राचे धारण करवावे. मेखला ही जणू यजमानाची स्त्री व योक्त्र हा पत्नीचा पतिरूप पुरुष , अशा प्रकारे, यजमान व पत्नी या दोघांच्या ठिकाणी अध्वर्यूने मिथुनभाव म्हणजे दांपत्याचे प्रतीक निर्माण केल्यासारखे होते.

यज्ञदे वाने दक्षिणादेवीचा एकसारखा ध्यास घेतला व त्याने तिच्याशी समागम केला. ही गोष्ट इंद्राला समजली. तेव्हा त्याने तर्क केला की , यज्ञदेव व दक्षिणादेवीच्या समागमामुळे जो पुत्र निपजेल त्याला सर्व ऐश्वर्य प्राप्त होईल. त्या अर्थी दक्षिणादेवीपासून आपणच पुत्ररूपाने जन्मावे, असे त्याने निश्चित केले. व तदनुसार त्याने दक्षिणादेवीच्या शरीरात प्रवेश केला आणि तो तिच्यापासून पुत्ररूपाने उत्पन्न झाला. नंतर त्याला असे वाटले की , आपल्या मागून दक्षिणादेवीला जो पुत्र होईल तोही माझ्याप्रमाणेच सर्व ऐश्वर्याचा भोक्ता होईल. यास्तव, असे होऊ नये, सर्व ऐश्वर्याचा उपभोग घेणारा मी एकटाच असावा, इतर कोणीही असू नये, असा विचार करून त्याने आपल्या मातेच्या म्हणजे दक्षिणादेवीच्या योनीवरून हात फिरवून म्हणजे तिची योनी आपल्या हाताने पिरगळून टाकली. अर्थात् ती त्याची माता दक्षिणादेवी एकदा इंद्राला जन्म दिल्यानंतर वांझच झाली. तेव्हापासून या जगात एक अपत्य झाल्यानंतर वांझ होणाऱ्या स्त्रिया निर्माण होऊ लागल्या. इंद्राने आपल्या हाताने पिरगळून तोडलेली ती योनी त्याने आपल्या हाताच्या मुठीत घट्ट धरून ती काळवीट जातीच्या हरिणाच्यावर फेकली. ती योनी काळविटांच्या ठिकाणी 'कृष्णविषाणा' या संज्ञेने व्यक्त केल्या जाणाऱ्या कृष्णवर्णी शिंगांच्या रूपाने आविर्भूत झाली. यास्तव ' हे कृष्णविषाणे, तू इंद्राला जन्म देणारी योनीच आहेस, तरी तू माझी हिंसा करू नको,' असा अर्थ असणारा 'इंद्रस्य योनिरसि मा मा हिंसीः, हा मंत्र म्हणून अध्वर्यूने कृष्णविषाण म्हणजे हरणाचे शिंग यजमानाच्या हाती द्यावे. असे केल्याने त्याने आपल्या यजमानाचा यज्ञ योनियुक्त केल्यासारखे होते. आणि अशा प्रकारे योनियुक्त

असा होणारा तो यज्ञ दक्षिणेला आणि इंद्रालाही सयोनित्व प्राप्त करण्याला कारणभूत होतो. कृष्णविषाणसंज्ञक हरणाच्या शिंगाने जमीन खणून तिचे ढेकूळ उकरताना यजमानाने 'कृष्यै त्वा सुसस्यायै' हा मंत्र म्हणावा. 'हे मृल्लोष्ठ, भरपूर पिकाने युक्त अशी शेती व्हावी म्हणून मी तुला उकरतो, असा त्या मंत्राचा भावार्थ आहे. हा मंत्र पठण केला जात असल्यामुळेच नांगरट न केलेल्या जमिनीत देवभातासारखी काही धान्ये पिकत असतात. 'हे मस्तका, उगवलेल्या शेतांच्या पासून उत्कृष्टफलसंपन्न अशी धान्ये पिकावीत म्हणून मी तुला खाजवीत आहे,' अशा अर्थाचा मंत्र हरिणाच्या शिंगाने आपले मस्तक खाजवीत असताना यजमानाने म्हणावा. या मंत्राचे पठण केल्याने उगवलेली पिके सत्त्वसंपन्न अशा फळाचे म्हणजे धान्यकणांचे ग्रहण करणारी होतात.

यजमानाने जर आपले शरीर हाताने खाजविले तर त्याच्या प्रजा खरजेने पीडित होतात. आणि यजमान लोकांना दिसेल असा हसला तर प्रजा दारिद्र्याने वस्त्ररहित होतात. यास्तव, शरीर खाजविणे झाल्यास जवळ बाळगलेल्या हरिणाच्या शिंगाने खाजवावे व कारणपरत्वे हसू आल्यास तोंडावर वस्त्राचा पदर धरून त्या पदराच्या आड हसावे. म्हणजे त्याच्या प्रजांचे दोनही प्रकारे रक्षण होते.

ऋत्विजांना दिलेल्या दक्षणा त्यांनी नेईपर्यंत यजमानाने आपल्या जवळचे कृष्णविषाणा नांवाचे हरिणाचे शिंग टाकून देऊ नये. ऋत्विजांनी दक्षणा घेऊन जाण्यापूर्वी जर त्याने कृष्णविषाणाचा त्याग केला तर त्याने आपल्या प्रजांच्या योनीचाच त्याग केल्यासारखे होईल. यास्तव, ऋत्विजांनी आपापल्या दक्षणा नेल्या म्हणजे चात्वालनामक स्थानावर त्याने आपल्या जवळची कृष्णविषाणा टाकून द्यावी. कारण, चात्वाल ही यज्ञाची योनीच आहे. व कृष्णविषाणा हीही यज्ञाची योनीच आहे. यास्तव, चात्वालावर कृष्णविषाणा टाकली असता योनीच्या ठिकाणी योनीचेच स्थापन केल्यासारखे होते. व ते स्थापन यज्ञाला सयोनित्व प्राप्त करण्यालाही कारणभूत होते. (अनुवाक ३).

यज्ञाकडे जाण्याकरिता वाणी देवांच्यापासून दूर निघून गेली. आणि ती वनस्पतींच्या ठिकाणी प्रविष्ट झाली. दुंदुभी, तूणव नांवाचे वाद्य म्हणजे पावा किंवा बासरी व वीणा म्हणजे बीन या नांवाचे वाद्य, या सर्व वस्तू वनस्पतिजन्य होत. कारण दुदुंभी वाजविताना तिच्यावर ज्या टिपरीने आघात करावयाचा असतो ती वनस्पतिजन्य म्हणजे वृक्षाच्या ताशीव लाकडाची केलेली असते. तूणव म्हणजे पावा किंवा बासरी नांवाचे वाद्य हे तर एका कळकाच्या पोकळ नळीला भोके पाडून तयार केलेले असते. त्याचप्रमाणे वीणेची म्हणजे बीन नांवाच्या वाद्याची दांडी पोकळ कळकाची किंवा तासून व पोखरून पोकळ केलेल्या लाकडाची असते.

सारांश, ही तीनही वाद्ये वनस्पतिजन्य आहेत. यासाठी अध्वर्यूने दीक्षा ग्रहण करणाऱ्या यजमानाला हाती धरण्यासाठी लाकडाचा दंड द्यावा. असे केल्याने त्याला वाणीचीच प्राप्ती करून दिल्याप्रमाण होते. दंड उंबराच्या लाकडाचा असावा. उंबराचा वृक्ष हा अन्नरूप आहे. म्हणून उंबराचा दंड दिला असता यजमानाला अन्नाची प्राप्ती होते. दंडाची उंची यजमानाच्या मुखापर्यंत असावी. म्हणजे अध्वर्यूने जणू यजमानाच्या मुखामध्येच अन्न घातल्यासारखे होते. आणि म्हणूनच यजमान मुखाने अन्नाचे भक्षण करतो. सोमराजा विकत घेतल्यावर यजमानाने आपल्या हाती धारण केलेला दंड मैत्रावरुणाला द्यावा. कारण मैत्रावरुण हाच सर्वांच्या पूर्वी ऋत्विजांना मंत्ररूपी वाणी विभागून देत असतो. आणि मग ते ऋत्विज यजमानाच्या ठिकाणी मंत्ररूप वाणीचे स्थापन करतात. म्हणजे यजमानाकरता मंत्र म्हणतात.

'स्वाहा यज्ञं मनसा 'असा मंत्रांश यजमानाने पठण करावा. कारण कोणताही पुरुष मनाच्या प्रेरणेनेच यज्ञाकडे जात असतो. 'स्वाहा द्यावापृथिवीभ्याम्' असा दुसरा मंत्रांश यजमानाने पठण करावा. कारण द्युलोक व पृथ्वी या दोन लोकांच्या आधारावर म्हणजे आनु कू ल्यावरच यज्ञ सं पादित के ला जात असतो . पृ थ्वीवर यज्ञाचे अनुष्ठान करण्यात येते व त्या यज्ञाचे फल यजमानाला द्युलोकात मिळत असते, हे सांगावयास नको. 'स्वाहोरोरन्तरिक्षात्' हा तिसरा मंत्राश यजमानाने पठण करावा. कारण विस्तीर्ण अशा अंतरिक्षात - अर्थात् मोकळ्या जागेतच यज्ञ होत असतो. म्हणजे यज्ञाच्या अनुष्ठानाचा विस्तार होत असतो. ' स्वाहा यज्ञं वातादारभे' हा चौथा मंत्रांश यजमानाने पठण करावा. कारण, अंतराळात वायू वाहत असतो. वारा वाहत असल्यावाचून कोणतीच क्रिया घडत नाही. म्हणून वायू हाच यज्ञरूप आहे. अर्थात् चौथा मंत्र पठण केला असता त्या वायुरूप यज्ञाचा प्रारंभ यजमानाने केल्यासारखे होते.

यजमानाने करंगळीपासून आपल्या दोन्ही हातांची बोटे मिटून मुठी कराव्यात. आणि वाङ्‌नियम करावा. म्हणजे लौकिक भाषण वर्ज्य करावे. अशाप्रकारे त्याने वळलेल्या मुठी या जणू काय त्या यजमानाने, या यज्ञाचे अनुष्ठान मी प्रमादरहित असेच करीन, अशा प्रकारची आपल्या मनाची धारणा केली असल्याचीच व्यक्तता करतात. वाङ्‌नियम केल्याने केवळ मंत्ररूप वाणीच आपल्या ठिकाणी धारण केल्याचेही सहजच व्यक्त होते.

या ब्राह्मणाने यज्ञाची दीक्षा ग्रहण केली आहे, अशा अर्थाचा 'अदीक्षिष्टायं ब्राह्मणः 'हा मंत्र तीन वेळ हलक्या स्वरात म्हणावा. म्हणजे त्याने आपल्या यजमानाने यज्ञदीक्षा घेतल्याचे वृत्त देवांना निवेदन केल्यासारखे होते. मग तोच मंत्र तीनदा मोठ्याने म्हणावा. त्या योगाने यजमानाने दीक्षा घेतल्याचे वृत्त मनुष्यांना कळविल्यासारखे होते.

कांड ६ - प्रपाठक १

सांयकाळी आकाशात नक्षत्रे दिसू लागेपर्यंत यजमानाने वाङ्नियमाचे विसर्जन करू नये. त्यापूर्वी जर वाङ्नियमाचे विसर्जन केले तर त्याने यज्ञाचा विच्छेदच केल्यासारखे होते. आकाशात नक्षत्रे दिसू लागली म्हणजे 'व्रतं कृणुत' म्हणजे 'यज्ञदीक्षांगभूत मला दुग्धाहार करण्याकरिता दूध तापवून तयार करा,' अशी परिकर्म्यांना म्हणजे यज्ञाच्या कामी मदत करणाऱ्या स्वयंसेवकांना सूचना द्यावी व नंतर वाङ्नियमाचे विसर्जन करावे. कारण दीक्षा धारण केलेला यजमान हा यज्ञाचे व्रतच धारण केलेला असतो. म्हणजे दीक्षांगभूत असा दुग्धाहार सेवन करूनच राहत असतो. अर्थात् त्या संबंधीची सूचना देऊन नंतर वाङ्नियमाचे विसर्जन केल्याने यज्ञाचा विच्छेद केल्याचा दोष लागत नाही. कारण दिलेली सूचना ही देखील यज्ञाला धरूनच केलेली असते. अर्थात् ती देण्यासाठी केलेले वाङ्नियमाचे विसर्जन हे सदोष होऊ शकत नाही. नक्षत्रोदय होण्यापूर्वी कारणपरत्वे वाङ्नियमाचे विसर्जन झाल्यास त्या दोषाचे प्रायश्चित म्हणून यजमानाने ' इदं विष्णुर्विचक्रमे 'या विष्णुलिंगात्मक ऋचेचे पठण करावे. कारण यज्ञ हा विष्णुरूपच आहे. यास्तव, विष्णुलिंगात्मक म्हणजे विष्णु हा शब्द जीमध्ये आहे, त्या ऋचेचा जप केला असता, विष्णूकडूनच यज्ञविच्छेदाचा दोषनाश करून तो यज्ञ पुनः सांधल्यासारखे होते.

' दैवीं धियं मनामहे 'हा मंत्रांश यजमानाने पठण करावा. म्हणजे त्याने यज्ञाला मृदू केल्यासारखे होते. ' सुपारा नो असद्वशे' हा 'दैवीं धियं' या पठण केल्या जाणाऱ्या मंत्राचा शेवटचा अंश होय. या अंशाचे पठण करावे. त्या योगाने यजमानाने जणू काय आपल्या यज्ञाचे संपूर्णपणे प्रकाशन केल्यासारखे होते.

दीक्षा धारण केलेल्या यजमानाच्या घरी नित्याचा अग्निहोत्र करावा किंवा करू नये, याविषयी ब्रह्मवादी विद्वान परस्परांमध्ये विचार करीत असतात. जर अग्निहोत्र होम केला तर दीक्षा धारण केलेला यजमान हाच हविर्द्रव्यरूप असल्याने त्या हविर्द्रव्यरूप यजमानाचेच अवदान घेऊन अग्निहोत्र होम केल्यासारखे होईल. आणि अग्निहोत्र होम जर न केला तर यज्ञाचे एक अंगच अंतरल्यासारखे होईल. यासाठी यजमानाने दीक्षांगभूत दुग्धाहार सेवन करावयाच्या वेळी, ' ये देवा मनोजाता मनोयुजः ' हा मंत्र म्हणावा. कारण यजमानाचे प्राण हेच मनोजात म्हणजे सृष्टी उत्पन्न होताना मनाबरोबरच उत्पन्न होणारे आणि व्यवहारकाळी मनाशी संयुक्त होणारे देव होत. अर्थात् दुग्धाहार घेताना आता सांगितलेला मंत्र यजमानाने पठण केला असता, अप्रत्यक्ष रीतीने त्याने प्राणरूपी देवांनाच आहुती दिल्यासारखे होते. आणि अशा युक्तीमुळे एका दृष्टीने अप्रत्यक्षपणे अग्निहोत्र होम केल्यासारखे होते व प्रत्यक्षतः अग्निहोत्र होम न केल्यासारखेही होते.

सूर्यास्ताचे वेळी यजमानाने ' यच्चिध्दि ते विशो यथा ' या वरुणलिंगात्मक ऋचेने अग्नीची उपस्थानरूप परिचर्या करावी. म्हणजे अग्नीला स्वकीय वाटणाऱ्या वरुणदेवतेसह अशा अग्नीचीच जणू त्याने उपस्थानरूप परिचर्या केली असे होते.

यजमान रात्री निजला म्हणजे राक्षस त्याला मारीत असतात. अग्नी हा राक्षसांचा निश्चितपणे नाश करणारा आहे. यास्तव, झोपी जाण्याचे वेळी यजमानाने, ' अग्ने त्वं सुजागृहि वयं सुमन्दिषीमहि ' हा मंत्र म्हणावा. ' हे अग्निदेवा, तू सावधानतेने जागा रहा, आमच्या रक्षणाचा भार तुझ्यावर टाकून आम्ही निर्भयपणे झोपतो' , असा या मंत्राचा भावार्थ आहे. यास्तव, या मंत्राचे पठण करून मग झोपले असता, अग्नीला आपला रक्षणकर्ता म्हणून नियोजित करून यजमान झोपल्यासारखे होते. आणि अशा प्रकारे पूर्वोक्त मंत्राचे पठण झाल्यानंतर यजमानाचे निद्रावश होणे, हे त्याला मारावयास येणाऱ्या राक्षसांचा, त्याचा संरक्षक असलेल्या अग्निदेवाकडून नाश होण्याला कारणभूत होते.

दीक्षा ग्रहण केलेला जो यजमान रात्री झोप घेतो, तो स्वतःलाच व्रतभ्रष्ट झाल्यासारखे करतो. यासाठी झोपणाऱ्या यजमानाने मध्यरात्र उलटल्यावर जागे होऊन ' त्वमग्ने व्रतपा असि 'या मंत्राचे पठण करावे. कारण देवांमध्ये अग्नी हा व्रताचे पालन करणारा देव आहे. यास्तव, या मंत्राचे पठण केले असता, तो अग्निदेव त्या यजमानाला व्रतभ्रष्ट होऊ न देता त्याच्या व्रताचे पालन करतो. 'देव आ मर्त्येषु' असा पूर्वोक्त मंत्राचा दुसरा चरण यजमानाने म्हणावा. कारण अग्नी हा अमर असा देव असून मर्त्य अशा मानवांमध्ये तेजोरूपाने अवतीर्ण होत असतो. ' त्वं यज्ञेष्वीड्यः 'हा पूर्वोक्त मंत्राचा शेवटचा तिसरा चरण असून 'अग्निदेवच यज्ञामध्ये स्तविला जातो ', असा त्या चरणाचा भावार्थ आहे.

निद्रिस्त असलेल्या दीक्षितापासून त्याचे इंद्रीयसामर्थ्य आणि देवता त्याच्यापासून दूर जात असतात. यासाठी ' विश्वेदेवा अभि मा माऽववृत्रन्' हा मंत्र यजमानाने म्हणावा. म्हणजे तो मंत्र त्या यजमानाला त्याचे इंद्रियसामर्थ्य व देवता यांच्याशी संयुक्त करतो.

पूर्वोक्त ' विश्वेदेवा अभि मा मा' . हा यजुर्मंत्र यजमानाने जर पठण केला नाही, तर दीक्षा ग्रहण करते वेळी त्याच्याजवळ जितके पशू असतात तितकेच अखेरपर्यंत राहतात. त्यांत वाढ होत नाही. परंतुयजमानाने जर पूर्वोक्त मंत्र म्हटला तर त्या मंत्राच्या प्रभावाने यजमान परलोकी गेल्यावर त्याला अपरिमित असे पशू प्राप्त होतील. कारण त्या मंत्रात, ' हे सोमदेवा, या यज्ञकर्मामध्ये ज्या ज्या वस्तूंची अपेक्षा असते त्या त्या सर्व वस्तू तू मला दे; सर्व वस्तूंच्या संपूर्णतेने तू मला युक्त कर, 'असा अर्थ व्यक्त होणारा मंत्र यजमानाकडून पठण केला जात असतो. त्यामुळे त्या यजमानाला परलोकी अपरिमित पशूंची प्राप्ती होणे युक्तच आहे.

''चंद्रमसि मम भोगाय भव' इत्यादि अंशांनी युक्त असलेला मंत्र यजमानाने, यज्ञासाठी लोकांकडून द्रव्यनिधि गोळा करून आणणाऱ्यांनी आणलेल्या सुवर्णादि वस्तूंचा स्वीकार करतांना म्हणावा. म्हणजे त्या त्या अंशात व्यक्त केलेल्या देवतांच्या साठी त्या त्या वस्तूंचा परिग्रह केल्यासारखे होते. ' वायवे त्वा, वरुणाय त्वा निऋत्यै त्वा, रुद्राय त्वा ', हा मंत्र यजमानाने म्हणावा. कारण या मंत्रात उच्चारल्या जाणाऱ्या वायू इत्यादि देवतांचा उच्चार करून त्यांना जर स्वीकारलेल्या वस्तू प्रदर्शित केल्या नाहीत तर, ज्या ज्या देवतांचा निर्देश करून त्या त्या वस्तूंचा स्वीकार केला असेल तो व्यर्थ होईल. म्हणजे त्या त्या देवतेसाठी त्या त्या वस्तूंचा स्वीकार केल्याप्रमाणे होणार नाही. इतकेच नव्हे तर त्या सर्व देवतांपासून यजमानाची ताटातूट होईल. आणि आता सांगितलेला मंत्र जर यजमानाने म्हटला तर स्वीकृत केलेल्या सर्व वस्तू वायू इत्यादि देवतांना प्रदर्शित केल्यासारखे होईल आणि इतर ज्या ज्या देवतांच्या ज्या ज्या वस्तूंचा स्वीकार केला असेल त्या त्या वस्तू त्या त्या देवताना यजमानाने समर्पण केल्यासारखे होईल. अर्थात् देवतांच्यापासून यजमानाची ताटातूट होणार नाही.

दीक्षा ग्रहण केलेल्या यजमानाला कारणपरत्वे प्रवास करण्याचा ५ त्यातही उदक प्रवाहातून पलीकडे जावयाचा प्रसंग आल्यास उदकातून पलीकडे जाताना यजमानाने ' देवीरापो अपां नपात्' हा मंत्र म्हणावा. त्या योगाने जणू काय ' हे उदक देवतांनो, तुम्हाला अर्पण करावयाजोगे पवित्र व यज्ञयोग्य असे जे जे तुमच्या ठिकाणी असेल, त्या त्या तुमच्या वस्तूच मी आपल्या पायांनी आक्रमण करणार नाही,' असेच त्या उदकदेवतांना उद्देशून म्हटल्याप्रमाणे होते. ' अच्छिन्नं तंतुं पृथिव्या अनुगेषम्' हा पूर्वोक्त मंत्राचा शेवटचा अंश यजमानाकडून म्हटला जात असतो. त्या योगाने त्या उदकप्रवाहाच्या ठिकाणी जणू पूल तयार करून त्या पुलावरून यजमानाने पलीकडे गेल्यासारखे होते. (अनुवाक ४).

देवांचे यजन करावयास योग्य असे स्थान शोधण्याकरिता देवांनी अनेक ठिकाणी भ्रमण केले. शेवटी त्यांना जसे हवे होते तसे उत्कृष्ट स्थान त्यांना आढळले. आणि हेच स्थान देवयजनास म्हणजे यज्ञाचे अनुष्ठान करण्यास योग्य आहे असा निश्चय करून त्या ठिकाणी यज्ञमंडप उभारण्याचा त्यांनी बेत केला. परंतु, दीर्घकाळ व अनेक प्रदेशांतून देवयजनयोग्य स्थळ शोधण्यासाठी अत्यंत परिभ्रमण करावे लागल्यामुळे त्या देवांची दिशाभूल झाली. त्यामुळे ज्या प्राग्वंशनामक शालेवर पूर्वाग्र असे वासे घालावयाचे असतात ती शाला उभारण्यास ते असमर्थ झाले. पूर्व दिशा कोणती? हेच त्यांच्या ध्यानी येईना. तेव्हा ' तू दिशा दाखव, कोणती दिशा कोणीकडे आहे, हे तू शोधून काढ,' असे ते एकमेकांना म्हणू लागले. कोणती दिशा कोणीकडे आहे, हे सांगण्यास अदिती हीच एकटी समर्थ

आहे, असे त्यांनी आपल्या ठिकाणी निश्चित ठरविले. आणि त्याप्रमाणे त्यांनी, ' हे अदिति, तू आम्हाला दिशांचा बोध करून दे,'अशी प्रार्थना केली. तेव्हा अदितीने ' मी तुम्हाला दिशांचा बोध करून देईन, परंतु तुम्ही जो यज्ञ कराल, त्या यज्ञाच्या प्रारंभापासून समाप्तीपर्यंत मी त्या यज्ञाची देवता असावे, असा तुम्ही मला वर दिला पाहिजे,' असे सांगितले. ते देवांनी मान्य केले . ' प्रायण 'म्हणजे प्रारंभ व ' उदयन 'म्हणजे समाप्ती होय. यास्तव, सोमयागाच्या प्रारंभी जी इष्टी करावी लागते त्या प्रायणीयेष्टीमध्ये व सोमयागाच्या शेवटी जी इष्टी करावयाची असते त्या उदयनीयेष्टीमध्ये अदिती ही मुख्य देवता कल्पावी.

पूर्व इत्यादि चार व ऊर्ध्व मिळून पांच दिशांचे ज्ञान होण्यासाठी प्रायणीयेष्टीमध्ये अदिती ही मुख्य देवता आणि दुसऱ्या चार अंगदेवता मिळून पांच देवतांचे यजन करावे. पंक्ती छंद हा पांचअक्षरी असून यज्ञ हा पांचच हविर्द्रव्यांनी पांक्त म्हणजे पूर्ण होत असतो. यास्तव, प्रायणीयेष्टीमध्ये पांच देवतांचे यजन केले असता यजमानाने पंक्ती छंद व तद्द्वारा पांक्त अशा यज्ञाचा प्रारंभ केल्यासारखे होते.

मार्गक्रमण करताना कल्याण करणारी देवता ती ' पथ्यास्वस्ति' होय. पथ्यास्वस्ती देवतेचे यजन करून तिच्या योगाने देवांनी पूर्व दिशा ओळखली. अग्नीचे यजन करून त्या अग्नीकडून दक्षिण दिशेचे देवांनी ज्ञान करून घेतले. सोमदेवाचे यजन करून त्यांनी पश्चिम दिशा समजून घेतली. सविता देवतेचे यजन करून देवांनी उत्तर दिशा व अदिती देवतेचे यजन करून तिच्या द्वारा त्यांनी ऊर्ध्व दिशा समजून घेतली. यासाठी प्रायणीयेष्टीमध्ये पथ्यास्वस्ती देवतेचे पूर्व दिशेस यजन करावे. म्हणजे तिच्या अनुग्रहाने पूर्व दिशेचे निश्चित ज्ञान होते. पथ्यास्वती देवतेच्या यजनानंतर दक्षिण दिशेस अग्नीचे व पश्चिम दिशेस सोमाचे यजन करावे. म्हणजे दक्षिण व पश्चिम दिशेचे नीटपणे ज्ञान होते. शिवाय अग्नी व सोम हे यज्ञाचे दोन नेत्रच आहेत. अर्थात् त्यांच्या अनुग्रहाने यजमान आपल्या दोनही नेत्रांनी दक्षिण व पश्चिम ह्या दोनही दिशा स्पष्टपणे पाहतो. अग्नी व सोम यांच्या यजनानंतर सवितादेवाचे उत्तरेस यजन करावे. म्हणजे त्या देवाच्या प्रेरणेनेच यजमान उत्तर दिशा निश्चितपणे जाणतो. सवित्तादेवाचे यजन झाल्यावर ऊर्ध्व दिशेस म्हणजे मध्यभागी अदिती देवतेचे यजन करावे. अदिती म्हणजे भूदेवताच होय. अर्थात् अदितीच्या यजनाने या भूलोकावरूनच यजमान ऊर्ध्व दिशेचे नीटपणे अवलोकन करू शकतो. अदिती देवतेचे यजन झाल्यावर 'मारुती' म्हणजे मरुत् पदाने युक्त अशा 'मरुतां यद्धवो दिवः' ह्या ऋचेचे पठण करावे. कारण 'मरुत्' हे देवांमधील वैश्य आहेत. देवांमधील धनाढ्य अशा मरुत्संज्ञक वैश्यांच्या अनुकरणानेच मनुष्यसमाजात धनाढ्य असे वैश्य निर्माण होत असतात. यास्तव, आपल्या राष्ट्रात धनसंपादक असे वैश्य निर्माण व्हावयासाठी यजमानाने

अदिती देवतेच्या यजनानंतर पूर्वोक्त ऋचेचे पठण केले असता, ते धनाढ्य वैश्यांच्या निर्मितीला कारणभूत होते.

प्रकृतिभूत दर्शपूर्णमासेष्टीमध्ये प्रधान देवतांच्या यागापूर्वी 'समित्' इत्यादि पांच देवतांचे जे यजन करण्यात येते, त्यास प्रयाज अशी संज्ञा असून प्रधानदेवतांच्या यागानंतर 'बर्हि' इत्यादि तीन देवतांचे जे यजन करावे लागते त्यास अनूयाज असे नांव आहे. प्रयाज हे यागाच्या प्रारंभाचे निदर्शक असून अनूयाज हे समाप्तीचे निदर्शक होत. यास्तव काही ब्रह्मवादी असे म्हणतात की, सोमयागाच्या प्रारंभाची निदर्शक असणाऱ्या 'प्रायणीया' इष्टीचे अनुष्ठान प्रयाजसहित व अनूयाजरहित करावे. आणि सोमयागाच्या समाप्तीची निदर्शक उदयनीया इष्टीचे अनुष्ठान प्रयाजरहित व अनूयाजसहित करावे. कारण, प्रायणीयेष्टीत जर अनूयाजाचे अनुष्ठान केले तर दुसऱ्याच सोमयागाचा प्रारंभ केल्यासारखे होऊन चालू केलेला सोमयाग मध्येच अधांत्री राहील. त्याच्या अनुष्ठानपरंपरेचा विच्छेद होईल. यास्तव, आता सांगितल्याप्रमाणे प्रायणीयेष्टीत केले जाणारे केवळ प्रयाज प्रकृत सोमयागाच्या प्रारंभाचे प्रतीक होऊन उदयनीयेष्टीत केलेले केवळ अनूयाज प्रकृत. सोमयागाच्या समाप्तीचे प्रतीक होतील. आणि म्हणूनच असे करावे हे युक्त आहे.

यावर दुसरे ब्रह्मवादी म्हणतात की, तसे करू नये. कारण, प्रयाज व अनूयाज हे सोमयागाचे अंगभूत आहेत, हे म्हणजे बरोबर नाही. प्रयाज हे यजमानाचा जणू आत्मा असून अनूयाज हे त्याची प्रजा होत. यास्तव, प्रयाज जर अंतरले तर यजमान आपल्या आत्म्यालाच अंतरेल व अनूयाज अंतरले तर तो आपल्या प्रजांना अंतरेल. शिवाय, आरंभिलेल्या सोमयागाची अंगे म्हटले तरी देखील या अंगापैकी एखादे अंग न केले तर यज्ञाच्या ठिकाणी अंगवैकल्य उत्पन्न होईल. व त्यामुळे आरंभिलेला यज्ञ पराभूत अर्थात् विफल होईल. आणि त्या पराभूत झालेल्या यज्ञाला अनुसरून यजमानही पराभव पावेल. सारांश, सिध्दान्त असा की, प्रायणीयेष्टीचे अनुष्ठान प्रयाज व अनूयाज या दोहोंनी युक्त असे करावे. व त्याचप्रमाणे उदयनीयेष्टीचे अनुष्ठानही प्रयाज व अनूयाज यांच्या सहच करावे. म्हणचे त्या योगाने यजमान आपल्या आत्म्याला अंतरत नाही व प्रजांनाही अंतरत नाही. अंगवैकल्य घडत नसल्याने आरंभिलेला सोमयज्ञ पराभूत होत नाही आणि यजमानही पराभव पावत नाही. आता पूर्वपक्षीय ब्रह्मवादी यांची यज्ञविच्छेदाबद्दलची जी शंका आहे, तिचेही समाधान असे की, प्रायणीयेष्टीमध्ये जो चरू शिजविल जातो त्याचा निष्कास म्हणजे चरुस्थालीच्या बुडाशी असलेली चरूची खरवड तशीच राखून ठेवावी, आणि उदयनीयेष्टीमध्ये चरूचा नीर्वाप करताना म्हणजे चरू शिजविताना शिल्लक ठेवलेली ती खरवड त्या तांदुळात मिसळूनच चरू शिजवावा. म्हणजे प्रायणीयेष्टीत शिजवलेल्या चरूचे व उदयनीयेष्टीत

शिजविल्या जाणाऱ्या चरूचे सांतत्य होईल व हेच सांतत्य आरंभिलेल्या यज्ञानुष्ठानाचेही सांतत्य होय.

प्रायणीयाष्टीच्या ज्या 'याज्या' आहेत त्याच उदयनीयेष्टीतही उपयोगात आणाव्यात, असे कोणी म्हणतात. परंतु तसे केल्याने यजमान इहलोकाला मात्र पारखा होईल व अंती स्वर्गलोकालाही जाऊ शकणार नाही. फुकट एकाएकी मरेल. यास्तव, प्रायणीयेष्टीमधील ज्या याज्या आहेत त्या उदयनीयेष्टीत पुरोनुवाक्या म्हणून उपयोगात आणाव्यात. आणि प्रायणीयेष्टीतील पुरोनुवाक्या उदयनीयेष्टीमध्ये याज्या कल्पून पठण कराव्यात. असे केल्याच्या योगाने यजमान अंती स्वर्गलोकीही जाईल व इहलोकीही प्रतिष्ठितपणाने दीर्घकाळ जगेल. (अनुवाक ५) .

कश्यप महर्षींच्या कद्रू व सुपर्णी य नांवाच्या दोन स्त्रिया होत्या. त्या दोघी सवतींमध्ये सुस्वरूपतेबद्दल स्पर्धा उत्पन्न झाली. कद्रू म्हणे, 'मी तुझ्यापेक्षा सुस्वरूप आहे,' सुपर्णी म्हणे 'मी तुझ्याहून सुंदर आहे.' शेवटी हा सवतीसवतींमधील स्पर्धाविषयक वाद निर्णयासाठी मध्यस्थांच्याकडे उभयतांनी नेला. मध्यस्थांनी कद्रू हीच सुपर्णीपेक्षा अधिक रूपसुंदर आहे, असा निर्णय दिला. व त्या वादात सुपर्णी पराजित झाली. मध्यस्थांच्याकडे निर्णयाचे काम सोपविण्यापूर्वी दोघींमध्ये असा संकेत ठरला होता की, या वादात जी पराजित होईल तिने विजयी झालेल्या आपल्या सवतीचे दास्य करावे. अर्थात् कद्रू ही विजयी झाल्यामुळे सुपर्णीला तिचे दास्य करणे भागच झाले. ती आपल्या सवतीची दासी झाली व कद्रू तिला दासीप्रमाणे वागवूही लागली. तथापि, आपल्या दास्यापासून मुक्त होण्याचा एक उपाय तिने सुपर्णीला आपण होऊन सांगितला. तो असा की, या भूलोकापासून तिसऱ्या टप्प्यावर जो द्युलोक म्हणजे स्वर्गलोक आहे, त्या ठिकाणी 'सोम' नांवाची एक वेली आहे. ती सोमवल्ली आपल्या मोबदल्यात जर तू मला आणून दिलीस तर मी तुला माझ्या दास्यातून मुक्त करीन.

कद्रू ही भूलोकरूप असल्यामुळे स्वतः स्वर्गलोकात जाऊन सोमवल्ली आणण्यास ती असमर्थ होती. सुपर्णी ही द्युलोकरूप असल्याने व द्युलोकात उडून जाण्याचे सामर्थ्य असलेल्या गायत्र्यादि छंदोरूपी पुत्रांची ती माता असल्यामुळे तिला स्वर्गलोकातून सोमवल्ली आणणे शक्य होते. यामुळे सुपर्णी आपल्या गायत्र्यादि छंदस्वरूपी पुत्रांना म्हणाली की, हे पुत्रहो, अत्यंत दुःखप्रद अशा 'पुं' नांवाच्या नरकापासून आपले परित्राण म्हणजे रक्षण व्हावे, या हेतूनेच मातापितरे पुत्रांचे पोषण करतात. आपल्या आईबापांचे पुंनामक नरकापासून जे संरक्षण करतात तेच खरे पुत्र होत. हे पुत्र हो, सांप्रत मी कद्रूची दासी झालेली आहे. 'द्युलोकात असलेला वल्लीरूप सोम मला आणून दे आणि त्याच्या मोबदल्यात आपला देह मजकडून विकत घे, मला सोमवल्ली आणून दिलीस तर

तुला मी माझ्या दास्यातून मुक्त करीन ' असे कद्रू मला म्हणाली आहे. हे पुत्रहो, कद्रूचे हे माझ्याशी झालेले भाषण लक्षात घ्या आणि तुम्हास उचित दिसेल ते करा.

'गायत्री 'इत्यादि छंदांना आपल्या इच्छेस येईल ते रूप धारण करण्याची शक्ती होती. 'जगती छंद हा पूर्वी चौदाअक्षरी चरणांचा होता. त्या चतुर्दशाक्षरी जगती छंदाने पक्ष्याचे रूप धारण करून द्युलोकात उड्डाण केले. आणि सोमवल्ली संपादन करण्यासाटी सोमवल्लीचे संरक्षक असणाऱ्या स्वान, भ्राज इत्यादि गंधर्वांच्याशी त्या जगतीने युद्ध केले. पण त्या युद्धात तिला जय मिळाला नाही. अर्थात् सोमवल्ली तिला संपादन करता आली नाही. उलट, तिच्या चरणाक्षरांपैकी दोन अक्षरे स्वान इत्यादि गंधर्वांनी हिरावून घेतली. सोमवल्ली जरी तिला मिळाली नाही, तरी त्या जगतीने अग्निषोमीय, सवनीय व अनूबंध्यसंज्ञक पशुयागांच्या व तदंगभूत होणाऱ्या इष्टीच्या योगाने साध्य होणारी दीक्षा आणि पशू यांना आपल्या बरोबर घेऊन ती परत आली. पशूंना घेऊन ती परत आल्यामुळे ती पशुप्रद अशी झाली.आणि म्हणूनच, पशुसंपत्तीने युक्त असतो तोच सोमयागाची दीक्षा घेण्यास प्रवृत्त होतो.

चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने तेराअक्षरी असलेल्या त्रिष्टुप् छंदाने सोमवल्ली आणण्यासाठी द्युलोकात भरारी मारली. परंतु, त्यालाही यश आले नाही. सोमरक्षक गंधर्वांच्याशी झगडण्यात त्याच्या चरणातील दोन अक्षरे गमावली गेली. परंतु गाई अश्व इत्यादि रूपाने दिली जाणारी ' यज्ञदक्षिणा ' आणि अन्नसेवनाचे वर्जन, वाणीचे नियमन, कृष्णाजिनाचे प्रावरण इत्यादि आचरणाने साध्य होणारे 'तप' यांना घेऊन ती परत आली. त्रिष्टुप् छंदाची अभिमानिनी असणारी देवता ही सोमयागातील माध्यंदिन सवनसंज्ञक अनुष्ठानाची अधिष्ठात्री देवता आहे. अर्थात् माध्यंदिन सवन हे त्रिष्टुप् छंदाचे निवासस्थान आहे. आणि यामुळेच माध्यंदिन सवनामध्ये यजमानाकडून ऋत्विजांना दक्षिणा दिली जात असते. स्वकष्टार्जित अशा धनाचे दक्षिणारूपाने दान करणे, हे अत्यंत उच्चतम असे तपच आहे असे विव्दानांचे मत आहे.

सोमवल्ली आणण्याकरिता जगती व त्रिष्टुप् ही उभयता आपल्या बरोबर कोणा साहायकास बरोबर घेऊन न जाता एकट्यानेच गेल्याने पराभूत झाली. हे ध्यानात घेऊन चारअक्षरी चरण असणाऱ्या गायत्रीने आपल्याला साहाय्यक म्हणून एक शेळी आपल्या बरोबर घेतली. आणि त्या शेळीसह सोमवल्ली आणण्यासाठी तिने उड्डाण केले. सोमररक्षक गंधर्वांच्या बरोबर गायत्री युद्ध करीत असता, तिच्या साहाय्यार्थ गेलेल्या शेळीने आपल्या ठिकाणच्या तेजाने त्या द्युलोकस्थ सोमवल्लीला चोहीकडून घेरले आणि गायत्रीला फार साहाय्य केले. ''अज' या धातूचा अर्थ अडविणे, व्यापणे असा आहे. सोमवल्लीला चोहोकडून

व्यापण्याचे कर्तव्य गायत्रीच्या साहाय्यकर्त्या शेळीने केल्यामुळेच तिला 'अजा' म्हणजे सोमवल्लीला घेरणारी, व्यापणारी असे नांव रूढ झाले. सोमवल्लीला व्यापणे हेच त्या अजेचे अजात्व किंवा स्वाभाविक गुण होय. सारांश, शेळीच्या साहाय्याने गायत्रीने सोमरक्षक गंधर्वांशी केलेल्या झगड्यात विजय मिळविला. आणि सोमवल्लीचे तिने संपादन केले. इतकेच नव्हे तर जगती व त्रिष्टुप् यांची दोन दोन अक्षरे, जी सोमरक्षक गंधर्वांनी हिराऊन घेतली होती, तीही चार अक्षरे तिने त्यांच्यापासून परत हिसकावून घेतली. अर्थात् त्यामुळे गायत्री ही चारअक्षरी चरणांची होती ती आठअक्षरी चरणांची झाली.

अग्निष्टोमसंज्ञक सोमयागातील प्रातःसवनामध्ये सामगायकांकडून जे बहिष्पवमानसंज्ञक स्तोत्र गाइले जाते त्यामध्ये 'उपास्मै गायता नरः' या गायत्री छंदातील ऋचांचा उपयोग केला जातो. काही ब्रह्मवादी असे म्हणतात की इतर छंदांपेक्षा गायत्री ही कनिष्ठ म्हणजे चरणाक्षरसंख्येने कमी असताना यज्ञाचे जणू मुखस्थानच असलेल्या प्रातःसवनामध्ये काय म्हणून उपयुक्त ठरली? परंतु, या ब्रह्मवाद्यांच्या शंकेचे दुसरे ब्रह्मवादी असे उत्तर देतात की, चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने गायत्री कनिष्ठ असली म्हणून काय झाले? मूर्ती लहान पण कीर्ती मोठी या म्हणीप्रमाणे जगती व त्रिष्टुप् ह्या तिच्याहून मोठ्या असणाऱ्या छंदांना जे कार्य करता आले नाही ते कार्य तिने लहान असूनही केले. ज्या अर्थी तिने द्युलोकातून सोमवल्ली घेऊन येण्याचे महत्कार्य यशस्वी केले त्या अर्थी गायत्री आपल्या ठिकाणच्या तेजाच्या प्रभावामुळे यज्ञाच्या मुखस्थानी असणाऱ्या प्रातःसवनामध्ये प्रमुखतेला प्राप्त होणे युक्तच आहे. सोम आणण्यासाठी पक्ष्याचे रूप धारण करून गेलेल्या गायत्रीने सर्व सोमयागास पुरेल इतकी सोमवल्ली आपल्या बरोबर आणली. सोमयागातील तीन सवनांपैकी प्रातःसवन व माध्यंदिन सवन या दोन सवनांना पुरेल इतकी सोमवल्ली तिने आपल्या दोन पायांत धरून आणली व तिसऱ्या तृतीय सवनास पुरेल इतका वल्लीरूप सोम तिने आपल्या चोचीत धरून आणला. मात्र येता येता चोचीत धरलेली सोमवल्ली आपल्या दातांनी चावून तिच्यातील सोमरस ती प्याली. पायांत धरलेल्या सोमवल्लीचा रस तिला पिता आला नाही. यामुळेच त्या दोन सवनांत कुटली जाणारी सोमवल्ली 'शुक्रवती' म्हणजे रससंपन्न असते. चोचीत धरलेल्या वल्लीचा रस, तिने ती वल्ली चावून प्यालेला असल्यामुळे तृतीय सवनामध्ये सोमवल्लीचा नुसता चोथाच कुटला जातो. तृतीय सवनाकरिता ती वल्ली तिने आणताना चावली व तिच्यातील रस प्राशन केला या गोष्टीचे साक्षिभूत प्रतीक मानूनच याज्ञिक त्या सवनात सोमवल्लीचा चोथा कुटून तिचाच निघेल तेवढा रस काढीत असतात. तृतीय सवनामध्ये कुटल्या जाणाऱ्या चोथ्यापासून फार थोडा रस निघत

असल्यामुळे, तो रस अनुष्ठानास पुरेसा होण्यासाठी त्या रसात अध्वर्यू 'आशिर' संज्ञक दूध ओतून तो रस अनुष्ठानास पुरेसा होईल इतका वाढवितो.

जो सोम गायत्रीने आणला तो सोम विश्वावसू नांवाच्या गंधर्वाने चोरून आपल्या जवळ ठेवला होता. विश्वा व सूने चोरलेला तो सोमरस तीन दिवस त्याच्या जवळ तसाच होता. त्यानंतर तो गायत्रीच्या हाती लागला व ती तो घेऊन आली. या गोष्टीचे स्मरण म्हणून विकत घेतलेला सोमरस लागलीच न कुटता तीन दिवस तसाच ठेवावा.

सोमयाग करण्यास जे देव प्रवृत्त झाले होते, ते परस्परांना म्हणू लागले की, गंधर्व हे स्त्रियांच्या विषयी कामुक म्हणजे लोलुपवृत्तीचे असतात. यासाठी, गंधर्वांना स्त्रीचीच किंमत देऊन आपण त्यांच्यापासून सोम विकत घेऊ. त्याप्रमाणे देवांनी वाग्देवतेलाच एकवर्षाच्या वयाची स्त्री बनविली. तिच्या योगाने म्हणजे ती वाग्देवतारूप एक वर्षाची स्त्रीच किंमतीदाखल गंधर्वांना देऊन देवांनी सोम विकत घेतला.

देवांनी गंधर्वांना किंमतीदाखल दिलेली वाग्देवतारूप एक वर्षाची स्त्री गंधर्वांच्यावर मुळीच अनुरक्त झाली नाही. तिने 'रोहित्' म्हणजे रोही किंवा रुई म्हणतात त्या गाईचे रूप धारण केले व ती गंधर्वांच्या पासून दूर राहू लागली.

देव गंधर्वांना म्हणाले की, आम्ही तुम्हाला सोमवल्लीची किंमत म्हणून दिलेली स्त्री तुम्हाला सोडून गेली आणि आमच्याकडे परत आली नाही. यास्तव, आम्ही आता तिचे स्वरूपच पालटतो. मग देवांनी तिला पुनः ब्रह्मरूप म्हणजे वेदमंत्ररूप केली. ते वेदमंत्र गंधर्व म्हणू लागले. व ते मंत्र देवही गाऊ लागले. तेव्हा ती वाग्देवता वेदमंत्रांचे गान करणाऱ्या देवांच्या जवळ आली. त्यावरून असे दिसून आले की, गायन करणाऱ्या पुरुषाची स्त्रिया इच्छा करतात.

गाणाऱ्या पुरुषाला पाहून स्त्रिया लोलुप होतात हे जो जाणतो, त्याच्या हे लक्षात येईल की, विवाहयोग्य अशा वराला वधू शोधण्याचा उद्योग करीत असलेल्या लोकांत दोन प्रकारचे लोक आढळून येतात. त्यांपैकी एका प्रकारातील लोकांना असा अनुभव येतो की, गायनाव्यतिरिक्त इतर अनेक गुणांनी युक्त असे वर त्यांच्याजवळ असताना वधूचे आईबाप त्या वरांना कन्या देण्यास तयार होत नाहीत. आणि दुसऱ्या प्रकारच्या लोकांना असे अनुभवास येते की,त्यांच्या जवळ असलेल्या अनेक वरांपैकी गाननिपुण असा जो वर असतो त्यालाच वधूची मातपितरे आपली कन्या देतात.

सोम विकणाऱ्या मनुष्यापासून सोम विकत घेताना वाग्देवतेचे प्रतीक म्हणून एक वर्षाच्या वयाची गाय त्याला सोमवल्लीची किंमत म्हणून द्यावी. म्हणजे संपूर्ण अशा वेदवाणीनेच सोम विकत घेतल्यासारखे होते. सोमवल्लीची किंमत म्हणून

वाग्देवतेच्या प्रतीकरूपाने सोमक्रयणी म्हणजे सोमाची किंमत म्हणून देण्याची एक वर्षाची गाय सोम विकणाऱ्याला देण्यात येते. म्हणूनच एक वर्षाचे वय झाल्यावर मनुष्यांची मुले बोलू लागतात. त्यांना वाचा फुटते.

सोमवल्लीची किंमत म्हणून द्यावयाच्या गाईची शिंगे वाकडी नसावीत. तिचे कान फाडलेले नसावेत . ती एका डोळ्याने आंधळी असू नये. तिच्या अंगावर कोड उठलेले नसावे. तिच्या चारही पायांना मिळून असावयाच्या आठ खुरांत एकही उणा नसावा. सारांश, सरळ शिंगे असलेल्या, कान न फाडलेल्या, एका डोळ्याने आंधळी नसलेल्या, कोड अंगावर न उठलेल्या आणि पायातील खुरांत एकही खुराची उणीव नसलेल्या गाईच्या मोबदल्यात सोम विकत घ्यावा. अशाप्रकारे संपूर्ण अवयवांनी युक्त असलेल्या गाईच्या मोबदल्याने सोम विकत घेतला असता सर्वांगपूर्ण अशा वेदवाणीने सोम विकत घेतल्यासारखे होते.

सोमक्रयणी म्हणजे सोमाची किंमत म्हणून देण्यात येणारी गाय पांढरी असेल तर यजमान त्वग्रोगाने पीडित होईल. त्याच्या अंगावर पांढरे कोड उठेल. ती गाय जर काळ्या रंगाची असेल तर ती अनुस्तरणी म्हणजे मृत मनुष्याला चितेवर ठेवल्यावर ज्या गाईला मारून त्याच्या शरीरावर तिची अंगे पसरली जातात, त्या गाईच्या स्वरूपाला प्राप्त होईल. व त्या योगे यजमान मरेल. ती गाय जर दुरंगी असेल तर ती वार्त्रघ्नी होईल. म्हणजे यजमान व त्याचे वैरी यामध्ये कोण कोणाचा घात करील, याचा नेम नाही, अशी अवस्था निर्माण होईल. यास्तव, सोमक्रयणी गाय अरुणासारख्या तांबूस वर्णाची आणि जिचे डोळे पिंगळे आहेत अशी असावी. कारण अरुण वर्ण व पिंगट नेत्र हे सोमदेवतेचे स्वरूप आहे. यास्तव, आता सांगितलेल्या स्वरूपाच्या गाईने सोम विकत घ्यावा. म्हणजे स्वतः सोमाच्या अधिष्ठात्री देवतेच्या योगानेच सोम विकत घेतल्यासारखे होते.(अनुवाक ६).

उदकदेवता या वरुणाच्या स्त्रिया होत्त. त्यांनी अग्नीचा ध्यास घेतला व त्याच्याशी समागम केला. त्यावेळी अग्नीचे जे रेत भूमीवर पडले, तेच हिरण्यरूपाने प्रादुर्भूत झाले. म्हणजे अग्नीच्या रेतापासून हिरण्य म्हणजे सुवर्ण निर्माण झाले आहे. उदके ह्या हिरण्याच्या माता असून अग्नी हा त्याचा पिता आहे. म्हणून स्वभावतःच शुध्द असलेले हिरण्य रजस्वलेचा स्पर्श इत्यादि कारणाने अपवित्र झालेच तर ते उदकांनी प्रक्षालन केले असता पूर्ववत् शुध्द होते. त्याला राख लावून धुण्याचे किंवा अग्नीत घालून तापविण्याचे कारण नाही.

ब्रह्मवादी असे म्हणतात की, अस्थिरहित अशा वीर्याने निर्माण होणारे गर्भ जन्मास येतांना अस्थिसहित कसे येतात? परंतु, या शंकेचे समाधान असे की, वीर्यसदृश आज्यामध्ये अस्थिसदृश हिरण्य ठेवून आहुती देण्यात येते. त्यामुळे अस्थिरहित अशा गर्भावस्थेत प्रथम असणाऱ्या प्रजा प्रसूतिकाळाच्या वेळी अस्थिसहित होऊन जन्मास येतात. आज्य व हिरण्य यांचे अशा प्रकारे वीर्याशी

व अस्थीशी असलेले सादृश्यच जणू- ईश्वर अस्थिरहित गर्भांच्या व अस्थिसहित जन्मास येणाऱ्या प्रजांच्या रूपाने निर्माण करीत असतो.

हिरण्य हे अग्नीचे अत्यंत प्रिय असे स्थान आहे. हिरण्य हे स्वभावतःच तेजस्वी आहे. यास्तव, ' इयं ते शुक्रतनूरिदं वर्चः' हा मंत्र म्हणून हिरण्य आज्यावर म्हणजे आज्य भरून घेतलेल्या स्रुचीवर ठेवावे. म्हणजे ते हिरण्य आपल्या तेजाने त्या आज्याला आपल्यासारखेच तेजस्वी करते.आणि हिरण्य ठेवलेल्या त्या तेजस्वी आज्याने अग्नीच्या ठिकाणी दिलेली आहुती अग्नीला उत्कृष्ट प्रकाशित करते. ते हिरण्य एखाद्या सूत्राला न गाठविता जर नुसतेच आज्यावर ठेवले तर प्रजांचे गर्भ पतन पावतील. यास्तव, ते हिरण्य सूत्राच्या टोकाला गाठ देऊन बांधावे. आणि हिरण्य बांधताना त्या सूत्राची गाठ सहज सुटेल अशी निसटती असावी. म्हणजे ती निसटती गाठ प्रजांचे जनन सहजतेने होण्यास कारणीभूत होते.

सोमक्रयणी गाय ही वाग्देवतारूप आहे. यास्तव, ' जूरसि धृता ' हा मंत्र म्हणावा. कारण जे कार्य त्वरित करावे असे मनाने ठरते, तेच कार्य मनुष्य मुखाने बोलून दाखवितो. या मंत्रात ' धृता मनसा ' असा अंश म्हटला जातो. या अंशाचा , ' मनानेच वाणीचे धारण केले आहे', असा अर्थ आहे . ' जुष्टा विष्णवे ' असा त्याच्या पुढचा अंश आहे. ' यज्ञ हाच विष्णू आहे व यज्ञाकरिताच विष्णू हा त्या वाणीला माधुर्य व प्रियता यांनी युक्त करतो' असा त्या अंशाचा अर्थ आहे. 'तस्यास्ते सत्यसवसः प्रसवे ' असा त्यापुढचा अंश असून,' हे सोमक्रयणी, यज्ञ व सत्य यांना प्रेरक अशा तुझ्या प्रेरणेनेच मी मंत्रोच्चारणरूप वाणीचे नियमन करण्याला समर्थ होईन', असा त्या अंशाचा अर्थ आहे. या अंशाचे पठण केले असता सवितादेवाच्या प्रेरणेने यजमान मंत्ररूप वाणीची प्राप्ती करून घेतो.

यज्ञाच्या अनुष्ठानास प्रारंभ झाल्यानंतर त्या यज्ञाच्या प्रत्येक कर्मांगाचा राक्षस नाश करीत असतात. अग्नीचा व सूर्याचा गमनमार्ग मात्र राक्षसांच्या कडून कधीही नाश न पावणारा अर्थात् सुरक्षित असतो. यास्तव, ' सूर्यस्य चक्षुरारुहमग्नेरक्ष्णः कनीनिकाम् ' हा मंत्र म्हणावा. ' सूर्याच्या नेत्रांच्या व अग्नीच्या नेत्रांतील बाहुलीच्या ठिकाणी मी प्राप्त झालो आहे', असा त्या मंत्राचा भावार्थ आहे. हा मंत्र पठण केला असता राक्षसांचा उपद्रव नसलेला व अर्थातच सुरक्षित असा जो मार्ग आता सांगितला त्या सुरक्षित मार्गावर तो यजमान आरूढ होतो.

सोमक्रयणी गाय ही वाग्देवतारूप आहे. तिला अनुलक्षून ' चिदसि मनाऽसि' हा मंत्र पठण करावा. म्हणजे या मंत्राच्या द्वारा त्या सोमक्रयणीला 'तू चिद्रूप व मनोरूप हो ' अशा प्रकारची शिकवणच दिल्यासारखी होते. आणि म्हणूनच लोकांना विद्वानांच्याकडून शिक्षण देण्यात येत असते.

पूर्वोक्त मंत्रातील ' चिदसि 'असा जो शब्द उच्चारला जातो त्यामुळे मनाकडून ज्या कार्याची प्रेरणा मिळते त्या कार्याचा यजमान वाचेने उच्चार करतो. 'मनासि' हा त्यापुढचा शब्द होय. या शब्दाच्या उच्चाराच्या योगाने यजमानाच्या मनाने ज्या कार्याविषयी विचार केला जातो, ते कार्य तो कृतीत आणतो.'धीरसि' हा यापुढचा शब्द होय. त्याचा उच्चार केल्याने यजमान ज्या कार्याविषयी आपल्या मनाने निश्चय करतो, तेच तो बोलून दाखवितो. 'दक्षिणासि' हा त्यानंतरचा शब्द आहे. हा उच्चारला असता वाग्देवतारूपी सोमक्रयणी हीच जणू यज्ञाची दक्षिणा आहे.अशी भावना यजमानाने व्यक्त केल्यासारखे होते.' यज्ञियासि 'हा त्याच्या पुढचा शब्द उच्चारण्यात येतो. त्या योगाने यजमान जणू सोमक्रयणी गाईला यज्ञयोग्य करतो. 'क्षत्रियासि' हा त्यापुढचा शब्द आहे. त्याच्या उच्चाराने 'सोमक्रयणी गाय ही क्षत्रिया म्हणजे दुःखापासून रक्षण करणारी आहे,'अशी भावना यजमानाकडून व्यक्त झाल्याप्रमाणे होते. 'अदितिरस्युभयतः शीर्ष्णी ' हा त्यापुढचा अंश होय. यज्ञाचा प्रारंभ व समाप्ती ही दोन जणू यज्ञाची शिरे म्हणजे टोके आहेत. यज्ञाच्या प्रारंभनिमित्तक होणाऱ्या प्रायणीयेष्टीत व समाप्तीनिमित्तक होणाऱ्या उदयनीयेष्टीत अदिती देवतेचे यजन केले जात असल्यामुळे यज्ञाची दोनही शिरे किंवा टोके अदितिरूपच होत यास्तव, 'हे सोमक्रयणी,यज्ञाच्या दोनही ठिकाणी अधिष्ठित होणारी अदिती तूच आहेत ', असेच जणू यजमानाने सोमक्रयणीला उद्देशून म्हटल्यासारखे होते.

सोमक्रयणी गाय सोम विकत घेण्याच्या जागी नेताना, तिला दोरीने न बांधता मोकळी नेली तर ती सरळपणे न चालता, मोकाटपणे इकडे तिकडे उधळेल. जर तिच्या गळ्याला दोरी बांधून नेली तर ती पूर्वी एके वेळी सांगितल्याप्रमाणे 'अनुस्तरणी' होईल. व तसे झाल्याने यजमान मरेल. तिच्या कानाला धरून जर तिला चालविली तर ती वार्त्रघ्नी होईल. म्हणजे यजमानाचे शत्रू यजमानाचा घात करतील किंवा यजमान त्यांचा घात करील, याचा काहीच नियम राहणार नाही, असा प्रसंग निर्माण होईल. म्हणजे प्रसंगविशेषी शत्रूप्रमाणे यजमानाचाही घात होईल. यास्तव, 'मित्रस्त्वा पदि बध्नातु' म्हणजे 'मित्रदेवच तुझ्या पायाला बंधन करो' अशा अर्थाचा मंत्र म्हणून तिच्या पायाला दोरी बांधून तिला न्यावी. मित्र हा देवांच्यामध्ये सुखप्रद असा देव आहे. यास्तव, पूर्वोक्त मंत्राने तिच्या पायाला दोरी बांधविल्यासारखे होते.

सोमक्रयणी गाईला सोमविक्रयस्थली नेताना 'पूषाऽध्वनः पातु' असा प्रारंभ असलेला मंत्र म्हणावा. ' पूषाऽध्वनः पातु' हा मंत्राचा पहिला अंश असून 'पूषा हा मार्गातून तू जात असताना तुझे रक्षण करो', असा त्या अंशाचा भावार्थ आहे. ही भूमी म्हणजेच पूषा असून ती सोमक्रयणीचे पालन करणारी आहे. यास्तव, या अंशाचे पठण केले असता सोमक्रयणी गाईला भूमिदेवतेकडून सुरक्षिततेने इच्छित

स्थली प्राप्त केल्यासारखे होते. 'तुझा अध्यक्ष असलेल्या इंद्राच्याच स्वाधीन मी, तुला करतो ,'असा अर्थ व्यक्त करणारा 'इंद्रायाध्यक्षाय' असा पूर्वोक्त मंत्राचा दुसरा अंश आहे. याचे पठण करून यजमान जणू काय इंद्र देवाला सोमक्रयणीचा अध्यक्ष करतो. 'अनु त्वा माता मन्यतामनु पिता', असा तिसरा अंश असून; 'सोम' विकणाराला सोमवल्लीची किंमत म्हणून तुला देण्याविषयी तुझी माता व पिता अनुमती देवो,'असा त्या चरणाचा अर्थ आहे. या अंशाचे पठण केले असता सोमक्रयणी गाईच्या मातापितरांच्या अनुमतीनेच तिची किंमत देऊन सोम विकत घेतल्यासारखे होते. 'सा देवि देवमच्छेहि' असा एक अंश या मंत्रात म्हटला जात असून, 'हे सोमक्रयणी, तू देवी आहेस तर तू आपल्या देवाकडे जा,'असा त्या अंशाचा अर्थ आहे. सोमक्रयणी गाय हीच देवी असून सोम हा तिचा देव आहे, त्या अर्थी 'तू आपला देव असलेल्या सोमाकडे जा,'असे सोमक्रयणीला उद्देशून म्हणणे योग्यच आहे. 'इंद्राय सोमं' असा पूर्वोक्त अंशाच्या पुढचा अंश असून 'इंद्रासाठीच मी सोमाला विकत घेणार आहे,'असा त्या अंशात अर्थ व्यक्त झाला आहे. इंद्र देवालाच सोमरस अर्पण करावयासाठी यजमान सोम विकत घेत असल्यामुळे सोमक्रयणीला उद्देशून पूर्वोक्त अंश म्हणने योग्य आहे.

' पूषाऽध्वनः पातु ' या यजुर्मंत्रापैकी आता सांगितलेला अंश जर पठण केला नाही तर सोमवल्ली विकत आणावयासाठी घेऊन जात असलेली सोमक्रयणी गाय सोमविक्रयस्थलापर्यंत न जाता माघारी फिरेल. 'रुद्रस्त्वाऽऽवर्तयतु' हा पूर्वोक्त अंशाच्या पुढचा अंश असून 'रुद्रदेव तुला सोम विकत घेतल्यानंतर परत आणो' असा त्याचा अर्थ आहे. रुद्र हा देवांच्यामध्ये क्रूर असा देव आहे. म्हणून या अंशाच्या पठणाने यजमान जणू काय त्या रुद्र देवाला सोमक्रयणी गाईच्या पलीकडे तिला परत आणण्यासाठी उभा करून ठेवतो. रुद्रासारख्या क्रूर देवाचे उच्चारण करणे, हे क्रूरपणाचे आहे, अशी शंका तेथे उत्पन्न होण्याची शक्यता आहे. यास्तव, रुद्रदेवाने शांतपणे तिला परत आणण्याचे कार्य करावे यासाठी, 'मित्रस्य पथा' हा त्या पुढचा अंश पठण करावा. म्हणजे त्यायोगे रुद्रदेवाला शांत केल्यासारखे होते.

व्यवहारदृष्टीने सोमक्रयणी गाईच्या योगाने म्हणजे सोमक्रयणी गाय सोम विकणाराला किंमत म्हणून देऊन जरी सोम विकत घेतला जात असतो, तरी तत्त्वतः मंत्ररूप वाणीनेच तो सोम विकत घेतला जात असतो. अर्थात् केवळ व्यवहारदक्ष वाग्देवतेचे प्रतीक म्हणून किंमतीच्या रूपाने सोम विकणाराला दिलेली सोमक्रयणी गाय त्याच्या स्वाधीन करण्याची अवश्यकताच नसते. यास्तव, 'स्वस्ति सोमसखा पुनरेहि सह रय्या' हा पूर्वोक्त अंशाचा पुढचा भाग पठण करावा. 'हे सोमक्रयणी सोम हा तुझा सखा होवो आणि त्याच्या सह रुद्रदेव तुला परत आणताना कठिण मार्गाने न आणता मित्रदेवाच्या सुखप्रद मार्गाने परत आणो,धनासह तू आमच्याकडे परत ये,' असा त्या भागामध्ये अर्थ व्यक्त झाला

आहे. अर्थात् या भागाचे पठण केले असता, मंत्ररूप वाणीनेच सोम विकत घेतल्यानंतर, त्या वाणीचेच- सोमक्रयणी गाईच्या रूपाने- यजमानाने पुन्हा आपल्या ठिकाणी स्थापन केल्यासारखे होते. मंत्ररूप वाणीचे हे माहात्म्य जो जाणतो, त्याची वाणी केव्हाही क्षीण होत नाही. (अनुवाक ७).

'पृष्ठ्य षडह'या नांवाचा एक याग आहे. या यागात बृहत्, रथंतर, वैरूप,वैराज,शाक्वर व रैवत या नांवांची सहा ' पृष्ठ्य 'संज्ञक स्तोत्रे म्हणजे सामे गाइली जातात. या सहांपैकी अनुक्रमे एक एक स्तोत्र गाइले जाऊन सहा दिवसांत हा याग पूर्ण होत असतो. या सहापेक्षा अधिक कोणतेही स्तोत्र या पृष्ठ्यषडह यागात गाइले जात नाही. एवं च, पृष्ठ्यस्तोत्ररूप अशी वाग्देवता सहा दिवसांपेक्षा अधिक एकही दिवस बोलत नाही. म्हणजे गानरूप भाषण करीत नाही.संवत्सरपर्यंत चालत राहणाऱ्या 'गवामयन'नामक सत्रातही सहापेक्षा अधिक पृष्ठ्यस्तोत्रांचे गान किंवा वादन पृष्ठ्यस्तोत्ररूपी वाग्देवता करीत नाही. यास्तव, वाग्देवतारूपी सोमक्रयणी गाईकडून समंत्रक अशी सहा पावले टाकविणे आवश्यक आहे. तिच्याकडून सहा पावले अनुक्रमाने टाकविली असता, संपूर्ण वाग्देवतेचे संपादन केल्यासारखे होते.

तिचे सातवे पाऊल जेथे पडेल त्या ठिकाणी एक आहुती द्यावी. शक्वरीछंद हा सात चरणांचा असतो. हा छंद पशू प्राप्त करून देणारा असल्याने पशू हे शक्वरीछंदस्वरूपच आहेत. यास्तव, सोमक्रयणीच्या सातव्या पावलाच्या ठिकाणी आहुती दिली असता यजमानाने जणू पशूंचेच संपादन केल्यासारखे होते.

शेळी, घोडा, गाय,म्हैस,डुक्कर,हत्ती व खेचरी हे सात ग्राम्य पशू असून प्रत्येक पायाला दोन खूर असणारे, एकच खूर असलेले, पक्षी, सरपटणारे प्राणी, श्वापदे, शरभ व माकड हे सात आरण्य पशू होत. गायत्री इत्यादि छंदही मुख्यतः सातच आहेत. यास्तव सोमक्रयणी गाईचे सातवे पाऊल जेथे पडले असेल त्या ठिकाणी आहुती दिल्याच्या योगाने ग्राम्य व आरण्य या दोन प्रकारच्या पशूंचे व सातही छंदांचे यजमानाने संपादन केल्यासारखे होते.

सोमक्रयणी गाय एक एक पाऊल टाकताना, 'हे सोमक्रयणी तू वसुरूप आहेस, तू रुद्ररूप आहेस,'असा अर्थ असलेल्या 'वस्व्यसि रुद्रासि 'इत्यादि मंत्राचा एकेक अंश क्रमाने उच्चारीत जावा.म्हणजे अध्वर्यूने आपल्या यजमानाला सोमक्रयणीचे स्वरूपच कथन केल्यासारखे होते. सातवे पाऊल पडले तेव्हा ते स्थल आपल्या दोन्ही हातांनी धरून ठेवून,' हे सोमक्रयणी, बृहस्पतिदेव तुला या सुखकर स्थानी रमवो,'असा अर्थ असलेला,'बृहस्पतिस्त्वा सुम्ने रण्वतु'हा मंत्र म्हणावा. कारण बृहस्पती हा देवांचा ब्राह्मण आहे. यास्तव, या मंत्राचा जप केला असता, अध्वर्यूने जणू काय यजमानाला देवांमधील ब्राह्मण असलेल्या बृहस्पतीकडून पशूंची प्राप्ती करून दिल्यासारखे होते. ' रुद्र हा वसूंच्या सह तुला यजमानाकडे

परत आणो,'अशा अर्थाचा पूर्वोक्त अंशाच्या पुढचा 'रुद्रो पशुभिराचिकेतु' हा अंश म्हणावा.म्हणजे तो सोमक्रयणी गाईला यजमानाकडे रुद्राच्या कडून परत आणण्याच्या कामी उपयोगी होतो. 'हे घृत, पृथ्वीचे जणू मूर्धस्थानच अशा या देवयजनस्थली' इत्यादि अर्थ व्यक्त करणारा 'पृथिव्यास्त्वा मूर्धन्नाजिघर्मि देवयजने' हा मंत्र म्हणून सोमक्रयणी गाईचे सातवे पाऊल पडलेल्या स्थलावर आज्याहुती द्यावी. कारण देवयजनस्थल हे जणू पृथ्वीचे मूर्धस्थानच होय. 'इडायाः पदे' असा पूर्वोक्त मंत्राचा पुढचा अंश पठण करावा. कारण सोमक्रयणी गाईच्या सातव्या पावलाचे स्थल हे जणू इडानामक अन्नप्रद देवतेचे स्थानच होय. ' घृतवति स्वाहा' हा मंत्राचा पुढचा अंश पठण करावा. सोमक्रयणी गाय जेथे जेथ पाऊल टाकत, तेथून तेथून घृताची निष्पत्ती होत असते. म्हणून या अंशाचे पठण उपयुक्तच होय.

अध्वर्यूने जर अग्निरहित अशा ठिकाणी आहुती दिली तर तो अंध होईल व राक्षस यज्ञाचा विध्वंस करतील. यास्तव, सोमक्रयणीच्या सातव्या पावलाचे ठिकाणी सुवर्ण ठेवून त्या सुवर्णावर आहुती द्यावी. सुवर्ण हे अग्नीसारखे तेजस्वी असल्याने ते अग्निरूपच असते. यास्तव, सुवर्णावर आहुती दिली असता ती अग्नीदरच दिल्यासारखे होते. मग अध्वर्यू अंध होत नाही व राक्षसही यज्ञाचा विध्वंस करीत नाहीत.

यज्ञाच्या प्रत्येक अंगाचे अनुष्ठान सुरू झाले म्हणजे राक्षस त्यावर हल्ला करून त्या यज्ञकर्मांगाचा नाश करतात. यास्तव, सोमक्रयणी गाईच्या पावलाच्या ठिकाणी आहुती दिल्यानंतर त्या घृताने माखल्या गेलेल्या जागेभोवती स्फ्यने रेखा काढीत असताना 'परिलिखितं रक्षः परिलिखिता अरातयः' इत्यादि मंत्र म्हणावा. म्हणजे राक्षसांचा नाश करण्यास तो कारणीभूत होतो. 'राक्षसांचा नाश केला व शत्रूंचाही नाश केला ' ,असा या मंत्रांशाचा अर्थ असल्याने त्या अंशाचे पठण राक्षसांचा नाश करण्यास उपयुक्त होणे योग्यच आहे.' मी ही राक्षसांची मानच मुरगळीत आहे. जो आमचा द्वेष करतो त्याचीही मान मी मुरगळीत आहे,व आम्ही ज्याचा द्वेष करतो त्याचीही मान मी मुरगळीत आहे 'अशा अर्थाचा, 'इदमहं रक्षसो ग्रीवा अपि कृन्तामि योऽस्मान् द्वेष्टि यं च वयं द्विष्मः' हा त्यापुढचा अंश पठण करावा. यजमान ज्याचा द्वेष करतो व जो यजमानाचा द्वेष करतो असे दोन प्रकारचे जे पुरुष असतात त्यांपैकी एकही न गळता दोघाही पुरुषांची मान अध्वर्यूने त्यायोगे मुरगळल्यासारखे होते.

सोमक्रयणी गाईचे पद म्हणजे तिने सातवे पाऊल ठेवलेले स्थान. ते जणू पशूच होय. यास्तव, तेथे दिलेल्या आज्याच्या आहुतीने त्या पावलाच्या ठिकाणचा जेवढा म्हणून भाग माखला गेला असेल त्या भागातील तुपाने माखलेले सर्व

मृत्कण अध्वर्यूने पध्दरणी नामक स्थालीत भरावेत. म्हणजे अध्वर्यूने जणू काय आपल्या यजमानाला पशूंचेच संपादन करून दिल्यासारखे होते. हे मृत्कण पध्दरणीनामक स्थालीत ओतताना 'अस्मे रायः' म्हणजे 'मज अध्वर्यूच्या ठिकाणी हे मृत्कणरूपी धन स्थिर राहो,'अशा अर्थाचा मंत्र म्हणावा. त्या योगाने अध्वर्यू जणू काय पशूंच्यापासून स्वतःला कधीही दूर करीत नाही. 'तुज यजमानाच्या ठिकाणी हे मृत्कणरूपी धन राहो ' अशा अर्थाचा ' त्वे रायः' हा मंत्र म्हणून ती पध्दरणी स्थाली यजमानाच्या हाती द्यावी. त्या योगे अध्वर्यूने जणू यजमानाच्या हाती धनच दिल्याप्रमाणे होते. यजमानाने ' तोते रायः' म्हणजे ' तुज पत्नीच्या ठिकाणी हे मृत्कणरूपी धन राहो ' हा मंत्र म्हणून ती पध्दरणी स्थाली म्हणजे मृत्कणरूपाने असणारे सोमक्रयणी गाईचे सातवे पाऊल पत्नीच्या हाती द्यावे. कारण पत्नी ही आपल्या पतीच्या आत्म्याचा अर्धा भागच असते. यास्तव, पध्दरणीमध्ये भरून घेतलेले पदपांसुरूपी अर्थात् मृत्कणरूपी धन पत्नीच्या जवळ दिल्याच्या योगाने यजमानाने जणू आपण संपादन करून आणलेले धन घरात नीट ठेवण्यासाठीच आपल्या पत्नीजवळ ठेवावयास दिल्याप्रमाणे होते.

' त्वष्टीमती ते सपेय ' इत्यादि मंत्र म्हणून पत्नीने सोमक्रयणी गाईचे अभिमंत्रण करावे, म्हणजे तिला स्पर्श करून हा मंत्र म्हणावा. ' हे सोमक्रयणी तू त्वष्ट्र देवाचा अनुग्रह संपादन केलेली आहेस. तुझ्या कृपेने मी आपल्या पतीशी संलग्न होऊन राहीन', असा त्या मंत्राचा अर्थ आहे. त्वष्टा हा देव पशूंच्या ठिकाणी निरनिराळी स्वरूपे निर्माण करणारा आहे. यास्तव, या मंत्राचेपठण केले असता, पत्नीने जणू काय यजमानाला प्राप्त होणाऱ्या पशूंच्या ठिकाणी त्वष्टादेवाकडून रूपांचे धारण केल्यासारखे होते.

यजमानाला इहलोकाची अनुकूलतेने प्राप्ती व्हावी म्हणून गार्हपत्य अग्नी स्थापन केले जात असून स्वर्गलोकाची प्राप्ती होण्यासाठी आहवनीयांची स्थापना केली जात असते. पध्दरणी स्थालीमध्ये सोमक्रयणीच्या पावलाच्या जागेचे जे मृत्कण भरलेले आहेत त्यांचे तीन विभाग करावेत. त्या तिहींपैकी एक भाग अध्वर्यूने गाईपत्याच्या आयतनात ओतावा. असे केले तर यज्ञकर्ता यजमान इहलोकी पशुमान म्हणजे पशुसंपत्तीने समृध्द होईल. दुसरा भाग आहवनीयाच्या आयतनात जर ओतला तर यजमान स्वर्गलोकी पशुसंपत्तीने युक्त होईल. यास्तव, अध्वर्यूने गार्हपत्य व आहवनीय या दोन्ही अग्नींच्या आयतनात पध्दरणीतील पदपांसूंचा अर्थात् मृत्कणांचा एक एक भाग ओतला म्हणजे त्याने आपल्या यजमानाला इहलोक व परलोक या दोनही लोकांच्या ठिकाणी पशुसंपत्तीने युक्त केल्यासारखे होते. (अनुवाक ८).

ब्रह्मवादी परस्परांमध्ये असा विचार करतात की, सोम निवडावा किंवा न निवडावा? म्हणजे सोववल्लीमध्ये दुसरे काही तृण इत्यादि मिसळलेले असेल, ते निवडून दूर करावे किंवा करू नये? 'सोम' हा औषधींचा राजा आहे. यास्तव, त्यामध्ये जर काही तृण वगैरे मिसळले गेले असेल तर तो जणू काय सोमाने गिळलेला घासच होय. अर्थात् सोमामध्ये मिसळलेले तृण जर त्यातून निवडून काढले तर, माशी लागल्यामुळे जसा एखाद्या मनुष्याच्या घशात उतरलेला घास ओकून बाहेर पडावा, त्याप्रमाणे सोमाने गिळलेला घास ओकून बाहेर पडल्यासारखे होईल. बरे, न निवडावा, त्यात मिसळलेले तृण वगैरे दूर न करावे तर, डोळ्यात पडलेला केर वगैरे बोटाने डोळा चोळल्यामुळे रुतावा, तसे होईल. व त्यामुळे अध्वर्यू सुरक्षित राहणार नाही व यजमानही सुरक्षित राहणार नाही. यास्तव, हे दोनही दोष टळण्यासाठी 'सोमविक्रयिन् सोमं शोधय' म्हणजे 'हे सोम विकणाऱ्या, तू आपल्या जवळचा सोम चांगला निवडून काढ, त्यात मिसळलेले तृण वगैरे काढून टाक', असा त्या सोम विकणाऱ्या अध्वर्यूने प्रेष द्यावा. असे केल्याच्या योगाने अध्वर्यूने जणू काय सोम निवडल्याने उत्पन्न होणारा व न निवडल्यामुळे उत्पन्न होणारा असे दोनही प्रकारचे दोष सोमक्रय करणारावरच टाकल्यासारखे होईल. व त्या योगाने तो सोम विकणाराच असुरक्षित अर्थात् संरक्षणरहित होईल.

उपवेश नामक ऋषीच्या अरुणनामक पुत्राने असा विचार केला की, सोम विकत घेत असतानाच मी तृतीय सवनाचे संपादन करीन. आणि त्या विचारास अनुसरून पशूच्या चर्मावरच त्याने सोम मोजून घेतला. आणि त्यायोगे त्याने जणू काय तृतीय सवनाचे म्हणजे पशूंचेच संपादन केले. कारण, सवनीय पशूच्या अंगांचे व अनूबंध्यसंज्ञक यागातील पशूच्या अंगांचेही यजन तृतीय सवनात होत असल्यामुळे तृतीय सवन हे पशुरूपच आहे. अर्थात् अरुण ऋषीचे पशूच्या चर्मावरच सोम मोजून घेऊन तृतीय सवनामध्ये होणाऱ्या दोन पशूंच्या यजनरूप कर्माचेच जणू संपादन केल्यासारखे झाले. यास्तव, सोम विकत घेताना तो मोजून घ्यावयाचा तो पशूच्या चर्मावर मोजून घ्यावा. म्हणजे अध्वर्यूनेही अरुण ऋषीप्रमाणे तृतीय सवनगत दोनही पशूंच्या यजनाचे संपादन केल्यासारखे होते.

आपला यजमान पशुसंपत्तिरहित व्हावा अशी अध्वर्यू इच्छा करीत

असेल तर त्याने त्या यजमानाच्या यज्ञामध्ये सोम मोजून घ्यावयाचा तो केशरहित असा जो पशुचर्माचा भाग असेल त्या भागावर घ्यावा. कारण केशरहित भाग हा पशुत्वरहित असतो. अर्थात् तशा प्रकारच्या भागावर सोम मोजून घेतल्याने यजमान पशुसंपत्तिरहितच होईल. आणि आपला यजमान पशुसंपत्तीने समृद्ध व्हावा असे अध्वर्यूला वाटत असेल तर त्याने आपल्या यजमानाच्या यज्ञाकरिता सोम मोजून घेताना, तो केशसहित असा जो पशुचर्माचा भाग असेल त्या भागावर मोजून घ्यावा. केशसहित असलेला पशुचर्माचा भाग हा जणू पशूचेच स्वरूप आहे. यास्तव केशयुक्त अशा पशुचर्मावरील भागावर सोम मोजून घेतला असता, अध्वर्यूने जणू काय आपल्या यजमानासाठी पशूंचेच संपादन केल्यासारखे होते. अर्थात् त्याचा यजमान पशुसंपत्तीने समृद्ध होतो. सोम विकत घ्यावयाचा तो उदकांच्या सान्निध्यात घ्यावा म्हणजे तो सरस अर्थात् रसयुक्त स्वरूपात विकत घेल्यासारखे होते. सोम विकत घेताना त्याला उद्देशून 'अमात्योऽसि' असा मंत्र म्हणावा. 'तू माझा सहकारी आहेस' असा त्या मंत्राचा अर्थ आहे. हा मंत्र म्हटला असता अध्वर्यूने त्या सोमाला जणू आपला सहकारी केल्यासारखे होते. नंतर 'शुक्रस्ते ग्रह:' हा मंत्र म्हणावा. 'सुवर्णयुक्त असा शुक्र नांवाचा तुझा ग्रह आहे', असा त्या मंत्राचा अर्थ आहे. कारण, सोमरस भरून घेण्याची जी ग्रहसंज्ञक पात्रे असतात त्यांपैकी एक शुक्र नावाचे ग्रहपात्र असते. या पात्रात सोमरस भरून घेतल्यावर त्यात सुवर्ण टाकावे लागत असते. अर्थात् शुक्र या नांवाच्या ग्रहपात्रात सोमरसाचे ग्रहण करणे हे सुवर्णाने साध्य होत असते. 'ग्रह' शब्दाचा अर्थ ग्रहण करणे असा असल्यामुळे 'सुवर्णयुक्त अशा पात्राने तू घेतला जात असतोस' असा भाव पूर्वोक्त मंत्रात अध्वर्यूकडून व्यक्त केला जातो.

सोम ज्या शकटावर ठेवून आणावयाचा त्या शकटासहच सोम विकत आणावयास जावे. असे केले असता अध्वर्यूने जणू काय सोमराजाचा महिमाच प्रकाशित केल्यासारखे होते. शकट आपल्याबरोबर घेऊनच सोम विकत घेण्यासाठी जावे. कारण सोम हा जीवनाचे एक साधनच आहे. सपाट असलेल्या प्रदेशातून जीवनाला साधनभूत असणारे धान्य आणावयाचे असल्यास ते शकटातूनच म्हणजे गाड्यावर भरूनच आणण्यात येत असते. अर्थात् सोमरूपी जीवनसाधनही शकटावर घालूनच आणणे युक्त होय.

सोम विकत घेण्याचे ठिकाण जर पर्वतावर असेल तर शकटासह

जाण्याचे कारण नाही. जेथे सोम विकत घेतला जाईल त्या पर्वतावरून मनुष्यांच्या डोक्यावरच सोमाचे भारे देऊन तो आणण्याचे करावे. व्यवहारात देखील डोंगरावरून आणावयाचे जीवनसाधन असे धान्य मनुष्ये आपल्या डोक्यावर घेऊनच आणीत असतात. अर्थात् पर्वतावर विकत घेतलेला सोम मनुष्यांनी आपल्या मस्तकावर वाहून आणणेच योग्य आहे.

सोम मोजून घेतेवेळी 'अभि त्यं देवं सवितारं' या अतिच्छंदात्मक ऋचेने तो मोजून घ्यावा. म्हणजे सोमवल्लीची जुडगी मोजून घेताना आता सांगितलेली ऋचा म्हणावी. अतिच्छंद हा अक्षरसंख्येच्या दृष्टीने इतर सर्व छंदांचे अतिक्रमण करणारा असल्यामुळे तो सर्वछंदस्वरूप आहे. अर्थात् अतिच्छदात्मक ऋचेने सोम मोजून घेतला असता अध्वर्यूने जणू काय सर्वच छंदांनी सोम मोजून घेतल्यासारखे होते. अतिच्छंदामध्ये इतर छंदांचा अंतर्भाव होत असल्याने अतिच्छंद हा जणू सर्व छंदांचे शरीरच आहे. यास्तव, अतिच्छंदात्मक ऋचेने सोम मोजून घेतला असता अध्वर्यूने आपल्या यजमानाला त्याच्या बरोबरीच्या सर्व लोकांचे जणू शरीरच केल्याप्रमाणे होते. म्हणजे त्या यजमानाला त्याच्या बरोबरीच्या लोकांत मुख्य स्थान प्राप्त होते.

सोम मोजून घेताना आंगठ्याखेरीज असलेल्या चार अंगुलींपैकी अनुक्रमे एकेका अंगुलीचा त्याग करून मोजून घ्यावा. म्हणजे पहिले जुडगे कनिष्ठिका व अंगुष्ठ या दोहोंनी मोजावे, दुसरे अनामिका व अंगुष्ठ यांनी, तिसरे मध्यमा व अंगुष्ठ यांनी, चौथे तर्जनी व अंगुष्ठ यांनी मोजावे. सारांश, आंगठ्याला साहाय्यक म्हणून ज्या अंगुलीचा उपयोग केला तिचाच उपयोग पुन्हा करू नये. प्रत्येक वेळी निराळी अंगुली आंगठ्याची साहाय्यक म्हणून निराळी योजावी. असे केल्याच्या योगाने प्रत्येक अंगुली गतसार म्हणजे सारहीन न होता सारभूत अशा सामर्थ्याने युक्त अशी राहते. प्रत्येक अंगुलीच्या ठिकाणचे सामर्थ्य वेगवेगळे असते. आणि म्हणूनच चारही अंगुली निरनिराळ्या सामर्थ्याने युक्त अशा असतात.

सर्व अंगुलींच्या बरोबर आंगठ्याचा उपयोग करावा. कारण तो सर्वच अंगुलींच्याशी सारख्याच सामर्थ्याने संयुक्त होत असतो. अशा प्रकारे आंगठा हा सर्व अंगुलींच्याशी समान सामर्थ्याने संयोजित असल्यामुळेच सर्व अंगुलीन्याला अनुसरून संचार करीत असतात. सर्वच अंगुली एकदमच आंगठ्याशी जुळवून

जर सोम मोजून घेतला तर यजमानाला होणाऱ्या मुलांच्या अंगुली एकमेकांस चिकटलेल्याच निपजतील. यासाठी प्रत्येक अंगुली वेगवेगळी करून अंगठ्याशी जुळवावी आणि सोम मोजून घ्यावा. असे केल्याने यजमानाच्या मुलांच्या अंगुली वेगवेगळ्या अर्थात् एकमेकांपासून सुट्या अशा निपजतील.

पांच वेळ सोम मंत्राने मोजून घ्यावा. अर्थात् पांच जुडगी समंत्रक मोजून घ्यावीत. कारण पंक्ती छंदाच्या चरणांची अक्षरे पांच असतात. तसेच यज्ञही पांच हविर्द्रव्यांनी संपादित केला जात असतो. अर्थात् पांच वेळ सोम समंत्रक मोजून घेतला असता अध्वर्यूने जणू काय पंक्ती छंद व तद्द्वारा पांक्त म्हणजे पांच हविर्द्रव्यांनी संपादन केल्या जाणाऱ्या यज्ञाचेच संपादन केल्यासारखे होते. पांच वेळ मंत्र न म्हणता सोम मोजून घ्यावा. पांच वेळ समंत्रक व पांच वेळ अमंत्रक मिळून दहा वेळ सोम मोजून घ्यावा. विराट् छंद हा चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने दहा अक्षरी आहे. विराट् छंद हा अन्नप्रद असल्यामुळे तो अन्नरूप आहे. यास्तव, दहा वेळ सोम मोजून घेतल्याच्या योगाने विराट् छंदाच्या द्वारा अध्वर्यूने जणू काय आपल्या यजमानासाठी सेवनीय अशा अन्नाचेच संपादन केल्यासारखे होते.

पांच वेळ सोम समंत्रक मोजून घेतल्याने भूतकालाचे व पांच वेळ अमंत्रक मोजून घेतल्याने भविष्यत् कालाचे अन्न अध्वर्यूने संपादन केल्यासारखे होते. दहा वेळ मोजून घेतल्याने जेवढा सोम भरेल तेवढाच जर विकत घेतला तर तो केवळ यजमानाचाच होईल. म्हणजे केवळ यजमानाच्याच उपयोगी होईल, सदोमंडपात बसणाऱ्या इतर ऋत्विजांना तो उपयुक्त होणार नाही. यास्तव, दहा वेळ मोजून घेतल्यानंतर जो सोम उरला असेल तोही 'प्रजाभ्यस्त्वा' या मंत्राने घ्यावा व मोजून घेतलेल्या सोमात मिसळावा. म्हणजे यजमानाबरोबर सदसंज्ञक मंडपात बसणाऱ्या ऋत्विजांनाही तो उपयुक्त होईल. म्हणजे प्राशन करावयास मिळण्याइतका पुरेसा होईल. विकत घेतलेला सर्व सोम वस्त्राने गुंडाळून घ्यावा व त्याचे गाठोडे बांधावे. कारण वस्त्र हे सर्वदेवतारूप आहे. यास्तव, सोम वस्त्रात बांधून घेतला असता सर्व देवतांच्या कडून त्याला समृद्ध केल्यासारखे होते. सोम हा पशुरूप आहे. 'प्राणाय त्वा' हा मंत्र म्हणून सोमाचे वस्त्रात गाठोडे बांधावे. असे केले असता अध्वर्यूने आपल्या यजामानाच्या पशूंच्या ठिकाणी प्राणांचे जणू स्थापन केल्यासारखे

होते. 'व्यानाय त्वा' या मंत्राने गाठोड्याचा थोडासा भाग उघडा करावा. असे केले असता यजमानाच्या पशूंच्या ठिकाणी अध्वर्यूने व्यान वायूचे स्थापन केल्यासारखे होते व त्यामुळे यज्ञकर्ता यजमान निद्रिस्त असता त्याचे प्राण त्याला सोडून जात नाहीत. (अनुवाक ९).

लहानातला लहान असा गाईच्या शरीरातील जो अवयव, त्याला 'कला' असे नांव आहे. सोम विकत घेतेवेळी 'गाईच्या शरीरातील अत्यंत लहान अशा अवयवाने व गाईच्या खुराने मी तुला विकत घेत आहे,' असा अर्थ असलेला 'कलया ते शफेन ते क्रीणानि' हा मंत्र जर अध्वर्यू म्हणेल आणि सोम विकत घेईल तर सोम गोरूप मूल्य देण्याला अपात्र होईल. यजमान ती गाय मूल्य म्हणून देऊ शकणार नाही. तसेच, अध्वर्यू ती गाय यजमानाकडून सोमाचे मूल्य म्हणून देववू शकणार नाही. साराश, गाईच्या मूल्याच्या तोलाचा सोम राहणार नाही. अध्वर्यूकडून त्याची योग्यता गाईपेक्षा कमी केली गेल्यासारखे होईल. गोरूप मूल्य देण्यास यजमानाला अपात्र ठरविल्यासारखे होईल व त्याबरोबर अध्वर्यूने स्वत:लाही गोरूप मूल्य यजमानाकडून देवविण्याचे कामी अपात्र ठरविल्यासारखे होईल. सोमाच्या मानाने सोमक्रयणी गाय ही अत्यंत अधिक ठरेल व ती सोमाची मुळीच पर्वा करणार नाही. त्याला तुच्छ लेखील.

यास्तव, सोम विकत घेताना, 'हे सोमा, गाईने म्हणजे गाईचे मूल्य देऊन मी तुला विकत घेत आहे', अशा अर्थाचा 'गवा ते क्रीणानि' हाच मंत्र अध्वर्यूने म्हणावा. म्हणजे त्या अध्वर्यूने सोमाला गाईच्या मूल्याला पात्र ठरविल्यासारखे होईल. तसेच, यजमानाला गोरूप मूल्य देण्यास पात्र केल्यासारखे होईल स्वत:लाही यजमानाकडून गोरूप मूल्य देवविण्याचे कामी पात्र केल्यासारखे होईल. अर्थात् सोमापेक्षा गाय अधिक योग्यतेची ठरणार नाही व तिच्याकडून सोमाचा अवमान ही होणार नाही.

शेळी देऊन सोम विकत घ्यावा म्हणजे तपासह सोम विकत घेतल्यासारखे होते. सुवर्णाने म्हणजे सुवर्णाचे मूल्य देऊन सोम विकत घ्यावा. त्या योगाने शुभ्रवर्ण अशा तेजासह सोम विकत घेतल्यासारखे होते. दुधाळ गाईच्या मूल्याने सोम विकत घ्यावा. त्या योगाने दुग्धरसासह सोम विकत घेतल्यासारखे होते. वृषभाचे म्हणजे बैलाचे मूल्य देऊन सोम विकत घ्यावा. म्हणजे इंद्रियशक्तिवर्धक

असा सोम विकत घेतल्यासारखे होते. गाडी ओढणाऱ्या बैलाची किंमत देऊन सोम विकत घ्यावा. कारण, तो बैल 'वहिन्' म्हणेज गाडीचा वाहक अर्थात् ओढणारा असल्याने गाडी ओढणाऱ्या बैलाच्या मूल्याने, यज्ञाचा वाहक म्हणजे यज्ञाचा निर्वाह करणारा सोम विकत घेतल्यासारखे होते. कालवड व खोंड यांच्या जोडीची किंमत देऊन सोम विकत घ्यावा. त्या योगाने कालवड व खोंड यांच्या जोड्यांची यजमानास प्राप्ती करून देण्याला कारणभूत असा सोम विकत घेतल्यासारखे होते. वस्त्राच्या मूल्याचे सोम विकत घ्यावा. कारण वस्त्र हे सर्वदेवतारूप आहे. अर्थात् वस्त्राच्या मूल्याने सोम विकत घेतल्यास तो सर्वदेवतांच्या पासून विकत घेतल्यासारखे होते. याप्रमाणे सोम विकत घेण्यासाठी दिल्या जाणाऱ्या मूल्यांची संख्या दहा होते. विराट् छंद हा दशाक्षरी असून तो अन्नरूप आहे. अर्थात् विराट् छंदाशी संख्यासाम्य असलेल्या मूल्यांनी सोम विकत घेतल्याच्या योगाने विराट् छंदाच्या द्वारा अध्वर्यूने जणू काय यजमानासाठी सेवनीय अशा अन्नाचेच संपादन केल्यासारखे होते.

'हे अजे, तू जणू पुण्यकारक अशा तपाचे शरीरच आहेत, तू प्रजापतीचाच देह आहेत', अशा अर्थाचा 'तपसस्तनूरसि प्रजापतेर्वर्णः' हा मंत्र शेळीचे मूल्य देताना अध्वर्यूने म्हणावा. त्या योगाने अध्वर्यूने जणू काय अजा (शेळी) प्रभृति पशूंना अडवाउडवीच्या शब्दाने नसतेच महत्त्व दिल्यासारखे होते. तत्त्वतः अजा म्हणजे शेळी ही तपाचे शरीरही नाही व प्रजापतीचा देहही नाही. परंतु, अशा प्रकारच्या अपलापाने म्हणजे नसत्याच महत्त्वाचा निदर्शक अशा मंत्रपठणाने त्या अजेला अध्वर्यूने मोठेपणा दिल्यासारखे होते. व हे त्याचे करणे स्वतःला निरपराधी ठरविण्याला कारणभूत होते.

पूर्वोक्त 'तपसस्तनूरसि.' या मंत्राने व्यक्त केले जाणारे पशूंचे महत्त्व जो जाणतो, तो संपत्तील प्राप्त होतो व पशूंचेही संपादन करतो. सोम विकणाराला सोमाचे मूल्य म्हणून सुवर्ण देताना अध्वर्यूने, 'सोमविक्रयी, अत्यंत तेजस्वी असा तुझा सोम मी अत्यंत तेजस्वी अशा सुवर्णानेच विकत घेतो', अशा अर्थाचा 'शुक्रं ते शुक्रेण क्रीणामि' हा मंत्र म्हणावा. त्या योगाने मंत्रामध्ये वर्णिल्याप्रमाणे तेजस्वी असा सोम तेजस्वी अशा सुवर्णाच्या योगाने विकत घेतल्यासारखे होते.

जे सुवर्ण देऊन देवांनी सोम विकत घेतला, ते सुवर्ण त्यांनी बलात्काराने

पुन: परत घेतले. कारण सोमाचा मोबदला म्हणून सोम विकणाराला तेजस्वी अशा सुवर्णाचा मोबदला कोण देत असतो? असा देवांच्या मनात विचार येऊन देवांनी सुवर्ण परत घेतले. यास्तव, अध्वर्यूनेही जे सुवर्ण देऊन सोम विकत घेतला असेल, ते सुवर्ण सोम विकणारापासून बलात्काराने परत घ्यावे. असे केले असता त्याने आपल्या ठिकाणी तेजाचे स्थापन केल्यासारखे होते.

मेंढीची पांढरी लोकर यजमानाने हाती देताना अध्वर्यूने 'अस्मे ज्योति:' हा 'ज्योतीप्रमाणे उज्वल असलेली लोकर आमच्याजवळ राहो' अशा अर्थाचा मंत्र म्हणावा. म्हणजे त्याने आपल्या यजमानाच्या ठिकाणी ज्योतीप्रमाणे उज्वल तेजच जणू स्थापन केल्यासारखे होते. नंतर अध्वर्यूने मेंढीच्या काळ्या लोकरीची गोळी सोम विकणाऱ्याच्या अंगावर मारताना 'सोमविक्रयिणि तम:' हा 'काळाकुट्ट अंधकार सोम विकणाराच्या ठिकाणी जावो', या अर्थाचा मंत्र म्हणावा. त्या योगाने सोम विकणाऱ्या माणसाला अंधकाराला समर्पण केल्यासारखे अर्थात् अंधकारास ढकलल्यासारखे होते.

काळ्या लोकरीची गोळी न करता मोकळी लोकरच जर सोम विकणारास मारली तर त्या लोकरीच्याच वर्णाचे व लोकांना दंश करणारे सर्प निर्माण होतील. यास्तव, काळी लोकर बोटांनी मुरगळून त्या लोकरीची गोळी करावी. गोळी करताना, इदमहं सर्पाणां दंदशूकानां ग्रीवा उपग्रथ्नामि' हा मंत्र म्हणावा. 'लोकांना दंश करणाऱ्या सर्पांच्या माना मी मुरगळीत आहे', असा या मंत्राचा अर्थ आहे. असे केले असता त्या लोकरीच्याच वर्णाचे परंतु लोकांना दंश न करणारे अर्थात् निरुपद्रवी असे सर्प निर्माण होतील. शिवाय त्या काळ्या लोकरीच्या रूपाने अध्वर्यूने जणू काय सोम विकणाराला अंधकारात विध्द केल्यासारखे होते.

सोम विकत घेलयानंतर 'स्वान भ्राजाड्.घारे' हा मंत्र अध्वर्यूने म्हणावा. कारण स्वान, भ्राज इत्यादि गंधर्वांनीच स्वर्गलोकी सोमाचे रक्षण केलेले असते. यास्तव, त्यांचा नामोच्चार ज्यात आहे, असा आता सांगितलेला मंत्र व्हावा म्हणजे त्या स्वान, भ्राज इत्यादि सोमरक्षक गंधर्वांच्याकडूनच भरपूर असा सोम विकत घेतल्यासारखे होते. आता सांगितलेला मंत्र म्हणून अध्वर्यूने त्या सोमरक्षक गंधर्वांचे नामसंकीर्तन न केले तर सोम विकत घेतल्यासारखे

होणार नाही. व त्या यजमानाचा सोम स्वर्गलोकी स्वानभ्राजादि गंधर्व रक्षण करणार नाहीत. यासाठी जर अध्वर्यू पूर्वोक्त मंत्र म्हणून त्या सोमरक्षक गंधर्वाच्या नांवांचा उच्चार करील तर त्याच्या यजमानाचा सोम विकत घेतल्यासारखे होईल व स्वर्गलोकी स्वानभ्राजादि सोमरक्षक गंधर्व त्या यजमानाच्या सोमाचे रक्षण करतील. (अनुवाक १०).

विकत घेतलेला सोम वस्त्राच्या गाठोड्यात बांधला गेला म्हणजे तो वरुण देवाच्या आधिपत्याखाली जातो. सोमाला होणारे वस्त्राचे बंधन हे वरुण देवाच्या पाशाप्रमाणेच असल्याने तो जणू काय वरुणपाशानेच बद्ध झालेला असतो. यामुळे त्या सोमाचाही स्वभाव क्रोधी होण्याचा संभव असतो. तसे न व्हावे, सोम शांत स्वभावाचा व्हावा म्हणून यजमानाने गाठोड्यात बांधलेला सोम आपल्या मांडीवर घेताना, 'हे सोमा तू आमचा सन्मित्र होऊन आमच्या बरोबर ये', अशा अर्थाचा 'मित्रो न एहि सुमित्रधाः' हा मंत्र म्हणावा. अध्वर्यूने सोम यजमानाच्या उजव्या मांडीवर देताना ' हे सोमदेवा, तू इंद्राच्या उजव्या मांडीवर बैस', अशा अर्थाचा, 'इंद्रस्योरुमाविश' हा मंत्र म्हणावा. देवांनी जो सोम विकत घेतला तो त्यांनी इंद्राच्या उजव्या मांडीवर दिला. जो यजमान यज्ञ करीत असतो तो इंद्रच होय. यास्तव अध्वर्यूने पूर्वोक्त मंत्र यजमानाच्या उजव्या मांडीवर सोम देताना म्हणावा, हे युक्तच आहे. गाठोड्यात बांधलेला सोम घेऊन उठताना यजमानाने 'उदायुषा स्वायुषा' हा मंत्र म्हणावा.'अमर अशा देवांना अनुलक्षून आरोग्यकारक आयुष्याने युक्त असलेला हा सोम घेऊनच उठत आहे', असा या मंत्रात भावार्थ व्यक्त झाला आहे. हा मंत्र म्हणून उठले असता, अमर अशा देवांना घेऊनच यजमान उठल्यासारखे होते. 'हे सोमा विस्तीर्ण अशा आकाशाला अनुलक्षून तू माझ्याबरोबर ये'., अशा अर्थाचा 'उर्वन्तरिक्षमन्विहि' हा मंत्र म्हणून यजमानाने शकटाजवळ यावे. कारण, सोम उचलून घेतल्यापासून तो गाड्यावर आणून ठेवीपर्यंत तो अंतरिक्षदेवतात्मक म्हणजे अंतरिक्षदेवतेच्या आधीन असा असतो.

शकटाच्या साटीवर कृष्णाजिन पसरताना अध्वर्यूने 'हे कृष्णाजिन, तू अदितीचे स्थानच आहेस', या अर्थाचा 'अदित्याः सदोऽसि' हा मंत्र म्हणावा. त्या कृष्णाजिनावर सोम ठेवताना 'हे सोमदेवा, अदितीच्या स्थानाच्या ठिकाणी तू बैस', असा अर्थ असलेला, 'अदित्याः सद आसीद', हा मंत्र म्हणावा.

म्हणजे त्याने मंत्रामध्ये व्यक्त झालेल्या अर्थास अनुसरून कर्म केल्यासारखे होते.

वस्त्राने बद्ध केलेला म्हणजे वस्त्राच्या गाठोड्यात बांधलेला सोम वरुणदेवाच्या स्वामित्वाखाली असताना, 'मित्रो न एहि' हा मंत्र पठण करून अध्वर्यू त्या सोमाला मित्रदेवतात्मक करतो. परंतु, त्याच्या अशा करण्याने तो त्या सोमाला समृद्धिहीनच करतो. यासाठी त्या सोमाला कृष्णाजिनावर ठेवताना वरुण शब्दाने युक्त अशा 'अस्तभ्नाद्यामृषभो.' या वारुणीसंज्ञक ऋचेचे पठण करावे. असे केले असता अध्वर्यूने सोमाच्या स्वकीय अशा वरुणदेवतेकडूनच त्या सोमाला समृद्ध केल्यासारखे होते.

कृष्णाजिनावर ठेवलेल्या सोमाच्या भोवती वस्त्राने वेष्टन करावे. वस्त्र हे सर्वदेवतारूप आहे. यास्तव, सोमाच्या भोवती वस्त्राने वेष्टन केल्याच्या योगाने सर्व देवतांच्या कडूनच त्या सोमाला समृद्ध केल्यासारखे होते. शिवाय, हे वस्त्राचे वेष्टन सोमाला उपद्रव देणाऱ्या राक्षसांचा नाश करण्यालाही कारणभूत होते.

वस्त्राने सोमाभोवती वेढा घालताना 'वनेषु व्यंतरिक्षं ततान' हा मंत्र म्हणावा. कारण अरण्यात असलेल्या वृक्षांच्या मध्यंतरात वरुणदेवानेच अंतरिक्षाचा विस्तार केला आहे. 'वाजमर्वत्सु' हा पूर्वोक्त मंत्राचा दुसरा अंश अध्वर्यूकडून म्हटला जात असतो. कारण अश्वांच्या ठिकाणी वेगाने धावण्याची शक्ती वरुणदेवच निर्माण करीत असतो. 'पयो अघ्नियासु' हा पूर्वोक्त अंशाच्या पुढचा मंत्रांश होय. त्याचा उच्चार अध्वर्यूने करावा. कारण, निष्पाप अशा गाईंच्या ठिकाणी दूध वरुणदेवानेच निर्माण केलेले असते. 'हृत्सु क्रतुम्' हा त्यापुढचा अंश होय. या अंशाचा अध्वर्यूने उच्चार करावा. कारण यजमानांच्या चित्तांमध्ये यज्ञ करण्याविषयीचा संकल्प वरुणदेवच उत्पन्न करतो. 'विक्ष्वग्निम्' हा त्यापुढचा मंत्रांश अध्वर्यू पठण करीत असतो. कारण मनुष्यांच्या ठिकाणी वरुणदेवच जठराग्नीचे स्थापन करीत असतो. 'दिवि सूर्यमदधात्' हा त्यापुढचा मंत्रांश होय. या मंत्रांशाचे अध्वर्यूने पठण करावे. कारण द्युलोकाच्या ठिकाणी वरुणदेवाने सूर्य स्थापन केला आहे. 'सोममद्रौ' हा त्यापुढचा मंत्रांश आहे. त्याचा उच्चार अध्वर्यूने करावा. कारण, पर्वतावर असलेल्या पाषाणांच्या संधींच्या ठिकाणी वरुणदेव सोमवल्लीची उत्पत्ती करीत असतो. या मंत्रातील अद्री

हा शब्द पाषाणांचा वाचक आहे. अर्थात् जो यजमान सोमयाग करू इच्छितो त्या यजमानाला पर्वतावरील पाषाणांच्या संधींच्या ठिकाणी वल्लीरूप सोम प्राप्त होतो.

'उदु त्यं जातवेदसम्' या सौरी म्हणजे सूर्यदेवतात्मक ऋचेने सोमराजा ज्या शकटावर ठेवला जातो त्याच्या साटींच्या पुढच्या बाजूस कृष्णाजिनाचा पडदा बांधावा. म्हणजे तो सोमराजावर आक्रमण करू पाहणाऱ्या राक्षसांचा नाश करावयास कारणभूत होतो. ' हे शकटाचा भार सहन करणाऱ्या बैलांनो, तुम्ही या शकटाजवळ या', असा अर्थ असलेला 'उस्रावेतं धूर्वाहौ' हा मंत्र शकटास जोडावयाचे दोन बैल शकटाजवळ आणताना अध्वर्यूने म्हणावा. म्हणजे मंत्रात दर्शविल्याप्रमाणे त्याने कर्म संपादिल्यासारखे होते.

'सर्व भूतांचा पालक असलेल्या हे सोमदेवा, तू या शकटावर बसून यज्ञभूमीकडे सत्त्वर चल', असा भावार्थ असलेला, 'प्रच्यवस्व भुवस्पते' हा मंत्र शकट यज्ञभूमीकडे चालू करताना म्हणावा. कारण जगात निर्माण झालेल्या सर्व भूतांचा सोम हाच पालक आहे. 'विश्वान्यभि धामानि' हा पूर्वोक्त मंत्राचाच दुसरा अंश होय. हा अंश अध्वर्यू पठण करतो. कारण, यज्ञभूमीच्या ठिकाणी असणाऱ्या सर्व स्थानांच्या ठिकाणी सोम हा जात असतो. ' मा त्वा परिपरी विदत्' असा त्यापुढचा मंत्रांश अध्वर्यू म्हणतो. कारण, देवांनी जेव्हा द्युलोकातून सोम आणला तेव्हा विश्वावसू नांवाच्या गंधर्वाने त्याचा अपहार करण्यासाठी त्याच्यावर धाड घातली होती. यास्तव, यावेळी सोम यज्ञभूमीकडे नेताना त्यावर चोरांची धाड येऊ नये म्हणून पूर्वोक्त मंत्रांशाचे अध्वर्यूने पठण करणे अवश्य होय.

गाड्यात घालून आणलेला सोम ऋत्विज जेव्हा प्राग्वंश शाळेमध्ये असणाऱ्या आहवनीय अग्नीच्या सन्निध नेऊन ठेवतात, तेव्हा तो सोम अग्नीच्या सहवर्तमान त्या ठिकाणी प्रतिष्ठित होतो. अशा रीतीने अग्नी व सोम हे जेव्हा परस्परांशी एकत्र होतात तेव्हा ते दोघे यजमानावर लक्ष ठेवूनच एकत्र होत असतात. म्हणजे यजमानरूपी पशूच आपले हविर्द्रव्य आहे, अशा भावनेनेच अग्नी व सोम हे दोघे प्रेरित झालेले असतात. आणि हे प्रथम जाणूनच यज्ञ करण्यासाठी दीक्षा ग्रहण केलेला जो यजमान असतो तो स्वतःचेच पशुरूपाने उपाकरण करावयाचे ठरवून यज्ञाचा प्रारंभ करीत असतो. मग जेव्हा तो

अग्नी व सोम या दोन देवतांच्यासाठी पशूचे आलभन करून त्याच्या अंगांचे यजन करतो त्या वेळेस तो जणू काय अग्निषोमीय पशूची किमत देऊन स्वतःला अग्नी व सोम या दोघांच्याकडून विकत घेतो. यास्तव, अग्निषोमीय यागामध्ये आलभन केला जाणारा पशू हा यजमानरूपी पुरुषाचे मूल्य असल्यामुळे त्या पशुयागातील हविःशेषाचे भक्षण करू नये. परंतु, काही विद्वान असा सिद्धान्त निश्चित करतात की, अग्नी व सोम यांच्यासाठीच इंद्राने वृत्रासुराचा वध केला. यास्तव, अग्निषोमीय पशूचे आलभन अर्थात् अग्नी व सोम यांच्यासाठी केला जाणारा तो पशुयाग यज्ञकर्त्या यजमानाच्या शत्रूचा घात करणारा असतो. यास्तव, त्या यागाचा हविःशेष भक्षण करण्यास योग्यच आहे.

वस्त्रात बांधून ठेवलेल्या सोमाची वरुण ही देवता आहे. यास्तव, वरुण देवतात्मक असलेल्या मंत्रानेच त्याची परिचर्या म्हणजे सेवा करणे योग्य आहे. 'उपस्थान' करणे ही एक परिचर्या म्हणजे सेवाच होय. यास्तव, 'एवा वंदस्व वरुणं बृहंतम्' या वरुणदेवतात्मक ऋचेने अध्वर्यूने सोमाचे उपस्थान करावे. त्या यागाने सोमाला स्वकीय वाटणाऱ्या अशा वरुणदेवतेच्या रुपानेच अध्वर्यूने सोमाची उपस्थानरूप परिचर्या केल्यासारखे होते. (अनुवाक ११).

प्रपाठक २

प्राग्वंश शाळेजवळ येऊन पोचल्यानंतर सोमराजाला घेऊन येणाऱ्या गाड्याचे दोनही बैल सोडून टाकल्यानंतर आतिथ्येष्टीसंबंधी हविर्द्रव्याचे ग्रहण केले, म्हणजे आतिथ्येष्टीविषयक देवतेसाठी हविर्द्रव्याचा निर्वाप केला तर सोमराजाचे प्राग्वंशशालेत जाण्याचे कार्यच सर्वस्वी नाहीसेच केल्यासारखे होईल. आरंभिलेल्या आतिथ्येष्टिरूपी यागामध्ये विच्छेद उत्पन्न होईल. दोन्हीही बैल न सोडता जर आतिथ्येष्टीसंबंधी हविर्द्रव्याचा निर्वाप केला तर, पाहुणा घरात येऊन पोचण्यापूर्वीच त्याचे आतिथ्य करावे त्याप्रमाणे, सोमराजाचे प्राग्वंशशालेत जाण्याचे कार्य होण्यापूर्वीच त्याचे आतिथ्य केल्यासारखे होईल. यास्तव, गाड्याचा एक बैल सोडावा व दुसरा न सोडता तसाच जुपलेला ठेवावा. आणि आतिथ्येष्टी संबंधी हविर्द्रव्याचा निर्वाप करावा. असे केले असता सोमराजाचे प्राग्वंशशालेत जाण्याचे कार्य पूर्ण झाल्यासारखे होईल व दुसरा तसाच जुपलेला ठेवल्यामुळे सोमराजाचे प्राग्वंशशालेत जाण्याचे कार्य परित्यक्त केल्यासारखे

होणार नाही. अर्थात् आतिथ्येष्टिरूप यज्ञामध्येही विच्छेद निर्माण होणार नाही. त्या यज्ञाचे सातत्य कायम राहील.

आतिथ्येष्टीतील हविर्द्रव्याचा निर्वाप करते वेळी ज्या शकटावर हविर्द्रव्य ठेवले असेल त्या शकटाला अन्वारब्ध म्हणजे स्पर्श करावा. कारण घरामध्ये असलेल्या कणगीमध्ये किंवा पोत्यामध्ये भरून ठेवलेल्या साळीचे भात इत्यादि धान्यावर पत्नीचेच स्वामित्व असते. यास्तव, निर्वापाचे वेळी तिने शकटाला अन्वारब्ध केला म्हणजे अध्वर्यूने पत्नीच्या अनुमतीनेच हविर्द्रव्याचा निर्वाप केल्या सारखे होते. यज्ञाचे जे कर्मरूपी अंग पत्नी करते, म्हणजे पत्नीच्या साहाय्याने केले जाते, ते त्या यज्ञाच्या ठिकाणी दांपत्यभाव निर्माण करण्यास कारणभूत होते. कारण, यज्ञ हा पुरुष असून पत्नी ही स्त्री आहे. यज्ञासाठीच ज्या हविर्द्रव्याचा निर्वाप करावयाचा, ते हविर्द्रव्य ज्या शकटावर ठेवलेले असते तो शकटही यज्ञरूपच असतो. अर्थात् त्या शकटाला पत्नीने केलेला स्पर्श यज्ञाच्या ठिकाणी दांपत्यभाव निर्माण करण्यास कारणीभूत तर होतोच, पण शिवाय, शकटाला होणारा पत्नीचा अन्वारब्ध यज्ञाचा विच्छेद न होऊ देता त्याचे सातत्य राखायलाही कारणभूत होतो.

सोमराजा हा आपल्या जितक्या अनुचरांच्या सह आलेला असतो, त्या सर्व अनुचरांचेही आतिथ्य सोमराजाबरोबर करण्यात येत असते. गायत्र्यादि छंद हेच खरोखर सोमराजाच्या बरोबर येणारे त्याचे अनुचर होत. 'अग्नेरातिथ्यमसि विष्णवे त्वा' हा मंत्र पहिल्या खेपेस हविर्द्रव्याचा निर्वाप करताना म्हणावा. त्या योगाने सोमाराजाबरोबर 'अग्नी' शब्दाने उपलक्षित अशा गायत्री छंदाभिमानिनी देवतेचेही आतिथ्य केल्यासारखे होते. दुसऱ्या खेपेस निर्वाप करताना 'सोमस्यातिथ्यमसि विष्णवे त्वा' हा मंत्र म्हणावा. म्हणजे सोमराजाबरोबर 'सोम' शब्दोपलक्षित अशा त्रिष्टुप्छंदाभिमानिनी देवतेचे आतिथ्य केल्यासारखे होते. तिसऱ्या खेपेस निर्वाप करताना 'अतिथेरातिथ्यमसि विष्णवे त्वा' हा मंत्र म्हणावा. म्हणजे सोमराजाबरोबरच अतिथिशब्दोपलक्षित अशा जगतीछंदाभिमानिनी देवतेचे आतिथ्य केल्यासारखे होते. चौथ्या खेपेस 'अग्नये त्वा रायस्पोषदाव्ने विष्णवे त्वा' हा मंत्र म्हणावा. म्हणजे सोमराजाबरोबर रायस्पोषदायी या विशेषणाने युक्त अशा अग्निशब्दोपलक्षित अनुष्टुप्छंदाभिमानिनी देवतेचेही आतिथ्य केल्यासारखे होते. पांचव्या खेपेस निर्वाप करताना

'श्येनाय त्वा सोमभृते विष्णवे त्वा' हा मंत्र म्हणवा. म्हणजे सोमराजाबरोबरच सोमभृत् या विशेषणाने युक्त असलेल्या श्येनशब्दोपलक्षित अशा गायत्रीछंदाभिमानिनी देवतेचेच आतिथ्य केल्यासारखे होते. आतापर्यंतच्या पांच मंत्रांत असलेला 'विष्णू' हा शब्द सोमराजाचाच उपलक्षक असून अग्नी इत्यादि देवतांचे वाचक शब्द पर्यायाने सोमराजाचे अनुचर असणाऱ्या गायत्र्यादि छंदांचे अर्थात् तदभिमानिनी देवतांचे उपलक्षक होत.

हविर्द्रव्याचा पांच वेळ निर्वाप करावा. पंक्तिछंद हा पांचअक्षरी चरणांचा असून पांच हविर्द्रव्यांनी होणारा यज्ञ हाही पांक्त म्हणजे पंक्तिछंदरूप आहे. यास्तव, पांच वेळ हविर्द्रव्याचा निर्वाप केला असता अध्वर्यूने जणू यज्ञाचेच संपादन केल्यासारखे होते.

ब्रह्मवादी असे म्हणतात की, आतिथ्येष्टीच्या हविर्द्रव्याचा निर्वाप करताना पहिल्या व पांचव्या अशा दोन खेपेस गायत्री छंदानेच तो काय म्हणून केला जातो? परंतु, या शंकेचे समाधान असे की, गायत्रीने ज्या अर्थी सोम आणला आहे, त्याअर्थी पहिल्या व शेवटच्या म्हणजे पाचव्या अशा दोनही वेळचा निर्वाप गायत्री छंदाने केला जातो. सोमराजाच्या सत्कारासाठी केली जाणारी इष्टी हा जणू यज्ञाचा शिरोभागच आहे. मनुष्याचा शिरोभाग आठ कपालांच्या परस्पर संयोगानेच बनलेला असून त्याच्या खालचे कबंध म्हणजे शरीर हे त्या शिरोभागास जोडले जाणारे नववे कपालच समजावे. सारांश, मनुष्याचे शिर हे नऊ कपालांच्या संयोगाने निष्पन्न झाले असल्यामुळे यज्ञाचा शिरोभाग असलेल्या आतिथ्येष्टीमध्ये जो पुरोडाश तयार करावयाचा तो नऊ कपालांच्या संयोगावर भाजून तयार करावा.

नऊ कपालांवर भाजून पुरोडाश तयार केल्याने तीन तीन कपालांचे तीन विभाग त्यात समाविष्ट होतात. त्रिवृत् नांवाचा स्तोम तीन तृचाचा असून त्या प्रत्येक सूक्तात तीन तीन ऋचा असतात. अशा नऊ या संख्येने निष्पन्न होणाऱ्या त्रिवृत् स्तोमाशी त्या पुरोडाशाचे साम्य होत असल्याने आतिथ्येष्टीत तयार केला जाणारा तो पुरोडाश त्रिवृत्छंदोरूप असतो. त्रिवृत् छंद हा तेजस्वरूप आहे. यास्तव त्रिवृत्छंदोरूप असा पुरोडाश केला असता अध्वर्यूने यज्ञाचा शिरोभाग असलेल्या आतिथ्येष्टीचे ठिकाणी तेज स्थापन केल्यासारखे होते.

नऊ कपालांवर पुरोडाश तयार केल्याने तीन तीन कपालांचे तीन विभाग त्यात समाविष्ट होतात. म्हणजे त्रिकपालात्मक तीन पुरोडाशच जणू त्यात समाविष्ट झालेले असतात. त्रिकपालात्मक तीन पुरोडाशांच्या कपालांची संख्या नऊ असते. शिरोभागी असलेल्या सात व त्याला जोडूनच असणाऱ्या शरीराचे ठिकाणी दोन मिळून नऊ छिद्रांच्या ठिकाणी संचार करणारे प्राण नऊच असतात. सारांश, पूर्वोक्त पुरोडाशाच्या कपालांच्या व प्राणांच्या संख्येचे साम्यच आहे. प्राण हा त्रिवृत् म्हणजे ऊर्ध्व, मध्य व अध अशा तीन वृत्तींनी संचार करीत असतो. यास्तव, त्रिवृत्रूप प्राणाच्या तीन विभागसंयोगांचे पूर्वोक्त नवकपालात्मक पुरोडाशाच्या ठिकाणी स्वरूपसाम्य असल्यामुळे, तो पुरोडाश म्हणजे प्राणरूपच होय. अर्थात् नवकपालात्मक पुरोडाश तयार करून अध्वर्यू जणू काय यज्ञाचा शिरोभाग असणाऱ्या आतिथ्येष्टीचे ठिकाणी अनुक्रमे प्राणाचेच स्थापन करतो.

आश्ववाल म्हणजे काश जातीचे दर्भ हे जणू काय प्रजापतीच्या नेत्राच्या पापण्यांचे केसच असून उसाच्या दोन दोन पातींची विधृती ही जणू काय त्या प्रजापतीच्या नेत्रांतील दोन चर्मपुटेच होत. यास्तव, आतिथ्येष्टीमध्ये जो 'प्रस्तर' करावयाचा तो आश्ववालांचा म्हणजे काश जातीचा दर्भांचा करावा. व विधृती उसाच्या दोन पातींची करून ती प्रस्तराखाली आडवी ठेवावी. असे केल्याने प्रजापतीच्या नेत्रांचेच संपादन केल्यासारखे होते.

देवांनी ज्या आहुती अग्नीमध्ये दिल्या त्या असुरांनी देवांना न समजेल अशा रीतीने म्हणजे चावताना शब्द उत्पन्न न होऊ देता चोरून खाऊन टाकल्या. तेव्हा या गोष्टीचा प्रतीकार करण्यास कार्ष्मर्य म्हणजे शिवणीचा वृक्ष योग्य असल्याचे देवांना आढळून आले. तेव्हा देवांनी आतिथ्येष्टीमध्ये शिवणीच्या वृक्षाचे परिधी आहवनीयाभोवती घातले. त्या परिधींनी राक्षसांना दूर हाकून लावले. सारांश, राक्षसांचे निवारण करणारा शिवणीचा वृक्ष हा कर्मण्य म्हणजे यज्ञकर्मोपयुक्त आहे, हे लक्षात घेऊन देवांच्याप्रमाणे अध्वर्यूनेही आतिथ्येष्टीमध्ये कार्ष्मर्यमय म्हणजे शिवणीच्या वृक्षाचे परिधी आहवनीयाभोवती घालावेत. म्हणजे ते परिधी यज्ञकर्माला उपद्रव करणाऱ्या राक्षसांना दूर करण्याला कारणभूत होतात.

परिधींच्या फटींतून राक्षसांचा संचार होऊ नये म्हणून मधल्या परिधीला

अगदी चिकटून असे त्याच्या दोन्ही बाजूस परिधी घालावेत. त्यांच्यामध्ये फट राहू देऊ नये. पूर्वेच्या बाजूस परिधी घालू नये. कारण उदयास येणारा आदित्य हा पूर्वबाजूस येणाऱ्या राक्षसांना हाकून लावीत असतो. आहवनीयाच्या आयतनाच्या पूर्वभागी दक्षिणेस एक व उत्तरेस एक अशा दोन समिधा उभ्या खोचून ठेवाव्यात. म्हणजे त्या ऊर्ध्व दिशेकडून उपद्रव देणाऱ्या राक्षसांना दूर हाकून लावतात. या दोन समिधांमध्ये मिथुनभाव म्हणजे दांपत्याचे स्वरूप निर्माण व्हावयासाठी दक्षिणेकडील समिध मंत्राने उभी खोचावी व उत्तरेकडील मंत्र न म्हणता खोचावी. अशा प्रकारे एक समंत्रक व एक अमंत्रक अशा दोन समिधा उभ्या पुरल्या म्हणजे त्यांच्या ठिकाणी स्त्रीपुरुषरूप दांपत्यभाव निर्माण होतो. अशा प्रकारे दोनच समिधा उभ्या कराव्या. म्हणजे त्या द्विपाद अशा यजमानाच्या प्रतिष्ठेला कारणभूत होतात.

ब्रह्मवादी असे म्हणतात की, अग्नी व सोम हे दोन देव यज्ञकर्माचे निर्वाहक असताना नुसत्या सोमाच्याच सत्कारासाठी आतिथ्येष्टी काय म्हणून केली जाते? अग्नीचाही आतिथ्येष्टीच्या रूपाने सत्कार का केला जात नाही? परंतु, या शंकेचे समाधान असे की, अरणींचे मंथन करून उत्पन्न केलेला अग्नी आहवनीयात मिसळावा. अशा प्रकारे मंथनोत्पादित अग्नीचे आहवनीयाग्नीत केले जाणारे मिश्रण हेच आहवनीयरूप अग्नीचे आतिथ्य किंवा सत्कार होय. शिवाय, अग्नी हा सर्वदेवतात्मक आहे, असे ब्रह्मवादी म्हणत असतात. यास्तव, आतिथ्येष्टीमध्ये वेदीत हवीचे आसादन केले, म्हणजे वेदीत हवी आणून ठेवला की अरणींचे मंथन करून अग्नी निर्माण करावा. असे जर अध्वर्यूने केले तर त्याने जणू काय वेदीत आणून ठेवलेल्या हवीचे भक्षण करण्यासाठी मंथनोत्पादित अग्नीच्या रूपाने सर्वच देवता उत्पन्न केल्यासारखे होते.(अनुवाक १)

देव व असुर परस्परांच्याशी युद्ध करण्यास प्रवृत्त झाले. परंतु, सर्व देव परस्परांना अप्रिय झाले होते. कोणी कोणाचे श्रेष्ठत्व मानीनासा होऊन देवसमाजात निरनिराळे पांच पक्ष किंवा तट निर्माण झाले. अग्नि इत्यादि पांच देव त्या पांच पक्षांचे सेनानी म्हणजे प्रमुख झाले व वसू इत्यादि पांच गण त्या सेनानींचे अनुयायी झाले. अग्नीने अष्ट वसूंच्या सह आपल्या पक्षाची उभारणी केली व सोमाने अकरा रुद्रांच्या सह आपला पक्ष सजविला. इंद्राने मरुद्गणांच्या सहकारितेने आपला पक्ष संघटित केला आणि वरुणाने

बारा आदित्यांच्या सह आपला पक्ष बनविला. विश्वेदेवांच्या साहाय्याने बृहस्पतीने आपल्या पक्षाची संघटना केली. अशा प्रकारे देवसमाजातील या पांच पक्षांनी परस्परांविषयी विरोधीपणाचे वर्तन केल्यानंतर काही काळाने 'आपण आपल्यामध्ये निरनिराळे विरोधी पक्ष उत्पन्न करून आपली शक्ती हीन करीत आहोत व त्यामुळे आपले शत्रू असलेल्या असुरांना जय मिळवून देण्याचे कार्य आपणच सुसाध्य करून देत आहोत', हे देवांच्या विचारदृष्टीला दिसून आले. यास्तव, आपल्यामध्ये उत्पन्न झालेला विरोधभाव नाहीसा करण्याच्या इच्छेने 'आपण आपले स्त्रीपुत्रादि एका ठिकाणी जमवू व त्यांच्या समोरच परस्परांचा विरोध न करण्याविषयी शपथ करू', असे सर्व देवांनी ठरवून त्याप्रमाणे त्यांनी आपल्या कुटुंबातील सर्वांना एकत्र केले. आणि स्वशरीररक्षक अशा 'तनूनपृ' संज्ञक जठराग्नीची सर्व देवांनी अशी शपथ घेतली की, आपणांपैकी जो कोणी दुसऱ्याचा प्रथम द्रोह करील, तो आपल्या पत्नीपुत्रादिरूपाने असणाऱ्या तनूंच्यापासून भ्रष्ट होईल. म्हणजे स्वकीय अशा कुटुंबीयांच्या पासून बहिष्कृत होईल. एकाच हेतूने 'तनूनपृ' संज्ञक जठराग्नीची शपथ घेणाऱ्या सर्वांना 'सतानूनप्त्री' अशी संज्ञा आहे. देवांच्याप्रमाणे 'तनूनपृ' अग्नीची एकाच हेतूने शपथ' घेणाऱ्या अनेक मनुष्यांपैकी जो मनुष्य इतरांशी प्रथम द्रोह करील तो विनाश पावेल.

आज्य हे तनूनपृसंज्ञक अग्नीला प्रिय असणारे हविर्द्रव्य असल्याने ते 'तनूनपृ' अग्निरूपच समजावे व त्या आज्याचीच शपथ घ्यावी. म्हणजे तनूनपृ अग्नीचीच शपथ घेतल्याप्रमाणे होते. तनूनपृ अग्नीची शपथ घेण्याच्या विधीस 'तानूनप्त्र' अशी पारिभाषिक संज्ञा आहे. तानूनप्त्र विधीसाठी एका पात्रात आज्य घेताना त्याचे अनेकवार अवदान घ्यावे म्हणजे ते शत्रूच्या पराभवाला कारणभूत होते. आज्याचे अनेकवार अवदान घेणारा स्वतः ऐश्वर्यवान होतो व त्याचा शत्रू पराभव पावतो.

'तानूनप्त्र' संज्ञक विधी करणारे म्हणजे शपथ घेणारे देव प्रथम पांच पक्षांनी विभागलेले होते. मागाहून त्यांनी शपथ करण्याच्या इच्छेने आपल्यास स्वशरीराप्रमाणे प्रिय असणाऱ्या कुटुंबीयांना एकत्र केले होते. यासाठी तानूनप्त्र विधीसाठी आज्याचे अवदान पांच वेळ घ्यावे. शिवाय असे केल्याच्या योगाने पंचाक्षरी चरणांचा पंक्तिछंद व पांच हविर्द्रव्यांनी केला जाणारा यज्ञ या दोहोंचेही संपादन केल्यासारखे होते. 'आपतये त्वा गृहणामि' या मंत्राने आज्याचे

पहिले अवदान घ्यावे. प्राण हाच 'आपति' होय. यास्तव या मंत्राने पठण करून पहिले अवदान घेतले असता अध्वर्यूने प्राणालाच जणू संतुष्ट केल्यासारखे होते. दुसरे अवदान घेताना 'आपतये च्या जागी 'परिपतये' या शब्दाचा उच्चार करावा. 'मन' हेच 'परिपति' होय. अर्थात् त्याचा उच्चार करून अवदान घेतले असता मनालाच संतुष्ट केल्यासारखे होते. तिसरे अवदान घेताना 'तनूनपत्रे' असा शब्दोच्चार करावा. या शब्दाने युक्त अशा मंत्राने अवदान घ्यावे. कारण देवांनी पूर्वी शपथ घेतली त्यावेळी आपल्या कुटुंबीयांच्या रूपाने स्वत:चे ओजच जणू एकत्र केले होते. चौथे अवदान घेताना 'शाक्वराय त्वा' हा मंत्र म्हणावा. कारण देवांनी आपल्या कुटुंबीयांच्या रूपाने स्वत:च्या शक्तीलाच जणू एकत्र केले होते. 'शक्मन्नोजिष्ठाय त्वा' असा मत्र म्हणून पांचवे अवदान घ्यावे. कारण देवांनी शपथ घेतेवेळी आपल्या कुटुंबीयांच्या रूपाने जणू आपल्या आत्म्याचे ओजिष्ठ असे सारच एकत्र केले होते.

जितके ऋत्विज असतील तितक्या सर्वांनी 'तानूनप्त्र' संज्ञक आज्याला स्पर्श करून 'अनाधृष्टमस्यनाधृष्यम्' हा मंत्र म्हणावा. कारण आज्य हे कोणाकडूनही तिरस्कृत होत नाही. देवांचे ओजही कोणाकडूनही तिरस्कृत केले न जाणारेच असते. यास्तव, पूर्वोक्त मंत्राशानंतर 'देवानामोज:' हा मंत्रांश म्हणावा. कारण आज्य हे देवांचे जणू अतिरस्करणीय असे ओजच आहे. त्यानंतर 'अभिशस्तिपा अनभिशस्तेन्यम्' हा मंत्रांश म्हणावा. कारण 'तानूनप्त्र' संज्ञक आज्य हेच अभिशस्तीपासून, असत्यतेचा खोटा आळ घेतला जाण्याच्या पीडेपासून संरक्षण करणारे व अभिशस्तीपासून अगदी अलग राहणारे असे आहे. 'दीक्षेचा अधिपती माझ्या दीक्षेला अनुमती देवो', असा अर्थ असणारा 'अनु मे दीक्षां दीक्षापतिर्मन्यताम्' हा मंत्र अध्वर्यूने यजमानाकडून म्हणवावा. म्हणजे मंत्रात व्यक्त केल्याप्रमाणे दीक्षाधिपतीकडून यजमानाच्या दीक्षेला अध्वर्यूने अनुमती मिळवून दिल्यासारखे होते.

पूर्वी एकदा आपल्या सामर्थ्याने वज्राप्रमाणे तीक्ष्ण केलेल्या घृताचा आघात करून देवांनी सोमाला ताडन केले होते. तेव्हापासून सोम घृतापासून भयभीत होत असतो. आणि ऋत्विज तर वेदीमध्ये ठेवलेल्या नानूनप्त्रसंज्ञक घृतास स्पर्श करून तानूनप्त्र विधी करतात. हा विधी वेदीपासून अगदी जवळ म्हणजे आहवनीयाच्या दक्षिण बाजूस ठेवलेल्या सोमाच्या सान्निध्यातच

होत असल्याने तो सोम भयभीत झालेला असतो. यास्तव, त्या सोमाचे ऋत्विजांनी व यजमानाने आप्यायन म्हणजे भयनिवारण करून त्याला पुन: पूर्ववत् प्रफुल्लित करावा.

सोमराजाचे आप्यायन करताना म्हणजे मध्ये धरलेल्या सुवर्णावरून मदंतीतील उदक सोमराजावर सिंचित करताना, 'हे सोमदेवा, तुझा जो सूक्ष्म अवयव शुष्क झाला असेल, तो पुन्हा टवटवीत होवो, त्याचप्रमाणे तुझा जो सूक्ष्म अवयव क्षीण झाला असेल तोही पुन्हा संवर्धित होवो', असा अर्थ असलेला, 'अंशुरंशुस्ते देव सोमाऽऽप्यायताम्' हा मंत्र प्रत्येक आप्यायन करणाराने म्हणावा. म्हणजे त्या मंत्रप्रभावाने सोमराजाचे जे अंग शुष्क झाले असेल, ते पुन्हा टवटवीत केल्यासारखे होते व जे अंग क्षीण म्हणजे नष्ट झाले असेल ते पुन: प्रा[illegible] होते. 'आ तुभ्यमिंद्र: प्यायतामा त्वमिंद्राय प्यायस्व' हा पूर्वोक्त मंत्रांपैकीच एक अंश असून 'हे सोमा, इंद्र तुला उत्साहित करो व तू इंद्राला उत्साहित कर' असा त्या अंशाचा अर्थ आहे. या अंशाचे पठण केले असता इंद्र सोमाला व सोम इंद्राला उत्साहित करतो. 'आप्यायय सखीन् सन्या मेधया' हा पूर्वोक्त मंत्रांशाच्या पुढचा अंश आहे. 'मित्रभूत अशा ऋत्विजांना बुद्धिमत्तेने व धनाने तू समृद्ध कर', असा त्या अंशाचा अर्थ आहे. ऋत्विज हे त्या सोमराजाचे मित्र होत. अर्थात् या अंशाच्या पठणामुळे सोमराजा ऋत्विजांना बुद्धिमत्तेने व धनसंपत्तीने समृद्ध करतो. 'स्वस्ति ते देव सोम सुत्यामशीय' हा पूर्वोक्त मंत्राचा शेवट असून 'हे सोमा, तुझे कल्याण असो, तुझ्या प्रसादाने आम्ही 'सुत्या' नामक अनुष्ठानाला प्राप्त होऊ', असा त्या शेवटच्या अंशाचा अर्थ आहे. याचे पठण केले असता यात व्यक्त केलेल्या आशीर्वादाचीच याचना सोमराजाजवळ केल्यासारखे होते.

सोमराजाचे जे 'आप्यायन' करतात, ते इहलोकापासून च्युत होतात. कारण सोमराजा हा नामीइतक्या उंचीच्या घडवंचीवर ठेवला असल्यामुळे तो अंतरिक्षदेवतेच्या सत्तेखाली गेलेला असतो. यास्तव, त्याचे आप्यायन करणारे ऋत्विजही अंतरिक्षदेवतेच्या आधिपत्याखाली जातात. त्यांची इहलोकी स्थिती राहत नाही. यास्तव, सोमराजाचे आप्यायन करणारांनी 'एष्टा राय: प्रेषे भगाय' या मंत्राने प्रस्तरावर दोनही हातांची अंजुली ठेवून द्यावापृथिवींना नमस्कार करावा. असे केल्याच्या योगाने द्यावापृथिवींच्या कृपेने सोमराजाचे

आप्यायन करणारे ऋत्विज या भूलोकाच्या ठिकाणी प्रतिष्ठेला प्राप्त होतात.

देव व असुर हे एकमेकांच्याशी युद्ध करण्यास सज्ज झाले. परंतु, असुरांच्या भयाने अग्नीच्या ठिकाणी प्रविष्ट झाले. म्हणजे अग्नीच्या आड दडले. म्हणूनच विद्वान लोक अग्नी हा सर्वदेवतारूप आहे, असे म्हणत असतात. त्या देवांनी अग्नीचे सैन्य आघाडीवर ठेवले व त्याच्या मागे राहून त्यांनी असुरांच्या बरोबर सामना दिला. व असुरांचा पराभव केला. जो यजमान अवांतर दीक्षेचे ग्रहण करतो तो जणू काय अग्नीच्याच ठिकाणी प्रविष्ट होत असतो. अशाप्रकारे अग्नीच्या ठिकाणी होणारा यजमानाचा प्रवेश त्याच्या शत्रूच्या नाशाला कारणभूत होत असतो. अवांतर दीक्षा ग्रहण करणारा यजमान स्वत: ऐश्वर्यसंपन्न होतो व त्याचा शत्रू पराभव पावतो. दीक्षेच्या ग्रहणाने यजमान स्वत:चे रक्षण करतो व अवांतर दीक्षेच्या ग्रहणाने तो आपल्या प्रजेचे रक्षण करतो.

यजमानाने आपल्या कमरेस बांधलेली मेखला घट्ट करावी. कारण कोणीही मनुष्य स्वत:च्या शरीराला कष्ट घेऊन आपल्या प्रजेचे उत्तम प्रकारे पालन करीत असतो. आणि म्हणूनच प्रजा ही आपणाहून भिन्न मानली जाते. मेखला ही प्रजास्थानीय असल्यामुळे ती आपल्याहून दूर न राहील, सैल न होईल अशा प्रकारे ती आपल्या कमरेस चिकटून राहील अशी घट्ट करावी. थंड दूध प्याल्याने आणि शीतोदकाने मार्जन केल्याने यजमानाचा जठराग्नी मंद किंवा विझल्यासारखा होतो. यास्तव, यजमानाने आपला जठराग्नी प्रदीप्त व्हावयासाठी तापविलेले दूध प्यावे. व मदंतीतील कढत पाण्याने मार्जन करावे. व्रतग्रहणांगभूत दुग्धप्राशन करताना 'या ते अग्ने रुद्रिया तनू:' म्हणजे 'हे अग्निदेवा तुझी जी रुद्रिय म्हणजे क्रोधाने संतप्त असणारी तनू आहे', इत्यादि अर्थ व्यक्त करणारा मंत्र म्हणावा. अशा रीतीने मंत्रपूर्वक केलेले दुग्धप्राशन स्वकीय अशा अग्निदेवाच्या सहितत्वाला म्हणजे अग्निदेवतेसह दुग्धप्राशन केल्यासारखे होण्याला व जठराग्नीच्या ठिकाणी शांती उत्पन्न करण्याला कारणभूत होते. (अनुवाक २).

आघाडीवर असलेल्या अग्नीच्या सैन्याकडून पराभव पावलेल्या असुरांनी आपल्या संरक्षणासाठी पृथ्वी, अंतरिक्ष व द्युलोक या तीन लोकांच्या ठिकाणी तीन भुईकोट किल्ले बांधले. पृथ्वीवर बांधलेल्या किल्याभोवती त्यांनी पोलादी

कृष्ण यजुर्वेदीय तैत्तिरीय संहिता

तट उभारला. अंतरिक्षातील किल्याभोवती त्यांनी रुप्याचा भक्कम तट उभारला आणि द्युलोकातील किल्याला सुवर्णाच्या तटाचा त्यांनी वेढा दिला. अशा प्रकारचा असुरांनी बंदोबस्त केल्यामुळे त्रैलोक्यामध्ये असुरांनी निर्माण केलेल्या त्या तीन किल्यांच्यावर हल्ला चढविणे अग्नीच्या आघाडीवरील सैन्यालाही अशक्य झाले. तेव्हा देवांनी 'उपसत्' नांवाच्या अनुष्ठानाच्या प्रभावाने असुरांना जिंकण्याचे ठरविले. व तदनुसार देव असुरांनी उभारलेल्या तीनही किल्यांच्या पायथ्याशी असलेल्या सभोवारच्या प्रदेशांत आपल्या सैन्याचा तळ देऊन स्वस्थ बसले. देवांचा असे करण्यात अभिप्राय असा की, अशा रीतीने आपण बरेच दिवस तळ देऊन बसलो म्हणजे किल्यात राहाणाऱ्या असुरांच्या जवळची रसद हळू हळू संपत जाऊन त्यांची उपासमार होईल आणि आपण तळ देऊन बसलो असल्याने असुरांना बाहेरूनही रसद मिळविण्याचा मार्ग बंद होईल. शिवाय नाना प्रयत्नाने असुरसमुदायात फितुरी उत्पन्न करूनही त्यांना आपण कमजोर करून जेरीस आणू शकू. एवं च. असुरांच्यावर जय मिळविण्यासाठी त्यांच्या किल्याभोवती बरेच दिवस वेढा देऊन बसण्याचा उपाय देवांनी अमलात आणला. यावरूनच लोकव्यवहारामध्ये देखील कोणी कोणी असे बोलतात की, वेदाध्ययन करून त्यातील ज्ञानाचा विचार करणारा ब्राह्मण असो, किंवा वेदाध्ययनाधिकार नसलेला अडाणी शूद्र असो, ज्ञानी व अज्ञानी असे दोनही प्रकारचे लोक देखील युद्धाने जो एखादा भव्य किल्ला सर करता येत नाही, तो त्याच्या भोवती दीर्घकाल वेढा देऊन बसल्याने जिंकता येणे शक्य होते.

बरेच दिवस 'उपसत्' संज्ञक अनुष्ठानपूर्वक वेढा देऊन बसण्याने असुर वठणीस येत नाहीत असे पाहून कालविलंब न करता असुरांच्याशी निकराची लढाई देण्याचा विचार देवांनी निश्चित केला व त्या लढाईत आपणास निश्चितपणे जय मिळण्यासाठी एक विशिष्ट प्रकारचा बाण देवांनी निर्माण केला. अग्नीला त्यांनी बाणाचा दांडा बनविला, सोमाला त्या बाणाचे पोलादी फाळ बनविले आणि विष्णूला त्यांनी त्या फाळाचे तीक्ष्ण असे टोक बनविले. अग्नी, सोम व विष्णू या तीन देवतांच्या समष्टीने आपण बाण तयार केला खरा, पण बायकामुलांच्या सह असुरांचा घात करणारा हा अपूर्व बाण असुरांच्यावर सोडणार कोण? कारण हा बाण सोडण्याला विशेष शक्तिमान् असाच कोणी पाहिजे, वाटेल त्या देवाला हा बाण असुरांच्यावर फेकणे शक्यच होणार

नाही, असा देवांना विचार पडला. काही देव अत्यंत क्रूर व निर्घृण असलेला रुद्रच हा बाण असुरांच्यावर फेकण्यास योग्य आहे, असे म्हणाले. सर्व देवांना त्यांचे म्हणणे पटले व त्यांनी तीन देवतांच्या समष्टीने निर्माण केलेला तो अमोघ बाण असुरांच्यावर टाकण्याविषयी रुद्राची प्रार्थना केली. तेव्हा रुद्र त्यांना म्हणाला, 'मी असुरांच्यावर बाण सोडीन. पण तुम्ही मला मी मागेन तो वर दिला पाहिजे. सर्व पशूंचा मीच एकटा अधिपती होईन. ही माझी मागणी जर तुम्ही मान्य करीत असाल तर मी तुमचे कार्य करतो'. देवांनी सर्व पशूंच्यावर रुद्राचे आधिपत्य मान्य केले. व तेव्हापासून रुद्र हा पशूंचा अधिपती झाला. देवांना वचन दिल्याप्रमाणे तो देवतात्रयाच्या समष्टीने निर्माण झालेला अमोघ बाण असुरांच्या किल्यांवर फेकला आणि त्या बाणाच्या प्रहाराने तीनही लोकांच्या ठिकाणी असुरांनी उभारलेल्या अभेद्य किल्यांचा रुद्राने पूर्ण विध्वंस केला. तीनही लोकांतून असुरांना देवांनी पिटाळून लावले.

यासाठी उपसत्संज्ञक इष्टी करून त्या इष्टीमध्ये अग्नी, सोम व विष्णू या तीनही देवतांना आज्याच्या आहुती द्याव्यात. अशा प्रकारे दिलेल्या आहुती यजमानाच्या शत्रूंना हाकून लावण्यास कारणभूत होतात. उपसत् इष्टीसंबंधी आता सांगितलेल्या प्रधान देवतांना आज्याहुती देण्यापूर्वी प्रयाजादि इतर कोणतीही आहुती देऊ नये. जर तशा प्रकारे आहुती दिली तर प्रधान देवता या नात्याने अग्नीला देण्यात यावयाच्या आहुतीचे प्रामुख्य दूर केल्यासारखे होऊन ते प्रामुख्य प्रयाजादि अंगांमधील अग्नीला द्याव्या लागणाऱ्या आहुतीला दिल्यासारखे होते. अशाप्रकारे, प्रधानाहुतींच्या पूर्वी कोणतीही आहुती देण्याचा निषेध केला असला तरी त्याला अपवाद म्हणून 'आघार' संज्ञक आज्याहुती स्रुव्याने द्यावी. ही आहुती, दर्शपूर्णमासादि यज्ञाप्रमाणेच 'उपसत्' संज्ञक यज्ञाचेही स्वरूप स्पष्ट होण्याला कारणभूत होते.

इतर इष्टींतील प्रधान देवतांचे यजन करताना प्रत्येक देवतेचे यजन केल्यावर अध्वर्यूने आपल्या जागी परत यावयाचे, आणि नंतर दुसऱ्या देवतेसाठी अवदान घेऊन पुनः वेदी ओलांडून आहवनीयाच्या दक्षिणेस उभे राहून त्या देवतेचे यजन करावयाचे, असा क्रम असतो. परंतु, उपसत् इष्टीच्या प्रधान देवतांचे यजन करण्यासाठी एकदा वेदी ओलांडून आहवनीयाच्या दक्षिणेस

उभे राहिल्यानंतर तेथूनच अनुक्रमे अग्नी, सोम व विष्णू या तीनही प्रधान देवतांचे यजन करावे. आणि नंतर एकदमच अध्वर्यूने आपल्या जागी यावे. प्रत्येक देवतेसाठी पुन्हा पुन्हा वेदीचे आक्रमण करु नये. असे केल्याच्या योगाने, यजमान आपल्या शत्रूंना, पुन: ते केव्हाही परत येणार नाहीत, अशाप्रकारे, तीनही लोकांतून कायमचे हाकून लावतो. अग्नी, सोम व विष्णू या तीनही प्रधान देवतांचे यजन करून वेदीच्या अलीकडे आपल्या जागी परत आल्यानंतर अध्वर्यूने उपसत् नामक आज्याहुती द्यावी. असे केले असता यजमान पृथिव्यादि तीनही लोकांच्या ठिकाणी असणाऱ्या आपल्या शत्रूंना जिंकतो, त्यांना हाकून लावतो व स्वर्गलोकी गेल्या नंतर शत्रूंनी बळकाविलेल्या त्या लोकांतील स्थानांवरही तो अधिष्ठित होऊन राहतो.

देवांनी प्रात:काळी ज्या 'उपसत्' नामक इष्टी केल्या, त्यांच्या योगाने त्यांनी दिवसांपासून असुरांना हाकलून लावले, आणि सायंकाळी ज्या उपसत् इष्टी केल्या त्यांच्या प्रभावाने त्यांनी रात्रींपासून असुरांना हाकलून लावले. यास्तव, सोमयाग करणारा यजमान जर देवांच्या प्रमाणे सांज सकाळ दोनही वेळ उपसत् इष्टीचे अनुष्ठान करील, तर त्या अनुष्ठानाच्या प्रभावाने तो आपल्या शत्रूंना अहोरात्रांपासून दूर हाकून लावील. उपसत् इष्टीमध्ये उपयोगात आणल्या जाणाऱ्या याज्या व पुरोनुवाक्या यांच्या ठिकाणी शिळेपणा किंवा नीरसता उत्पन्न होऊ नये म्हणून प्रात:काळच्या उपसत् इष्टीमध्ये याज्या म्हणून ज्या ऋचा पठण केल्या असतील, त्याच ऋचा सायंकाळच्या उपसत् इष्टीत पुरोनुवाक्या म्हणून पठण कराव्यात. याप्रमाणे सकाळी व सायंकाळी मिळून दोन वेळ उपसत् इष्टीचे अनुष्ठान तीन दिवस करावे. कारण, पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु हे तीन लोक आहेत. यास्तव, तीन दिवस उपसत् इष्टींचे अनुष्ठान केले असता तीनही लोकांना संतुष्ट केल्यासारखे होते. तीन दिवसांत सहा उपसत् इष्टी होतात. वसंतादि ऋतू सहा आहेत. अर्थात् सहा उपसत् इष्टी केल्या असता, यजमानाने सहा ऋतूंनाच प्रसन्न केल्यासारखे होते.

द्विरात्र इत्यादि 'अहीन' संज्ञक सोमयागामध्ये बारा दिवस उपसत् इष्टी कराव्यात. कारण, बारा महिन्यांच्या समवायाने संवत्सर पूर्ण होत असतो. यासाठी बारा दिवस उपसत् इष्टी केल्या असता यजमानाने संवत्सरालाच जणू संतुष्ट केल्यासारखे होते.

बारा दिवसांत चोवीस उपसत् इष्टी होतात. एका संवत्सरामध्ये अर्धमास म्हणजे पंध्रवडेही चोवीसच असतात. अर्थात् चोवीस उपसत् इष्टी केल्याच्या योगाने यजमानाने जणू काय चोवीस अर्धमासांना संतुष्ट केल्यासारखे होते. जो कोणी यजमान 'मला इहलोकी समृद्धिशील असे फल प्राप्त व्हावे', अशी इच्छा करील त्याने 'आराग्रा' संज्ञक अवांतर दीक्षा ग्रहण करावी. बैलाला टोचण्यासाठी जी लोखंडाची पराणी म्हणजे आरा केलेली असते, तिचे अग्र म्हणजे मुख अतिशय बारीक असते. त्या पराणीच्या किंवा आराच्या टोकाला आराग्र असे म्हणतात. अर्थात् ज्या अवांतर दीक्षेचे मुख म्हणजे प्रारंभ आराग्रासारखे लहान असते, ती अवांतर दीक्षा होय. सोमयागाची दीक्षा ग्रहण केलेल्या यजमानाने सोमवल्ली विकत घेण्याच्या दिवशी सायंकाळी, गाईच्या एका स्तनात निघेल तेवढेच दूध काढून ते तापवून प्यावे. दुसऱ्या दिवशी सकाळी दोन स्तनांचे व सायंकाळी तीन स्तनांचे दूध प्यावे. त्याच्या दुसरे दिवशी सकाळी चार स्तनांत निघेल तितके दूध प्यावे. अशा प्रकारे प्रारंभी अल्प असा दुग्धाहार करून तो उत्तरोत्तर वाढवीत जाणे हीच आराग्रानामक अवांतर दीक्षा होय. या अवांतर दीक्षेचे ग्रहण करणारा यजमान इहलोकी समृद्धिशील असे फल संपादन करतो.

ज्या अवांतर दीक्षेचा प्रारंभ अधिक दुग्धाहाराने होतो, व उत्तरोत्तर कमी कमी होत जातो, त्या अवांतर दीक्षेस 'परोवरीयसी' अशी संज्ञा आहे. ज्या यजमानाला 'स्वर्गलोकी मला समृद्धिशील असे फल प्राप्त व्हावे', अशी इच्छा असेल त्याने परोवरीयसी दीक्षेचे ग्रहण करावे. आरंभी चार, नंतर तीन, नंतर दोन व शेवटी एक अशाप्रकारे उत्तरोत्तर कमी स्तनांतील दुग्धाचा आहार यजमानाने करणे, हीच परोवरीयसीसंज्ञक अवांतर दीक्षा होय. या अवांतर दीक्षेचे जो ग्रहण करील त्याला स्वर्गलोकी समृद्धिशील असे फल प्राप्त होईल.(अनुवाक ३)

सोमयाग करणारे जे यजमान 'उपसत्' इष्टीचे अनुष्ठान करतात, ते स्वर्गलोकाला प्राप्त होत असतात. अशा यजमानांमध्ये जो कोणी शास्त्राने सांगितलेल्या पूर्वोक्त रीतीने जेवढा दुग्धाहार घ्यावयाचा, त्यापेक्षा अधिक असा 'भात' वगैरे आहार सेवन करील तो स्वर्गलोकापासून च्युत होईल. यास्तव, अत्यंत श्रद्धालू असा एखादा यजमान 'शास्त्रविहित अशा दुग्धाहारापेक्षा

मी काहीही अधिक सेवन करणार नाही', असा मनाने निश्चय केल्यामुळे अगदीच थकू लागला, शास्त्राविहित अशा परिमित दुग्धाहाराने आपली शक्ती अगदीच क्षीण होऊ लागली, असे त्याला वाटू लागले तर त्याने दुसऱ्या ठिकाणी म्हणजे कूष्मांडहोमप्रकरणी श्रुतीने उपदिष्ट केलेल्या आहाराचे, आपली शक्ती क्षीण न होईल इतक्या बेताने, सेवन करावे. ब्राह्मणाने थोडा अधिक दुग्धाहार करावा, क्षत्रियाने पातळ असा थोडा भात खावा, वैश्याने आमिक्षा सेवन करावी अथवा अगदीच थकण्याची भीती वाटल्यास भात, भाजके सातू, पीठ, तूप या पदार्थांपैकी कोणत्यातरी पदार्थांचा, शक्ती क्षीण न होईल इतक्याच प्रमाणात आहार करावा.

'शास्त्रविहित तेवढाच आहार सेवन करून मी यथोक्त फल मिळवीन' असा निश्चय करून तदनुसार वर्तन करण्याचा जो यजमान प्रयत्न करतो त्याला 'स्वार्थेत' म्हणजे 'इच्छित फलरूपी स्वार्थ साधण्याचा यत्न करणारा', असे नांव आहे. अशा प्रकारचा यत्न करणारांपैकी जर एखादा शास्त्राने परिमित अशा दुग्धाहाराने अगदीच थकू लागला तर त्याने शास्त्रविहित अशा मुख्य दुग्धाहाराबरोबर अनुकल्परूपाने विहित अशा पदार्थांचा आहार घेऊन आपल्या अशक्ततेचा परिहार करावा व अवशिष्ट राहिलेले अनुष्ठान शेवटास न्यावे. उदाहरणार्थ, मकरमासात प्रयागक्षेत्री नित्य स्नान करण्याचा स्वार्थ साधणाऱ्या अनेक भाविकांपैकी एखादा प्रयागास जाताना वाटेत थकला, मकरमासाच्या पहिल्याच दिवशी प्रयागास पोचला नाही तर तो प्रयागास जाण्याचा बेत अजीबात न टाकता दुसऱ्या दिवशी प्रयागास जातो, व तेथील तीर्थवासी लोकांच्या सान्निध्यात उरलेला सर्व मास तेथे राहून आपले स्नानदानादि नियम पाळतो, त्याचप्रमाणे दीक्षा ग्रहण करून उपसद् इष्टींचे अनुष्ठान करणाऱ्या यजमानाने शास्त्रविहित आहाराने आपली शक्ती क्षीण होण्याच्या भीतीने अजीबातच व्रताचा त्याग न करता, शास्त्रविहित आहाराबरोबरच अल्प प्रमाणात अनुकल्प रूपाने सांगितलेल्या आहाराचे सेवन केल्यास त्याच्या व्रताचा भंग होत नाही.

मात्र शास्त्रविहित आहाराखेरीज जो अधिक आहार करावयाचा तो एकदाच करावा. पुन्हा करू नये. अधिक आहार घ्यावयाचा तो दह्याचा घ्यावा. दही हे पशूंचे रूप आहे. यास्तव, पशुरूप असे दही भक्षण केल्याच्या योगाने यजमानाने जणू पशूंचेच संपादन केल्यासारखे होते.

स्वर्गलोकी राहणाऱ्या यज्ञपुरुषाने आपणास कोणी ओळखू नये, आपले स्वरूप छपले जावे, म्हणून विष्णूचे रूप धारण केले. आणि देवांच्यापासून पलायन करून त्याने पृथ्वीमध्ये प्रवेश केला. देवांनी त्याचा पाठलाग केला व आपले हात लांब करून यज्ञपुरुषाला पकडण्याचा प्रयत्न केला. विष्णुरूप धारण केलेला यज्ञपुरुष ज्या ज्या मार्गाने धाव घेई त्या त्या मार्गावर जाऊन इंद्र त्याला अडथळा करी. तेव्हा 'मला अडथळा करणारा हा असावा तरी कोण? अशी यज्ञपुरुषाला शंका आली. त्यावर 'एखाद्या अगम्य अशा किल्यावर जाऊन माझा विरोधी असलेल्या यज्ञपुरुषाला मी ताडण करीन' अशी इंद्राने स्वत:च्या सामर्थ्याची प्रतिज्ञा केली. आणि 'माझ्या सामर्थ्याची परीक्षा पाहणारा तू तरी कोण मोठा लागून गेला आहेस?' अशा कठोर वाणीने यज्ञपुरुषावर इंद्राने आक्षेप केला. तेव्हा, 'तू जरी दुर्गम अशा किल्यावर जाऊन बसलास तरी माझा विरोध करणाऱ्या तुला मी त्या अगम्य किल्यावरूनही धरून आणीन' अशा प्रकारे आपल्या सामर्थ्याच्या बळावर यज्ञपुरुषानेही प्रतिज्ञा केली. आणि इंद्राला समक्षच गाठून यज्ञपुरुषाने त्याला सर्व पूर्ववृत्तांत सांगितला.

यज्ञपुरुष म्हणाला, 'पूर्वी एके वेळी असुरांचे प्राबल्य झालेले पाहून माझ्या अंगभूत असणाऱ्या दीक्षादि कर्मांचे अभिमानी असलेले स्वर्गलोकवासी सर्व देव माझ्यापासून दूर गेले व पृथ्वीच्या ठिकाणी प्रविष्ट झाले. चार दिवस चालणाऱ्या, दीक्षाविषयक कर्माचे, तीन दिवस चालणाऱ्या उपसद् इष्टींचे व एक दिवस चालणाऱ्या सुत्यासंज्ञक कर्माचे, असे आठ दिवस चालणाऱ्या कर्मांचे अभिमानी असलेले देव पृथ्वीच्या ठिकाणी प्रविष्ट झाले. त्यांपैकी दीक्षेच्या चार व उपसद् इष्टींच्या तीन मिळून सात अभिमानिनी देवता पृथ्वीच्या ठिकाणी सात पर्वत होऊन बसल्या व आठव्या सुत्याभिमानी देवाने, अभिलाषा करण्यास योग्य अशा सौमिक वेदी, ग्रह, चमस आदि देवांच्या धनाचा अपहार केला व ते सर्व धन त्याने असुरांना देऊन टाकले. आणि स्वत: वराहाचे रूप धारण करून सात पर्वतांच्या पलीकडे गेला व असुरांना दिलेल्या धनाची राखण करीत बसला आहे. ते धन देवांनी पुन: मिळविणे अवश्य आहे. ते त्यांचे कर्तव्य आहे. यास्तव, हे इंद्रा, दुर्गम अशा किल्यामध्ये राहणाऱ्या विरोधकाचा नाश करणारा जर तू असशील तर त्या वराहरूपधारी सुत्याभिमानी देवाला मार.'

यज्ञपुरुषाचे हे भाषण ऐकताच इंद्राने दर्भस्तम्ब उचलून त्या सात पर्वतांच्यावर फेकला. इंद्राने दर्भस्तंबाच्या एका प्रहारानेच सातही पर्वतांचा चुराडा केला आणि त्या वराहरूपधारी सुत्याभिमानी देवालाही ताडण केले. मग इंद्र यज्ञपुरुषाला म्हणाला, 'विरोध करणाराला मी पकडून आणीन, अशी जी तू प्रतिज्ञा केली होतीस ती जर तू पूर्ण करू शकत असलास तर या विरोधकारी वराहाला अर्थात् सुत्याभिमानी देवाला तू आता पकडून आण'. त्याबरोबर यज्ञपुरुषाने वराहरूपधारी अशा त्या सुत्याभिमानी देवाला वेदी-ग्रह चमसादिरूप धनासह पकडून आणला व देवांच्या स्वाधीन केला. ज्या अर्थी देवांनी संपादन करावयास योग्य असे वेदीरूपी धन असुरांच्या पासून देवांनी संपादन केले, त्या अर्थी वेदीला 'वेदी' हे अनुरूप नांव प्राप्त झाले. वेदीला 'वेदी' हे नांव प्राप्त होण्याच्या अनेक प्रकारांपैकी हा एक प्रकार होय.

ही सर्व पृथ्वी पूर्वी असुरांच्या सत्तेखाली होती. भूमीवर बसले असतां नजरेच्या टप्प्यात येईल एवढाच पृथ्वीचा भाग काय तो देवांच्या मालकीचा होता. तेव्हा देव असुरांना म्हणाले की, हे असुरहो, तुमच्या सत्तेखाली असलेल्या पृथ्वीपैकी, काही भाग आम्हाला असावा. असुर देवांना म्हणाले, 'तुम्हाला आम्ही पृथ्वीचा केवढा भाग द्यावा?' तेव्हा देव म्हणाले की, ही लांडगी जेवढ्या भूभागाला तीन फेऱ्या घालील तेवढा भूभाग तुम्ही आम्हाला द्या. असुर म्हणाले, 'ठीक आहे.' तेव्हा इंद्राने लांडगीचे रूप धारण केले आणि या सर्वच पृथ्वीभोवती तीन फेऱ्या घातल्या. आणि असुरांच्याकडून त्यांनी वचन दिल्याप्रमाणे सर्वच पृथ्वी आपलीशी केली. सारांश, देवांनी सर्व पृथ्वी संपादन केली. देवांना लाभलेल्या सर्वच पृथ्वीला वेदी हे नांव रूढ झाले. देवांना प्राप्त होणे हेच वेदीचे वेदित्व होय.

ही सर्व पृथ्वी जरी वेदीरूप असली तरी तिच्या ठिकाणी उगीच कुठे तरी यजन करू नये. तर ज्या ठिकाणी सद्, हविर्धान इत्यादि मंडप उत्तम प्रकारे मी निर्माण करू शकेन, असे यजमानाला वाटेल त्या ठिकाणचे पायांनी मोजमाप करावे व त्या मापून घेतलेल्या प्रदेशाचे ठिकाणी देवाचे यजन करावे.

पश्चिम बाजूस महावेदीची दक्षिणोत्तर रुंदी तीस पावले असावी. पूर्वपश्चिम

लांबी छत्तीस पावले आणि पूर्व दिशेस दक्षिणोत्तर रुंदी चोवीस पावले असावी. महावेदीच्या लांबी-रुंदीची पावले एकत्र गणल्यास नव्वद होतात म्हणजे नऊ दशके होतात. दहा दहा पावलांचे नऊ गट निर्माण होतात. विराट् छंदाच्या एका चरणाची दहाच अक्षरे असतात. विराट्छन्द हा अन्नरूप आहे. यास्तव विराट्रूप अशा वेदीचे संपादन करून अध्वर्यूने जणू काय तिच्या ठिकाणी सेवनीय अशा अन्नाचीच निष्पत्ती केल्यासारखे होते.

महावेदीच्या स्थलाचे मोजमाप झाल्यानंतर तिची सर्व जागा खणावी व वरवरची माती काढून बाहेर टाकावी. असे केल्याच्या योगाने तिच्या ठिकाणी असलेली अपवित्रताच दूर केल्यासारखे होते. वेदीच्या जागा खणल्याच्या योगाने त्या ठिकाणी उत्पन्न झालेल्या तृणरूपी ओषधी पराभूत म्हणजे नाहीशा होत असतात. यास्तव, वेदीमध्ये अध्वर्यू दर्भ पसरतो आणि त्यामुळे त्या वेदिस्थलाच्या ठिकाणी पूर्वीप्रमाणे तृणादि ओषधी पुन्हा निर्माण होतात.

महावेदीमध्ये जे बर्ही म्हणजे दर्भ पसरलेले असतील त्यांवरच उत्तरवेदीच्या जवळ अग्निषोमीय पशूच्या यागासाठी दर्भ पसरावेत. पहिल्याने पसरलेले दर्भ हे जणू प्रजारूप असून त्यांवर मागाहून पसरलेले दर्भ हे जणू यजमानरूप होत. असे केल्याच्या योगाने अध्वर्यूने जणू काय अयजमान म्हणजे यजमान नसणारापेक्षा यजमानाला उत्तर म्हणजे वरचढ अर्थात् श्रेष्ठ केल्यासारखे होते. आणि म्हणूनच लोकव्यवहारात देखील यज्ञ न करणाऱ्या अर्थात् यजमान न झालेल्या लोकांपेक्षा यज्ञ करणारा यजमान हा वरचढ अर्थात् श्रेष्ठ गणला जातो. (अनुवाक४).

जर एखादा माणूस आपल्या शक्तीला पेलणार नाही असे अवजड ओझे उचलण्याचा प्रयत्न करील, तर त्याला ते ओझे उचलणे अशक्य होऊन तो जमिनीवर कोलमडून पडेल, त्याप्रमाणे एकदिनसाध्य अशा ज्योतिष्टोम यज्ञामध्ये जर बारा दिवस उपसत् इष्टी केल्या तर त्या इष्टींचा भार त्या अल्प अर्थात् एकदिनसाध्य अशा ज्योतिष्टोम यज्ञाला सहन होणार नाही. उलटपक्षी, अहीन म्हणजे द्विरात्र इत्यादि क्रतूंमध्ये तीनच उपसत् इष्टी केल्या तर त्या अल्पसंख्याक इष्टींना द्विरात्रादि क्रतूचा भार सहन होत नाही. यासाठी साद्य म्हणजे एकदिनसाध्य अशा क्रतूमध्ये तीनच उपसत् इष्टी कराव्या. आणि अहीन किंवा बहुदिनसाध्य अशा द्विरात्रादि क्रतूंमध्ये बारा 'उपसत्'

इष्टी कराव्यात. म्हणजे त्या यज्ञाचे ठिकाणी सवीर्यत्व, समानशक्तित्व उत्पन्न होते.

वासरांच्या वाटणीचा जो गाईचा एक स्तन असतो, त्यातला म्हणजे त्यातील दुधातला देखील थोडासा भाग चौथ्या खेपेस यजमान स्वीकारीत असतो. म्हणजे त्या वासराच्या वाटणीचा भाग म्हणून असलेल्या एका स्तनातीलही थोडे दूध यजमान पितो. व त्यामुळे त्याचा चार स्तनांतील दूध पिण्याचा नियम पूर्णत्वास प्राप्त होतो. पहिल्या खेपेस एका स्तनाचे, दुसऱ्या खेपेस दोन स्तनांचे, तिसऱ्या खेपेस तीन स्तनांचे व चौथ्या खेपेस चार स्तनांचे अशा प्रकारे स्तनांच्या चढत्या क्रमाने दुग्धपान करण्याच्या यजमानाच्या व्रतास म्हणजे नियमास 'क्षुरपवि' म्हणजे वस्तऱ्याच्या धारेप्रमाणे तीक्ष्ण असणारे असे नांव आहे. ज्या व्रताच्या योगाने, म्हणजे ज्या व्रताचे पालन केले असता, पूर्वी उत्पन्न झालेल्या शत्रूंचा यजमान नाश करू शकतो व नवीन होणाऱ्या शत्रूंना प्रतिबंध करू शकतो, असे हे आता सांगितलेले 'क्षुरपवि' व्रत यजमान जर आचरणात आणील, तर तो , अल्प बीज पेरल्याने प्रौढ अशा वृक्षरूप फलाची प्राप्ती व्हावी त्याप्रमाणे, व्रतपालनरूपी अल्प प्रयासाने महत्फल संपादन करतो.

पहिल्या खेपेस चार स्तनांचे दुग्ध प्राशन करावयचे, नंतर तीन, नंतर दोन, आणि शेवटच्या चौथ्या खेपेस एकाच स्तनाचे दुग्धपान करावयाचे, अशा प्रकारे स्तनांच्या उतरत्या क्रमाने दुग्धपान करण्याचे जे व्रत यजमान स्वीकारतो ते 'सुजघन' संज्ञक व्रत होय. या व्रतामध्ये उत्तरोत्तर दुग्धाहार कमी कमी होत असल्याने हे व्रत 'तपस्य' म्हणजे तपाला अत्यंत योग्य व स्वर्गलोकप्राप्तीला साधनभूत असे आहे. शिवाय, या 'सुजघन' नामक व्रताचे पालन करणारा यजमान प्रजा व पशू यांना उत्पन्न करण्यास समर्थ होतो.

क्षत्रिय यजमानाला व्रतनिमित्ताने यवागू म्हणजे तांदुळाच्या भाताची पेज सेवन करणे प्रशस्त होय. भात खाण्याने जशी तृप्तता निर्माण होते तशी पेज पिण्याने होत नाही. म्हणून तो क्रूर आहे. दुष्टांचे दंडन करणारा क्षत्रियही क्रूरच असतो. सारांश, यजमानाच्या ठिकाणचे व त्याने सेवन केलेल्या पेजेच्या ठिकाणचे क्रूरत्व एकत्र झाल्याने त्या व्रताला जे वज्रासारखे कठिण स्वरूप

प्राप्त होत असते, ते यजमानाच्या अनिष्टाचे निवारण करण्याला व त्याला सर्व प्रकारे समृद्ध करण्याला कारणभूत होत असते.

कडकडीत तापलेल्या दुधात दही मिसळण्याने जो एक लो‍ण्यासारखा घट्ट पदार्थ निर्माण होतो, त्यास आमिक्षा असे म्हणतात. आमिक्षेचे सेवन करणे हेच वैश्य यजमानाला प्रशस्त असे व्रत होय. आमिक्षा ही पाक यज्ञासारख्या स्वरुपाची असल्यामुळे तिचे सेवन करणे हे यजमानाला पुष्टी प्राप्त करून देण्यास कारणभूत होते.

ब्राह्मण यजमानाला दुग्धप्राशनरूप व्रत प्रशस्त होय. अध्ययनाध्यापनामुळे ब्राह्मण तेजस्वी असतो. व दूध हे देखील स्वच्छतेच्या योगाने तेजस्वी असते. यास्तव दुग्धप्राशनरूप व्रत केल्याने ब्राह्मण यजमानाने स्वतःच्या ठिकाणच्या तेजासह दुग्धरूप तेज आपल्या ठिकाणी धारण केल्यासारखे होते. शिवाय, दुधाने गर्भ वाढत असतात. दीक्षा ग्रहण केलेला यजमान हा खरोखरच गर्भरूपच आहे. अर्थात् त्याने आचरण केलेले दुग्धप्राशनरूप व्रत गर्भरूप अशा त्या यजमानाची वृध्दी करण्याला कारणभूत होते.

व्रत म्हणजे विशिष्ट पदार्थाचे भोजन. मनुष्य हा दिवसातून तीन वेळा भोजन करणारा असून असुर हे दिवसातून दोन वेळ व देव हे एकच वेळ भोजन करणारे आहेत. प्रातःकाली, मध्यान्ह काली व सायंकाली असे तीन वेळ मनुष्याचे जे व्रत म्हणजे भोजन होत असते ते पाकयज्ञस्वरूप व पुष्टी प्राप्त करून देण्याला कारणभूत असते. प्रातःकाळी व सायंकाळी असे दोन वेळ असुरांचे भोजन होत असते. मध्यान्हकाळी त्यांचे भोजन होत नाही. आणि मध्यान्हकाळ हे तर क्षुधेचे मुख्य स्वरूप आहे. अर्थात् क्षुधेच्या मुख्य वेळी म्हणजे मध्यान्हकाळी भोजन न केल्याने असुर पराभवाला प्राप्त झाले. मध्यान्हकाळी व मध्यरात्री देवांचे भोजन होत असल्याने ते विजयी होऊन स्वर्गलोकी गेले. एवं च, मध्यान्हकाळी भोजन करणारे मानव व देव अनुक्रमे पुष्टीला व स्वर्गलोकाला प्राप्त झाले.

मध्यान्हकाळी व मध्यरात्री यजमानाकडून पूर्वोक्त अन्नप्राशनादिरूप व्रत होत असते. दिवसाच्या मध्यकाळात यजमान अन्नाने भोजन करीत असतो. अर्थात् त्यायोगे तो आपल्या शरीराच्या मध्यभागी म्हणजे उदराच्या ठिकाणी अन्नाचे धारण करतो. त्याचप्रमाणे मध्यरात्रीही पण भोजन करावे. अशा प्रकारे

केले जाणारे भोजन यजमानाच्या शत्रूच्या पराभवाला व त्याला स्वत:ला विजय प्राप्त करून देण्याला कारणभूत होत असते. सारांश, मध्यान्हकाळी व मध्यरात्री भोजन करणारा यजमान स्वत: विजयी होतो व त्याचा शत्रू पराभव पावतो.

दीक्षा धारण केलेला यजमान हा जणू गर्भरूप असून तो ज्या प्राग्वंशशालेमध्ये वस्ती करतो ते स्थान हे जणू काय त्या यजमानरूपी गर्भाला धारण करणारी योनीच होय. असे असल्यामुळे दीक्षा धारण केलेला यजमान आपले निवासस्थान सोडून जर बाहेर कोठे जाईल तर, योनीपासून जसा अकाली गर्भ पतन पावतो तशी त्याची अवस्था होईल. यास्तव, गर्भरूप असणाऱ्या यजमानाने स्वत:चे संरक्षण व्हावे म्हणून आपल्या निवासस्थानाच्या बाहेर कोठेही जाऊ नये.

प्राग्वंशशाळेत असलेला आहवनीय अग्नी हा प्राग्वंश शाळेच्या बाहेर प्रवास करणाराची हिंसा करणारा जणू व्याघ्र असून प्राग्वंशशालेत निवास करणाऱ्याच्या कुलाचे संरक्षण करणारा आहे. दीक्षा ग्रहण केलेला यजमान जर प्राग्वंशस्थान सोडून इतर ठिकाणी प्रवास करील तर तो आहवनीय अग्नी आपल्या जागेवरून उठून प्रवास करणाऱ्या यजमानाच्या मागोमाग जातो व त्याला मारण्यास समर्थ होतो. यास्तव स्वत:चे संरक्षण व्हावे अशी इच्छा करणाऱ्या यजमानाने प्राग्वंशशाळेच्या बाहेर कोठेही प्रवास करू नये.

आहवनीयाच्या दक्षिण दिशेस निजावे. कारण यजमानाचेच ते स्थान आहे. अर्थात् स्वकीय अशा स्थानीच त्याने रात्री निजावे.

आहवनीयाकडे मुख करून निजावे. तसे केल्याने देवता व यज्ञ यांच्याकडे मुख करून निजल्यासारखे होते. (अनुवाक ५).

आपल्या यजमानाच्या हातून उक्थ्य, षोडशी इत्यादि उत्तर क्रतू व्हावेत व त्याने स्वर्गलोक जिंकावा, म्हणजे स्वर्गलोकाचे संपादन करावे असे ज्या यजमानाबद्दल वाटत असेल त्या यजमानाकडून अध्वर्यूने 'पुरोहवि' नांवाच्या देवयजनस्थलाच्या अर्थात् यज्ञभूमीच्या ठिकाणी सोमयज्ञाचे अनुष्ठान करवावे.

ज्या देवयजन स्थलाच्या हविर्धानमंडपात प्राङ्.मुख बसलेला होता 'प्रातरनुवाक' संज्ञक 'शस्त्र' पठण करताना आपल्या समोर आहवनीय अग्नी,

त्याच्यापुढे काही अंतरावर नदी किंवा तडागरूपाने असणारा जलप्रवाह व त्यापुढे उदय पावणारा सूर्य एकदम पाहू शकतो, त्या देवयजनास 'पुरोहवि' असे नांव आहे. पुरोहवीसंज्ञक देवयजनस्थलात यज्ञ करणारा यजमान उत्तर क्रतूंना प्राप्त होतो, त्याच्या हातून उत्तर क्रतू घडतात व तो स्वर्गलोकही जिंकतो म्हणजे मिळवितो.

शत्रुपीडित अशा यजमानाकडून 'आप्त' नांवाच्या देवयजनामध्ये यज्ञ करावा. एखादा प्रौढ असा राजमार्ग किंवा विस्तीर्ण असा खड्डा असलेले ठिकाण पहावे व त्या राजमार्गाच्या किंवा खड्याच्या शक्य तितक्या अधिक जवळ देवयजन निर्माण करावे. राजमार्ग किंवा खड्डा यांच्यापासून इतक्या संकुचित अंतरावर देवयजनस्थल उभारावे की, त्यांच्या मधून गाडा किंवा रथ जाऊ शकणार नाही. अशा प्रकारचे जे देवयजन ते 'आप्त' संज्ञक देवयजन होय. आप्तसंज्ञक देवयजनस्थलात यज्ञ करणारा आपल्या शत्रूला जिंकतो. त्याचा शत्रू त्याला जिंकीत नाही.

पशुप्राप्तीची इच्छा करणाऱ्या यजमानाकडून 'एकोन्नत' नामक देवयजनात यज्ञ करवावा. कारण, एकोन्नतनामक देवयजनात यज्ञ केल्यामुळे अंगिरसांनी पशू निर्माण केले. सद व हविर्धान या दोन मंडपांच्या मध्यभागी उंच असे स्थल ज्यात तयार केलेले असते, ते एकोन्नतसंज्ञक देवयजन होय. अशा प्रकारच्या देवयजनामध्ये यज्ञ करणारा यजमान पशुसंपत्तीने युक्त होतो.

स्वर्गलोकाची इच्छा करणाऱ्या यजमानाकडून 'त्र्युन्नत' नामक देवयजनामध्ये यज्ञ करवावा. कारण त्र्युन्नत अशा देवयजनात यज्ञ करूनच अंगिरस स्वर्गलोकाला प्राप्त झाले. आहवनीय व हविर्धान, हविर्धान आणि सद त्याचप्रमाणे सद व गार्हपत्य यांच्या मध्यभागी, अर्थात् तीन ठिकाणी उंच स्थल ज्यामध्ये निर्माण केले असेल त्या देवयजनास 'त्र्युन्नत' असे नांव आहे. त्र्युन्नत देवयजनात यज्ञ करणारा यजमान स्वर्गलोकाला प्राप्त होतो.

समाजामध्ये प्रतिष्ठा प्राप्त व्हावी अशी इच्छा असलेल्या यजमानाकडून 'प्रतिष्ठित' नामक देवयजनामध्ये यज्ञ करवावा. सर्वत्र सारख्या पातळीत असलेल्या भूमीवर निर्माण केलेले जे देवयजन ते 'प्रतिष्ठित' देवयजन होय. या देवयजनात यज्ञ करणारा यजमान समाजात प्रतिष्ठेला प्राप्त होतो.

पशूंची इच्छा करणाऱ्या यजमानाकडून ज्या ठिकाणी निरनिराळ्या जातीची

धान्ये एकाच वेळी उत्पन्न होत असतात, त्या ठिकाणी यज्ञ करवावा. कारण, अशा प्रकारची धान्ये एकाच वेळी उत्पन्न होणारे स्थल हे जणू काय पशुरूपच होय. अर्थात् अशा प्रकारच्या देवयजनस्थली यज्ञ करणारा यजमान पशुरूपी संपत्तीने युक्त होतो.

निर्ऋती नांवाच्या राक्षसाकडून माझ्या यजमानाच्या यज्ञाला मी ग्रासवून टाकीन, असे ज्या यजमानाबद्दल अध्वर्यूला वाटत असेल, त्याने आपल्या त्या यजमानाचा यज्ञ 'निर्ऋतिगृहीत' नामक देवयजनाच्या ठिकाणी करवावा. खाचखळगे नसून सर्वत्र सारखी जमीन असताना देखील ज्या ठिकाणी गवतसुद्धा उगवत नाही, अशा ठिकाणास 'निर्ऋतिगृहीत' असे नांव आहे. निर्ऋतिगृहीत नांवाच्या देवयजनात यज्ञ करविला असता अध्वर्यूने जणू काय त्या यजमानाचा यज्ञ निर्ऋतिसंज्ञक राक्षसाकडून ग्रासविल्यासारखे होते.

ज्या पुरुषाबद्दल याच्या पंक्तीस बसून भोजन करावे किंवा नाही, अथवा याच्याशी विवाह संबंध जोडावा किंवा नाही असा त्याचे बाधव मित्र इत्यादि संशय प्रदर्शित करीत असतात, अर्थात् ज्या पुरुषावर पंक्तिपावनत्वाबद्दल किंवा विवाहसंबधाविषयीच्या योग्यत्वाबद्दल इतरांकडून अपवाद ठेवला जात असतो, त्या अपवादापासून तो आपला यजमान मुक्त व्हावा असे ज्याला वाटत असेल त्या अध्वर्यूने 'व्यावृत्त' संज्ञक देवयजनाच्या ठिकाणी आपल्या त्या यजमानाकडून यज्ञ करवावा आहवनीयाच्या पुढे म्हणजे पूर्व दिशेस उत्तरोत्तर सखल होत गेलेले व गार्हपत्याच्या मागे पश्चिम दिशेस उत्तरोत्तर सखल होत गेलेले जे स्थल असेल ते 'व्यावृत्त' संज्ञक देवजयन होय. अशा प्रकारच्या देवयजनात यज्ञ केला असता तो यजमान इतरांकडून पंक्तिपावनतेबद्दल किंवा विवाहसंबंधाबद्दल केल्या जाणाऱ्या अपवादापासून दूर होतो व नतर त्याच्या विषयी कोणीही पंक्तिपावनतेबद्दल किंवा विवाहसंबंधाबद्दल संशय व्यक्त करीत नाही.

ऐश्वर्यप्राप्तीची इच्छा करणाऱ्या यजमानाकडून 'कार्य' नांवाच्या देवयजनामध्ये यज्ञ करवावा. माती व दगड याच्या योगाने ओट्यासारखे उंच केलेले जे देवयजन ते 'कार्य' संज्ञक देवयजन होय. कोणताही पुरुष 'कार्य' म्हणजे उन्नती करण्यास योग्य असाच असतो. सारांश, कार्यसंज्ञक देवयजनाच्या ठिकाणी यज्ञ करणारा यजमान सर्व प्रकारे ऐश्वर्याला प्राप्त होतो. (अनुवाक ६)

उत्तर वेदीने सिंहिणीचे रूप धारण केले व ती देव व असुर या दोघांच्याही पासून दूर जाऊन उभी राहिली. तेव्हा देवांना असे वाटले की, देव व असुर यांपैकी ज्यांच्याजवळ ही येईल तेच हे यज्ञकर्म पार पाडणार हातील. यास्तव, आपण तिला आपल्याजवळ बोलवावे. त्याप्रमाणे त्यांनी सिंहिणीचे रूप धारण केलेल्या त्या उत्तरवेदीला आपल्याजवळ बोलाविली. तेव्हा तिने त्यांच्याजवळ असा वर मागितला की, माझ्याकडून तुमचे सर्व मनोरथ पूर्ण व्हावेत अशी जर तुमची इच्छा असेल, तर अग्नीला आहुती देण्यापूर्वी मला जर आहुती द्याल तर माझ्या अनुग्रहाने तुमचे सर्व मनोरथ पूर्ण होतील. यासाठी अग्नीचे स्थापन करून त्याला आहुती द्याल तर माझ्या अनुग्रहाने तुमचे सर्व मनोरथ पूर्ण होतील. यासाठी अग्नीचे स्थापन करून त्याला आहुती देण्यापूर्वीच त्या उत्तरवेदीच्या ठिकाणी 'व्याघारण' करीत असतात. म्हणजे उत्तरवेदीवर विशिष्ट पद्धतीने आज्य धारा पाडवून आहुती देत असतात. कारण देवांच्याकडून तशा प्रकारचा वरच उत्तरवेदीने मिळविलेला आहे.

गदेसारखा आकार असलेल्या व बाहुमात्र लांबीच्या यज्ञीय वृक्षाच्या काठीस 'शम्या' असे नांव आहे. या शम्याने उत्तरवेदीच्या क्षेत्राची चारही बाजूंनी मापणी करावी. शम्याने मापून घेतलेली उत्तर वेदीची भूमी तिच्या ठिकाणी पुढे करण्यात येणाऱ्या कार्याला म्हणजे ग्रहचमसादिकांच्या प्रचारकार्याला पुरेशी होते. कमी किंवा अधिक होत नाही. शिवाय, अशाप्रकारे उत्तरवेदीचे प्रमाण योग्य असे ठेवल्याने योग्य असे फल प्राप्त होते.

उत्तरवेदीच्या स्थलाची पूर्व दिशेने मापणी करतात 'वित्तायनी मेऽसि' हा मंत्र म्हणावा. कारण, वन्हिरूप वित्ताच्या प्राप्तीसाठी केल्या जाणाऱ्या यज्ञक्रतूंचे रक्षण पूर्व बाजूने उत्तरवेदी करीत असते. दक्षिण दिशेने मापणी करताना 'तिक्तायनी मेऽसि' हा मंत्र म्हणावा. कारण वन्हिज्वालारूपी प्रखर तेजाची प्राप्ती होण्यासाठी यज्ञ करणाऱ्या यजमानांचे दक्षिण दिशेने उत्तरवेदी रक्षण करीत असते. पश्चिम दिशेने उत्तरवेदीच्या स्थलाची मापणी करताना, 'अवतान्मा नाथितम्' हा मंत्र म्हणावा. कारण अग्नीची याचना करणाऱ्या यज्ञकर्त्यांचे रक्षण पश्चिम दिशेने उत्तरवेदी करीत असते. उत्तरवेदीच्या स्थलाची उत्तर दिशेने मापणी करताना 'अवतान्मा व्यथितम्' हा मंत्र म्हणावा. कारण अग्नीच्या प्राप्तीविषयी उत्पन्न होणाऱ्या चिंतेने व्यथित होणाऱ्या यज्ञकर्त्यांचे

उत्तरबाजूने उत्तरवेदी रक्षण करीत असते.

चात्वालातील माती 'विदेरग्निर्नभो नामाग्ने अंगिर:' या मंत्राने मापून घेतलेल्या उत्तरवेदीस्थलावर तीन वेळ नेऊन टाकावी. असे केल्याने अध्वर्यूने जणू काय, पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु या तीन लोकांच्या ठिकाणी असलेल्या अग्नींनाच उत्तरवेदीस्थलाच्या ठिकाणी आणून ठेवल्यासारखे होते. चौथ्या खेपेस मंत्र न म्हणताच माती आणून टाकावी. असे केल्याने सर्वसामान्य अशा अग्नीला जणू उत्तरवेदीच्या स्थलाच्या ठिकाणी आणून ठेवल्यासारखे होते. उत्तरवेदीस्थलावर आणून टाकलेली माती एकत्र मिसळताना 'सिंहीरसि महिषीरसि' हा मंत्र म्हणावा. कारण उत्तरवेदी ही सिंहाचे रूप धारण करून देव व असुर यांच्यापासून दूर जाऊन उभी राहिली होती. एकत्र मिसळलेली माती उत्तरवेदीस्थलामध्ये सारखी पसरताना 'उरु प्रथस्वोरु ते यज्ञपतिः प्रथताम्' हा मंत्र म्हणावा. कारण, उत्तरवेदी ही यजमानाला प्रजा व पशू यांच्या योगाने वृध्दिंगत करीत असते. पसरलेली माती शम्याने ठोकून सारखी बसविताना 'ध्रुवाऽसि' असे म्हणावे. अशाप्रकारे मंत्रपूर्वक माती ठोकणे चारही बाजूला उत्तरवेदी दृढ होण्याला कारणभूत होते. उत्तरवेदीच्या ठिकाणी शुद्धता उत्पन्न होण्याकरिता 'देवेभ्य: शुंधस्व' या मंत्राने तिच्या ठिकाणी उदकाने प्रोक्षण करावे व ती सुशोभित दिसण्यासाठी 'देवेभ्य: शुंभस्व' या मंत्राने तिच्या ठिकाणी बारीक माती विखरावी. 'इंद्रघोषस्त्वा वसुभिः पुरस्तात् पातु' इत्यादि मंत्र म्हणून चारही दिशांनी उत्तरवेदीचे उदकाने प्रोक्षण करावे.

देव व असुर यांच्यापासून दूर झालेली उत्तरवेदी जेव्हा देव व असुर यांच्या सैन्याच्या मध्यभागी उभी राहिली तेव्हा देवांनी तिला आपल्याजवळ बोलाविली. त्याबरोबर 'ही जर देवांच्याकडे गेली तर तेच विजयी होतील, यास्तव, याच क्षणी म्हणजे उत्तरवेदी देवांच्याजवळ पोचण्याच्या आत आपण देवांना जिंकून त्यांच्यावर विजय मिळवावा', असा असुरांनी विचार केला. आणि ते असुर आपल्या हातांतील वज्र उगारून देवांच्यावर धावले.

इंद्रघोष नांवाच्या देवांनी वसूंच्या सहकारितेने पूर्व दिशेने चाल करून आलेल्या असुरांना पिटाळून लावले. मनोजव नामक देवांनी पितरांच्या साहाय्याने दक्षिण दिशेने चाल करून आलेल्या असुरांना हाकून लावले. रुद्रांच्या सह प्रचेतानामक देवांनी पश्चिम दिशेने धावून आलेल्या असुरांना पराभूत केले.

आणि आदित्यांच्यासह विश्वकर्म्याने उत्तर दिशेने चाल करून आलेल्या असुरांना पिटाळून लावले. 'इंद्रघोषस्त्वा' इत्यादि मंत्रांनी जर चारही दिशांनी उत्तरवेदीला प्रोक्षण केले तर त्या उत्तरवेदीच्या प्रभावाने यजमान चारही दिशांना असलेल्या आपल्या शत्रूंना दूर हाकून लावतो.

देवांना मारण्यासाठी सर्वदा टपून राहून प्रयत्न करणाऱ्या यतिवेषधारी अशा काही असुरांना इंद्राने मारून त्यांचे देह लांडग्यांना खावयास दिले. त्या असुरांना उत्तरवेदीच्या दक्षिणदिशेस नेऊन लांडग्यांनी खाल्ले. वास्तव, उत्तरवेदीचे प्रोक्षण केल्यानंतर स्रुचीमध्ये जे उदक उरेल, ते उत्तरवेदीच्या दक्षिणेस ओतावे. म्हणजे त्या दिशेस जे काही क्रूर म्हणजे भीतिजनक असेल त्याचे ते उदक शमन करते. उदक ओतताना यजमानाचा जो द्वेष्टा असेल त्याचे ध्यान करावे. म्हणजे अध्वर्यूने त्या यजमानाच्या द्वेष्ट्याला दु:खाच्या खाईत ढकल्यासारखे होते. (अनुवाक ७).

ती उत्तरवेदी देवांना म्हणाली, 'हे देवहो, तुम्ही आपले सर्व मनोरथ माझ्याकडून प्राप्त करून घ्या'. देवांनी, 'आपल्याशी शत्रुत्व करणाऱ्या असुरांचा आम्ही पराभव करू', अशी कामना धारण केली. आणि त्यांनी 'सिंहीरसि सपत्नसाही स्वाहा' या मंत्राने उत्तरवेदीला उद्देशून आज्याहुती दिली. उत्तरवेदीच्या कृपेने त्यांनी आपल्याशी शत्रुत्व करणाऱ्या असुरांचा पराभव केला. असुरांचा पराभव केल्यावर त्यांनी 'प्रजा संपादन करू', अशी कामना मनात धरून उत्तरवेदीच्या ठिकाणी 'सिंहीरसि सुप्रजावनि: स्वाहा' या मंत्राने आज्याहुती दिली. त्यायोगे त्यांना प्रजेची प्राप्ती झाली. प्रजा प्राप्त झाल्यानंतर त्यांनी आपणांस पशू मिळावेत, अशी इच्छा केली व 'सिंहीरसि रायस्पोषवनि: स्वाहा' या मंत्राने उत्तरवेदीच्या ठिकाणी आहुती दिली. तिच्या योगाने त्यांना पशू प्राप्त झाले. पशू प्राप्त झाल्यानंतर, 'आम्हाला प्रतिष्ठा प्राप्त व्हावी', अशी इच्छा धारण करून देवांनी 'सिंहीरस्यादित्यवनि: स्वाहा' या मंत्राने उत्तरवेदीच्या ठिकाणी आज्याहुती दिली. तेव्हा त्यांना पृथ्वीवर प्रतिष्ठा प्राप्त झाली. पृथ्वीवर प्रतिष्ठा मिळविल्यावर त्यांनी 'हविर्द्रव्याचा स्वीकार करणाऱ्या देवांच्या जवळ आम्ही प्राप्त होऊ', अशी कामना मनात धारण केली. आणि 'सिंहीरस्यावह देवान् देवयते यजमानाय स्वाहा' या मंत्राने उत्तरवेदीच्या ठिकाणी आज्याहुती दिली. ही शेवटची आहुती देऊन देवांचे यजन करणारे ते देव

हविर्द्रव्यांचा स्वीकार करणाऱ्या देवांच्या जवळ प्राप्त झाले व यज्ञकर्माच्या फलांनाही ते संपादन करते झाले.

उत्तरवेदीच्या ठिकाणी आता सांगितलेल्या पांच मंत्रांनी पांच आहुती देऊन व्याघारण करावे. म्हणजे पांच आहुतींनी पांच आज्यधारा पाडवाव्यात. पंक्ती छंद हा पांच अक्षरांचा असून यज्ञही पांच हविर्द्रव्यांनी परिपूर्ण असतो. यास्तव, पंक्तिछंदाशी व यज्ञाशी संख्यासाम्य असलेल्या पांच आहुती दिल्याच्या योगाने अध्वर्यूने जणू काय पंक्तिछंदाच्या द्वारा यज्ञाचेच संपादन केल्यासारखे होते. आज्याच्या धारा उत्तरवेदीच्या एकेका कोपऱ्यापासून मध्यापर्यंत वक्रगतीने पाडवाव्या. कारण, पशू हे जमिनीवर बसताना आपले पाय कोणाकार करून म्हणजे कोपरापासून आखडून घेऊन बसत असतात. अर्थात् अशाप्रकारे एकेका कोणापासून दिलेल्या आहुती यजमानाला भूलोकी प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याला कारणभूत होत असतात. 'भूतेभ्यस्त्वा' हा मंत्र म्हणून हातात धरलेली स्रुची वर उचलावी. कारण, अशाप्रकारे स्रुचीचे वर उचलणे म्हणजे चिरंतनत्वाने निर्माण झालेल्या देवांना त्यांचा सत्काररूप भाग देऊन अध्वर्यूने त्यांना संतुष्ट करणे होय. एवं च, स्रुची उचलण्याच्या रूपाने अध्वर्यूने केलेल्या संस्काराने संतुष्ट झालेले देव यज्ञकर्त्यां यजमानाविषयी संतुष्ट होतात.

पूर्व दिशेखेरीज उत्तरवेदीच्या भोवती तीन दिशांना देवदारुवृक्षाचे तीन परिधी घालावेत. म्हणजे ते तीनही लोकांचे धारण करण्याला कारणभूत होतात.

अग्नीला तीन वडील भाऊ होते. ते देवांच्याकडे हविर्द्रव्ये वाहून नेता नेता थकून गेले. तेव्हा, 'माझे तीनहीं भाऊ ज्याप्रमाणे हविर्द्रव्ये वाहता वाहता थकून गेले, त्याचप्रमाणे माझ्यासारखाही जो कोणी हे हविर्द्रव्यांचे ओझे वाहण्याचे काम करील, तो देखील मरणाच्या खाईत पडावयाचा', असा विचार मनात येऊन अग्नी भ्याला आणि तो देवांच्यापासून दूर पळून गेला व दडून राहिला. वृक्षसमुदायापैकी देवदारू वृक्षाच्या ठिकाणी तो एक रात्र दडला. ओषधींच्या पैकी सुगंधयुक्त अशा तृणाच्या ठिकाणी, अर्थात् वाळ्याच्या गवतामध्ये त्याने एक रात्र दडून काढली. आणि एक रात्र मेंढ्यांच्या दोन शिंगांच्या मध्यभागात लपून राहून काढली. अग्नीला शोधून काढावा व हविर्द्रव्ये वाहून नेण्याच्या कामी त्याला प्रेरित करावा, अशी देवांना इच्छा

झाली आणि त्यांनी त्याला हुडकून काढले. देव त्याला म्हणाले, 'हे अग्ने, तू आमच्याकडे परत ये आणि 'आमची हविर्द्रव्ये वाहून नेण्याचे काम कर'. तेव्हा अग्नी त्यांना म्हणाला. 'मी मागेन तो वर तुम्ही मला द्या, म्हणजे मी हविर्द्रव्ये वाहण्याचे काम करीन. स्रुचीमध्ये भरून घेतलेल्या हविर्द्रव्याचा जो अंश आहुती देण्यापूर्वी परिधींच्या बाहेर सांडेल तो माझ्या भावांचा भाग असावा'. यास्तव, स्रुचीत घेतलेल्या हविर्द्रव्याचा जो अंश परिधीच्या बाहेर सांडेल, तो अग्नीच्या भावांचा भाग आहे, असे समजून अध्वर्यूने त्या भागाने अग्नीच्या भावांना संतुष्ट करावे.

अग्नीने असा विचार केला की, अस्थी व मांस यांनी युक्त असलेले माझे भाऊ मेले तेव्हा त्यांच्या शरीरातील अस्थी व मांस लांब फेकून द्यावे. त्याप्रमाणे त्याने आपल्या भावांच्या अस्थी दूर फेकल्या. त्यांच्यापासून देवदारू वृक्ष उत्पन्न झाले. व जे मांस दूर फेकले त्यापासून गुग्गुळ उत्पन्न झाला. यास्तव अध्वर्यूने जर देवदारू वृक्षाच्या ढलप्या व गुग्गुळ हे पदार्थ उत्तरवेदीच्या ठिकाणी ठेवले तर त्याने जणू काय अग्नीलाच पूरक असे संभार उत्तरवेदीच्या ठिकाणी ठेवल्याप्रमाणे होते. 'अग्नेः पुरीषमसि' या मंत्राने पूर्वोक्त पदार्थ उत्तरवेदीवर ठेवावेत. कारण, हे संभार अग्नीचेच पूरक अर्थात् त्याला वृद्धिकारक होत. शिवाय, ब्रह्मवादी असे म्हणतात की, अध्वर्यूने जर उत्तरवेदीच्या तीनही बाजूंस देवदारू वृक्षाचे परिधी घातले तर त्याने जणू काय तीन्ही परिधींच्या रूपाने अग्नीच्या तीन्ही भावांनाच त्याच्या सान्निध्यात आणून ठेवल्यासारखे होते. (अनुवाक ८).

हविर्धान संज्ञक दोन शकटांच्या म्हणजे गाड्यांच्या ठिकाणी पूर्वी ज्या दोऱ्या बांधलेल्या असतील त्या सोडाव्यात. म्हणजे त्या दोनही गाड्यांना वरुणपाशातूनच जणू काय मुक्त केल्यासारखे होते. मग ते दोनही गाडे व त्यांना बांधलेल्या त्या दोऱ्या स्वच्छ धुवाव्यात. म्हणजे त्या दोन्ही गाड्यांना व दोऱ्यांना मेध्य म्हणजे यज्ञयोग्य केल्यासारखे होते. नंतर त्या दोऱ्या दोनही गाड्यांना पुनः बांधाव्यात. आणि ते दोनही गाडे वेदीच्या मध्यभागी 'पृष्ठ्या' नांवाची जी दोरी जमिनीबरोबर पक्की बांधलेली असते, तिच्या दक्षिणोत्तर दोन बाजूस ते दोन गाडे उभे करावेत. सवितृशब्दाने युक्त अशा 'युंजते मन उत युंजते' या मंत्राने उत्तरवेदीवर स्थापन केलेल्या आहवनीयाच्या

ठिकाणी एक आज्याहुती द्यावी. आणि ते दोनही गाडे हविर्धान मंडपात नेण्यासाठी पुढे चालवावेत. असे केले असता सवितृदेवाच्या प्रेरणेनेच ते गाडे अध्वर्यूने पुढे चालू केल्यासारखे होते. हविर्धान शकटाचा कणा दोऱ्यांचे वेढे देऊन पक्का बांधलेला असतो. अर्थात् दोऱ्यांच्या फासाने बद्ध झालेला कणा वरुणरूप असतो. वरूण हा क्रुर स्वभावाचा असल्यामुळे त्याने उच्चारलेली वाणी कठोर असते. यास्तव, गाडे चालू केल्यावर त्याचा कणा जर आवाज करू लागला तर तो यजमानाच्या गृहांच्या ठिकाणी कठोर, अर्थात्, दुःसह असा शब्द उत्पन्न करण्याला कारणभूत होतो. म्हणजे यजमानाच्या घरात राहणारी माणसे परस्परांशी कठोर शब्दाने भांडू लागतात. यास्तव हविर्धान शकटाचा कणा जर कठोर शब्द करू लागेल तर 'हे अक्षदेवा, यजमानाच्या घरात कठोर वाणीचा उच्चार न करता मधुर व श्रेयस्कर अशा वाणीने बोल', अशा अर्थाचा, 'सुवाग्देव दुर्यां आ वद' हा मंत्र म्हणावा. दुर्य म्हणजे यजमानाची गृहे होत. यास्तव, आता सांगितलेला मंत्र म्हटला असता, तो यजमानाच्या गृहाच्या ठिकाणी कठोर शब्द उत्पन्न न होऊ देता शांती निर्माण करण्याला कारणभूत होतो. हविर्धान मंडपाकडे गाडे चालू करण्यापूर्वी 'सोमक्रयणी गाईने टाकलेल्या सातव्या पावलाच्या जागी आज्याहुती देऊन त्या जागेची आज्याने माखली गेलेली माती 'पद्धरणी' नांवाच्या एका स्थालीत म्हणजे तपेलीत साठवून ठेवलेली असते. त्या मातीतील तृतीयांश मातीमध्ये आज्य मिसळून तयार केलेल्या वंगणाचे त्या गाड्यांच्या कण्याच्या दोन्ही अग्रभागांना पत्नीने अंजन करावे. म्हणजे ते वंगण चांगले चोळावे. कारण पत्नी ही सर्वांचा मित्र आहे. यास्तव, गाड्यांच्या कण्याच्या ठिकाणी मित्रत्व उत्पन्न व्हावयासाठी तिच्या हातून कण्याला अंजन करणे युक्तच होय. शिवाय, यज्ञाचे जे अंगभूत कर्म पत्नी करते, त्या योगाने यज्ञाच्या ठिकाणी मिथुनभाव निर्माण होत असतो. अर्थात् वंगण लावण्याच्या निमित्ताने पत्नीकडून कण्याच्या ठिकाणी होणारा स्पर्श म्हणजे यज्ञालाच केलेला स्पर्श होय. आणि अशा प्रकारे यज्ञाला झालेला पत्नीचा स्पर्श यज्ञाच्या ठिकाणी विच्छेद उत्पन्न न होण्यास कारणभूत होतो.

शकट चालविण्याच्या मार्गावर आडवे येऊन राक्षस यज्ञाचा नाश करीत असतात. यास्तव, शकटाच्या दोनही बाजूंच्या चाकोऱ्या उठलेल्या असतील त्यांच्या ठिकाणी 'विष्णु' शब्दाने युक्त अशा 'इदं विष्णुर्विचक्रमे' व 'इरावती

धेनुमती' या वैष्णवीसंज्ञक दोन ऋचांनी दोन आहुती द्याव्यात. कारण, यज्ञ हा विष्णुरूप आहे. यास्तव, वैष्णवी ऋचांनी दोन आहुती दिल्या असता त्या विष्णुरूप अशा यज्ञाकडूनच हविर्धान शकटाच्या मार्गावर आडवे येणाऱ्या राक्षसांचा नाश करतात.

अग्नी नसेल अशा ठिकाणी जर अध्वर्यू आहुती देईल तर तो आंधळा होईल व राक्षस यज्ञाचा नाश करतील. यास्तव, चाकोरीच्या जागी सुवर्ण ठेवून त्या सुवर्णावर आहुती द्याव्यात. म्हणजे अग्नियुक्त अशा स्थलाच्या ठिकाणी अध्वर्यूने आहुती दिल्यासारखे होते. आणि त्यायोगे अध्वर्यू अंध होत नाही व राक्षस यज्ञाचा नाशही करीत नाहीत.

हविर्धान मंडपाकडे नेण्यासाठी पूर्व दिशेस अनुलक्षून शकट चालू करताना 'प्राची प्रेतमध्वरं कल्पयन्ती' हा मंत्र म्हणावा. त्या योगाने अध्वर्यूने जणू काय त्या दोनही शकटांना स्वर्गलोकाकडेच चालविल्यासारखे होते. हविर्धान मंडपात पोचल्यावर टेकणांच्या आधारावर गाडे उभे करताना, 'अत्र रमेथा वर्ष्मन् पृथिव्याः' हा मंत्र म्हणावा. कारण देवयजनरूप वेदी हे जणू पृथ्वीचे शरीरच आहे. अर्थात् या मंत्राने गाडे उभे केले असता पृथ्वीच्या शरीराच्या ठिकाणी त्यांना उभे केल्यासारखे होते.

हविर्धान मंडपाचे स्थल हे यज्ञाचा जणू शिरोभागच होय. दक्षिण बाजूचा हविर्धान शकट स्थिर राहण्यासाठी त्याच्या कण्याच्या दक्षिण बाजूस जमिनीवर एक मेख ठोकावी. व त्या मेखेच्या ठिकाणी दोरीने गाड्याचे चाक बांधून ठेवावे. म्हणजे गाडा न हालता स्थिर राहतो. मेख ठोकावयाची ती, आशीर्वाद निदर्शक अशी पदे जिच्यामध्ये पठित झालेली आहेत अशा 'दिवो वा विष्णवुत वा पृथिव्याः' ही ऋचा म्हणून ठोकावी. म्हणजे त्या योगाने मंत्रामध्ये व्यक्त झालेले आशीर्वाद हविर्धान शकटाच्या द्वारा यजमानाच्या शिरोभागाच्या ठिकाणी प्राप्त होतात.

'उपर' नांवाच्या असुराचा पुत्र 'दंड' या नांवाचा एक असुर होता. त्याने वषट्कार मंत्राचा अधिष्ठाता असणारा जो देव त्याच्याशी मैत्री संपादन केली. व त्याच्या द्वारे हविर्धान मंडपात प्रवेश करून तेथे असलेल्या तिसऱ्या शकटाचा कणा मोडून टाकला. यास्तव, त्या तिसऱ्या शकटाच्या प्रतिनिधीरूपाने एकेका हविर्धान शकटाच्या वरच्या बाजूस एकेक छदी म्हणजे छावणी घालावी.

म्हणजे त्या योगाने तिसऱ्या हविर्धान शकटाचाही संग्रह केल्याप्रमाणे होते.

हविर्धान संज्ञक मंडप हे यज्ञाचे मस्तकच होय. यास्तव, 'विष्णो रराटमसि' म्हणजे 'हे रराटी, तू यज्ञरूपी विष्णूचे ललाटच आहेस', या अर्थाचा मंत्र म्हणून हविर्धानमंडपाच्या पूर्व द्वाराच्या दोन बाजूंकडील दोन खांबांना तोरणासारखी एक दर्भमाला बांधावी. त्याचप्रमाणे 'विष्णोः पृष्ठमसि' हा मंत्र म्हणून हविर्धान मंडपावर एक छावणी घालावी. कारण सृष्टिकर्त्याने रराटी, छदी व रराटीची दोनही टोके एकत्र शिऊन हे हविर्धानमंडपरूप यज्ञाचे मस्तक निर्माण केले आहे. हविर्धान शकटाच्या दक्षिणेकडील खांबाला दर्भांनी गुंडाळून ते दोरीने घट्ट बांधताना 'विष्णोः स्युरसि' म्हणजे 'तू विष्णूदेवतेचीच रज्जू आहेस', या अर्थाचा मंत्र म्हणावा. नंतर त्या दोरीची सहज दिसेल अशी गाठ देताना, 'हे ग्रंथी, तू विष्णूच्या ठिकाणी दृढ झालेली आहेस' या अर्थाचा, 'विष्णो र्ध्रुवमसि' हा मंत्र म्हणावा. स्पष्ट दिसेल अशीही प्रथम दिलेली गाठ अध्वर्यूने मग जर सोडून टाकली नाही तर तो मूत्र कोंडून मरतो. यासाठी त्याने पूर्वोक्त मंत्राने प्रथम दिलेली गाठ सोडून टाकावी. (अनुवाक ९).

'देवस्य त्वा सवितुः प्रसवे' हा मंत्र पठण करून अभ्री म्हणजे माती खणावयाची अणकुचीदार कळकाची काठी हाती घ्यावी. असे केले असता, सविता देवाकडून पुढे करावयाच्या खननकार्याची प्रेरणा मिळते. 'अश्विनोर्बाहुभ्याम्' हा पूर्वोक्त मंत्राचा दुसरा अंश होय. कारण, उभयता अश्विनीकुमार हे देवांचे अध्वर्यू होते. यास्तव, या मंत्रांशाचे पठण केले असता देवांचे अध्वर्यू असलेल्या अश्विनीकुमारांच्याच बाहूंच्या साहाय्याने खणण्याचे कार्य केल्यासारखे होते. 'पूष्णो हस्ताभ्याम्' हा त्यापुढचा अंश अध्वर्यूने म्हणावा. म्हणजे तो पुढे सांगण्यात येणाऱ्या खननकार्याकडे प्रवृत्ती होण्यास उपयुक्त होतो. अभ्री ही वज्रासारखी तीक्ष्ण आहे. यास्तव 'अभ्रिरसि नारिरसि' असे म्हणून त्या अभ्रीचे अभिमंत्रण करावे. म्हणजे ते अभिमंत्रण अभ्रीच्या ठिकाणी शांती उत्पन्न करण्यास कारणभूत होते.

यज्ञाचे प्रत्येक अंग जेव्हा जेव्हा अनुष्ठित केले जात असते, तेव्हा तेव्हा त्या यज्ञाचा नाश करण्यास राक्षस प्रवृत्त होत असतात. यास्तव, त्या राक्षसांचा नाश व्हावा म्हणून ज्या ठिकाणी खळगा खणावयाचा त्या

ठिकाणी खळग्याची आखणी करण्याकरिता अभ्रीच्या टोकाने वर्तुळाकार रेषा काढताना, 'परिलिखितं रक्षः परिलिखिता अरातयः' असे म्हणावे. नंतर, 'इदमहं रक्षसो ग्रीवा अपि कृंतामि योऽस्मान् द्वेष्टि यं च वयं द्विष्मः' ह्या मंत्रांश पठण करावा. त्या योगाने अध्वर्यूने जणू काय ज्या मनुष्याचा यजमान द्वेष करतो तो मनुष्य व यजमानाचा जो द्वेष करतो तो मनुष्य या दोन मनुष्यांपैकी कोणासही न वगळता दोघांचीही मान अभ्रीने छाटल्यासारखे होते.

औदुंबरी नांवाच्या उंबराच्या मेढीचे प्रोक्षण करताना 'दिवे त्वाऽन्तरिक्षाय त्वा पृथिव्यै त्वा' असा मंत्र म्हणावा. त्या योगाने द्युलोक, अंतरिक्ष व पृथ्वी या तीन लोकांच्यासाठीच जणू अध्वर्यूने औदुंबरीचे प्रोक्षण केल्यासारखे होते. औदुंबरीचे प्रोक्षण तिच्या अग्रभागाकडून मुळाकडे करीत यावे. कारण, मनुष्ये ऊर्ध्वभागी असणाऱ्या मुखामध्ये अन्न घालून ते अधोभागी असलेल्या उदरामध्ये प्रविष्ट करतात आणि आपले जीवन चालवितात. भूमीवर खळगी खणणे म्हणजे अध्वर्यूने जणू क्रूरपणाचेच कर्म केल्यासारखे होय. यास्तव, भूमीला शीत करण्याकरिता त्या खळगीत अध्वर्यूने उदक ओतावे. खळगीत जे उदक ओतावयाचे त्यात सातू मिसळून मग ओतावे. कारण, सातू हे धान्य अन्नरूप असून उंबराचा वृक्षही अन्नस्वरूप आहे. यास्तव, ज्या खळगीत उंबराची मेढ पुरावयाची तीत सातू मिसळलेले उदक ओतले असता यवरूप अन्नानेच औदुंबररूप अन्नाला समृद्ध केल्यासारखे होते. खळगीत पुरलेल्या औदुंबरीसंज्ञक मेढीची उंची यजमानाच्या उंची इतकी असावी. म्हणजे यजमानाला त्याच्या निर्वाहापुरते अन्नच अध्वर्यूने जणू काय त्याच्या ठिकाणी धारण केल्यासारखे होते. 'पितृणां सदनमसि' हा मंत्र म्हणून अध्वर्यूने खळगीच्या बुडाशी दर्भ पसरावेत. कारण, खणलेल्या खळगीच्या ठिकाणी पितृदेवतांचे आधिपत्य असते. अर्थात् खळगीमध्ये दर्भ पसरले म्हणजे अध्वर्यूने जणू काय पितरांना बसावयासाठी आसनच पसरून ठेवल्यासारखे होते. खळगीमध्ये दर्भ न पसरताच जर औदुंबरी तिच्या ठिकाणी पुरली तर खळगीच्या वर राहणारी औदुंबरी देखील पितरांच्याच आधिपत्याखालची होईल. खळगीच्या वरचा औदुंबरीचा भाग मनुष्यांच्या आधिपत्याचा होण्याला अवकाशच राहणार नाही. यास्तव, खळगीमध्ये दर्भ पसरले म्हणजे खळगीच्या ऊर्ध्व भागापर्यंतच पितरांचे आधिपत्य विभागल्यासारखे होऊन खळगीच्या वर राहणारा औदुंबरीचा सर्व भाग अध्वर्यूने मनुष्यांच्या आधिपत्यासाठी जणू राखून ठेवल्यासारखे होईल. सारांश, खळगीत असलेला

तेवढाच भाग पितरांच्यासाठी निराळा ठेवून बाकीच्या वर राहणाऱ्या औदुंबरीला अध्वर्यूने स्वसंबद्ध केल्यासारखे होते. खळगीत ठेवण्यासाठी औदुंबरी उचलताना 'उद्दिवं स्तभानाऽऽन्तरिक्षं पृण' हा मंत्र म्हणावा. त्या योगे पृथिव्यादि तीनही लोकांचे धारण करण्यास औदुंबरी कारणभूत होते. औदुंबरी खळगीत ठेवताना 'द्युतानस्त्वा मारुतो मिनोतु' हा मंत्र म्हणावा. कारण, 'द्युतान' या नांवाचा देवींचा जो मारुत म्हणजे वायू आहे, त्याच्याकडूनच जणू औदुंबरी खळगीत ठेवल्यासारखे होते. खळगीत ठेवलेल्या औदुंबरीभोवती माती बसविताना 'ब्रह्मवनिं त्वा क्षत्रवनिं' हा मंत्र म्हणावा. म्हणजे मंत्रामध्ये व्यक्त होत असलेल्या अर्थाप्रमाणे ती औदुंबरी ब्राह्मण व क्षत्रिय यांचे संरक्षण करणारी होते. 'घृतेन द्यावापृथिवी आपृणेथाम्' हा मंत्र म्हणून औदुंबरीच्या शेंड्याला असलेल्या दुबेळक्याच्या ठिकाणी सुवर्ण ठेवून त्यावर आज्याहुती द्यावी. म्हणजे द्युलोक व पृथ्वी यांना घृतरूपी रसाने माखल्यासारखे होते. आहुती दिल्यानंतर त्या आज्याचा ओघळ औदुंबरीच्या बुडख्यापर्यंत येईल, इतके आज्य आहुती देण्यासाठी घ्यावे. अशा प्रकारे आहुती देण्याने त्या आज्याचा ओघळ औदुंबरीच्या बुडापर्यंत आल्याने अध्वर्यूने जणू काय मस्तकापासून पायांपर्यंत यजमानाला तेजाने माखल्यासारखे होते.

'ऐंद्रमसि' हा मंत्र म्हणून सदनामक मंडपावर मधली छावणी घालावी. कारण, देवतेच्या आधिपत्याच्या दृष्टीने 'सद' हा इंद्रदेवतेच्या आधिपत्याखाली असतो. 'विश्वजनस्य छाया' हा मंत्र म्हणून मधल्या छावणीच्या दोन्ही बाजूंस छावण्या घालाव्यात. कारण 'सद' नामक मंडप हा सर्वच लोकांची छाया आहे. म्हणजे सर्वच लोकांना तो आपल्या छायेखाली घेत असतो.

तेजाची इच्छा करीत असलेल्या यजमानाच्या सदोमंडपावर नऊ छावण्या घालाव्यात. म्हणजे नऊ ऋचांनी निष्पन्न होणाऱ्या 'त्रिवृत्' नामक स्तोमाचे सादृश्य त्या सदोमंडपाला प्राप्त होते. 'त्रिवृत्' स्तोम हा तेजोरूप आहे. यास्तव, त्रिवृत् स्तोमाशी सादृश्य असणारा सदोमंडप निर्माण केला असता यजमान तेजस्वी होतो. इंद्रियकाम म्हणजे आपली सर्व इंद्रिये स्वकार्यक्षम व्हावीत अशी इच्छा करणाऱ्या यजमानाच्या सदोमंडपावर अकरा छावण्या घालाव्यात. त्रिष्टुप् छंद हा चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने अकराअक्षरी आहे. इंद्रियसमुदाय हा त्रिष्टुप् छंदाशी संख्यासाम्य असणारा आहे. यास्तव, त्रिष्टुप् छंदाशी सादृश्य

असणारा अर्थात् अकरा छावण्यांचा सद निर्माण केला असता यजमान इंद्रियावी म्हणजे स्वकार्यक्षम अशा इंद्रियांनी युक्त होतो. शत्रुपीडित अशा यजमानाच्या सदावर पंधरा छावण्या घालाव्यात. प्रजापतीच्या बाहूपासून उत्पन्न झाल्यामुळे 'पंचदश' नांवाचा स्तोम हा वज्ररूप आहे. यास्तव, पंधरा छावण्या घातलेला अर्थात् पंचदश स्तोमाशी सादृश्य असणारा सद् यजमानाच्या शत्रूंचा पराभव करण्यास समर्थ होतो. प्रजेची कामना करणाऱ्या यजमानाचा सदोमंडप सतरा छावण्या घालून तयार करावा. सतरा ही संख्या प्रजापतीच्या स्वरूपाशी सादृश्य असणारी आहे. अर्थात् सतरा छावण्या घातलेला सद यजमानाला प्रजापतीची सुप्रसन्नता प्राप्त करून देतो व त्या योगाने यजमानाला प्रजा प्राप्त होतात. प्रतिष्ठा प्राप्त व्हावी, अशी इच्छा असणाऱ्या यजमानाच्या यज्ञात एकवीस छावण्या घातलेला सद तयार करावा. कारण, त्रिवृत् इत्यादि स्तोमांचा अंतर्भाव एकविंश स्तोमाच्या ठिकाणी होत असल्याने तो प्रतिष्ठारूप आहे. अर्थात् एकवीस छावण्या घातल्यामुळे एकविंश स्तोमाशी सादृश्य पावणारा सद यजमानाला समाजात प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याला कारणभूत होतो.

सदसंज्ञक मंडप हा जणू यज्ञभूमीचे उदरच असून औदुंबरी ज्या वृक्षाची असते तो उंबर हा अन्नरूप होय. यास्तव, सदोमंडपाच्या मध्यभागी औदुंबरी पुरावी. म्हणजे ती प्रजांच्या मध्यभागाच्या ठिकाणी अर्थात् मानवी प्रजांच्या उदरभागी अन्नाचे स्थापन करण्यास कारणभूत होते. आणि म्हणूनच उदरामध्ये प्रविष्ट होणाऱ्या अन्नाने मनुष्ये भोजन करीत असतात.

दक्षिण बाजूस घातलेल्या छावण्या या जणू यजमानाच्या स्थानी असून उत्तरेकडील छावण्या त्याच्या शत्रूच्या ठिकाणी होत. यास्तव, दक्षिणेकडील छावण्यांची अग्रे उत्तरेकडील छावण्यांच्या अग्रांच्याहून उंच दिसतील अशी ठेवावीत. असे केल्याच्या योगाने यजमान नसलेल्या त्याच्या शत्रूच्यापेक्षा यजमानालाच उच्च स्थितीत ठेवल्यासारखे होते. लोकव्यवहारात देखील यजमान नसलेल्या सामान्य मनुष्यांपेक्षा यजमान असलेलाच माणूस उच्च ठरत असतो. छावण्यांमध्ये ज्या फटी राहिल्या असतील त्या गवताच्या मुळांनी अध्वर्यूने झाकून टाकाव्यात. छावण्या व गवताची मुळे ही भिन्न स्वरूपाची असल्याने छावण्या कोणत्या व त्यांच्या फटीत भर घातलेली तृणमुळे कोणती, हे सहज दृष्टोत्पत्तीस येते. तृण म्हणजे गवत हे अरण्यात उत्पन्न होत असल्याने

गवत व जळाऊ लाकूड या जिनसा मिळविण्यासाठी लोक अरण्यामध्ये जातात व त्या अरण्याच्या आश्रयावरच आपली उपजीविका चालवितात.

सदोमंडपाभोवती परिश्रयण करताना म्हणजे कूड घालताना 'परि त्वा गिर्वणो गिर:' हा मंत्र म्हणावा. त्या योगाने मंत्रामध्ये व्यक्त झालेल्या अर्थानुसार मंत्ररूप वाणी सदाची अधिदेवता असलेल्या इंद्राला प्रिय होतात.

सदोमंडपाच्या पूर्वदाराच्या उजव्या खांबणीला दोरीने दर्भमुष्टी गुंडाळण्यासाठी टाभणामध्ये दोरीचे टोक ओवताना 'इंद्रस्य स्यूरसि' हा मंत्र म्हणावा व 'इंद्रस्य ध्रुवोऽसि' हा मंत्र म्हणून त्या दोरीला गाठ द्यावी. कारण, देवतेच्या दृष्टीने सद हा इंद्रदेवतेच्या आधिपत्याखाली असतो.

प्रथम जी दोरीला गाठ मारली जाते, ती जर सोडली नाही तर अध्वर्यू मृत्यू पावतो. यासाठी प्रथम दिलेली गाठ अध्वर्यूने सोडून टाकावी. (अनुवाक १०).

दक्षिण दिशेस असलेला हविर्धान शकट हा जणू यज्ञाचा शिरोभागच असून 'उपरव' नांवाचे चार खळगे हे त्या शिरोभागी असलेले जणू प्राणच होत. यास्तव, हविर्धान शकट उभा केला असेल तेथेच 'उपरव' संज्ञक चार खळगे खणावेत. कारण, शिरोभागाचेच ठिकाणी प्राणांचे वास्तव्य असते. हविर्धान शकटाखाली असलेल्या भूमीवर 'उपरव' खणावेत कारण, शिरोभागी असणाऱ्या प्राणांचा संचार मेंदूपासून खालीच होत असतो. 'उपरव' खणताना 'रक्षोहणो वलगहनो वैष्णवान् खनामि' हा मंत्र म्हणावा. कारण देवतेच्या दृष्टीने 'उपरव' हे विष्णुदेवतेच्या आधिपत्याखाली असणारे आहेत. पलायन करण्यास तयार झालेल्या असुरांनी देवांच्या प्राणांचा नाश होण्यासाठी हाडे, नखे, केस इत्यादि पदार्थ फाटक्या फडक्यात बांधलेल्या व अभिचारक मंत्रांनी भारलेल्या पुरचुंड्या भूमीमध्ये खळगे करून त्यात पुरून ठेवल्या होत्या. कालांतराने देवांनी खांद्यापर्यंत खोल असे जेव्हा चार खळगे खणले तेव्हा त्या पुरचुंड्या त्यांना सापडल्या. यास्तव, उपरवांचे खळगे बाहुमात्र म्हणजे खांद्याइतके खोल खणावेत.

खळग्यातील माती उकरून बाहेर टाकताना 'इदमहं तं वलगमुद्वपामि यं न: समानो यमसमानो निचखान' हा मंत्र म्हणावा. म्हणजे अध्वर्यूने जणू काय विद्या, वित्त इत्यादिकांनी यजमानाच्या बरोबरीचा असलेला व

तसा नसलेला या दोन प्रकारच्या मनुष्यांपैकी ज्या कोणा मनुष्याने यजमानाच्या नाशाकरिता पूर्वोक्त भारलेले पदार्थ भूमीत पुरून ठेवले असतील, त्या मनुष्यावरच ते पदार्थ भूमीतून उकरून फेकल्यासारखे होते.

चार दिशेला खणलेले उपरवांचे चार खळगे खालच्या बाजूने परस्परांच्याशी एक झालेले असावेत. कारण प्राण हे बाह्य दृष्टीने निरनिराळ्या ठिकाणी संचरत असल्याप्रमाणे दिसत असले तरी ते शरीराच्या अंतर्यामी एकत्रच राहत असतात. वरच्या बाजूने सर्व उपरव परस्परांपासून पृथक् पृथक् दिसावेत. कारण अंतर्यामी एकत्र असणारे प्राण शरीराच्या बाहेरच्या बाजूस निरनिराळ्या जागी राहून आपापली कार्ये करीत असतात.

उपरवांचे प्रोक्षण केल्यानंतर उरलेले उदक चारही उपरवांच्या ठिकाणी थोडेथोडे ओतावे. कारण शरीरातील सर्व प्राण हे अंतर्यामी आर्द्र म्हणजे द्रवरूप असे आहेत. उपरवांमध्ये उदक ओतताना त्यामध्ये सातू टाकावेत व सातूंनी मिश्रित असे उदक उपरवात ओतावे. कारण सातू हे अन्नरूप असून उपरव हे प्राणरूप आहेत. यास्तव, उदकामध्ये सातू मिश्र करून ते ओतले असता, अध्वर्यूने प्राणांच्या ठिकाणी अन्नच स्थापन केल्यासारखे होते.

उपरवांच्या खळग्यांच्या बुडाशी दर्भ पसरावेत. कारण, शरीराच्या अंतर्भागी असलेले प्राण, म्हणजे डोळे, नाकपुड्या लोमश म्हणजे केसांनी युक्त आहेत. उपरवांच्या ठिकाणी आज्याने अभिघार करावा. म्हणजे त्यांच्या ठिकाणी एक एक आज्याहुती द्यावी. कारण, आज्य हे तेजोरूप असून 'उपरव' हे प्राणरूप आहेत. यास्तव, त्यांच्या ठिकाणी अभिघार केल्याच्या योगाने अध्वर्यूने प्राणांच्या ठिकाणी तेजाचीच स्थापना केल्यासारखे होते.

'अधिषवण' नांवाच्या दोन फळ्या या जणू यज्ञपुरुषाच्या मुखाच्या हनुवट्या अर्थात् दोन ओठच होत. 'अधिषवण' संज्ञक दोन फळ्या उपरवांच्यावर झाकणासारख्या बसविताना त्या एकमेकीशी अगदी घट्ट जुळतून बसवू नयेत. कारण, दोन्ही ओठ हे सदैव एकमेकांशी अगदी जुळलेले नसतात. परंतु, दीर्घकाळ अर्थात् पुष्कळ दिवस चालणाऱ्या सोमयागामध्ये त्या दोन्ही फळ्या, न हलता स्थिर रहाव्यात म्हणून त्यांच्या भोवती दोरीने अथवा अन्य साधनाने बंधन करावे.

हविर्धान शकट हा जणू शिरोभाग असून उपरव हे त्या शिरोभागाचे ठिकाणी असणारे प्राणच आहेत. 'अधिषवण' संज्ञक दोन फळ्या या जणू यज्ञाच्या मुखाचे दोन ओठ असून त्यांवर पसरले जाणारे चर्म हे त्या यज्ञपुरुषाच्या मुखातील जीभच होय. त्या चर्मावर ठेवलेले सोम कुटावयाचे बत्ते किंवा वरवंटे हे यज्ञाचे जणू दात असून आहवनीय हे यज्ञाचे मुख आहे. उत्तरवेदी हे यज्ञाचे नाक असून 'सद' नांवाचा मंडप हे जणू यज्ञाचे उदर आहे. खाण्यासाठी मुखामध्ये घातलेला पदार्थ जेव्हा जिव्हेच्या द्वारा दाताखाली जातो व त्यांच्याकडून चावला जातो तेव्हाच तो मुखाच्या अंतर्भागी म्हणजे कंठामध्ये जातो व जेव्हा तो कंठामध्ये जातो तेव्हाच तो तेथून उदरात प्रविष्ट होतो.

यास्तव, हविर्धान शकटाच्या खालच्या जमिनीवर खणलेल्या उपरवांच्यावर झाकण म्हणून ठेवलेल्या अधिषवण संज्ञक दोन फळ्यांच्यावर ठेवलेला सोम वरवंट्यांनी कुटून त्याच्या रसाची आहुती आहवनीयाच्या ठिकाणी दिल्यानंतर तेथून पश्चिमेस सदोमंडपात येतात आणि नंतर त्या ठिकाणी हुतशेष अशा सोमरसाचे भक्षण करातात.

अग्निष्टोम यज्ञामध्ये जी बारा स्तोत्रे म्हणजे सामे गाइली जातात, त्यांच्या ठिकाणी आवृत्तिरूपाने गाइल्या जाणाऱ्या ऋचा नव्वद होतात. अर्थात् या ऋचांची होणारी नऊ दशके म्हणजे दहा दहा अक्षरांचे समूह, यांचे विराट् छंदाच्या चरणाक्षरसंख्येशी स्वरूपसाम्य असल्यामुळे यज्ञ हा जणू विराट् छंदस्वरूपच आहे.

सारांश, विराट्छंदस्वरूप अशा यज्ञाचे जणू मुखच असलेल्या ठिकाणी सोमरसरूपी दुधाची काढली जाणारी धार जो जाणतो, तोच विराट्छंदस्वरूप असणाऱ्या कामधेनूची धार काढण्यास समर्थ होतो. यज्ञामध्ये तयार केली जाणारी महावेदी हीच खरोखर विराट्संज्ञक कामधेनू होय. उपरवांच्या ठिकाणी पसरलेले चर्म हीच त्या कामधेनूच्या शरीरावरील त्वचा होय. अधिषवणसंज्ञक फळ्या ह्या जणू त्या कामधेनूची पान्हवलेली कांस असून उपरव हे जणू त्या कामधेनूचे चार स्तनच होत. बत्ते किंवा वरवंटे ही जणू ह्या कामधेनूची वासरे असून ऋत्विज हे जणू त्या कामधेनूची धार काढणारे होत. सोमरस हे त्या महावेदीरूप कामधेनूचे दूध होय.

सारांश, अशा प्रकारे विराट्छंदस्वरूप अर्थात् महावेदीरूप कामधेनूच्या दोहनाचे म्हणजे धार काढण्याचे तत्त्व जो जाणतो, तोच आता वर्णिलेल्या कामधेनूची धार काढू शकतो. (अनुवाक ११).

प्रपाठक ३

'चात्वाल' नामक स्थलातील माती 'धिष्णिय' नामक स्थलाच्या ठिकाणी नेऊन घालावी. कारण, चात्वाल ही यज्ञाची योनी म्हणजे उत्पत्तिस्थान आहे. चात्वालातील मातीनेच उत्तरवेदी निर्माण करीत असतात. यास्तव, चात्वालातील माती धिष्णिय स्थलाच्या ठिकाणी नेऊन घातली असता, ती यज्ञाला स्वयोनित्व प्राप्त करून देण्याला कारणभूत होते. सर्व यज्ञ स्वकीय अशा जन्मस्थानाने युक्त होतो. यज्ञाचे संपादन करण्याच्या कामी देवांनी पराजय प्राप्त करून घेतला. म्हणजे देवांच्यापासून असुरांनी यज्ञ बळकावून घेतला. परंतु, आग्नीध्र मंडपाच्या अधिष्ठात्री देवतांच्या सामर्थ्याने देवांनी असुरांच्याकडून यज्ञ पुन्हा मिळविला आणि त्याचे यजन केले. तेव्हापासून आग्नीध्रीय मंडपाचे स्थळ हे यज्ञाचे अपराजित म्हणजे अजिंक्य असे स्थळ ठरले. यास्तव, आग्नीध्रीय मंडपातील अग्नी घेऊन जर धिष्णिय स्थलांवर नेऊन घातला, तर यज्ञाचे अजिंक्य स्थळ असलेल्या आग्नीध्रीय मंडपातील अग्नीपासून यज्ञानुष्ठानाचा विस्तार केल्याप्रमाणे होते.

प्रात:सवनामध्ये 'उपास्मै गायता नर:' या ऋचांच्या आधारे उद्गाता इत्यादि सामगायक ऋत्विज जे साम गातात त्यास 'बहिष्पवमान' अशी संज्ञा आहे. हे बहिष्पवमान साम गाण्याकरता चात्वालाजवळच्या 'आस्ताव' नामक स्थळाच्या ठिकाणी जेव्हा ऋत्विज धावत जातात तेव्हा, पराभूत लोक जसे पळ काढतात, तसे ते ऋत्विज दिसतात. यास्तव, बहिष्पवमान स्तोमाचे गान समाप्त झाल्यानंतर 'अग्नीदग्नीन् विहर बर्हि: स्तृणाहि पुरोडाशां अलं कुरु' म्हणजे 'आग्नीध्रा, तू आग्नीध्रीय मंडपातील अग्नी धिष्णिय स्थलांच्या ठिकाणी नेऊन घाल, पृष्ठ्यासंज्ञक दर्भ महावेदीत पसर, पुरोडाशांना अलंकरण कर', अशा अर्थाचा आग्नीध्राला अध्वर्यूने प्रैष द्यावा. असे केल्याच्या योगाने ते ऋत्विज पराजयापासून यज्ञाला दूर करून त्याचा पुन: प्रसार करणारे होतात. प्रात:सवन व माध्यंदिन सवन या दोन सवनांमध्ये आग्नीध्रीय मंडपातील

अग्नीवर प्रज्वलित केलेल्या काष्ठांनी धिष्णिय स्थलांच्या ठिकाणी अग्नीचे विहरण करावे. म्हणजे प्रज्वलित काष्ठरूप अग्नी धिष्णिय स्थलावर नेऊन घालावा. व तृतीय सवनामध्ये पेटलेल्या दर्भमुष्टींनी अग्नीचे विहरण करावे. अर्थात् पेटलेल्या दर्भमुष्टींच्या रूपाने असणारा अग्नी धिष्णिय स्थलांवर नेऊन घालावा. असे केल्याच्या योगाने प्रदीप्त अशा दर्भमुष्टींच्या ठिकाणी असलेल्या तेजाने तृतीयसवनगत सोमाला संपन्न केल्यासारखे होते. शिवाय असे करण्याने इतर दोन सवनांतील सोमाप्रमाणेच तृतीयसवनगत सोमाला सतेज करून त्याचे पोषण केल्यासारखे होते.

स्वान, भ्राज इत्यादि धिष्णिय देवता स्वर्गलोकी सोमाचे रक्षण करीत असतात. यास्तव, सोम यज्ञमंडपात आणला जात असताना त्या सोमरक्षक देवताही त्याच्या मागोमाग येऊन त्या सोमाभोवती बसलेल्या असतात. सारांश, सोमरक्षक देवता येऊन बसत असल्यामुळे धिष्णिय स्थले ही प्रशस्त मानली जातात. धिष्णिय स्थलांचे हे माहात्म्य जो जाणतो, तो आपल्या सभोवती असणाऱ्या सेवकजनांचे संपादन करतो.

धिष्णिय स्थलाच्या स्वानभ्राजादि अधिष्ठात्री देवता सोमपानापासून वियुक्त असतात. म्हणजे त्यांना सोमपान घडत नाही. इतर देवांच्या समुदायामध्ये आपणालाही सोमपान घडावे, अशी त्या देवता इच्छा करीत असतात. त्यांची ही सोमपानवियुक्त स्थिती पाहून देव त्या धिष्णिय देवतांना म्हणाले की, 'तुम्ही दोन दोन नांवे धारण करा. एकच नांव धारण करणाराला सोमपान करण्याची योग्यता केव्हाच प्राप्त होत नसते. तुम्ही दोन दोन नांवे धारण केलीत म्हणजे तुम्ही सोमपानाच्या योग्यतेला प्राप्त व्हाल. तर मग तुम्ही आता दोन दोन नांवे धारण करणार की नाही?'. देवांचे हे म्हणणे ऐकल्यावर त्या धिष्णिय देवतांनी धिष्ण्यविशिष्ट असे एक नांव आणि अग्नी हे दुसरे नांव धारण करण्याचे ठरविले व त्यांनी दोन दोन नांवे धारण केली. त्यामुळे त्या देवता सोमपानाला पात्र झाल्या. दोन नांवे धारण केल्यामुळे व्यक्तीचा उत्कर्ष होत असल्याने लोकव्यवहारात देखील ब्राह्मण हा देवदत्त इत्यादि नांव प्रथम धारण करून नंतर विद्या व तप इत्यादि साधनांनी आचार्य, उपाध्याय इत्यादि दुसरे नांव धारण करून लोकांच्याकडून होणाऱ्या सत्काराने समृद्ध होत असतो. दोन दोन नांवे धारण करणाऱ्या देवतांमध्ये 'आहवनीय'

इत्यादि ज्या चार देवता सोमाच्या अगदी सान्निध्यात निशिष्ट झालेल्या असतात त्या सोमाच्या समीपवर्तित्वामुळे सोमपानाच्या योग्यतेला प्राप्त झाल्या. अर्थात् आहवनीय, आग्नीध्रीय, होत्रीय व मार्जालीय या चौघांच्या ठिकाणी सोमरसाच्या आहुती द्याव्यात. सारांश, दोन नांवे धारण केलेल्या देवतांपैकी मैत्रावरुणादि धिष्णिय देवता सोमापासून दूर असल्यामुळे त्यांना सोडून पूर्वोक्त चारच धिष्णियांच्या ठिकाणी वषट्कारपूर्वक सोमरसाची आहुती अध्वर्यू देतो व सोमापासून दूर असणाऱ्या मैत्रावरुणादि धिष्णिय देवता आहुतीरूप सोमपानापासून वगळल्या जातात. तथापि, दोन नांवे धारण केल्यामुळे मैत्रावरुणादि धिष्णिय देवतांचा जो उत्कर्ष झालेला असतो, त्याची सार्थकता सोमरसाच्या आहुतीच्या अभावी आज्याचे व्याघारण करून म्हणजे आज्याहुती देऊन केली जाते.

देवांनी पूर्वाभिमुख होऊन उत्तरवेदीच्या ठिकाणी ज्या आहुती दिल्या, त्या आहुतींच्या प्रभावाने पूर्व दिशेस असलेल्या असुरांना त्यांनी हाकून लावले. आणि पश्चिमाभिमुख होऊन ज्या आहुती दिल्या त्या आहुतींच्या प्रभावाने देवांनी पश्चिम दिशेस असलेल्या असुरांना दूर हाकून लावले. याप्रमाणे काही पूर्वाभिमुख होऊन दिलेल्या व काही पश्चिमाभिमुख होऊन दिलेल्या, असे दोन प्रकार आहुतींमध्ये निष्पन्न होत असतात. यास्तव, अध्वर्यूने पश्चिमाभिमुख होऊन धिष्णिय स्थानांच्या ठिकाणी आज्याहुतींच्या रूपाने व्याघारण करावे. असे केल्याच्या योगाने यज्ञकर्ता यजमान पश्चिमेकडून व पूर्व दिशेकडून आपल्या शत्रूंना दूर हाकून लावतो. आणि म्हणूनच लोकव्यवहारामध्ये पित्याकडून ज्या दिशेस मुख करून स्त्रीच्या जननेन्द्रियाचे ठिकाणी वीर्याचे सेचन केले जाते, त्याच्या उलट दिशेस मुख करून प्रजा उत्पन्न होत असतात.

धिष्णिय स्थाने ही प्राणरूप आहेत. यास्तव, अध्वर्यू जर धिष्णिय स्थानांना ओलांडून पश्चिमेस जाईल, तर त्याचे प्राण आकर्षिले जाऊन तो मरेल. होता हा जणू यज्ञाची नाभी म्हणजे मध्यस्थान आहे. नाभीच्या वरच्या भागात प्राणाचे वास्तव्य असून नाभीच्या अधोभागी अपान राहत असतो. म्हणून अध्वर्यू जर नाभिस्थानी असणाऱ्या होत्याचे उल्लंघन करून पश्चिम दिशेस म्हणजे नाभिस्थानाच्या खालच्या बाजूस जाईल तर अपानाच्या ठिकाणी प्राणवायू नेऊन ठेवल्यासारखे होईल. आणि तो मरेल. यासाठी धिष्णिय स्थानांना ओलांडून अध्वर्यूने पश्चिमेस जाऊ नये. उद्गाता सामगान करीत

असताना त्याच्यामागे बसून त्याच्या सामगानाची वाहवा (साथ) करू नये. कारण, अध्वर्यू हा मंत्ररूप वाणीचे जणू वीर्यच आहे. यास्तव, अध्वर्यूने जर उद्गात्याच्या सामगानाबरोबर उपगान केले, म्हणजे त्याच्या सामगानाची 'हो' असे म्हणून तारीफ केली, तर त्याने आपली मंत्रवाणी उद्गात्याला देऊन टाकल्यासारखे होईल. अर्थात् त्याच्या ठिकाणच्या मंत्रवाणीचे वीर्य क्षीण होईल.

ब्रह्मवादी असे म्हणतात की, सोमयाग जोपर्यंत समाप्त झाला नाही, तोपर्यंत अध्वर्यूने 'सद' संज्ञक मंडप ओलांडून पलीकडे पश्चिम दिशेस जाऊ नये, असा नियम आहे. आणि दाक्षिणहोम म्हणजे ऋत्विजांना दक्षिणा देण्याच्या प्रसंगी जो होम करावयाचा असतो तो तर प्राग्वंश मंडपात असलेल्या नव्या गार्हपत्याग्नीवर म्हणजे शालामुखीय नामक अग्नीवर करावा लागतो. यावेळी सोमयाग काही संपलेला नसतो. मग हा दाक्षिणात्य होम करण्यासाठी अध्वर्यूने सदोमंडप न ओलांडता कोणीकडून प्राग्वंशमंडपात जावे? असा प्रश्न उपस्थित होतो. यावर असे उत्तर देता येईल की, दक्षिण होम जेव्हा करावयाचा असतो, त्यावेळी देवांच्या संबंधाने होणाऱ्या कर्माचा उपरम झालेला असतो, म्हणजे देवांच्यासाठी केले जाणारे कर्म थांबलेले असते. अर्थात् अशा वेळी लौकिकदृष्ट्या सदोमंडपाच्या पलीकडे पश्चिमेस जाण्याविषयी अध्वर्यूला देव अनुज्ञाच देत असतात. अर्थात् देवांच्या संबंधाने केल्या जाणाऱ्या कर्माचा विराम झाला असलेल्या वेळात सद ओलांडून प्राग्वंश मंडपात जाण्यास हरकत नाही. पण हे उत्तर बरोबर नाही. देवांच्या संबंधी कर्माचा विराम झालेला असो वा नसो, पण सदोमंडप ओलांडून प्राग्वंशमंडपात जाण्याविषयी देव अध्वर्यूला काय म्हणून अनुज्ञा देतील? तशा प्रकारची अनुज्ञा देण्याचे देवांना काय कारण आहे? तसे कारण काही दिसत नाही. पूर्वोक्त उत्तराचा हा निषेध खरा मानला तर, दाक्षिण होमच होऊ शकत नाही, अशी अडचण उत्पन्न होते. परंतु, या परस्परविरोधी शंकांचे समाधान असे की, अध्वर्यूला सदोमंडप ओलांडून पश्चिमेस जाण्याचा जो निषेध आहे, तो आग्नीध्रीय व हविर्धान या दोन मंडपांच्या मधून सदोमंडपाच्या पलीकडे जाण्याविषयीचा आहे. यासाठी अध्वर्यूने आग्नीध्रीय मंडपाच्या उत्तरेकडून, अर्थात् आग्नीध्र मंडप डाव्या बाजूस सोडून पश्चिमेस प्राग्वंश मंडपात जावे व दाक्षिण होम करावा. असे केल्याने सदोमंडपाचे उल्लंघन करून पश्चिम दिशेस गेल्याचा

दोष अध्वर्यूस लागत नाही. अर्थात् त्याचे प्राण आकर्षित होत नाहीत व तो मरत नाही.

'धिष्णिय' किंवा 'धिष्ण्य' या शब्दाचा 'स्थान' असा सामान्य अर्थ आहे. चात्वालातील माती धिष्णियांच्या ठिकाणी घालावी, या पूर्वोक्त वचनावरून आग्नीध्रीयसंज्ञक धिष्णियापासून पुराणगार्हपत्यसंज्ञक धिष्णियापर्यंत सोळा धिष्णिय स्थानांच्या ठिकाणी चात्वालातील माती नेऊन घालावी, असा समज होतो. परंतु, यांपैकी काही म्हणजे आग्नीध्रीयापासून मार्जालीय धिष्णियापर्यंत आठच स्थानांच्या ठिकाणी चात्वालातील माती नेऊन घालावी, इतर आठ धिष्णियांच्यावर घालू नये. ज्या धिष्ण्यांच्यावर माती नेऊन घातली जाते, त्या धिष्ण्यांना माती घालण्यानेच अध्वर्यूने संतुष्ट केल्यासारखे होत असून ज्या धिष्ण्यांच्यावर माती नेऊन घातली नाही त्या आठ धिष्णियांना मंत्रपूर्वक उपस्थान करूनच अध्वर्यूने संतुष्ट केल्यासारखे होते. (अनुवाक १).

यजमानाने स्वीकारलेल्या अवांतर दीक्षेचे विसर्जन करण्यासाठी व त्याला स्वर्गलोकाची प्राप्ती व्हावयासाठी निरनिराळ्या अग्नींच्या ठिकाणी ज्या आज्याहुती द्यावयाच्या असतात त्यांना 'वैसर्जन' अशी संज्ञा आहे. दोन मंत्रांनी दोन आहुती गार्हपत्यावर द्याव्यात. त्या दोन आहुती द्विपाद अशा यजमानाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याला कारणभूत होतात. एक आहुती आग्नीध्रीय मंडपातील अग्नीवर द्यावी. तिच्या प्रभावाने यजमान अंतरिक्षलोकाच्या ठिकाणी आक्रमण करतो. एक आहुती आहवनीयावर द्यावी. तिच्या प्रभावाने अध्वर्यू यजमानाला स्वर्गलोकाच्या ठिकाणी नेऊन पोचवितो.

देव जेव्हा स्वर्गलोकी जावयास निघाले, तेव्हा राक्षसांनी त्यांना मारण्याचा प्रयत्न केला. परंतु, देवांनी सोमराजाकडून राक्षसांना दूर हाकून लावले. आणि राक्षसांना उपलब्ध होणार नाही असा अल्प देह धारण करून ते स्वर्गलोकाला गेले. यास्तव, राक्षसांना आपली उपलब्धी होऊ नये म्हणून सोमराजा उचलून घ्यावा आणि नंतर 'वैसर्जन' संज्ञक आज्याहुती द्याव्यात. अशा प्रकारे दिलेल्या वैसर्जनाहुती राक्षसांना दूर हाकून लावण्यास कारणभूत होतात.

गार्हपत्यावर आहुती देताना 'त्वं सोम तनूकृद्भ्य:' हा मंत्र म्हणावा कारण सोम हा अत्यंत अल्प असा देह धारण करणारा आहे. पूर्वोक्त

मंत्राचा 'द्वेषेभ्योऽन्यकृतेभ्य:' असा पुढचा अंश आहे, तो म्हणावा. कारण, राक्षस हेच दुसऱ्याचा घात करण्यासाठी अभिचारकर्मे करणारे असतात. पूर्वोक्त मंत्राचा 'उरुयन्ताऽसि वरूथम्' हा शेवटचा अंश उच्चारावा. या भागामध्ये 'हे अग्ने आमच्या कल्याणासाठी तू पुष्कळ प्रयत्न कर', असा अर्थ व्यक्त केला जातो. गार्हपत्यावर दुसरी आहुती देताना 'जुषाणो अप्तुराज्यस्य वेतु' हा मंत्र म्हणावा. त्या योगाने अध्वर्यूने जणू काय यजमानाला अत्यंत अल्प देहाने युक्त करून स्वर्गलोकाला पोचविल्यासारखे होते. अर्थात् राक्षसांना त्या यजमानाची उपलब्धी होत नाही. यजमान त्यांच्या तावडीत सापडत नाही.

प्राग्वंशातून हविर्धान मंडपात नेण्याकरता सोम उचलून घ्यावा. सोम कुटण्याकरता दगडी बत्ते उचलून घ्यावेत. उखळाच्या आकाराची 'ग्रह' संज्ञक पात्रे उचलून घ्यावीत. दोणीच्या आकाराचे द्रोणकलश नांवाचे लाकडी पात्र उचलून घ्यावे. त्याचप्रमाणे हविर्धान मंडपात जाण्याकरता पत्नीलाही पत्नीशाळेतून उठवून आणावी. आणि या सर्व साहित्यासह व यजमानासह हविर्धानमंडपाकडे जावे. व्रीही इत्यादि धान्ये हविर्धानात नेण्याचा गाडाही वारंवार हविर्धान मंडपाकडे न्यावा. असे केल्याच्या योगाने यजमानाचे स्वकीय असे जेवढे काही असते, त्या सर्वासह अध्वर्यूने यजमानाला स्वर्गलोकी नेऊन पोचविल्यासारखे होते.

स्वर्गलोकासंमुख यजमानाला घेऊन जाण्यासाठी आग्नीध्रीय शाळेतील अग्नीवर 'नय' शब्दाने युक्त अशा 'अग्ने नय सुपथा'. या मंत्राने आहुती द्यावी. सोम कुटावयाचे दगडी बत्ते व वायुदेवता ज्याची अधिष्ठात्री देवता आहे, अशी ग्रहपात्रे थेट हविर्धान मंडपात न नेता आग्नीध्रीय शाळेत ठेवावीत. मात्र सोम आग्नीध्रीयेत म्हणजे आग्नीध्रशाळेत न ठेवता हविर्धान मंडपात नेण्यासाठी उचलून घ्यावा. सोम जर बत्ते व ग्रहपात्रे यांच्या बरोबर आग्नीध्रीयेत ठेवला तर कुटला जाण्याच्या भीतीने सोमाच्या अंतर्भागी दुर्गंधी उत्पन्न होईल. सोम शब्दाने युक्त अशी जी ऋचा ती 'सौमी' होय, 'सोमो जिगाति गातुवित्' या सौमी ऋचेने सोमराजा हविर्धान मंडपात न्यावा. असे केल्याच्या योगाने स्वकीय अशा ऋचेच्या पठणाने अध्वर्यूने सोमराजाला हविर्धान मंडपात नेल्यासारखे होते.

हविर्धान शकटाच्या साटीवर कृष्णाजिन पसरताना 'आदित्या: सदोऽसि'

हा मंत्र म्हणावा. आणि त्या कृष्णाजिनावर सोमराजा ठेवताना 'आदित्या: सद आ सीद' हा मंत्र म्हणावा. म्हणजे मंत्राच्या ठिकाणी व्यक्त झालेल्या अर्थास अनुसरून कृष्णाजिन पसरून त्यावर सोमराजाला ठेवल्यासारखे होते. हविर्धान मंडपात सोमराजा आणून ठेवण्यापूर्वी यजमान हा त्याचा संरक्षक असतो. हविर्धान मंडपात आणून ठेवल्यानंतर त्याचे संरक्षण व्हावे म्हणून तो देवतांच्या स्वाधीन करताना अध्वर्यूने 'एष वो देव सवित:' हा मंत्र म्हणावा. म्हणजे सविता देवाची प्रेरणा झाल्यावरच अध्वर्यूने सोमराजाला त्याचे रक्षण व्हावे म्हणून देवतांच्या स्वाधीन केल्यासारखे होते. 'एतत् त्वं सोम देवो देवानुपागा:' असा या पुढचा मंत्रांश म्हणावा. म्हणजे सोमराजा हा स्वत: देव होऊन देवांच्या सन्निध जातो. नंतर 'इदमहं मनुष्यो मनुष्यान्' हा अंश पठण करावा. म्हणजे सोमराजा हा मनुष्य होऊन मनुष्यांच्या जवळ जातो. जर हा यजुर्मंत्र म्हटला नाही तर यजमान प्रजारहित व पशुरहित होतो. यास्तव, 'सह प्रजया सह रायस्पोषेण' हा शेवटचा यजुमंत्रांश म्हणावा. त्या योगाने प्रजा व पशू यांच्यासह यजमान इहलोकी सुखाने नांदतो. 'नमो देवेभ्य:' असे म्हणावे. म्हणजे देवांना नमस्कार केल्याप्रमाणे होते. आणि 'स्वधा पितृभ्य:' असे म्हटले असता 'स्वधा' असे म्हणून पितरांनाही अभिवादन केल्यासारखे होते. नंतर 'इदमहं निर्वरुणस्य पाशात्' हा मंत्र म्हणावा. म्हणजे वरुणपाशापासून सोमराजा मोकळा होतो. यजमानाने 'अग्ने व्रतपते' हा मंत्र म्हणावा. बुध्दिमंत असे म्हणतात की, यजमानाने अग्नीच्या स्वाधीन केलेली आपली पहिली तनू अग्नीपासून सत्वर परत घ्यावी. कारण अत्यंत धनवान् असा कोणीही पुरुष दुसऱ्याची आपल्या हातात आलेली वस्तू ज्याची त्याला परत देतो की नाही, याविषयी कोणास भरवसा वाटणार? यासाठी 'अग्ने व्रतपते' या मंत्राने अग्नीची प्रार्थना करून आपली पूर्वीची तनू त्याच्याकडून झटकन परत घ्यावी हे उत्तम. ग्रावे म्हणजे सोम कुटावयाचे दगडी बत्ते हे जणू काय, सोमराजावर हल्ला करणाऱ्या चोरांची टोळीच होय. हे जाणून जो अध्वर्यू सोम कुटावयाचे बत्ते आग्नीध्रीय शाळेमध्ये ठेवतो त्याने त्या सोमराजाला त्याच्यावर हल्ला करणाऱ्या चोरांच्या टोळधाडीपासून सुरक्षित ठेवल्यासारखे होते. (अनुवाक २).

'उरु विष्णो वि क्रमस्व' या वैष्णवी म्हणजे विष्णुशब्दाने युक्त असलेल्या ऋचेने आहवनीयावर आज्याहुती द्यावी. आणि नंतर अध्वर्यूने 'यूप' तोडून

आणावयासाठी जावे. देवतेच्या दृष्टीने यूप हा विष्णुदेवतात्मक आहे. यास्तव, वैष्णवी ऋचेने आज्याहुती देऊन यूप आणावयास गेले असता यूपाच्या स्वकीय अशा देवतेलाच बरोबर घेऊन यूप आणावयास गेल्यासारखे होते. यूप आणावयास निघताना 'अत्यन्यानगां नान्यानुपागाम्' हा मंत्र म्हणावा, त्या योगाने यूप करण्यास योग्य परंतु, अवश्य त्या इतर चिन्हांनी रहित, त्याचप्रमाणे यूप करण्यास अयोग्य अशा दोन्ही प्रकारच्या वृक्षांच्या जवळ न जाता, यूप करण्यास योग्य व सुलक्षण अशा वृक्षाजवळ अध्वर्यूने गमन केल्यासारखे होते. नंतर पूर्वोक्त मंत्राच्या पुढचा 'अर्वाक् त्वा परैरविदं परोऽवरैः' हा अंश म्हणावा. त्या योगाने उत्कृष्ट अशा लक्षणांनी युक्त व निकृष्ट अशा लक्षणांनी रहित अशा वृक्षाजवळ अध्वर्यूने गेल्यासारखे होते. मग, 'तं त्वा जुषे वैष्णवं देवयज्यायै' हा त्या मंत्राचा शेवटचा अंश उच्चारावा. त्या योगाने अध्वर्यूने देवांचे यजन करण्यासाठीच त्या यूपयोग्य वृक्षाला पसंत केल्यासारखे होते. वृक्षाच्या बुंध्याच्या सभोवती स्रुव्याने आज्य लावताना 'देवस्त्वा सविता मध्वाऽनक्तु' हा मंत्र म्हणावा. म्हणजे तेजाच्याच योगाने वृक्षाच्या बुंध्याला अंजन केल्यासारखे होते. नंतर अंजन केलेल्या त्या बुंध्यावर दर्भ ठेवताना 'ओषधे त्रायस्वैनम्' हा पूर्वोक्त मंत्रातील दुसरा अंश म्हणावा. त्या योगाने 'या वृक्षाची हिंसा करू नको' अशी त्या दर्भरूपी ओषधीची प्रार्थना केल्यासारखे होते. मग, 'स्वधिते मैनं हिंसीः' हा अंश म्हणावा. कारण, स्वधिती म्हणजे वृक्ष तोडावयाची कुऱ्हाड ही जणू वज्रासारखी आहे. यास्तव, हा मंत्रांश पठण केला असता, तो वृक्ष तोडला जात असताना देखील त्या वृक्षाच्या ठिकाणी शांतता निर्माण करण्याला कारणभूत होतो. कुऱ्हाडीचा पहिला घाव पडताच घावाला भ्यालेल्या त्या वृक्षाची पहिली ढलपी जेव्हा तुटून पडते, तेव्हा तिच्या बरोबर त्या वृक्षाच्या ठिकाणचे तेजही जणू तुटून पडत असते. यास्तव, यूप घरी घेऊन जात असताना त्या वृक्षाची पहिल्याने तुटून पडलेली ढलपीही त्या यूपाबरोबर घरी घेऊन जावी. असे केले असता तेजासहित अशा यूपाला घरी नेल्यासारखे होते. पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु हे जे तीन लोक आहेत ते बुंधापासून तुटून भूमीवर पडणाऱ्या यूपाला भीत असतात. यास्तव, तो यूपयोग्य वृक्ष बुंधापासून तुटून जमिनीवर खाली पडत असताना, 'दिवमग्रेण मा लेखीरन्तरिक्षं मध्येन मा हिंसीः' हा मंत्र म्हणावा. असे केले असताना पृथिव्यादि तीनही लोकांना भीती उत्पन्न करणाऱ्या त्या यूपवृक्षाला अध्वर्यूने जणू शांत केल्यासारखे

होते. 'वनस्पते शतवल्शो वि रोह' या मंत्राने त्या वृक्षाच्या तुटलेल्या बुंधावर एक आज्याहुती द्यावी. म्हणजे त्या तुटलेल्या बुंध्यापासून पुष्कळ शाखा उत्पन्न होऊन वाढीस लागतात. अध्वर्यूने आपल्या हृदयाला स्पर्श करून 'सहस्रवल्शा विवयं रुहेम', हा मंत्र म्हणावा, म्हणजे त्या मंत्रात व्यक्त झालेला आशीर्वादच त्याने पूर्ण होण्याविषयी याचना केल्यासारखे होते. वृक्ष अशा रीतीने तोडावा की, त्याच्या खाली राहणाऱ्या बुंध्यावरून एखादा गाडा जाईल तर त्याच्या कण्यास त्या बुंध्याचा प्रतिबंध होऊ नये. सारांश, गाड्याच्या कण्याला आड न येईल इतक्याच बेताने बुंधा खाली राखून वृक्ष तोडावा. त्या बुंधाला जर गाड्याचा कणा अडखळला तर गाड्याला धक्का बसेल व त्या गाड्याच्या दांडीखाली यजमानाची एखादी गाय किंवा वासरू सापडेल व मरेल.

आपला यजमान अप्रतिष्ठित व्हावा, असे ज्या यजमानाबद्दल अध्वर्यूला वाटत असेल त्याने, त्या यजमानाला अप्रतिष्ठा प्राप्त व्हावी म्हणून, यूप करण्यासाठी वृक्षाचे खोड न तोडता त्या वृक्षाची शाखाच तोडावी. कारण, वृक्षाच्या ठिकाणचा शाखारूप भाग हा अप्रतिष्ठित म्हणजे भूमीपासून उत्पन्न न झालेला असतो. यास्तव, अध्वर्यूने वृक्षाची शाखा तोडली असताना यजमानही समाजात अप्रतिष्ठित अर्थात् प्रतिष्ठारहित होतो. ज्या यजमानाबद्दल तो पशुरहित व्हावा असे अध्वर्यूला वाटत असेल, त्या यजमानाच्या यज्ञातील यूपाकरता पर्णरहित व ज्याचे अग्र वाळून शुष्क झालेले आहे असा वृक्ष तोडावा. कारण, वृक्षांमध्ये पर्णरहित व शुष्काग्र असा जो वृक्ष असतो तो पशूंना हितकारक नसतो. अर्थात् अशा प्रकारचा वृक्ष यूपाकरता तोडल्याने यजमान पशुरहित होतोच होतो.

आपला यजमान पशुमान म्हणजे पशुसंपत्तीने युक्त व्हावा असे ज्या यजमानाबद्दल वाटत असेल, त्या यजमानाला पशूंची प्राप्ती व्हावयासाठी अध्वर्यूने पुष्कळ पाने व पुष्कळ शाखा असलेला वृक्ष तोडावा. वृक्षांमध्ये पुष्कळ पानांचा व पुष्कळ शाखा फुटलेला जो वृक्ष असतो, तो पशूंना कल्याणकारक असतो. यास्तव, तशा प्रकारचा वृक्ष अध्वर्यूने तोडला असता यजमान पशुसंपत्तीने युक्त होतो. प्रतिष्ठा प्राप्त व्हावी अशी इच्छा करणाऱ्या यजमानाच्या अध्वर्यूने सपाट अशा भूमीवर व स्वबीजापासून निर्माण झालेला वृक्ष यूप करण्याकरता

तोडावा. कारण वृक्षसमुदायामध्ये सपाट अशा भूमीवर स्वबीजापासून निर्माण झालेला जो वृक्ष असतो तो प्रतिष्ठित असतो. अर्थात् अशा प्रकारचा वृक्ष तोडला म्हणजे यजमान प्रतिष्ठेला प्राप्त होतो. पश्चिम दिशेकडे झुकलेला जो वृक्ष असतो. तो तोडावा. कारण, त्या वृक्षाचा जो यूप तयार होतो तो यज्ञाकडे झुकलेला राहतो. म्हणजे यज्ञाला अनुलक्षून विनम्र होतो. आपल्या यजमानाच्या हातून अग्निष्टोमाच्या पुढचा उक्थ्य इत्यादि विकृतिभूत सोमयज्ञ व्हावा असे ज्या यजमानाबद्दल वाटत असेल, त्याच्यासाठी अध्वर्यूने पांच अरत्नी लांबीचा यूप तासावा. कारण, पंक्ती छंद हा चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने पांच अक्षरांचा असतो. यज्ञही पांच हविर्द्रव्यांनी युक्त असतो. यास्तव, पांच अरत्नी लांबीचा यूप तासला म्हणजे यजमान उत्तर क्रतूला प्राप्त होतो. म्हणजे त्या यजमानाकडून उक्थ्य इत्यादि उत्तर क्रतूचे यजन घडते.

प्रतिष्ठेची इच्छा करणाऱ्या यजमानाचा यूप सहा अरत्नी लांब करावा. वसंत इत्यादि ऋतू सहा आहेत. यास्तव, ऋतूंच्याशी संख्यासाम्य असलेल्या अरत्नींच्या लांबीचा यूप तासला म्हणजे यजमान सहाही ऋतूंमध्ये प्रतिष्ठित होतो. पशूंची कामना करणाऱ्या यजमानाचा यूप सात अरत्नी लांबीचा करावा. शक्करी छंदाचे चरण सात असतात. पशू हे शक्करी छंदाशी संबद्ध आहेत. यास्तव, सात अरत्नी लांबीचा यूप केल्याने यजमान पशूंना जवळ करतो. म्हणजे पशूंचे संपादन करतो. तेजाची इच्छा करणाऱ्या यजमानाचा यूप नऊ अरत्नी लांबीचा असावा. म्हणजे तो त्रिवृत् नांवाच्या स्तोमाशी समानरूप होतो. त्रिवृत् स्तोम हा तेजोरूप आहे. अर्थात् त्रिवृत् स्तोमाशी समानरूप असा नऊ अरत्नी लांबीचा यूप केला म्हणजे यजमानही तेजस्वीच होतो. इंद्रियसामर्थ्य प्राप्त होण्याची इच्छा असलेल्या यजमानाचा यूप अकरा अरत्नी लांबीचा करावा. त्रिष्टुप् छंद हा चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने अकरा अक्षरी असतो. इंद्रियसामर्थ्य, अर्थात् इंद्रियांच्या ठिकाणी असलेली कार्यक्षमता त्रिष्टुप् छंदाशी संबध्द असते. यास्तव, अकरा अरत्नी लांबीचा यूप केला असता, यजमान स्वकार्यसमर्थ अशा इंद्रियसमुदायाने युक्त होतो. शत्रुपीडित अशा यजमानाचा यूप पंधरा अरत्नी लांबीचा असावा. कारण, 'पंचदश' स्तोम हा वज्ररूप आहे. अर्थात् वज्ररूप अशा पंचदश स्तोमाशी समानता असलेला यूप शत्रूंचा पराभव करण्याला समर्थ होतो. पुत्रपौत्रादि प्रजेच्या प्राप्तीची इच्छा असलेल्या यजमानाला सतरा अरत्नी लांबीचा यूप योग्य होय. सप्तदश स्तोम हा प्रजापतिरूप

आहे. यास्तव, सप्तदश स्तोमाशी समानरूप असलेला तो यूप प्रजाप्राप्तिरूपी फळ मिळवून देणाऱ्या प्रजापतीचा अनुग्रह प्राप्त करून देण्याला कारणभूत होतो. समाजामध्ये प्रतिष्ठा प्राप्त होण्याची इच्छा करणाऱ्या यजमानाचा यूप एकवीस अरत्नी लांब असावा. कारण, सर्व स्तोमांमध्ये एकविंश स्तोम हा जणू प्रतिष्ठारूप आहे. यास्तव, एकविंश स्तोमाशी स्वरूपसाम्य असलेला एकवीस अरत्नी लांबीचा यूप यजमानाला समाजामध्ये प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याला कारणभूत होतो.

यूप अष्टाश्री म्हणजे आठ धारांनी युक्त असा असावा. गायत्री छंद हा चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने आठअक्षरी असतो. प्रजापतीपासून तेजस्वी अशा अग्नीच्या बरोबरच गायत्री छंद उत्पन्न झाला असल्यामुळे तो तेजोरूप आहे. शिवाय, गायत्री छंद हा यज्ञाचे जणू मुख आहे. यास्तव 'अष्टाश्री' असा यूप आठ या संख्येच्या द्वारा तेज, गायत्री व यज्ञाचे मुख यांच्याशी समानरूप होतो. म्हणून वाकसाने तासून यूपाला आठ दिशांच्या ठिकाणी आठ धारा कराव्यात. (अनुवाक ३).

'पृथिव्यै त्वाऽन्तरिक्षाय त्वा दिवे त्वा' हा मंत्र म्हणून पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु या तीन लोकांच्या अभिमानिनी देवतांच्या प्रीत्यर्थ यूपाचे प्रोक्षण करावे. प्रोक्षण करावयाचे ते यूपाच्या मुळापासून वर अग्रापर्यंत करावे. कारण, स्वर्गलोक हा वर आहे. यूप पुरावयासाठी खळगा खणावा लागतो. अशा प्रकारे भूमीवर कुदळीने आघात करून खळगा खणणे, हे अध्वर्यूने केलेले थोडेसे क्रूर कर्मच होय. या क्रूर कर्मामुळे भूमीच्या ठिकाणी उत्पन्न झालेल्या क्षुब्धतेची शांती होण्यासाठी त्या खळग्यात प्रोक्षणीत उरलेले उदक ओतावे. त्या उदकात यव (सातू) मिश्र करून ते खळग्यात ओतावे. कारण, 'यव' हा बलरूप आहे. यजमानाच्या उंचीबरोबर यूपाची उंची असते. यामुळे यजमानाचे शरीर जेवढे आहे तेवढ्या सर्व शरीराच्या ठिकाणी यव बल निर्माण करून ठेवतो. 'पितृणां सदनमसि' हा मंत्राने त्या खळग्याच्या बुडाशी दर्भ पसरावेत. कारण, यूप पुरण्यासाठी खणलेला हा खळगा पितृदेवतांच्या आधिपत्याने युक्त असतो. यास्तव, त्या खळग्यात दर्भ पसरून त्यांवर यूप पुरला म्हणजे त्या खळग्याच्या ठिकाणी पितृदेवतात्व सिद्ध होते. खळग्यात दर्भ पसरून त्यांवर यूप पुरला म्हणजे पितृदेवतात्मक अशा पृथ्वीच्या भागात यूप पुरल्यासारखे होते.

यूपाचा वृक्ष तोडताना जे पहिले शकल निघालेले असते, ते यूप पुरण्यापूर्वी खळग्यात टाकावे. कारण शकलाच्या रूपाने त्या यूपाचे तेजच पतित झालेले असते. यास्तव, ते शकल खळग्यात टाकून यूप पुरला, म्हणजे पतित झालेल्या त्या शकलरूप तेजासह यूप पुरल्यासारखे होते. 'देवस्त्वा सविता मध्वाऽनकु' असे म्हणून यूपाच्या अग्रभागी व चषालाच्या अन्तर्भागाच्या ठिकाणी आज्याने अंजन करावे. म्हणजे आज्य माखावे. 'सुपिप्पलाभ्यस्त्वौषधीभ्यः' या मंत्राने तो चषाल यूपाच्या अग्राच्या ठिकाणी खोचून बसवावा. ज्या अर्थी यूपाच्या अग्रभागी जणू काय फळच निष्पन्न केल्यासारखा चषाल खोचून बसविला जातो, त्या अर्थी वृक्ष आपल्या मस्तकाप्रमाणे असलेल्या अग्रभागाचे ठिकाणी फळ धारण करीत असतात. यूपाच्या ठिकाणी तासून ज्या आठ धारा निर्माण केलेल्या असतात त्यांपैकी आहवनीयाच्या संमुख जी धार करावयाची असेल त्या धारेला खालपासून वरपर्यंत आज्याने अंजन करावे. म्हणजे ती धार तुपाने माखावी. कारण आज्य हे तेजोरूप आहे. अंहवनीयाच्या संमुख जी धार करावयाची असते, ती यजमानाच्या उंची इतकीच असते. यास्तव, त्या धारेला तुपाने माखले असता, यजमानालाच जणू काय तेजाने माखल्यासारखे होते. मुळापासून आंतापर्यंत ती धार तुपाने माखावी. म्हणजे पायापासून मस्तकापर्यंत यजमानाला तेजाने माखल्यासारखे होते.

न तासलेला, अर्थात् खळग्यात पुरला जाणारा जो यूपाचा मूलभाग असतो, त्या भागासह यूपाच्या अग्रभागापर्यंतच्या धारेला सर्व बाजूने हाताने तूप चोपडावे. असे केल्याने अध्वर्यूने जणू कोणताही अवयव न वगळता यजमानाच्या संपूर्ण शरीराच्या ठिकाणी तेज स्थापन केल्याप्रमाणे होते. 'उद्दिवं स्तभानाऽन्तरिक्षं पृण पृथिवीमुपरेण दृंह' हा मंत्र म्हणून भूमीवर ठेवलेला यूप उचलावा. म्हणजे तो यूप पृथिव्यादि तीनही लोकांचे धारण करण्यास समर्थ होतो. 'विष्णु' शब्दाने युक्त असलेली जी ऋचा ती वैष्णवी होय. 'ते ते धामान्युश्मसि' या वैष्णवी ऋचेने यूप खळग्यात ठेवावा. कारण देवतेच्या दृष्टीने यूप हा वैष्णव म्हणजे विष्णुदेवतात्मक आहे. यास्तव, आता सांगितलेल्या वैष्णवी ऋचेने तो खळग्यात ठेवला असता, स्वकीय अशा देवतेकडून जणू तो खळग्यात ठेवल्यासारखे होते. 'विष्णोः कर्माणि पश्यत' व 'तद्विष्णोः परमं पदम्' या दोन ऋचांनी तो यूप खळग्यात नीटनेटका बसवावा.

असे केल्याच्या योगाने द्विपाद असा यजमान प्रतिष्ठेला प्राप्त होतो. आपल्या यजमानाला तेज, देवता व इंद्रियसामर्थ्य यांच्यापासून मी वियुक्त करीन, असे ज्या यजमानाबद्दल अध्वर्यूला वाटत असेल त्याने यजमानाच्या यूपाची आहवनीयाच्या संमुख करावयाची धार बरोबर पश्चिम दिशेस आहवनीयाच्या संमुख न राहता जेणे करून त्याच्या आजूबाजूस अर्थात् दक्षिणेस किंवा उत्तरेस राहील, असे करावे. म्हणजे त्याचा यजमान तेज, देवता व इंद्रिय सामर्थ्य यांच्यापासून वियुक्त अर्थात् दूर हाईल.

आपल्या ज्या यजमानाला तेज, देवता व इंद्रियसामर्थ्य यांच्या योगाने मी समृद्ध करीत असे अध्वर्यूला वाटत असेल तर त्या यजमानाच्या यूपाची 'अग्निष्ठ' म्हणजे आहवनीयाच्या संमुख ठेवावयाची धार नेमकी पश्चिमाभिमुख म्हणजे आहवनीयाच्या अगदी समोर राहील अशा प्रकारे यूप खळग्यात ठेवावा. म्हणजे त्याचा यजमान तेज, देवता व इंद्रियसामर्थ्य यांच्या योगाने समृध्द होतो. 'ब्रह्मवनिं त्वा क्षत्रवनिम्' हा मंत्र म्हणून यूपाच्या भोवती त्या खळग्यात बारीक माती घालावी. त्याचप्रमाणे 'ब्रह्म दृंह क्षत्रं दृंह' या मंत्राने यूपाभोवती घातलेली माती मैत्रावरुणाच्या दंडाने ठोकून यूप न हलेल अशी पक्की बसवावी. 'परिवीरसि परि त्वा' या मंत्राने दर्भांची दोरी त्या यूपाला तीन वेढे देऊन गुंडाळावी. रशना म्हणजे दर्भांची दोरी बलस्वरूप आहे. यूप हा यजमानाच्या उंचीइतकाच उंच असतो. बलस्वरूप अशी दोरी यूपाभोवती गुंडाळल्याच्या योगाने तो यूप यजमानाला बलसमृध्द करतो. यूपाला दोरी गुंडाळावयाची, ती नाभीइतक्या उंचीवर गुंडाळावी. म्हणजे ती यजमानाच्या नाभीइतक्या उंचीवर असलेल्या उदराच्या ठिकाणी अन्नपचनाचे बल स्थापन करते. आणि म्हणूनच सर्व लोक नाभीइतक्या उंचीवर असलेल्या उदराच्या ठिकाणी अन्नपचनाचे बल स्थापन करते. आणि म्हणूनच सर्व लोक नाभीइतक्या उंचीवर असलेल्या उदराच्या ठिकाणी असलेल्या बळाने भक्षण केलेले अन्न पचवितात. ज्या यजमानाला मी बलापासून वियुक्त करीन, असे अध्वर्यूला वाटत असेल, त्याने त्या यजमानाच्या यूपाला नाभीइतक्या उंचीवर दोरी न गुंडाळता वर किंवा खाली गुंडाळावी. म्हणजे तो अध्वर्यू आपल्या यजमानाला बलापासून वियुक्त करतो.

पर्जन्याने भूमीवर वर्षाव करावा, अशी जर अध्वर्यू इच्छा करीत असेल, तर त्याने यूपाच्या ठिकाणी नाभीइतक्या उंचीच्या खाली यूपाला गुंडाळलेली

दोरी आणखी खाली सरकवावी. म्हणजे त्याने जणू काय पर्जन्यवृष्टीलाच खाली म्हणजे जमिनीवर आणल्यासारखे होते. पर्जन्य पडू नये अशी जर अध्वर्यू इच्छा करीत असेल, तर त्याने नाभीइतक्या उंचीच्या वर यूपाला गुंडाळलेली दोरी अधिकच वरती सरकवावी. असे केले असता अध्वर्यूने जणू काय पर्जन्यवृष्टीला वरच्यावरच आकाशात थोपवून धरल्यासारखे होते. अर्थात् पर्जन्य पडत नाही.

न तासलेला, अर्थात् खळग्यात पुरला जाणारा यूपाचा मुळाकडील भाग पितरांना प्रिय असतो. पुरल्या जाणाऱ्या या भागापासून दोरी गुंडाळलेल्या भागापर्यंतचा यूपाचा भाग मनुष्यांना प्रिय असतो. दोरी जेथे गुंडाळलेली असते तो भाग ओषधींना प्रिय असून, दोरी गुंडाळलेल्या भागापासून चषालापर्यंतचा भाग विश्वेदेवांना प्रिय असतो. चषाल बसविलेला भाग इंद्राला प्रिय असून चषालाच्या बाहेर असलेला यूपाचा अग्रभाग साध्यनामक देवांना प्रिय असतो. सारांश, खळग्यात पुरून उभा केला जाणारा यूप हा सर्वदेवतात्मक आहे. यास्तव यूप पुरला असता तो सर्व देवतांना प्रसन्न करतो.

पूर्वी देवांनी यज्ञ केला. नंतर त्या यज्ञाच्या योगाने देव स्वर्गलोकी जेव्हा जाऊ लागले, तेव्हा त्यांना असे वाटले की, आमच्या प्रमाणेच यज्ञाचे अनुष्ठान करून मनुष्ये देखील आमच्या मागोमाग स्वर्गलोकी येतील आणि आमच्याप्रमाणेच स्वर्गलोकाचे रहिवासी होतील. यास्तव, यज्ञाचे स्वरूपच मनुष्यांना नीट समजू नये, अर्थात् मनुष्यांना यज्ञाचे यथार्थ अनुष्ठानच करता येऊ नये, म्हणून देवांनी यूपाच्या योगाने मनुष्यांना मोह उत्पन्न होईल अशी तजवीज करून देव स्वर्गलोकी निघून गेले. यूप हा सर्वदेवतात्मक आहे हे मनुष्यांच्या लक्षात न येता, तो केवळ काष्ठरूप आहे, असे त्यांना वाटावे, हीच मनुष्यांना मोह उत्पन्न करण्याची देवांनी केलेली तजवीज होय. परंतु, देवांच्या या तजविजीला यश आले नाही. ऋषी हे अतींद्रियद्रष्टे असल्यामुळे देवांनी एखाद्या सामान्य काष्ठाप्रमाणे ठेवून दिलेल्या यूपाचे आपल्या अतींद्रिय दृष्टीने निरीक्षण करून, तो सर्वदेवतात्मक आहे, हे त्यांनी जाणले. व त्या यूपाच्या साहाय्याने यज्ञाचे अनुष्ठान करून देवांच्या मागोमाग ऋषींनीही स्वर्गलोकाचे स्वरूप जाणले. अर्थात् त्यांनी स्वर्गलोकाची प्राप्ती करून घेतली. 'युप्' हा धातू मोह म्हणजे भ्रम उत्पन्न करणे या अर्थाचा व्यंजक आहे. मनुष्यांना मोह उत्पन्न करणे हेच यूपाचे यूपत्व म्हणजे स्वभावगुण होय. यासाठी यज्ञामध्ये

जर सर्वदेवतात्मक असा यूप पुरला तर तो यज्ञकर्त्या यजमानाला स्वर्गलोकाचे स्वरूपज्ञान करून देण्याला कारणभूत होतो.

आहवनीयाच्या पूर्व दिशेस यूप उभा करावा. यज्ञासंबंधी जे कर्तव्य करावयाचे असते, त्याचे ज्ञान यज्ञानुष्ठानाचा प्रारंभ होण्यापूर्वीच झालेले असते. अनुष्ठानाच्या प्रारंभापूर्वी एखाद्या कर्माचे ज्ञान झालेले नसले म्हणजे ते कर्म करावयाचे अजीबातच राहून जाते किंवा त्या कर्मात काही तरी चूक होते. आणि मागाहून, अमुक एक कर्म करावयाचे होते ते राहून गेले, असे अनुष्ठानकर्ते बोलू लागतात. एवं चे, आहवनीयाच्या पूर्व दिशेस यूप पुरला असता, प्रशस्त अशा दिशेच्या ठिकाणी तो पुरल्यासारखा होऊन तो भावी अनुष्ठानाचे ज्ञान करून देण्यालाही कारणभूत होतो.

साध्यनामक देवांनी पूर्वक्लृप्त अशा यज्ञभागाहून काहीतरी अधिक भाग आपणास मिळावा, अशी इच्छा केली. पण तशा प्रकारच्या अधिक यज्ञभागाला ते स्पर्श करू शकले नाहीत. म्हणजे यज्ञाचा अधिक भाग त्यांच्या हाती आला नाही. तथापि, यज्ञाच्या खेरीज असा काही कर्मभाग त्यांचे हाती आला. अरणींचे मंथन करून उत्पन्न झालेला अग्नी आहवनीयाग्नीत टाकणे, हा तो यज्ञाखेरीजचा कर्मभाग होय. चषालाच्यावर असलेला यूपाचा अग्रभाग यजमानाच्या उंचीपेक्षा अधिक असल्यामुळे तो यूपाखेरीजचा अधिक भाग होय. सारांश, अरणींचे मंथन करून उत्पन्न झालेला अग्नी आहवनीयाग्नीत टाकल्याच्या योगाने व चषालाच्या वर यूपाचा अग्रभाग ठेवल्याने साध्य देवांनी संपादन केलेल्या यज्ञातिरिक्त अशा कर्मभागाचे अनुष्ठान केल्यासारखे होते व तो अनुष्ठित केलेला कर्मभाग साध्य देवांना संतुष्ट करतो.

पूर्वी देवांनी यज्ञ केला. त्या यज्ञाची समाप्ती झाल्यावर स्रुच्या व यूप अग्नीमध्ये टाकून द्यावीत असा त्यांनी विचार केला. परंतु, असे केल्यास यज्ञाचाच नाश केल्यासारखे होईल, तर तसे होऊ नये, म्हणून देवांनी आपल्या विचारदृष्टीने प्रस्तराच्या मूल्याने स्रुच्या व स्वरूच्या मूल्याने यूप विकत घ्यावा असे ठरविले व त्याप्रमाणे त्यांनी प्रस्तराचे व स्वरूचे मूल्य देऊन म्हणजे त्या दोनही वस्तू अग्नीमध्ये प्रहरण करून स्रुच्या व यूप ही दोनही विकत घेतली, म्हणजे राखून ठेवली. यास्तव, यज्ञाची समाप्ती झाल्यावर प्रस्तर आहवनीयाग्नीत टाकावा व स्वरूचीही त्या अग्नीत आहुती

द्यावी. अशा प्रकारे प्रस्तराचा व स्वरूचा केलेला विनियोग यजमानाच्या यज्ञाचा नाश न होऊ देण्याला कारणभूत होतो. (अनुवाक ४).

मनुष्य, पशू इत्यादि प्राणी उत्पन्न होण्यापूर्वी या भूलोकाच्या ठिकाणी केवळ साध्य नांवाचे देव उत्पन्न झालेले होते. त्यांच्या खेरीज काहीही उत्पन्न झालेले नव्हते. त्या साध्य देवांनी आपल्याला प्रजा प्राप्त होण्याच्या उद्देशाने यज्ञ करण्याकरता अग्निदेवतेप्रीत्यर्थ, अग्नीचेच आलभन केले. कारण अग्निदेवतेला अर्पण करण्याकरता कोणताही पशू त्यांना उपलब्धच नव्हता. म्हणून मंथनोत्पादित अग्नी हाच पशू समजून अग्निदेवतेप्रीत्यर्थ त्या अग्नीचेच त्यांनी उपाकरणादि संस्कार केले. अग्न्यालंभनरूप अशा त्या यज्ञापासूनच त्या साध्य देवांनी आज दिसत असलेल्या या प्रजा निर्माण केल्या. यास्तव, अरणींचे मंथन करून, त्या मंथनापासून उत्पन्न झालेला अग्नी जर पशुभावाने पूर्वसिद्ध अशा आहवनीयात टाकला तर तो यजमानापासून प्रजांची उत्पत्ती होण्याला कारणभूत होतो.

अग्नी हा जणू अत्यंत क्रूर असा रुद्रच असून यजमान हा पशुरूप आहे. म्हणून यज्ञिय पशूचे आलभन केल्यानंतर जर अग्निमंथन केले, तर हविर्द्रव्यभूत अशा यजमानालाच रुद्रदेवाला अर्पण केल्यासारखे होईल. व त्यामुळे यजमान मृत होईल. तथापि, कोणी असेही म्हणतात की, अग्नी हा सर्वदेवतात्मक असून यज्ञिय पशू हा हविर्द्रव्यरूप आहे. यासाठी पशूचे आलभन केल्यावर जर अग्निमंथन केले तर नियुक्त अशा पशुरूपी हविर्द्रव्याच्या सन्निध सर्वदेवतात्मक अग्नीला उत्पन्न केल्यासारखे होते, म्हणजे पशुरूपी हविर्द्रव्याजवळ अग्नीला आणून ठेवल्यासारखे होते.

परंतु, सिद्धान्त असा की, यज्ञिय पशूचे उपाकरण होताच अग्निमंथन करावे. कारण, उपाकरण केले म्हणजे आलभनाचा उपक्रम केल्यासारखे होते. व आलभन न केल्याने पूर्वोक्त यजमानालाच रुद्रदेवतेला अर्पण केल्याचाही दोष घडत नाही. एवं च, केवळ उपाकरण संस्कार केल्याने पशूचे आलभन केल्यासारखे आणि न केल्यासारखे होते.

अधिमंथन शकल भूमीवर ठेवताना 'अग्नेर्जनित्रमसि' हा मंत्र म्हणावा. कारण अधिमंथन शकल हे अग्नीचे जननस्थान आहे. अधिमंथन शकलावर दोन दर्भ ठेवताना 'वृषणौ स्थः' हा मंत्र म्हणावा. कारण अधिमंथन शकलावर

ठेवले जाणारे दोन दर्भ हे जणू दोन अंडच आहेत. दोन अरणी उचलून घेताना 'उर्वश्यसि' व 'पुरूरवा:' हे दोन मंत्र म्हणावेत. हे दोन मंत्र त्या दोन्ही अरणींच्या ठिकाणी दांपत्यभाव निर्माण करण्याला कारणभूत होतात. दोन्ही अरणींना अभिमंत्रण करताना 'वैष्णौ स्थ:' हा मंत्र म्हणावा. कारण, खालची व वरची अशा या दोन्ही अरणी उत्पन्न होणाऱ्या अग्नीसंबंधी सिंचित झालेले वीर्य आपल्या ठिकाणी धारण करीत असतात.

अरणींचे मंथन करताना 'गायत्रं छंदोऽनु प्र जायस्व' इत्यादि तीन मंत्र म्हणावेत. असे केले असता गायत्र्यादि छंदांच्या कडूनच अध्वर्यूने अग्नीचे जनन केल्यासारखे होते. मंथनाला आरंभ करण्यापूर्वी 'अग्नये मथ्यमानायानुब्रूहि' असा होत्याला प्रैष द्यावा. होत्याने 'अभि त्वा देव सवित:' या सवितृदेवतात्मक ऋचेचे पठण करावे. म्हणजे सविता देवाच्या प्रेरणेनेच अग्नीचे मंथन केल्याप्रमाणे होते.

अग्नी उत्पन्न झाला म्हणजे 'जातायाऽनुब्रूहि' व मंथनोत्पन्न अग्नी आहवनीयात टाकतेवेळी 'प्रहियमाणायानुब्रूहि' असा होत्याला प्रैष द्यावा. असे केल्याच्या योगाने मंथन, जनन व आहवनीयात प्रहरण म्हणजे टाकणे यांपैकी प्रत्येक कांडाच्या म्हणजे कर्मविभागाच्या ठिकाणी मंत्रांच्या योगाने अध्वर्यूने अग्नीला समृद्ध केल्यासारखे होते. होत्याने मंथनाच्या वेळी अग्निजनन झाल्यावर व मंथनोत्पन्न अग्नी आहवनीयात टाकताना ज्या ज्या ऋचा म्हणावयाच्या त्या सर्व गायत्री छंदातील म्हणाव्यात. कारण गायत्री छंदाबरोबरच अग्नी उत्पन्न झालेला असल्यामुळे तो गायत्रछंदसंब्ध्द आहे. यास्तव, होत्याने गायत्री छंदातील ऋचा पठण केल्याच्या योगाने स्वकीय अशा छंदाकडून अग्नीला समृद्ध केल्यासारखे होते. आहवनीय अग्नी पूर्वीच सिद्ध झालेला असतो व त्या अग्नीच्या ठिकाणी अरणींचे मंथन करून उत्पन्न केलेला अग्नी टाकण्यात येतो. पूर्वसिध्द असा आहवनीय अग्नी व त्यात टाकला जाणारा मंथनोत्पादित अग्नी हे दोघेही एकमेकांशी युक्त होऊन यजमानाला खाण्यासाठी त्याच्यावर धाड घालतात. यास्तव, त्या दोन्ही अग्नींच्या ठिकाणी शांतता उत्पन्न व्हावी व त्यांनी यजमानाला भक्षण करू नये म्हणून अध्वर्यूने 'भवतं न: समनसौ' व 'अग्नावग्निश्चरति' हे दोन मंत्र पठण करून त्या दोन्ही अग्नींची प्रार्थना करावी. आहवनीयात मंथनोत्पन्न अग्नी टाकताना 'भवतं न: समनसौ' हा मंत्र म्हणावा आणि

तो अग्नी आहवनीयात टाकल्यानंतर त्या अग्नीच्या ठिकाणी 'अग्नावग्निश्चरति' या मंत्राने एक आहुती द्यावी. असे केले असता, मंथनाच्या योगाने जन्मलेल्या अग्नीला, तो जन्मल्याबरोबरच अन्न खाव्यास दिल्यासारखे होते. आहुती द्यावयाची ती आज्याने द्यावी. कारण आज्य हे अग्नीचे अत्यंत प्रिय असे स्थान आहे. यास्तव, आज्याने आहुती दिली असता, अग्नीला प्रिय अशा स्थानाने आणि तेजाने समृद्ध केल्यासारखे होते. (अनुवाक ५).

पशूचे उपाकरण करण्याकरता 'इषे त्वा' या मंत्राने दर्भ हाती घ्यावा. कारण, जो यजमान यज्ञ करीत असतो, तो देवाना पशुरूपी हविर्द्रव्य देण्याची इच्छा करीतच असतो. प्लक्षशाखा हाती घेताना 'उपवीरसि' हा मंत्र म्हणावा. असे केले असता त्या शाखेने यज्ञिय पशूचे हृदयादि अवयव अध्वर्यूने जणू देवांच्या सन्निध केल्यासारखे होते.

पशूचे उपाकरण करताना 'उपो देवान् दैवीर्विशः प्रागु:' हा मंत्र म्हणावा. या मंत्रामध्ये आताच प्रदर्शित केलेला अंश प्रथम पठण केला जात असतो. त्याच्या पठणाच्या योगाने देवसंबंधी असलेल्या या प्रजा देवांच्या जवळ प्राप्त होतात. 'वन्हीरुशिज:' हा पूर्वोक्त मंत्राचा दुसरा अंश होय. ऋत्विज हेच हविर्द्रव्ये देवांच्या जवळ वाहून नेणारे होत. म्हणूनच हा दुसरा अंश अध्वर्यूने पठण करावा. 'बृहस्पते धारया वसूनि' हा पूर्वोक्त मंत्राचा तिसरा अंश अध्वर्यू पठण करीत असतो. कारण, बृहस्पती हा देवांचा ब्राह्मण आहे. यास्तव, हा अंश पठण केला असता देवांचा ब्राह्मण असलेल्या बृहस्पतीकडून यजमानाला पशूंची प्राप्ती करून दिल्यासारखे होते.

'हव्या ते स्वदन्ताम्' हा त्यापुढचा अंश पठण करावा. त्या योगाने अध्वर्यूने पशूच्या हृदयादिअंगरूपी हविर्द्रव्यांना बृहस्पतीने स्वादिष्ठ करावे म्हणून त्याची प्रार्थना केल्यासारखी होते व तो बृहस्पती हृदयादिअंगरूपी हविर्द्रव्यांना स्वादिष्ठ करतो. 'देव त्वष्टर्वसु रण्व' हा पूर्वोक्त मंत्राचा पुढचा अंश पठण करावा. कारण, त्वष्टा देव हा स्त्रीपुरूषरूप पशूंची स्वरूपे निर्माण करीत असतो. यास्तव, हा अंश पठण करून त्वष्ट्याची प्रार्थना केली असता तो त्वष्टा देव पशूंच्या ठिकाणी स्त्रीपुरुषात्मक स्वरूप स्थापन करतो. 'रेवती रमध्वम्' हा पूर्वोक्त मंत्राचा शेवटचा अंश पठण करावा. कारण, पशू हेच दुग्धादि धनांचे धारण करणारे असतात. यास्तव, हा अंश पठण केला

असता अध्वर्यूने जणू काय आपल्या यजमानाकरता दुग्धादिधनसंपन्न अशा पशूंना रमविल्यासारखे होते.

पशूला बांधावयाची दोरी 'देवस्य त्वा सवितुः प्रसवे' ह्या मंत्राने हाती घ्यावी. हा मंत्र पशूला दोरीने बांधण्यविषयी सविता देवाची प्रेरणा प्राप्त करून देण्याला कारणभूत होतो. 'अश्विनोर्बाहुभ्याम्' हा पूर्वोक्त मंत्रापैकी दुसरा अंश पठण करावा. कारण दोघे अश्विनीकुमार हे देवांचे अध्वर्यू होत. अर्थात् या अंशाच्या पठणाने अश्विनीकुमारांच्या बाहूंनी पशूला दोरीने बांधल्यासारखे होते. 'पूष्णो हस्ताभ्याम्' हा त्यापुढचा अंश पठण करावा. म्हणजे पूषा देवाच्या दोनही हातांनी पशूला दोरीने बांधण्याचा यत्न केल्यासारखे होण्याला हा मंत्राश कारणभूत होतो.

पशूला दोरीने बंधन करताना, 'ऋतस्य त्वा देवहविः पाशेनाऽरभे' हा मंत्र म्हणावा. वाचिक सत्याला 'ऋत' असे नांव असून मानसिक सत्याला 'सत्य' असे नांव आहे. यज्ञ हा सत्यरूप असून तोच ऋतरूपही आहे. यास्तव पशूला दोरीने बंधन करताना आता सांगितलेला मंत्र पठण केला असता सत्यरूप व ऋतरूप अशा यज्ञाच्या निमित्तानेच पशूला दोरीने बंधन केल्यासारखे होते. पशूच्या उजवीकडील पायापासून शिरोभागापर्यंतच्या भागाच्या ठिकाणी दोरीच्या तिरप्या वेढ्याने पशूला पाश घालून बद्ध करावा. मांसभक्षक असा जो माणूस असतो तो, ज्या पशूला मारावयाचे असेल त्याला आपल्याकडे मुख करून उभा करतो आणि मग त्याच्या गळ्याला दोरीचा सरळ फासा घालतो. पशूला फास घालण्याच्या या पध्दतीत बदल करण्यासाठीच 'धर्षा मानुषान्' हा मंत्र म्हणून त्या पशूला, तो पळून न जाता एका जागी स्थिर रहावा याकरता, यूपाला दोरीने घट्ट बांधावा. 'अद्भ्यस्त्वौषधीभ्यः प्रोक्षामि' हा मंत्र म्हणून त्या पशूला दर्भासह उदकाने प्रोक्षण करावे. कारण, हा यज्ञिय पशू उदक व दर्भरूप ओषधी यांच्यापासूनच उत्पन्न होत असतो. 'अपां पेरुरसि' या मंत्राने त्या पशूला पाणी पाजावे. यज्ञाकरता जो पशू मारावयाचा असतो त्याला यापुढे पाणी पिण्याची संधीच द्यावयाची नसल्यामुळे याच वेळी तो शेवटचे उदकपान करीत असतो. 'स्वात्तं चित् सदेवं हव्यमापो देवीः स्वदतैनम्' हा मंत्र म्हणून खालच्या व वरच्या बाजूने त्या पशूच्या शरीराचे सर्व बाजूंनी उदकाने प्रोक्षण करावे. अशा प्रकारे प्रोक्षण करून

अध्वर्यू जणू काय त्या पशूला स्वादिष्ठ व रुचकरच करतो.

शरीराच्या वरच्या भागाच्या ठिकाणी प्रोक्षण करून अध्वर्यू जणू काय शरीराच्या वरच्या बाजूने त्या पशूला यज्ञयोग्य करतो. पाणी पाजून अध्वर्यू त्या पशूला त्याच्या शरीराच्या अन्तर्भागाकडून यज्ञयोग्य करतो. आणि शरीराच्या खालच्या बाजूने प्रोक्षण करून अध्वर्यू त्या पशूला सर्व बाजूंनी यज्ञयोग्य असा करतो. (अनुवाक ६).

देवांनी आपल्या यज्ञातील होता असलेल्या अग्रीकडून असुरांना पराभूत केले. यास्तव, अध्वर्यूने 'अग्नये समिध्यमानायाऽनुब्रूहि' असा होत्याला प्रैष द्यावा. कारण होत्याने अग्रीला प्रज्वलित करण्याविषयीच्या सामिधेनी ऋचा पठण केल्याने प्रज्वलित होणारा अग्री यजमानाच्या शत्रूंना पराभूत करण्याला कारणभूत होतो. म्हणजे तो अग्री यजमानाच्या शत्रूला पराभूत करतो. होत्याने सामिधेनीसंज्ञक सतरा ऋचा पठण कराव्यात. कारण प्रजापती हा सप्तदशाक्षरात्मक आहे. यास्तव, होत्याने पठण केलेल्या सतरा सामिधेनी ऋचा. म्हणावयाचे कारण असे की, बारा महिने व हेमंत व शिशिर हे दोन ऋतू मिळून एकच ऋतू मानल्यास पांच ऋतू अशा या एकूण सतरा विभागांनी संवत्सर पूर्ण होत असतो. प्रजा देखील संवत्सरपर्यंत गर्भात राहून नंतर जन्मास येतात. यास्तव, यजमानापासून प्रजांचे जनन होण्यासाठी होत्याने सतराच सामिधेनी पठण करणे योग्य आहे.

देवांच्या यज्ञामध्ये सामिधेनींचे पठण झाल्यानंतर सामिधेनींच्या पठणात त्यांची बुद्धी अत्यंत श्रमल्यामुळे त्यांना पुढे यज्ञ दिसेनासा झाला. म्हणजे आता यज्ञानुष्ठान काय करावयाचे, हे देवांना सुचेनासे झाले. तेव्हा प्रजापतीने मंत्र न म्हणता आघारसंज्ञक आहुती दिली. तेव्हा देवांना पुढचे अनुष्ठान दिसू लागले. यास्तव, पुढे कोणते अनुष्ठान करावयाचे आहे, हे सुचावे म्हणून सामिधेनींचे पठण झाल्यानंतर मंत्र न म्हणता आहवनीयावर आघारसंज्ञक आहुती द्यावी..

असुर गुप्तपणाने देवांच्या यज्ञात येत व देवांनी यज्ञाचे अनुष्ठान कसे केले ते समजून घेऊन त्याप्रमाणे आपल्या यज्ञात अनुष्ठान करीत. अशा रीतीने असुरांच्या ठिकाणी यज्ञ प्रविष्ट झाला होता. आपले अनुष्ठान पाहून असुर यज्ञानुष्ठान करतात, हे देवांना समजून आले. तेव्हा देवांनी यज्ञाचे

अनुष्ठान चालू असता, त्या ठिकाणी गुप्तपणे असुरही आलेले आहेत, हे पाहून त्यांना समजेल अशा प्रकारे मंत्र न म्हणता पहिली आघारसंज्ञक आहुती दिली. त्यावेळी गुप्तरूपाने जवळ असलेल्या असुरांना असे वाटले की, यज्ञाचे सर्वच अनुष्ठान मंत्र न म्हणता करावयाचे असते. नंतर ते असुर तेथून सत्वर निघून गेले व आपल्या समजुतीप्रमाणे सर्व यज्ञाचे अनुष्ठान मंत्र न म्हणता केले आणि आपल्या यज्ञाचा आपल्याच हातांनी त्यांनी नाश करून घेतला.

स्फ्य व बर्ही यांना बांधलेल्या शुल्बाच्या दर्भांनी आहवनीयाभोवती घातलेल्या तीन परिधींना आग्नीध्राने संमार्ग करावा. म्हणजे त्यांच्या ठिकाणी पडलेले भस्म वगैरे निघून जाऊन ते शुद्ध होतात. प्रत्येक परिधीला तीन तीन वेळ संमार्ग करावा. कारण यज्ञ हा त्र्यावृत् म्हणजे सामिधेनीतील पहिल्या व शेवटच्या ऋचेच्या तीन आवृत्तींनी सिद्ध होत असतो. अशा प्रकारचा यज्ञ राक्षसांना भीती उत्पन्न करण्याला कारणभूत होत असतो. प्रत्येक परिधीचे तीन तीन वेळ याप्रमाणे तीन परिधींचे मिळून नऊ संमार्ग होतात. यानंतर आहवनीयाग्नीचे ठिकाणी केला जाणारा तीन वेळचा संमार्ग परिधींच्या नऊ संमार्गांमध्ये मिळविला म्हणजे एकंदर संमार्गांची संख्या बारा होते. संवत्सराचे महिने बारा असतात. संवत्सराच्या महिन्यांच्याशी संख्यासाम्य असलेल्या संमार्गांच्या योगाने आग्नीध्र जणू संवत्सरालाच संतुष्ट करतो. इतकेच नव्हे तर आपल्या यजमानाला स्वर्गलोक प्राप्त व्हावा म्हणून त्याला तो संवत्सरदेवतांच्या सन्निध नेऊन पोचवितो.

आघार हा यज्ञाचा शिरोभागच असून अग्नी हा सर्वदेवतारूप आहे. यास्तव, अध्वर्यू जो आघारहोम करतो. त्या योगाने यज्ञकर्ता यजमान यज्ञाच्या शिरोभागापासून म्हणजे प्रारंभापासूनच सर्व देवता स्वाधीन करून घेतो.

आघार हा यज्ञाचे शिर असून पशू हा त्याच्या मानेखाली असणारे शरीर आहे. यास्तव आघारहोम केल्यावर पशूच्या शरीराच्या ठिकाणी जुहूतील आज्याचे अंजन करावे म्हणजे त्याच्या शरीराच्या निरनिराळ्या भागांना जुहूने तूप लावावे. पशूच्या मस्तकाला 'सं ते प्राणो वायुना गच्छताम्' या मंत्राने तूप लावावे. कारण त्याच्या मस्तकाच्या ठिकाणी असणारा प्राण वायुदेवतात्मक आहे. यास्तव, आता सांगितलेल्या मंत्राने पशूच्या मस्तकाला तूप लावले

असता अध्वर्यूने वायूच्याच ठिकाणी त्या पशूच्या प्राणाचे हवन केल्यासारखे होते.

'सं यजत्रैरंगानि' या मंत्राने पशूच्या दोन्ही खांद्यावरील उंचवट्यांना व 'सं यज्ञपतिराशिषा' या मंत्राने त्याच्या कमरेच्या उजव्या बाजूला तूप लावावे. असे केले असता अध्वर्यूने यज्ञदेवतेकडून मिळणारा आशीर्वाद यज्ञाधिपती अशा आपल्या यजमानालाच पोचविल्यासारखे होते.

त्वष्ट्याचा विश्वरूप नांवाचा पुत्र पशूच्या जवळ आला व त्याच्या पाठीवर ओकला. म्हणून यज्ञानुष्ठान करणारे याज्ञिक यज्ञिय पशूच्या पाठीकडील भागातून अवदान घेत नाहीत. यास्तव, अध्वर्यू जर यज्ञिय पशूच्या पृष्ठभागाचे ठिकाणी आज्याने अंजन करील तर त्याने विश्वरूपाच्या ओकण्याने पृष्ठभागाच्या ठिकाणी अशुद्ध असलेल्या त्या पशूला शुद्ध अर्थात् यज्ञयोग्य केल्यासारखे होईल.

नंतर अध्वर्यू ऋत्विजांचे वरण करतो. तसे केल्याने त्याने जणू काय छंदांचेच वरण केल्यासारखे होते. अध्वर्यूने होता, आग्नीध्र, अध्वर्यू, मैत्रावरुण, ब्राह्मणाच्छंसी, पोता व नेष्टा अशा सात ऋत्विजांचे वरण करावे. ग्राम्य पशू सात जातीचे असतात. त्याचप्रमाणे अरण्यात संचार करणारे पशूही सात जातीचे असतात. गायत्री इत्यादि मुख्य छंदही सातच आहेत. यास्तव, छंदोरूप अशा सात ऋत्विजांचे वरण केले असता, ते यजमानाला ग्राम्य व आरण्य अशा दोनही प्रकारच्या पशूंची प्राप्ती करून देण्याला कारणभूत होते.

अकरा प्रयाजांचे यजन करावे. मस्तकाच्या ठिकाणी सात, अधोभागी दोन व नाभीच्या ठिकाणी एक मिळून पशूच्या ठिकाणी दहा प्राण असून त्याचा देह हा अकरावा होय. यास्तव, अकरा प्रयाजांचे यजन केले असता जेवढा म्हणून पशू आहे, तेवढ्या सर्व पशूचे अध्वर्यूने य केल्यासारखे होते.

मात्र शेवटच्या अकराव्या प्रयाजाचे यजन करावयाचे ते वपाहोमाच्या सान्निध्याने करावे. कारण शेवटचा प्रयाज हा पशूच्या आत्म्याप्रमाणेच आहे. वपा ही देखील पशूचा एक मुख्य अवयव असल्यामुळे पशूच्या आत्म्यासारखीच आहे. अर्थात् वपाहोमाच्या सान्निध्याने शेवटच्या प्रयाजाचे यजन केले असता

आत्म्याच्या ठिकाणी आत्म्याचे सान्निध्य केल्यासारखे होते.

स्वधिती म्हणजे पशूच्या शरीराची चीरफाड करणारी सुरी. ही वज्ररूप असून 'स्वरू नांवाचे यूपशकलही वज्ररूपच आहे. देवांनी घृताचे वज्र करून त्या वज्राने सोमाला मारले. यास्तव, जुहूतील आज्याने स्वधितीला व स्वरूला अंजन करावे व स्वरूच्या खाली टेकण लावलेल्या त्या स्वधितीने 'घृतेनाक्तौ पशुं त्रायेथाम्' हा मंत्र म्हणून पशूच्या मस्तकाला तुपाचे अंजन करावे. असे केले असता घृतरूपी व्रजाने पशूला प्रथम वश करून नंतर त्याला मारल्यासारखे होते. (अनुवाक ७).

आहवनीयातून एक प्रज्वलित असे कोलीत हाती घेऊन आग्रीध्राने 'परि वाजपति: कवि:' हा मंत्र म्हणत असताना पशू, यूप, आहवनीय व शामित्रशाला यांच्या भोवती पर्यग्निकरण करावे, म्हणजे प्रदक्षिणा घालाव्यात. असे केले असता पशूला सर्वहुत केल्यासारखे होते, म्हणजे त्या पशूच्या अंगरूपी हविर्द्रव्यांपैकी कोणताही भाग आहवनीयाग्नीच्या बाहेर पडू न देता सर्व अंगांच्या सह पशूचे आहवनीयाग्नीत हवन केल्यासारखे होते. आणि मग पश्वंगांचे हवन केल्यावर जरी त्यातील काही भाग आहवनीयाबाहेर पडला तरी त्याचा दोष न लागण्याला ते पशूचे सर्वहुतत्व कारणभूत होते. सारांश, पश्वंगांच्या होमानंतर त्यांतला काही भाग जरी अग्नीबाहेर पडला तरी तो न पडल्यासारखाच होतो. प्रदक्षिणा तीन घालाव्यात. कारण यज्ञ हा सामिधेनी ऋचेतील पहिल्या व शेवटच्या ऋचेच्या तीन आवृत्तींनी युक्त असतो. शिवाय तीन प्रदक्षिणा घालून केलेले 'पर्यग्निकरण' राक्षसांचा नाश करण्याला कारणभूत होते.

ब्रह्मवादी असे म्हणतात की, पशूला मारण्यासाठी शामित्रशाळेकडे नेत असताना त्याला यजमानाने स्पर्श करावा किंवा करू नये? कारण यज्ञिय पशू हा मृत्यूच्या स्वाधीन करण्यासाठीच शामित्रशाळेकडे नेला जात असतो. त्या अर्थी त्या वेळी त्याला जर यजमान स्पर्श करील तर तो मृत्यू पावेल. शिवाय, कोणी असेही बोलतात की, स्वर्गलोकी नेऊन पोचविण्यासाठीच हा यज्ञपशू शामित्राकडे नेण्यात येत असतो. म्हणून त्याला शामित्रशाळेकडे नेत असताना यजमानाने जर स्पर्श केला नाही तर तो स्वर्गलोकापासून च्युत होईल. यास्तव हे दोनही दोष घडू नयेत म्हणून यजमानाने दोनही वपाश्रपणींनी,

त्या पशूला अन्वारब्ध म्हणजे स्पर्श करावा. वपाश्रपणींच्या द्वारा अप्रत्यक्षरीतीने पशूला केलेला हा अन्वारब्ध, केल्या न केल्यासारखाच होतो.

पशूला शामित्रशाळेकडे नेण्याचे वेळी, 'उप प्रेष्य होतर्हव्या देवेभ्यः' असा होत्याला प्रैष द्यावा. कारण मोठ्या माणसाने सुचविलेले कर्म कोणीही सत्वर करीत असतो.

वपाश्रपणींनी पशूला अन्वारब्ध करताना 'रेवतीर्यज्ञपतिं प्रियधाऽविशत' हा मंत्र म्हणावा. म्हणजे त्या मंत्रात व्यक्त झालेल्या अर्थानुसार फल निष्पन्न होते. हातात प्रज्वलित असे कोलीत घेऊन आग्नीध्राने पशूच्या पुढे चालावे. अशा प्रकारे त्याचे पुढे चालणे राक्षसांचा नाश होण्याला कारणभूत होते.

पशूला जेथे मारावयाचा त्या जागी अध्वर्यूने पशूचे उपाकरण करण्यासाठी हाती घेतलेल्या दोन दर्भांपैकी एक दर्भ 'पृथिव्याः संपृचः पाहि' असे म्हणून टाकावा. म्हणजे तो पशुशरीरातील कोणताही भाग भूमीवर पडू न देण्याला कारणभूत होतो. शिवाय पूर्वोक्त क्रमाने भूमीवर टाकलेल्या दर्भांवर जरी काही पशुशरीराचा भाग पडला तरी तो भूमीवर पडल्यासारखे होत नाही. इतकेच नव्हे तर कदाचित् भूमीवर जरी काही भाग पडला तरीही तो दर्भांवरच पडल्यासारखे होते.

पशूला मारण्याचे काम चालू असता, अध्वर्यूने त्या पशूकडे न पाहता, त्याच्याकडे पाठ फिरवून परत फिरावे. म्हणजे त्या योगाने पशूच्या मारण्यापासून आपण दूर आहोत, पशूला आपण काही मारवीत नाही, अशा प्रकारची लपवालपवी अध्वर्यूने व्यक्त केल्यासारखे होते. आणि पशूला मारण्याशी आपला संबंध असल्याची लपवालपवी किंवा स्वतःच्या दोषावर घातलेले पांघरूण अध्वर्यूला पशूला मारविण्याविषयीचा दोष न लागण्याला कारणभूत होते. पशूला मारताना त्याच्याकडे न पाहता पाठमोरे होऊन परत फिरण्याचे तत्त्व जो कोणी जाणतो तो संपत्तीला प्राप्त होतो व पशूंची प्राप्ती करून घेतो.

पशूला मारण्याची व त्याच्या शरीराची चीरफाड करण्याची जी शाला असते, तिला शामित्रशाला असे नांव आहे. ही शामित्रशाला यज्ञमंडपाच्या पश्चिम दिशेस तयार केली जात असल्याने तिला 'पश्चाल्लोका' अशी संज्ञा आहे. पशू मारला गेल्यानंतर प्रतिप्रस्थात्याने पत्नीला शामित्रशालेकडे घेऊन

जावे. पूर्वाभिमुख होऊन पत्नी त्या शाळेकडे जेव्हा जाऊ लागते, तेव्हा तिच्या समोर सूर्याचे किरण असतात. यास्तव, प्रतिप्रस्थात्याने 'नमस्त आतान' हा मंत्र पत्नीकडून म्हणवावा. व तिच्याकडून त्या सूर्याच्या किरणांना नमस्कार करावावा. पत्नीला शामित्रशाळेकडे नेताना प्रतिप्रस्थात्याने 'अनर्वा प्रेहि' हा मंत्र म्हणावा. शत्रूला 'अर्वा' असे नांव आहे. म्हणून प्रतिप्रस्थात्याने पठण केलेला हा मंत्र पत्नीच्या शत्रूंचा नाश करण्याला कारणभूत होतो. 'घृतस्य कुल्यामनु सह प्रजया सह रायस्पोषेण' हा पूर्वोक्त मंत्राचा पुढचा भाग प्रतिप्रस्थाता पठण करतो. त्याच्या योगाने त्याने जणू काय मंत्राच्या त्या भागात व्यक्त झालेल्या अर्थानुसार पत्नीला फल प्राप्त होण्याविषयी प्रार्थना केल्यासारखे होते. 'आपो देवीः शुद्धायुवः' हा पूर्वोक्त मंत्राचा शेवटचा अंश प्रतिप्रस्थाता पठण करतो. त्या योगाने त्या मंत्रांशात व्यक्त झालेल्या अर्थाप्रमाणेच त्याने भावना व्यक्त केल्यासारखे होते. (अनुवाक ८).

मारल्या जाणाऱ्या पशूच्या प्राणांना अत्यंत दुःखद अशी यातना होत असते. यास्तव, पत्नीने पशूच्या वाणीचे स्थान असलेल्या मुखाचे व प्राणवायूच्या संचाराचे स्थान असलेल्या नासिकेचे, त्या दोन्ही अवयवांच्या ठिकाणी उदकसिंचन करून 'आप्यायन' म्हणजे सवर्धन करावे. व तसे करताना 'वाक आप्यायताम्' व 'प्राणस्त आप्यायताम्' हे दोन मंत्र क्रमाने पठण करावेत. असे केले असता त्या पशूच्या प्राणांपासून त्यांना होणाऱ्या दुःखद यातनांचे तिने शमन केल्यासारखे होते.

पशूच्या प्राणांपासून दूर झालेली ती दुःखद यातना पृथ्वीमध्ये प्रवेश करून तिच्या अधिष्ठात्री देवतेच्या शरीरात प्रविष्ट होते. 'शमहोभ्याम्' असे म्हणून पत्नीने पशूच्या पृष्ठभागाच्या ठिकाणी उदकधारेने सिंचन करावे. अशा प्रकारे केलेले उदकसिंचन एका अहोरात्रामध्ये पृथ्वीमध्ये प्रविष्ट झालेल्या पशूच्या प्राणांच्या दुःखद यातनेला पूर्णतया शांत करते.

उपाकरणासाठी घेतलेल्या दोन दर्भांपैकी उरलेला एक दर्भ पशूच्या नाभीच्या दक्षिण भागी ठेवताना 'ओषधे त्रायस्वैनम्' हा मंत्र म्हणावा व 'स्वधिते मैनं हिंसीः' हा मंत्र म्हणून त्या दर्भावर सुरी ठेवून पशूच्या शरीराच्या कातडीला चीर पाडावी. सुरी ही वज्ररूप आहे. यास्तव पठण केलेला मंत्र तिच्या ठिकाणी शांती उत्पन्न करण्याला कारणभूत होतो.

मांसभक्षक लोक पशूच्या नाभीवर सुरी ठेवून त्या ठिकाणी पूर्व-पश्चिम अशी उभी चीर पाडतात. परंतु या दोनही प्रकारांचे अनुकरण न करता पशूच्या दक्षिण बाजूस दक्षिणोत्तर अशी आडवी चीर पाडावी. चीर पाडण्यापूर्वी खाली ठेवलेल्या दर्भाचे आता दोन तुकडे झालेले असतात. त्यांपैकी सूक्ष्म असा अग्राकडील भाग न घेता मुळाकडील स्थूल म्हणजे जाड भाग हाती घ्यावा आणि त्याची दोनही टोके चीर पाडलेल्या जागी निघालेल्या रक्तात बुचकळावीत आणि तो दर्भ दूर फेकून द्यावा. तसे करताना 'रक्षसां भागोऽसि' हा मंत्र म्हणावा. असे केल्याने दर्भाच्या दोन्ही टोकांना चोपडल्या गेलेल्या रक्ताचा भाग राक्षसांना देऊन त्यांना दूर हाकलल्यासारखे होते. या मंत्रानंतर 'इदमहं रक्षोऽधमं तमो नयामि योऽस्मान् द्वेष्टि यं च वयं द्विष्मः' हा मंत्र म्हणावा. यजमान ज्याचा द्वेष करतो तो, आणि यजमानाचा जो द्वेष करतो तो, असे दोन प्रकारचे पुरुष असतात. यास्तव, पूर्वोक्त मंत्र, रक्ताने माखलेला दर्भ फेकून देताना म्हटला म्हणजे आता सांगितलेल्या दोनही प्रकारच्या पुरुषांना अध्वर्यूने जणू काय दूर अंधार असलेल्या खड्यात नेऊन टाकल्यासारखे होते.

पशूच्या उदरातील कोठ्याला वेष्टून जी कागदासारखी पातळ व चिवट अशी त्वचा असते, तिला 'वपा' असे नांव आहे. ती वपा हातांनी युक्तीने कोठ्यापासून सोडवावी. सोडविताना, 'इषे त्वा' हा मंत्र म्हणावा. कारण जो यजमान यज्ञाचे यजन करतो, तो स्वतःच्या उत्कट इच्छेनेच करीत असतो. वपा कोठ्यापासून सोडविल्यानंतर तिचा मुळाकडील थोडासा भाग तसाच राहू द्यावा. म्हणजे पशुशरीरापासून वपा वेगळी करू नये. सोडविलेली वपा द्विशूल म्हणजे सुळ्यासारखी दोन टोके असलेल्या वपाश्रपणीवर नीट पसरावी. द्विशूल वपाश्रपणीवर वपा पसरताना त्या वपाश्रपणीचे एक टोक वपेत खोचावे म्हणजे त्या टोकाला चिकटून असणारा वपेचा भाग त्या टोकाच्या ठिकाणी खोचून बसवावा. आणि नंतर ती वपा द्विशूल वपाश्रपणीवर नीट पसरावी. वपाश्रपणीची दोन्ही टोके वपेच्या ठिकाणी खोचली तर रुद्रदेव क्रुद्ध होईल व तो यजमानाच्या पशूंचा घात करील. बरे, वपेच्या ठिकाणी कोणतेच टोक न खोचता जर ती वपाश्रपणीवर पसरली तर ती आहवनीयाकडे नीटपणे नेणे अशक्य होईल. ती वपा वपाश्रपणीवर नीट टिकून राहणार नाही, व मध्येच कोठे तरी खाली पडेल. यासाठी द्विशूल वपाश्रपणीच्या

अग्रभागी दुबेळक्याप्रमाणे असणाऱ्या दोन शाखांपैकी एका शाखेने म्हणजे तिच्या सुळ्यासारख्या टोकाने वपेला खोचावे म्हणजे त्या टोकाशी वपा खोचून बसवावी. दुसऱ्या टोकाला वपा खोचून बसवू नये. असे केले असता, वपाश्रपणीवर वपा टिकून राहील व ती नीटपणे घेऊन जाणे शक्य होईल. मध्येच कोठे पडणार नाही व रुद्रदेवही रागावणार नाही. अर्थात् यजमानाच्या पशूचा तो घातही करणार नाही.

द्विशूल वपाश्रपणीच्या दोनही शाखांवर आता सांगितलेल्या पद्धतीने वपा पसरताना 'घृतेन द्यावापृथिवी प्रोर्णुवाथाम्' असा मंत्र म्हणावा. म्हणजे वपेच्या ठिकाणी असणाऱ्या रसरूपी घृताने अध्वर्यूने जणू काय द्युलोक व पृथ्वी यांना आर्द्र केल्यासारखे होते. वपेच्या मुळाकडील भाग 'आच्छिन्नो राय: सुवीर:' या मंत्राने तोडून टाकावा व वपा पशुशरीरापासून वेगळी करावी. आता सांगितलेल्या मंत्राने वपेच्या मुळाकडील भाग तोडला असता त्या मंत्रात व्यक्त झालेल्या अर्थानुरूप सर्व घडून येते. वपा आहवनीयाकडे घेऊन जाताना 'उर्वन्तरिक्षमन्विहि' हा मंत्र म्हणावा. पशुशरीरातील वपा सोडवून दूर करणे, हे थोडेसे क्रूरपणाचेच कर्म होय. यास्तव, वपा घेऊन जाताना पूर्वोक्त मंत्र म्हटला असता अध्वर्यूच्या ठिकाणी उत्पन्न होणाऱ्या क्रूर वृत्तीला शांतता उत्पन्न करण्यास तो कारणभूत होतो. जो यजमान पशूला मारावयासाठी नेताना त्याला स्पर्श करतो, तो या भूलोकापासून च्युत होतो. यास्तव एकशूल व द्विशूल अशा दोनही वपाश्रपणींनी त्या पशूला स्पर्श करावा. म्हणजे तो यजमान इहलोकी प्रतिष्ठित होतो.

वपा आहवनीयाकडे नेत असताना तिच्यापुढे आग्नीध्राने अग्नी घेऊन चालावे. अशाप्रकारे अग्नी घेऊन आग्नीध्राने वपेच्या पुढे चालत राहणे राक्षसांना दूर करण्याला उपयुक्त होते. शिवाय अग्नी हा सर्वदेवतात्मक असल्याने वपारूपी हविर्द्रव्याच्या मागोमाग अग्नीच्या रूपाने सर्व देवताच जणू आहवनीयाकडे जातात.

आहवनीयाच्या अंगारांच्या अंतर्भागी म्हणजे मध्यावर नेऊन वपा त्या अंगारांवर भाजू नये. कारण, अंगार हे सर्वदेवतात्मक असल्याने त्यांच्या अंतर्भागी म्हणजे अगदी मध्यावर नेऊन त्यांच्या ठिकाणी वपा भाजली तर देवतांची अवज्ञा केल्यासारखे होते. यास्तव, आहवनीयाच्या अगदी कडेला, जे अंगार आलेले असतील त्या अंगारांच्यावर वपा भाजावी. वपा भाजू लागण्यापूर्वी उपाकरण बर्हीपैकी उरलेल्या एका दर्भाचा राखून ठेवलेला अग्रभाग

अंगारांवर अगोदर टाकावा आणि मग त्यांवर वपा भाजावी. अंगारांवर दर्भ टाकताना 'वायो वीहि स्तोकानाम्' हा मंत्र म्हणावा. कारण, असे केले असता, वपा भाजताना तिच्यावर दिलेल्या आज्याहुतीचे वायूने विभक्त केलेले आज्यबिंदू खाली पडत असतात.

वपा हे जणू काय पशूचे अग्र आहे. म्हणजे पशुशरीरातील श्रेष्ठ भाग आहे. त्याचप्रमाणे तृणांच्यामध्ये दर्भ हा अग्र आहे. म्हणजे अग्रगण्य अर्थात् श्रेष्ठ असा आहे. यास्तव, वपा भाजण्यापूर्वी तिच्या खाली दर्भाचा अग्रभाग टाकला असता त्या अग्राच्या योगाने पशुशरीरातील वपारूपी अग्रभाग अध्वर्यूने अधिक समृध्द केल्यासारखे होते. शिवाय, तृणादि ओषधींच्या ठिकाणी पशूंचे स्थापन केल्यासारखे होते.

शेवटच्या प्रयाजाचे वेळी, 'स्वाहाकृतीभ्य: प्रेष्य' असा मैत्रावरुणाला प्रैष द्यावा. म्हणजे तो यज्ञाचे यजन उत्तम प्रकारे होण्याला कारणभूत होतो.

'पृषदाज्य' हे जणू पशूंच्या प्राण व अपान या वायूंच्या स्वरूप असून वपा ही जणू पशूंचा आत्मा आहे. यास्तव, प्रयाजाहुती दिल्यानंतर जुहूमध्ये उरलेल्या आज्याने पृषदाज्यावर प्रथम अभिघार करावा. आणि नंतर वपेवर करावा. म्हणजे पशूंच्या शरीराच्या ठिकाणी प्राण व अपान या दोनही वायूंचे स्थापन केल्यासारखे होते.

प्रतिप्रस्थात्याने एकशूल व द्विशूल या दोनही वपाश्रपणी 'स्वाहोर्ध्वनभसं मारुतं गच्छतम्' हा मंत्र म्हणून आहवनीयावर द्याव्यात. देवांच्या समुदायामध्ये 'ऊर्ध्वनभा' हा मरुतांचा पुत्र आहे. यास्तव, हा मंत्र म्हणून वपाश्रपणी आहवनीयावर दिल्या असता, त्या मरुत्पुत्र ऊर्ध्वनभाकडूनच त्या वपाश्रपणींचे आहवनीयावर प्रहरण केल्यासारखे होते. वपाश्रपणी आहवनीयावर टाकताना त्यांच्या अग्रांची उलटापालट करून टाकाव्यात. म्हणजे द्विशूल वपाश्रपणी पूर्वेस अग्र करून व एकशूल वपाश्रपणी पश्चिमेस अग्र करून टाकावी. कारण, पशूंच्या ठिकाणच्या प्राणापानांची गती परस्परांच्या उलट असते. प्राण हा ऊर्ध्व गतीने संचार करीत असतो व अपान हा अधोगतीने संचार करीत असतो. सारांश, अशाप्रकारे वपाश्रपणींचे प्रहरण केले असता पशूंच्या प्राणापानांच्या ठिकाणी त्यांच्या स्वाभाविक गतीची स्थिती निर्माण केल्यासारखे होते. (अनुवाक ९).

पशूचे आलभन केल्यानंतर म्हणजे पशू मारला गेल्यानंतर पुरोडाशाचा

निर्वाप करावा. पुरोडाश हा साळीच्या भाताचे साररूप असे द्रव्य आहे. यास्तव, पुरोडाशाचा निर्वाप केला असता सारसहित अशा पशूचे आलभन केल्याप्रमाणे होते.

वपेचे हवन केल्यानंतर पुरोडाशाचे हवन करावे. पुरोडाश हा अन्नरूपच आहे. म्हणून वपा व हृदयादि अंगे यांच्या आहुतींच्या मध्यभागी पुरोडाशाची आहुती द्यावी. कारण, वपा आणि हृदय यांच्या मध्यभागीच पशूचे मध्य म्हणजे उदरस्थान असते. यास्तव, वपा व हृदयादि अवयवांच्या आहुतींच्या मध्यभागी पुरोडाशाची आहुती दिली असता, पशूच्या उदराच्या ठिकाणीच पुरोडाशरूप अन्न स्थापन केल्यासारखे होते. शिवाय, वपेचे छेदन केल्यामुळे पशूच्या शरीराच्या ठिकाणी उत्पन्न झालेले छिद्रही बुजविल्यासारखे होते. पृषदाज्य ज्या पात्रात ठेवले असेल त्या पात्रातून स्रुव्याने पृषदाज्य घ्यावे. आणि 'शृतं हवी: शमित:' म्हणजे, 'हे शमित्या, हृदयादि अंगरूप हवी शिजला काय?' असा शमित्याला तीन वेळ प्रश्न करावा. कारण, तीनदा जे बोलले जाईल ते सत्य, अशा समजुतीचे देव असतात. हृदयादि अंगरूपी हवी शिजला नसून जर, 'शिजला आहे' असे शमिता म्हणेल तर तो असत्य भाषणाच्या पापाने दूषित होईल. म्हणून हृदयादिअंगरूपी हवी चांगला भाजला गेला म्हणजेच शमित्याने 'शिजला आहे' असे उत्तर द्यावे.

पृषदाज्य म्हणजे पशूचे जणू प्राण व अपान हे दोन वायूच आहेत. पशूला मारल्यानंतर त्याचा आत्मा अभिमुखतेने त्याच्या हृदयामध्ये येऊन बसतो. यास्तव, हृदयाच्या ठिकाणी अध्वर्यू जर पृषदाज्याने अभिघार करील, तर त्याने त्या पशूचे प्राण व अपान त्याच्या आत्म्याच्या ठिकाणी स्थापन केल्यासारखे होते.

पशूच्या सहवर्तमान स्वर्गलोकी जाणाऱ्या देवांनी आपल्या मागोमाग मनुष्यांचे स्वर्गलोकी आगमन होऊ नये, असे मनात आणून पशूचे शीर छेदून ते धडावेगळे केले. आणि शिराचे छेदन करते वेळी निष्पन्न झालेला रक्तरूपी सारभूत रस भूमीवर इतस्तत: सांडला. त्या सारभूत रसापासून प्लक्ष (पायरी) नांवाचा वृक्ष उत्पन्न झाला. प्रकर्षाने भूमीवर सांडलेल्या सारभूत रसापासून निर्माण होणे, हेच त्या प्लक्ष वृक्षाचे प्लक्षत्व होय. यास्तव, वेदीत पसरलेल्या बर्हीवर प्लक्ष वृक्षाची एक शाखा (डहाळी) ठेवावी व तीवर पशूची हृदयादि

अंगे क्रमाने ठेवावीत. असे केले असता, सारभूत अशा पश्वंगभूत हवीचे अवदान घेतल्यासारखे होते.

परिपक्व झालेला पश्वंगरूप हवी आहवनीयाकडे घेऊन जात असता त्याच्या मागोमाग राक्षस येत असतात. म्हणून तो पश्वंगरूप हवी यूप व आहवनीय यांच्यामधून न्यावा. अशाप्रकारे हवी घेऊन जाणे, राक्षसांना मागे येऊ न देता दूर हाकलण्याला कारणभूत होते. यूप व आहवनीय हे राक्षसांचा घात करणारे असल्यामुळे त्या दोहोंच्या मधला मार्ग निर्भय असतो. त्यामार्गाने राक्षस येऊ शकत नाहीत.

पशूला मारल्यानंतर त्याचे मन दूर निघून जात असते. यास्तव, 'मनोतायै हविषोऽवदीयमानस्यानुब्रूहि' असा होत्याला प्रैष द्यावा. असा प्रैष दिल्यानंतर होता 'त्वं ह्यग्रे प्रथमो मनोता' इत्यादि ऋचा पठण करीत असतो. मनाशी संबद्ध असणारा तो मनोता होय. अग्निदेवता म्हणजेच मन:संबध्द असा मनोता समजावा. एवं च, आता सांगितल्याप्रमाणे प्रैष दिला असता, पशूचे दूर गेलेले मन पुन: त्याच्याजवळ आणल्यासारखे होते.

पशूच्या हृदयादि अकरा अंगांचे अवदान घ्यावे. यांपैकी, पशूच्या नाभिसहित असलेल्या दहा छिद्रांच्या ठिकाणी असलेले दहा प्राण व त्याचा देह मिळून अकरा अंगे होतात. आता सांगितल्याप्रमाणे अकरा अंगांचे अवदान घेतले असता, जेवढा पशू आहे, तेवढ्या समग्र पशूचे अवदान घेतल्यासारखे होते.

प्रथम हृदयाचे, नंतर जिह्वेचे व त्यानंतर काळजाचे म्हणजे उरोभागात असलेल्या मांसपिंडाचे अवदान घ्यावे. कारण, हृदयाकडून जे निश्चित केले जाते, तेच जिव्हेने बोलले जाते. व तेच उराच्या ऊर्ध्व भागापासून उच्च स्वराने बोलले जाते. हाच पशूच्या अंगांचा यथापूर्व म्हणजे स्वाभाविक असा अनुक्रम होय. ज्या पशूची आता सांगितलेल्या क्रमाने तीन अंगांची अवदाने प्रथम घेतली जातात, त्या पशूची पुढची सर्व अंगे अध्वर्यूने नियमबद्ध अशा क्रमाने न घेता आपल्या इच्छेने येईल त्याप्रमाणे घेतली तरी चालेल. सारांश, अशा रीतीने पशूच्या सर्व अंगांची अवदाने घेतली असता, त्या पशूच्या सर्व अंगांचे स्वाभाविक अनुक्रमास अनुसरूनच अवदान घेतल्यासारखे होते.

गुदकांडाचे तीन भाग करावेत व त्यांपैकी मधल्या भागापासून अवदान

घ्यावे. कारण, पशूचा प्राणवायू मुखामध्ये असतो. अथवा गुदकांडाच्या शेवटच्या म्हणजे अग्राकडील भागापासून अवदान घ्यावे. कारण पशूचा प्राणवायू मुखाच्या अग्रभागी असलेल्या नेत्रादि इंद्रियांच्या ठिकाणीही असतो. यास्तव, गुदकांडाच्या मध्यभागातून अवदान घेतले काय, किंवा उत्तम म्हणजे अग्राकडील भागातून अवदान घेतले काय, सारखेच. एवं च, दोहोपैकी कोणत्याही भागातून अवदान घेतले तरी त्यात काही दोष घडत नाही.

जन्माला येणारा ब्राह्मण ऋषिऋण, देवऋण व पितृऋण अशा तीन ऋणांच्यासह अर्थात् ही तीन ऋणे फेडण्याचा भार आपल्या शिरावर घेऊन जन्मास येत असतो. ऋषींच्या पासून घेतलेले ऋण ब्रह्मचर्याने म्हणजे वेदाध्ययन करून फेडावयाचे असते. यज्ञ करून देवांच्यापासून घेतलेले ऋण फेडावयाचे असून पुत्रपौत्रादि प्रजेच्या योगाने पितरांच्यापासून घेतलेले ऋण फेडावयाचे असते. पुत्र उत्पन्न केलेला, यज्ञभाग केलेला आणि ब्रह्मचर्याश्रमामध्ये गुरुसन्निध राहून वेदाध्ययन केलेला असा जो पुरुष असेल तोच अनृणी म्हणजे पूर्वोक्त तीन्ही प्रकारच्या ऋणांतून मुक्त झालेला असतो. आता सांगितलेल्या अनुक्रमाने पशूच्या अंगांचे अवदान घेतले असता, पूर्वोक्त तीनही प्रकारचे ऋण फेडल्यासारखे अर्थात् तीनही प्रकारच्या ऋणांना दूर केल्यासारखे होते. यज्ञकर्त्या यजमानाचे तीन्ही प्रकारचे ऋण दूर करणे, हेच त्या हृदयादि अंगांच्या अवदानाचे अवदानत्व म्हणजे स्वभावगुण होय.

देव व असुर परस्परांशी युद्ध करू लागले. तेव्हा देव अग्नीला म्हणाले की, तुज वीराच्या साहाय्याने आम्ही असुरांचा पराभव करू. अग्नी म्हणाला, 'ठीक आहे. पण मी मागेन तो वर तुम्ही मला द्यावयास पाहिजे. पशूंच्या शरीरातील उत्तमात उत्तम भाग मी तुमच्यापासून घेईन.' मग त्या अग्नीने पशुशरीरातील उत्तमातला उत्तम भाग देवांच्यापासून संपादन केला. पशुशरीराच्या पूर्वार्धापैकी उजव्या बाजूचा खांदा, मध्यभागापैकी गुदकांड व पश्चार्धापैकी डाव्या बाजूच्या कमरेचा भाग हाच तो अग्नीने देवांच्यापासून संपादन केलेला पशुशरीरापैकी उत्तमातला उत्तम भाग होय. याप्रमाणे उत्तम भागाचा स्वीकार केल्यानंतर अग्नीने देवांना त्यांच्या अपेक्षेप्रमाणे साहाय्य केले व त्या योगाने देव विजयी झाले आणि असुरांचा पराभव झाला. यास्तव, आताच दर्शविलेली पशुशरीरातील तीन अंगे स्रुचीमध्ये एकत्र घेऊन त्यांचे यजन करावे. अशा

प्रकारचे यजन यजमानाच्या शत्रूंचा पराभव करण्याला कारणभूत होते. सारांश, यजमान सर्व प्रकारे समृद्ध होतो व त्याचा शत्रू पराभव पावतो.

गाई वगैरे पशू निजताना आपले पाय वाकडे करून म्हणजे आखडून घेऊन निजतात. अर्थात् पशुशरीरातील अंगांची पूर्वोक्त तीन अवदाने वक्रगतीने घ्यावीत. उजव्या बाजूचा खांदा, डाव्या बाजूची कमर व गुदकांड हीच ह्या तीन अंगांची वक्रगती होय. सारांश, आता सांगितलेल्या वक्रक्रमाने अवदाने घेऊन त्यांचे यजन केले असता ते यजमानाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यास कारणभूत होते. (अनुवाक १०).

जीर्ण अशा वस्त्राप्रमाणे विसविशित व हृदयाला वेष्टून असणाऱ्या मेदाने जुहू व उपभृत् या दोन स्रुच्या झाकाव्यात. पशू हे मेदरूपच आहेत. कारण मेदच पशूच्या ठिकाणी रूप स्थापन करतो. सारांश, मेद म्हणजे चरबी पशूंच्या शरीरात भरपूर असली म्हणजे पशू रूपवान अर्थात् बाळसेदार होतात. मांस शिजविताना त्या मांसाबरोबरच परिपक्व होणाऱ्या उदकास 'यूष' असे नांव आहे. या यूषसंज्ञक उदकात मेद प्रथम बुचकळावा आणि नंतर तो स्रुच्यांच्या मुखावर पसरून त्या आच्छादित कराव्यात. यूष हा पशुशरीरातील सारभूत असा रसच होय. यास्तव, यूषात बुचकळून स्रुच्यांवर मेद पसरला असता जणू अध्वर्यूने पशूंच्या ठिकाणी रूपस्थापन केल्यासारखे होते.

मांस शिजविलेल्या भांड्यातील मांस काढून घेतल्यावर त्या भांड्यात असणाऱ्या तेलकट अशा द्रवास 'वसा' म्हणतात. या वसेचा होम करावयाचा असल्याने त्या वसेलाच 'वसाहोम' अशी पारिभाषिक संज्ञा आहे. पशूंच्या उजव्या बरगडीतील अस्थीने वसाहोम ढवळावा. कारण, पार्श्व म्हणजे बरगडी ही पशुशरीराचा मध्यच असून वसा ही पशुशरीरातील रस आहे. यास्तव, बरगडीतील अस्थीने वसा ढवळली असता पशूच्या शरीराच्या मध्यभागी रस स्थापन केल्यासारखे होते.

पशूला मारतात म्हणजे त्याच्या प्राणांचा घातच करतात. पशूचा गळा दाबून शमिते पशूला मारू लागले म्हणजे पशूला अत्यंत पीडा होऊन तो कासावीस होतो व त्याचे प्राण व अपान हे त्याला सोडून जातात. देवतेच्या दृष्टीने प्राण हा इंद्रदेवतात्मक असून अपानही इंद्रदेवतात्मकच आहे. यासाठी पशूच्या अंगांच्या अवदानांना स्पर्श करून 'ऐन्द्रः प्राणो अंगे अंगे निदेध्यत्'

हा मंत्र म्हणावा. असे केल्याने पशूंच्या ठिकाणी प्राण व अपान यांचे स्थापन केल्यासारखे होते. 'देव त्वष्टर्भूरि ते संसमेतु' हा पूर्वोक्त मंत्राचा दुसरा भाग होय. कारण, देवतेच्या दृष्टीने पशू हे 'त्वाष्ट्र' म्हणजे त्वष्ट्रदेवतात्मक असतात. 'विषुरूपा यत् सलक्ष्माणो भवथ' हा त्या मंत्राचा तिसरा भाग होय. या भागाचे पठण केले असता पशू हे निरनिराळ्या रूपांनी व निरनिराळ्या चिन्हांनी युक्त असे होतात. पूर्वोक्त मंत्राचा 'देवत्रा यन्तमवसे सखायोऽनु त्वा मातापितरो मदन्तु' हा चौथा भाग पठण करावा. असे केले असता, पशूच्या मातापितरांच्या अनुमतीने त्या मृत पशूला अध्वर्यूने स्वर्गलोकी पोचविल्यासारखे होते.

होत्याने याज्येची अर्धी ऋचा म्हटली असता वसाहोमाची आहुती द्यावी. याज्येच्या पहिल्या अर्धाची द्युलोक ही अधिष्ठात्री देवता असून पुढच्या अर्ध्या ऋचेची पृथ्वी ही अधिष्ठात्री देवता आहे. याज्येचा पूर्वार्ध व उत्तरार्ध यांच्या मध्यंतरी वसेचा होम केला असता, अध्वर्यूने द्युलोक व पृथ्वी यांच्या अधिष्ठात्री देवतांना वसारूपी रसाने युक्त म्हणजे परिपूर्ण केल्यासारखे होते. आहुती देऊन उरलेल्या वसेने दिशांच्या ठिकाणी आहुती द्याव्यात. म्हणजे त्या योगाने दिग्देवतांना वसेने तृप्त केल्यासारखे होते व त्या दिशांच्या कडून यजमानाला अन्नरसाची प्राप्ती होते. 'पृषदाज्य' हे जणू काय पशूंचे प्राण व अपान हे वायूच आहेत. देवतेच्या दृष्टीने पशू हे खरोखर वनस्पतिदेवतात्मक आहेत. यास्तव, पृषदाज्यपात्रातून स्रुव्याने जुहूमध्ये पृषदाज्य ओतून घ्यावे आणि 'वनस्पतयेऽनु ब्रूहि' व 'वनस्पतये प्रेष्य' हे दोन प्रैष मैत्रावरुणाला द्यावेत. होत्याने 'वौषट्' असे म्हणताच त्या पृषदाज्याची आहुती द्यावी. असे केले असता पशूंच्या ठिकाणी प्राण व अपान या दोन वायूंचे स्थापन केल्यासारखे होते.

पशूच्या हृदय इत्यादि निरनिराळ्या अंगांचे इडेमध्ये एकत्र अवदान घ्यावे. इडेमध्ये घेतलेली अवदाने निरनिराळ्या रूपांची असल्या कारणाने त्यांच्या होमाच्या प्रभावाने यजमानाला निरनिराळ्या रूपांचे पशू प्राप्त होत असतात.

इडेमध्ये घेतलेल्या अवदानांच्यावर यूष शिंपडावा. कारण, यूष हा पशूंचा शरीरगत असा रसच आहे. यास्तव, इडेमध्ये घेतलेल्या पश्वंगांच्या अवदानांवर

यूष शिंपला असता, पशूंच्या ठिकाणी रसाचेच स्थापन केल्यासारखे होते.

इडेतील भागाचे भक्षण करण्यासाठी होत्याने इडेचे उपाह्वान करावे, म्हणजे इडेला जवळ बोलवावी. कारण, ही गोरूप असल्यामुळेच ती पशुरूप आहे. गोरूप अशा इडेचे उपाह्वान केले, अर्थात् तिला बोलाविले म्हणजे सर्वच पशूंना होत्याने आपल्या जवळ बोलावल्यासारखे होते. चार वेळ उपाह्वान करावे. कारण, पशू चतुष्पाद असतात.

आपला यजमान पशुरहित व्हावा असे अध्वर्यूला वाटत असेल, तर त्याने त्या यजमानाच्या इडेमध्ये मेदरहित अशी पश्वंगांची अवदाने द्यावीत. कारण, पशू हे मेदोरूप आहेत. अर्थात् मेदोरहित अशी पश्वंगांची अवदाने इडेत घेणे म्हणजे रूपरहित अशा पश्वंगाची अवदाने घेणे होय. अर्थात् अशाप्रकारे मेदोरहित अशी अवदाने इडेत घेऊन अध्वर्यूने यजमानाला जणू काय, पशूंच्या पासून दूर केल्यासारखे होते. अर्थात् तो यजमान पशुरहित होतो.

आपला यजमान पशुमान् म्हणजे पशुसंपत्तीने युक्त व्हावा असे अध्वर्यूला वाटत असेल, तर त्याने त्या यजमानासाठी मेदसहित अशी पश्वंगांची अवदाने इडेत घ्यावीत. कारण, पशू हे मेदोरूप आहेत. अर्थात् मेदासहित अशी पश्वंगांची अवदाने इडेत घेणे म्हणजे रुपसहित अशा पश्वंगांची अवदाने घेणे होय. अर्थात् अशा प्रकारे मेदासह अवदाने घेऊन यजमानाला जणू काय रूपयुक्त अशा पशूंची प्राप्ती करून दिल्यासारखे होते. एवं च, तो यजमान पशुसंपत्तीने युक्त होतो.

प्रजापतीने यज्ञ उत्पन्न केला. त्याने प्रथम आज्य निर्माण केले, मध्यंतरी पशू निर्माण केला व शेवटी पृषदाज्य निर्माण केले. म्हणून यज्ञामध्ये प्रथमतः आज्याने प्रयाजांचे यजन केले जाते, मध्यंतरी पशूचे म्हणजे पशूच्या अंगाचे यजन केले जाते आणि शेवटी पृषदाज्याने अनूयाजांचे यजन केले जाते. प्रधानभूत अशा पश्वंगांचे यजन झाल्यावर होणारे अनूयाजांचे यजन केवळ एका आज्यानेच होणे पुरेसे न वाटल्यामुळेच यज्ञनिर्माणकर्त्या प्रजापतीने अनूयाजांच्यासाठी उत्पन्न केलेले पृषदाज्य आज्याबरोबर दह्याचे मिश्रण करून केले आहे.

अकरा अनूयाजांचे यजन करावे. पशूच्या निरनिराळ्या अंगांच्या ठिकाणी

दहा प्राण असतात व त्याचा देह हा अकरावा होय. यास्तव, अकरा अनूयाजांचे यजन केले असता जेवढा पशू आहे तेवढ्या पशूस अनुसरून यजन केल्यासारखे होते.

यज्ञामध्ये पशूला मारतात म्हणजे त्याचा प्राण व अपान या दोन वायूंचा घातच करतात. अर्थात् त्या पशूचे प्राण व अपान हे त्याला सोडून जातात. पृषदाज्य हे पशूंच्या प्राणापानरूपच आहे. यास्तव, पृषदाज्याने जर अनूयाजांचे यजन केले तर अध्वर्यूने जणू काय, पशूंच्या ठिकाणी प्राण व अपान या दोन वायूंचे स्थापन केल्यासारखे होते. (अनुवाक ११).

प्रपाठक ४.

सृष्टिकर्त्या प्रजापतीने ज्योतिष्टोम यज्ञाच्या साधनाने प्रजा निर्माण केल्या. तथापि, त्या यज्ञामध्ये अनूयाजांच्या बरोबरच होणाऱ्या उपयाजांच्या योगानेच प्रत्यक्षतः प्रजांची निर्मिती प्रजापती करू शकला. यास्तव, अनूयाजांच्या बरोबरच उपयाजांचे अनुष्ठान करावे. म्हणजे त्या अनुष्ठानाच्या प्रभावाने यज्ञकर्ता यजमान पुत्रपौत्रादि प्रजा उत्पन्न करतो.

पशूच्या कमरेकडील भागातून काढून घेतलेल्या गुदकांडातूनच उपयाजासाठी अवदान घेत जावे. कारण, कमरेकडील भागातूनच प्रजा जन्मास येत असतात.

गुदकांडाचे तीन भाग करण्यात येत असून मधल्या व शेवटच्या म्हणजे तिसऱ्या भागाचा अन्यत्र विनियोग केला जात असून उर्वरित असा जो पहिला म्हणजे मुळाकडील स्थूल भाग असतो त्या भागातून उपयाजासाठी अवदान घेत जावे. कारण, कमरेकडचा जो स्थूल अर्थात् ढुंगणाकडील भाग असतो तेथूनच प्रजा उत्पन्न होत असतात.

गुदकांडाच्या स्थूल भागाचे तोडून तोडून अकरा विभाग करावेत. व त्यांतील विभागांचा क्रम भंग न होऊ देता, अनुक्रमे एक एक भाग एकेका उपयाजाच्या वेळी अवदान म्हणून घेत जावा. अशा प्रकारे अकरा विभागांमध्ये सांकर्य, म्हणजे सरमिसळ अर्थात् क्रमभंग होऊ न देता, एकेका विभागाचे घेतलेले एकेक अवदान यजमानाला प्राप्त होणाऱ्या प्रजांच्या प्राणांमध्ये सांकर्य न होण्याला कारणभूत होते.

अवदानासाठी गुदकांडाचा भाग घेताना तो उलटापालटा होऊ देऊ नये. कारण, त्याची जर उलटापालट झाली तर यजमानाच्या प्रजा उदावर्त नांवाच्या योगाने घेरल्या जातील.

पहिल्या उपयाजाची आहुती देताना, 'समुद्रं गच्छ स्वाहा' हा मंत्र म्हणावा. म्हणजे तो यजमानाच्या ठिकाणी प्रजोत्पादनसमर्थ असे रेत स्थापन करतो. दुसऱ्या आहुतीच्या वेळी 'अंतरिक्षं गच्छ स्वाहा' हा मंत्र म्हणावा. म्हणजे तो मंत्र अंतरिक्षदेवतेकडून यजमानासाठी प्रजांची उत्पत्ती करतो. कारण अंतरिक्षाला अनुसरूनच प्रजा जन्मास येत असतात.

तिसरी आहुती देताना 'देवं सवितारं गच्छ स्वाहा' हा मंत्र म्हणावा. म्हणजे तो सविता देवाच्या प्रेरणेनेच यजमानाकरता प्रजा निर्माण करतो.

चौथी आहुती देतेवेळी 'अहोरात्रे गच्छ स्वाहा' हा मंत्र म्हणावा. म्हणजे तो अहोरात्राभिमानी देवांच्या द्वारा यजमानासाठी प्रजा उत्पन्न करतो. अहोरात्रांना अनुलक्षूनच प्रजा जन्मास येतात हे स्पष्टच आहे.

पांचव्या आहुतीच्या वेळी 'मित्रावरुणौ गच्छ स्वाहा' हा मंत्र म्हणावा. म्हणजे तो यजमानापासून उत्पन्न झालेल्या प्रजांच्या ठिकाणी प्राण व अपान या दोन वायूंचे स्थापन करतो. सहावी आहुती देताना 'सोमं गच्छ स्वाहा' हा मंत्र म्हणावा. कारण, देवतेच्या दृष्टीने सर्व प्रजा सोमदेवतात्मक असतात. म्हणजे त्या प्रजांची 'सोम' ही अधिष्ठात्री देवता असते. सातव्या आहुतीच्या वेळी 'यज्ञं गच्छ स्वाहा' हा मंत्र म्हणावा. म्हणजे तो मंत्र यजमानाच्या प्रजा यज्ञिय म्हणजे यज्ञानुष्ठान करण्यास योग्य अशा करतो. आठवी आहुती देताना 'छंदांसि गच्छ स्वाहा' असा मंत्र म्हणावा. पशू हे छंदस्वरूप आहेत. यास्तव, हा मंत्र म्हटला असता छंदस्वरूप अशा पशूंची प्राप्ती यजमानाला करून देतो. नववी आहुती देताना 'द्यावापृथिवी गच्छ स्वाहा' हा मंत्र म्हणावा. म्हणजे तो मंत्र आपल्या प्रभावाने यजमानापासून उत्पन्न होणाऱ्या प्रजांना द्युलोक व पृथ्वी या दोघांच्याकडून त्यांना जवळ घेववितो. म्हणजे या दोनही लोकांच्याकडून त्या प्रजांचे संरक्षण करतो. दहाव्या आहुतीच्या वेळी 'नभो दिव्यं गच्छ स्वाहा' हा मंत्र म्हणावा. म्हणजे तो यजमानापासून उत्पन्न होणाऱ्या प्रजांच्या कल्याणासाठी पर्जन्यवृष्टीला नियंत्रित करतो. शेवटची अकराव्या उपयाजाची आहुती देताना 'अग्निं वैश्वानं गच्छ स्वाहा' हा मंत्र म्हणावा.

म्हणजे तो यजमानापासून उत्पन्न झालेल्या प्रजांना पृथ्वीच्या ठिकाणी प्रतिष्ठित करतो.

पशूच्या गुदकांडाचे उपयाजांसाठी जो अवदान घेतो, तो जणू काय, पशूच्या प्राणांचेच अवदान घेतो. कारण, गुदकांड हे प्राणांचा आधार असते. त्या गुदकांडाचे अवदान घेतले, म्हणजे त्या पशूचे प्राण स्थानभ्रष्ट होत असतात. यास्तव, उपयाजांच्या आहुती दिल्यानंतर प्रतिप्रस्थात्याने 'मनो मे हार्दि यच्छ' इत्यादि मंत्र म्हणावा. म्हणजे प्रतिप्रस्थात्याने त्या मंत्राच्या प्रभावाने पशूचे प्राण त्यांच्या त्यांच्या स्थानी पुन्हा स्थापन केल्यासारखे होते.

मारल्या गेलेल्या पशूचे हृदय दुःखाने अत्यंत व्यथित झालेले असते. पशूच्या हृदयाला, त्याला मारताना व्यथित करणारे ते दुःख हृदयशूलाच्या ठिकाणी समाविष्ट होऊन राहते. यासाठी हृदयशूल पृथ्वीवर टाकून दिला तर प्रतिप्रस्थात्याने त्या हृदयशूलाच्या ठिकाणी समाविष्ट झालेले दुःख पृथ्वीला दिल्यासारखे होईल. हृदयशूल जर उदकामध्ये टाकून दिला तर ते दुःख उदकाला दिल्यासारखे होईल. यास्तव, पाण्याची ओल नसलेला पृथ्वीचा भाग व पाण्याने भिजलेला पृथ्वीचा भाग हे जेथे परस्परांशी मिळलेले असतात अशा संधिस्थलाच्या ठिकाणी तो हृदयशूल टाकावा. म्हणजे पृथ्वीला दुःख दिल्यासारखे होणार नाही. व उदकालाही दुःख दिल्यासारखे होणार नाही. आणि पृथ्वी व उदक या दोघांनाही शांतता प्राप्त केल्यासारखे होईल. हृदयशूल टाकून देताना यजमान ज्या मनुष्याचा द्वेष करीत असेल, त्या मनुष्याचे मनामध्ये ध्यान करावे. म्हणजे त्या मनुष्यालाच ते हृदयशूलामध्ये समाविष्ट झालेले दुःख अर्पण केल्यासारखे होईल. (अनुवाक १).

पूर्वी एकदा आग्नीध्र मंडपात देवांनी राहून यज्ञशाला आपआपसात विभागून घेतली. यज्ञशालेपैकी हा भाग माझा, हा भाग माझा, अशाप्रकारे सर्व देवांनी आपापले भाग निश्चित केले. शेवटी जे स्थल उरले, त्याविषयी देवांनी एकमताने असे ठरविले की, आजच्या दिवस हे स्थळ आपणा सर्वांचे सामयिक म्हणूनच राहू दे. उद्या आपण त्याची वाटणी करू. एवं च, 'वसतु' म्हणजे हे स्थल आज असेच समायिकीत राहू दे, असे देवांनी म्हटल्यामुळे त्या अवशिष्ट स्थळाला 'वसतीवरी' हे नांव पडले. आणि त्या स्थलाशी ज्या उदकांचा पुढे संबंध आला त्या उदकांनाही 'वसतीवरी' ही संज्ञा प्राप्त झाली.

'वसतीवरी' स्थलाशी संबंध होणे हेच त्या वसतीवरीसंज्ञक उदकांचे वसतीवरीत्व म्हणजे स्वभावलक्षण होय. नंतर दुसऱ्या दिवशी सर्व देव त्या उर्वरित स्थलापाशी आले. परंतु, त्या स्थलाची ते विभागणी करू शकले नाहीत. कारण, ते स्थल अतिशय लहान असल्यामुळे त्याचे विभाग अतिशयच लहान अर्थात् सर्वांना अपुरे होतील असे त्यांना दिसून आले. आणि समाईक म्हणून ठरविलेले ते स्थल एकट्या एखाद्या देवतेलाही घेता येणे अशक्य झाले. शेवटी देवांनी ते स्थळ उदकात बुडविले. म्हणजे त्या स्थलाच्या ठिकाणी उदक निर्माण केले. ते उदकच 'वसतीवरी' म्हणून प्रसिद्ध झाले. यज्ञभूमीतील अवशिष्ट राहिलेल्या स्थलामध्ये समाविष्ट झालेले ते उदकही यज्ञोपयुक्त असल्यामुळे त्या उदकाचे ग्रहण करावे. असे केले असता, यज्ञाचाच जणू उपक्रम करून त्याला आपल्याजवळ घट्ट धरून त्याच्या सन्निध यज्ञकर्त्या यजमानाने वसती केल्यासारखे होते.

'वसतीवरी' संज्ञक उदक ग्रहण करण्यापूर्वी जर सूर्य अस्तास गेला तर त्या यजमानाच्या यज्ञाचा प्रारंभच न केल्यासारखे होईल, व दुसऱ्या दिवशी यज्ञाचे अनुष्ठान केले तरी तो यज्ञ विच्छिन्न अर्थात् निष्फळ होईल. कदाचित् 'वसतीवरी' उदक घेण्याच्या वेळी सूर्यास्त होण्याचा समय आल्यास चूल पेटवून तिच्या उजेडात वसतीवरी उदक घ्यावे. किंवा ज्या घागरीत उदक घ्यावयाचे, तीत प्रथम सुवर्ण टाकावे व त्या घागरीत उदक घ्यावे. अथवा पुष्कळ यज्ञ केलेला जो ब्राह्मण असेल त्याच्या घरच्या घागरीमध्ये वसतीवरी उदक घ्यावे. म्हणजे तो यजमान सूर्यास्तापूर्वी वसतीवरी उदकाचे ग्रहण करणाऱ्यासारखा होतो. वसतीवरी उदक हे पशूंची प्राप्ती करून देणारे असल्यामुळे पशुरूप आहे. यास्तव, त्याचे ग्रहण केले असता पशूंनाच जणू जवळ करून त्यांच्या सन्निध यजमानाने वस्ती केल्यासारखे होते.

जलप्रवाह ज्या दिशेस वाहत असेल त्याच दिशेस मुख करून जर उदक भरून घेतले तर त्या यजमानाचे पशू नष्ट होतील. यास्तव, प्रवाहाभिमुख होऊन उदक भरून घ्यावे. म्हणजे पशूंच्या विनाशाला प्रतिबंध करून त्यांचे ग्रहण केल्याप्रमाणे होते.

इंद्राने वृत्रासुराला मारले. तेव्हा तो उदकांमध्ये मरण पावला. त्या उदकांत यज्ञार्ह असा जो अंश होता तो प्रवाहरूपाने वाहू लागला. यास्तव,

वाहत्या प्रवाहात उदक भरून घ्यावे. असे केले असता, त्या उदकामध्ये यज्ञार्ह असे जे अत्यंत शुद्ध अंश असतील, त्या सर्व अंशांचे ग्रहण केल्यासारखे होते. नद्यादिकांच्या प्रवाहातील उदक घ्यावे. ज्यामध्ये उदक वाहत नाही, स्थिर असते, अशा डोहातील किंवा तळ्यातील उदक घेऊ नये. कारण, स्थिर असणारी जी उदके असतात, ती वरुणाने आपल्या सत्तेखाली घेतलेली असतात. यास्तव, स्थिर असे उदक असलेल्या डोहातून किंवा तळ्यातून उदक भरून घेतल्यास त्या यजमानाचा यज्ञ अध्वर्यूने वरुणाकडून घेवविल्यासारखे होते. दिवस जेव्हा असतो तेव्हा रात्र उदकांमध्ये प्रवेश करून राहिलेली असते. म्हणूनच उदकाचा शुक्ल वर्ण व रात्रीचा कृष्ण वर्ण यांचे परस्परांमध्ये मिश्रण होऊन उदकाचा रंग राहुग्रस्त चंद्राप्रमाणे दिवसा तांबूस दिसतो. जेव्हा रात्र पडते तेव्हा दिवस रात्रीमध्ये प्रविष्ट होऊन राहतो. त्यामुळे चांदण्या रात्रीचा शुभ्र वर्ण व दिवसाचा शुभ्र वर्ण हे परस्परांत मिश्र होतात, आणि चांदण्या रात्रीत उदकांचा रंग चंद्राप्रमाणे शुभ्र दिसतो. यास्तव, सावली व ऊन यांचा जेथे संधी झालेला असेल त्या ठिकाणचे उदक भरून घ्यावे. म्हणजे दिवस व रात्र या दोघांच्याही वर्णांच्या ठिकाणचे उदक ग्रहण केल्यासारखे होते.

घागरीमध्ये उदक भरून घेताना 'हविष्मतीरिमा आप:' हा मंत्र म्हणावा. म्हणजे हवित्व संपादन केलेल्या उदकाचेच ग्रहण केल्यासारखे होते. 'हविष्मान् अस्तु सूर्य:' हा पूर्वोक्त मंत्राचा दुसरा अंश पठण करावा. म्हणजे सूर्यप्रकाशाने युक्त अशा उदकाचे ग्रहण केल्यासारखे होते.

अनुष्टुप् छंदातील ऋचेने उदक भरून घ्यावे. कारण, अनुष्टुप् छंद हा वाणीचे रूप आहे. यास्तव, अनुष्टुप्छंदात्मक ऋचेने उदक घेतले असता वाग्देवतेकडून सर्वश: त्या उदकाचे ग्रहण केल्यासारखे होते.

चार चरण असलेल्या ऋचेने उदकाचे ग्रहण करावे. आता सांगितलेल्या ऋचेने चार चरण आणि शालामुखीय, उत्तरवेदी व आग्नीध्रीय ही तीन स्थळे मिळून सात ही संख्या पूर्ण होते. शक्करी छंद हा सात चरणांचा असतो. पशू हे शक्करीछंदस्वरूप असतात. यास्तव, सात या संख्येशी संबद्ध असलेल्या उदकाचे ग्रहण केले असता, यजमानासाठी पशूनाच जणू जवळ केल्यासारखे होते.

यजमानाला इहलोकाचा उत्तम प्रकारे सुखोपभोग मिळावा म्हणून गार्हपत्य अग्नीची स्थापना केली जात असून स्वर्गलोकाच्या सुखोपभोगाचा यजमानाला लाभ व्हावा म्हणून आहवनीय अग्नी स्थापन केला जात असतो. म्हणून वसतीवरीसंज्ञक उदकांनी भरलेली घागर गार्हपत्यासन्निध ठेवावी. म्हणजे यज्ञकर्ता यजमान पशुसंपत्तीने समृध्द होतो. नंतर ती घागर आहवनीयाजवळ ठेवावी. म्हणजे यजमान स्वर्गलोकी पशुसंपत्तीने समृध्द होतो. सारांश, गार्हपत्याजवळच्या, अर्थात् शालामुखीय संज्ञक अग्नीजवळचे आणि आहवनीयाजवळच्या म्हणजे उत्तरवेदीजवळच्या, अशा दोनही ठिकाणी वसतीवरी उदकांनी भरलेली घागर ठेवावी. म्हणजे भूलोक व स्वर्गलोक या दोन्ही लोकांच्या ठिकाणी यजमानाला पशुसमृध्दीने समृद्ध केल्यासारखे होते. पूर्वोक्त तीन स्थानांच्या सभोवती वसतीवरी संज्ञक उदकाने भरलेली घागर फिरवावी. अशा प्रकारे पूर्वोक्त तीन स्थळांभोवती वसतीवरी उदकाने परिपूर्ण अशा घागरीचे फिरविणे राक्षसांचा नाश करण्यास कारणभूत होते.

विस्तीर्ण अशा यज्ञानुष्ठानाचा जर एखादा भाग विस्मरणाने केला गेला नाही तर त्या अनुष्ठानात फट पडते व त्या फटीत राक्षस शिरतात आणि यज्ञाला अपकार करतात. यास्तव, वसतीवरी उदकांचे ग्रहण केले असता, ती उदके विस्मरणाने यज्ञानुष्ठानामध्ये पडलेली फट बुजवून टाकतात, म्हणजे त्या फटीत शिरून विसरलेले अनुष्ठान केल्यासारखे करतात. आणि राक्षसांना प्रवेश करू देत नाहीत. सारांश, घागरीत भरून घेतलेली ती वसतीवरीसंज्ञक उदके शेवटी आग्नीध्रीय मंडपात ठेवली असता, ती यज्ञाच्या तृतीय सवनाचे अनुष्ठान पुरे होईपर्यंत संपत नाहीत. अवश्यक अशा सर्व कार्यांना ती पुरेशी होतात. यासाठी यज्ञानुष्ठानाच्या क्रमामध्ये सातत्य रहावे व यज्ञाची अविच्छिन्न अशा प्रकारे परिपूर्ती व्हावी म्हणून 'वसतीवरी' संज्ञक उदकाने भरलेली घागर शेवटी आग्नीध्रीय शाळेत स्थापन करावी. (अनुवाक २).

एकमेकांना जोडून बसविलेल्या 'अधिषवण' नामक फळ्यांच्यावर एक कृष्णाजिन पसरून त्यावर सोमवल्ली कुटावयाचे बत्ते परस्परांच्या समोर मुख करून ठेवलेले असतात. 'दक्षिणहविर्धान' नामक शकटावर ठेवलेला वल्लीरूप सोम त्या शकटाच्या दोन्ही दांड्यांमधून खाली काढून परस्परसंमुख अशा त्या बत्त्यांच्यावर ठेवावयाचा असतो.

ब्रह्मवादी असे म्हणतात की, दक्षिणहविर्धान शकटावर ठेवलेला सोम बत्त्यांच्यावर ठेवण्यासाठी खाली काढीत असताना सर्व देवतांच्यासाठी त्याचा रस काढावयाचा हेतू मनात धरून जो काढतो, तोच खरा मर्मज्ञ अध्वर्यू होय. हविर्धान शकटावरून सोम खाली काढताना 'हृदे त्वा' असे म्हणावे. म्हणजे त्या सोमाने सर्व मनुष्यांनाच जणू अध्वर्यूने संतुष्ट केल्यासारखे होते. नंतर 'मनसे त्वा' हा मंत्रांश म्हणावा. म्हणजे त्या सोमाने सर्व पितरांना जणू अध्वर्यूने संतुष्ट केल्यासारखे होते. नंतर 'दिवे त्वा सूर्याय त्वा' हा पुढचा मंत्र म्हणावा. म्हणजे अध्वर्यूने जणू त्या सोमाने सर्व देवतांना संतुष्ट केल्यासारखे होते. एवं च, आता सांगितल्याप्रमाणे मनुष्ये, पितर व देवता या सर्व देवताच समजाव्यात. अर्थात् 'हृदे त्वा', 'मनसे त्वा' इत्यादि मंत्र म्हणून सोम हविर्धान शकटाच्या खाली काढून बत्त्यांच्यावर ठेवला असता, अध्वर्यूने सर्वच देवतांना संतुष्ट केल्यासारखे होते.

रात्री निजलेली मनुष्ये उष:काली जागी होऊन एकमेकांच्याशी बोलू लागतात, व पक्ष्यांचीही किलबिल सुरू होते. अशा प्रकारच्या माणसांच्या होणाऱ्या बोलाचालीला व पक्ष्यांच्या किलबिलीला 'प्रवदन' असे म्हणतात. मनुष्यांचे व पक्ष्यांचे प्रवदन सुरू होण्यापूर्वीच अध्वर्यूने होत्याला 'प्रातरनुवाक' म्हणजे प्रात:कालापूर्वी होत्याने पठण करावयाचा असलेला ऋक्समूह पठण करावयासाठी 'उपाकरण' करावे. प्रातरनुवाक पठण करण्यासाठी दिल्या जाणाऱ्या प्रैषाला म्हणजे सूचनेलाच 'उपाकरण' ही संज्ञा आहे. मनुष्यांचे व पक्ष्यांचे प्रवदन सुरू होण्यापूर्वीच 'प्रातर्यावभ्यो देवेभ्योऽनुब्रूहि' असा अध्वर्यूने होत्याला प्रातरनुवाक पठण करण्यासाठी प्रैष दिला असता, जेवढी म्हणून वाणी आहे, त्या सर्व वाणीलाच अध्वर्यूने जवळ केल्यासारखे होते.

प्रातरनुवाकाचे पठण करताना होत्याने 'आपो रेवती: क्षयथा हि वस्व:' या उदकांचे प्रतिपादन करणाऱ्या ऋचेचे प्रथम पठण केल्याने होत्याने यज्ञाला अनुलक्षून आपल्या मंत्रवाणीचा उच्चार केल्याप्रमाणे होते. त्या ऋचेनंतर सर्व छंदांतील ऋचांचे पठण करावे. छंद पशुरूप आहेत. यास्तव, सर्व छंदांतील ऋचांच्या पठणाने सर्व पशूंचेच जणू संपादन केल्यासारखे होते.

तेजाची इच्छा करणाऱ्या यजमानाच्या यज्ञात गायत्री छंदातील ऋचेने होत्याने प्रातरनुवाकपठणाची समाप्ती करावी. इंद्रियसामर्थ्याची इच्छा करणाऱ्या

यजमानाच्या यज्ञातील प्रातरनुवाक त्रिष्टुप् छंदातील ऋचेने, पशुप्राप्तीची इच्छा करणाऱ्या यजमानाच्या यज्ञात जगती छंदातील ऋचेने, प्रतिष्ठा प्राप्त होण्याची इच्छा करणाऱ्या यजमानाच्या यज्ञातील प्रातरनुवाक अनुष्टुप् छंदातील ऋचेने, त्याप्रमाणे यज्ञाची व अन्नाची इच्छा करणाऱ्या यजमानाच्या यज्ञातील प्रातरनुवाक अनुक्रमे पंक्ती छंदातील व विराट् छंदातील ऋचेच्या पठणाने समाप्त करावा. प्रातरनुवाकाची शेवटची ऋचा पठण करीत असताना होत्याच्या मुखातून उच्चारले जाणारे 'अभूदुषा रुशत्पशुः:' हे शब्द कानावर पडताच अध्वर्यूने 'शृणोत्वग्निः समिधा हवं' हा मंत्र म्हणून प्रचरणी स्रुचीने आहवनीयावर एक आज्याहुती द्यावी. असे केले असता, सवितादेवाची प्रेरणा झाल्यानंतर आणि सर्व देवतांना श्रुत करूनच, एकधना, पन्नेजनी या संज्ञा असलेली उदके आणण्यासाठी अध्वर्यूने उदके असतील त्या ठिकाणी गमन केल्यासारखे होते.

उदक आणण्यासाठी जाताना 'अपं इष्य होतः' म्हणजे जी उदके आणावयाची आहेत त्यांना उद्देशून 'प्र देवत्रा ब्रह्मणे' इत्यादि ऋचांचे पठण कर, असा होत्याला प्रैष द्यावा. कारण उत्कट इच्छेने आरंभिलेले कार्य उत्तम केले जाते, असा लोकव्यवहार आहे. नंतर 'मैत्रावरुणस्य चमसाध्वर्यवा द्रव' हा पूर्वोक्त प्रैषातील पुढचा भाग उच्चारावा. कारण, मित्र व वरुण हे दोघे उदकांचे नेते म्हणजे प्रवर्तक आहेत. यास्तव, या प्रैष भागाचे उच्चारण केले असता उदकप्रवर्तक अशा मित्र व वरुण या दोघा देवांच्यासह अध्वर्यूने उदक आणावयास गेल्यासारखे होते.

उदकाच्या सन्निध पोचल्यावर उदकावर दर्भ टाकावेत. आणि त्या दर्भांवर 'देवीरापो अपां नपात्' हा मंत्र म्हणून एक आज्याहुती द्यावी. अशी आहुती दिली असता, त्या आहुतीचा मोबदला देऊन नेण्यात येणारी उदके अध्वर्यूने जणू विकतच घेतल्यासारखे होते. शिवाय हविःस्वरूपाला प्राप्त झालेल्या व आहुतीच्या घृताने अभिघारित केलेल्या उदकांचे ग्रहण केल्यासारखे होते.

'कार्षिरस्यपापां मृध्रम्' हा मंत्र म्हणून दर्भावर दिलेल्या आहुतीचे घृत दर्भांनी उदकामध्ये ढवळावे. 'समुद्रस्य वोऽक्षित्वा उन्नये' हा मंत्र म्हणून मैत्रावरुण चमसाने उदक भरून घ्यावे. असे केले असता, यजमानाच्या खाण्यापिण्यात येणारी उदके केव्हाच कमी पडत नाहीत. म्हणजे खाण्याचे पदार्थ तयार करण्यासाठी व पिण्यासाठी लागणाऱ्या उदकाचा केव्हाही तुटवडा पडत नाही.

चमसाने जसे उदक भरून घेतले, त्याचप्रमाणे तीन घटांमध्ये 'एकधना' व एक तपेली 'पन्नेजनी' संज्ञक उदक भरून घ्यावे.

चात्वाल नांवाचा खड्डा हा जणू यज्ञाची योनी म्हणजे जन्मस्थानच असून 'वसतीवरी' संज्ञक उदक हे यज्ञरूप आहे. होत्याच्या चमसात वसतीवरी घागरीतून थोडेसे उदक ओतावे व तो होतृचमस व मैत्रावरुण चमस हे एकमेकांना चिकटून चात्वालासन्निध ठेवावेत. आणि त्या दोनही चमसांत वसतीवरी संज्ञक उदकाने भर घालावी. असे करणे यज्ञाच्या ठिकाणी सयोनित्व-स्वत:च्या जन्मस्थलाशी संयुक्तत्व-उत्पन्न होण्याला कारणभूत होते. शिवाय, त्या दोनही चमसांतील उदकांना अध्वर्यूने जणू त्यांच्या स्वकीय अशा जन्मभूमीपासून उत्पन्न केल्यासारखे होते. नंतर सर्व उदकांच्या सह यज्ञमंडपामध्ये यावे. सर्व उदकांच्यासह अध्वर्यू यज्ञमंडपात येत असलेला पाहून होत्याने त्याला, 'अध्वर्योऽवेरपा:' म्हणजे 'उदके घेऊन आलास ना?' असा प्रश्न विचारावा. अध्वर्यूने, 'उत्तेमनन्नमुरुतेमा: पश्य' म्हणजे "ही उदके आणली आहेत, पहा', असे होत्याला उत्तर द्यावे.

नंतर, 'यमग्ने पृत्सु मर्त्यमावो' हा मंत्र म्हणून अध्वर्यूने 'ऋतुकरण' संज्ञक एक आज्याहुती द्यावी. अग्निष्टोम यज्ञ केला जात असेल तर आता सांगितलेल्या मंत्राने आज्याहुती द्यावी. 'उक्थ्य' नांवाचा यज्ञ केला जात असेल तर पूर्वोक्त मंत्राने आहवनीयाभोवती घातलेल्या परिधींपैकी मधल्या परिधीला आज्याचा लेप करावा. आणि अतिरात्र क्रतू केला जात असेल तर पूर्वोक्त मंत्र म्हणत हविर्धान मंडपात प्रवेश करावा. प्रत्येक यज्ञाचे वेगवेगळे स्वरूप स्पष्ट होण्यासाठी आता सांगितलेले विवेचन करण्यात आले आहे. (अनुवाक ३).

'देवस्य त्वा सवितु: प्रसवे' या मंत्राने 'उपांशुसवन' या नांवाचा सोम कुटावयाचा दगडी बत्ता उचलून घ्यावा. हा मंत्र बत्ता उचलून घेण्याविषयी सविता देवाची प्रेरणा करवून देण्याला कारणभूत होतो. उभयता अश्विनीकुमार हे देवांचे अध्वर्यू आहेत, त्यांच्या बाहूंनीच जणू बत्ता उचलल्यासारखे व्हावे, म्हणून '.अश्विनोर्बाहुभ्याम् हा पूर्वोक्त मंत्राचा दुसरा अंश पठण करावा. पूषादेवाच्या हातांनी बत्ता उचलण्याचा प्रयत्न केल्यासारखे व्हावे म्हणून 'पूष्णो हस्ताभ्याम्' ह्या पूर्वोक्त मंत्राच्या तिसऱ्या अंशाचे पठण करावे.

पशूंची प्राप्ती करून देणारा सोमही पशुरूपच असून उचलून घेतलेला 'उपांशुसवन' संज्ञक बत्ता व्यानरूप आहे. यास्तव 'उपांशुसवन' नामक बत्त्यावर सोम कुटण्यासाठी मापून घ्यावा. त्या योगाने पशूंच्या ठिकाणी व्यानवायूंचे स्थापन केल्यासारखे होते. 'इंद्राय त्वा वृत्रघ्ने', 'इंद्राय त्वा वृत्रतुरे', 'इंद्राय त्वाऽभिमातिघ्ने', 'इंद्राय त्याऽदित्यवते' व 'इंद्राय त्वा विश्वदेव्यावते' असे मंत्र म्हणून सोमवल्लीच्या पांच जुड्या उपांशुसवन बत्त्यावर मोजून घ्याव्या. कारण, इंद्रासाठीच सोम आणलेला असतो.

पूर्वोक्त पांच मंत्र म्हणून सोमवल्लीच्या पांच जुड्या मोजून घ्याव्यात. पंक्ती छंद हा पांच अक्षरांच्या चरणांचा असतो. आणि यज्ञही पांच हविर्द्रव्यांनी केला जात असल्यामुळे तो पंक्तिछंदस्वरूप असतो. यास्तव, सोमवल्ली पांच मंत्रांनी पांच जुड्या मोजून घेतली म्हणजे यज्ञाला पांक्तत्व म्हणजे पंक्तिछंदस्वरूप प्राप्त होते. नंतर मंत्र न म्हणता पांच जुड्या मोजून घ्याव्यात. म्हणजे एकंदर जुड्या दहा होतात. 'विराट्' छंद दशाक्षरी चरणांचा असतो. अन्न हे विराट्छंदस्वरूप असते. यास्तव, विराट्छंदाशी स्वरूपसाम्य असलेल्या सोमवल्लीच्या दहा जुड्यांच्या योगाने जणू विराट्छंदाच्याच ठिकाणी सेवनीय अशा अन्नाची स्थापना केल्यासारखे होते. चमसातील उदक 'श्वात्रा: स्थ वृत्रतुरो' या मंत्राने सोमवल्लीवर शिंपडावे. हेच उदकदेवतांचे सोमपान होय. उदकदेवतांच्या सोमपानाचे हे स्वरूप जो जाणतो, तो केव्हाही उदकात बुडून मरत नाही. मोजून घेतलेल्या वल्लीरूप सोमराजाला 'यत्ते सोम दिवि ज्योति:' या मंत्राने स्पर्श करावा. असे केले असता, तीनही लोकांच्याकडून सोमराजाचे उत्तम प्रकारे पोषण केल्यासारखे होते.

सोमराजाने दिशांचे ध्यान केले आणि तो त्या दिशांच्या ठिकाणीच प्रविष्ट होऊन राहिला. यास्तव, होतृचमसातील उदकात सोमवल्लीच्या कांड्या त्रिवार ढवळताना 'प्रागपागुदगधराक्' इत्यादि मंत्र म्हणावा. असे केले असता दिशांच्या कडून आणलेल्या सोमाला दिशांचीच पुन्हा प्राप्ती करून दिल्यासारखे होते. पूर्वोक्त मंत्राच्या शेवटी 'अम्ब निष्वर' असे म्हणावे. असे केले असता स्त्रीरूप अशा उदकदेवतांच्याशी लडिवाळपणाने बोलल्यासारखे होते. अशा प्रकारे स्त्रीरूप उदकदेवतांच्याशी लडिवाळपणे संभाषण करण्याचे महत्त्व जो जाणतो, त्याला पाहून स्त्रिया कामुक होतात. त्याच्या सहवासाची इच्छा

करतात.

सोमवल्लीतून तीन वेळ दोन दोन मिळून सहा कांड्या वेगळ्या करून ठेवलेल्या असतात. त्या पुन्हा जोडीजोडीने सोमवल्लीत परत टाकताना 'यत्ते सोमादाभ्यं नाम जागृवि' हा मंत्र म्हणावा. कारण, सोमवल्लीतून घेतलेल्या कांड्या पुन्हा सोमवल्लीत परत टाकणे, हेच सोमराजाचे सोमपान होय. हे जो जाणतो, त्याच्यावर सोमयागासंबंधी केव्हाही संकट येत नाही. म्हणजे त्याच्या हातून घडणाऱ्या सोमयागात कसलेही विघ्न येत नाही व त्या यागाचा विच्छेद होत नाही.

सोमवल्लीला ऋत्विज कुटतात म्हणजे ते त्याचा घातच करीत असतात. यास्तव, कुटावयाच्या सोमवल्लीपैकीच जोडीजोडीने तीन वेळ अशा सहा कांड्या दूर काढून ठेवाव्यात. असे केले असता घातापासून सोमराजाचे रक्षण केल्यासारखे होते.

महाभिषवाचे वेळी म्हणजे सोम कुटावयाच्या मुख्य प्रसंगी पूर्वी बाजूस करून ठेवलेल्या कांड्या पुन्हा, कुटावयास घेतलेल्या सोमवल्लीत टाकाव्यात. असे केले असता, पशूंच्या ठिकाणी प्राणांचे स्थापन केल्यासारखे होते. सोमयागामध्ये सकाळी, मध्यान्हकाळी व अपराण्ह काळानंतर अशी तीन सवने, म्हणजे सोम कुटून त्याच्या रसाच्या यजनाचे विधी, व्हावयाचे असतात. यास्तव, बाजूस करून ठेवलेल्या सहा कांड्यांपैकी प्रत्येक सवनातील सोम कुटण्याच्या मुख्य प्रसंगी दोन दोन कांड्या, कुटावयास घेतलेल्या सोमवल्लीत परत टाकीत जाव्यात. कारण नेत्र, नासिका व कर्ण या तीन इंद्रियांच्या ठिकाणी असणाऱ्या दोन दोन छिद्रांच्या ठिकाणी प्राण विभक्त होऊन राहिलेले असतात.(अनुवाक ४)

'उपांशु' नांवाचा सोमग्रह हा प्राणरूप असून 'अंतर्याम', 'ऐंद्रवायव' इत्यादि सोमग्रह हे अपानादिवायुरूप आहेत. यास्तव, 'उपांशु' नांवाच्या सोमग्रहाने प्रथम ग्रहण करून नंतर इतर सोमग्रहांचे ग्रहण करावे. म्हणजे उपांशु नांवाचा सोमग्रह सोमरसाचे प्रथम भरून घ्यावा. आणि नंतर क्रमाने इतर सोमग्रह सोमरसाने भरून घ्यावेत. कारण मुख्य अशा 'प्राण' संज्ञक वायूला अनुसरूनच इतर अपानादि वायू संचार करीत असतात.

'उपवेशि' मुनीचा पुत्र 'अरुण' असे म्हणाला की, 'प्रातःसवनाच्याच

ठिकाणी मी संपूर्ण यज्ञाचे स्थापन करीन. आणि अशाप्रकारे तीन सवनांनी पूर्ण होणाऱ्या यज्ञाचे एका प्रात:सवनाचेच ठिकाणी स्थापन करून त्या यज्ञाच्या योगानेच अनुष्ठान चालवीन.' प्रात:सवनामध्ये महाभिषवाचे, म्हणजे सोम कुटण्याच्या मुख्य विधीचे तीन पर्याय किंवा खेपा केल्या जातात. अरुणमुनीच्या म्हणण्याप्रमाणे प्रात:सवनामध्येच सवनत्रयसाध्य असा यज्ञ पूर्ण करावयाची पद्धती अशी की, महाभिषवाच्या पहिल्या पर्यायाचे वेळी आठ वेळ सोम कुटावा. कारण, चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने गायत्री छंद हा अष्टाक्षरी असून प्रात:सवन हे गायत्रीछंदसंबध्द आहे. अर्थात् आठ वेळ सोम कुटला म्हणजे प्रात:सवनाचेच जणू संपादन केल्यासारखे होते. दुसऱ्या पर्यायायामध्ये अकरा वेळ सोम कुटावा. कारण, त्रिष्टुप् छंद हा अकरा अक्षरांच्या चरणांचा असून माध्यंदिन सवन हे त्रिष्टुप् छंदाशी संबद्ध असते. यास्तव, दुसऱ्या पर्यायात अकरा वेळ सोम कुटल्याच्या योगाने माध्यंदिन सवनाचेच जणू संपादन केल्यासारखे होते. तिसऱ्या पर्यायाच्या वेळी बारा वेळ सोम कुटावा. कारण, जगदी छंद हा बाराअक्षरी चरणांचा असून तृतीय सवन हे जगतीछंदसंबध्द आहे. यास्तव, तिसऱ्या पर्यायाच्या वेळी बारा वेळ सोम कुटल्याने तृतीय सवनाचेच जणू संपादन केल्यासारखे होते. एवं च, एकाच प्रात:सवनात तीनही सवनांचा समावेश करून सोमयागाची पूर्तता करण्याची हीच पद्धती असल्याचे सर्वत्र बोलले जाते. अशा प्रकारे यज्ञाची पूर्णता केली असता, तीन्ही सवनांनी पूर्ण केल्या जाणाऱ्या यज्ञामध्ये जर काही नष्ट झाले, म्हणजे अनुष्ठानात काही स्खलन झाले, तरी ते न झाल्यासारखे होऊन यज्ञ सर्वांगपूर्ण होतो.

कोणी म्हणतात की, अधिक अक्षरांनी केलेल्या मंत्रपठणास 'अतिवाद' अशी संज्ञा आहे. गायत्री छंदाच्या ठिकाणीच तेवढा 'अतिवाद' संभवत नाही. त्रिष्टुप् व जगती या छंदांत अधिक अक्षरांचे पठण होत असल्याने त्या दोन छंदांमध्ये अतिवाद निष्पन्न होत असतो. यास्तव, महाभिषवाच्या तीन्ही पर्यायांच्या ठिकाणी आठ आठ वेळच सोम कुटावा यद्यपि प्रात:सवनामध्ये प्रसंगोपात्त इतर छंदांचे पठण होत असले तरी प्रात:सवनाची अधिष्ठात्री देवता गायत्री असल्याने गायत्री छंदाच्या चरणाक्षरांच्या संख्येइतक्याच वेळा अर्थात् तीन्ही पर्यायांत आठच वेळ सोम कुटला गेला असता ते प्रात:सवन अतिवाददोषरहित होते.

ब्रह्मवादी असे म्हणतात की, 'उपांशु' ग्रहाखेरीज सर्व सोमग्रह 'दशापवित्र'

नांवाच्या वस्त्राने पुसून स्वच्छ केल्यानंतर सोमरसाने भरून घेतले जातात, तसा काही उपांशु ग्रह दशापवित्राने पुसून शुद्ध केला जात नाही. असे असल्यामुळे त्या उपांशु ग्रहाला कोण शुद्ध करतो? परंतु, ब्रह्मवाद्यांना, मंत्ररूप वाणीच त्या उपांशु ग्रहाला शुद्ध करते, असे उत्तर द्यावे, 'वाचस्पतये पवस्व वाजिन्' हा मंत्र म्हणून उपांशु ग्रह सोमरसाने भरून घ्यावा. म्हणजे अध्वर्यूने आपल्या मंत्ररूप वाणीकडूनच त्या सोमग्रहाला शुद्ध केल्यासारखे होते. 'वृषा वृष्णो अंशुभ्याम्' असा पूर्वोक्त मंत्राचा दुसरा अंश पठण करावा. कारण, उपांशु ग्रहावर, तो सोमरसाने भरला जाण्याच्या पूर्वी प्रतिप्रस्थात्याने ज्या दोन कांड्या ठेवलेल्या असतात त्या रसाचे वर्षण करणाऱ्या सोमाच्याच असतात. 'गभस्तिपूत:' हा त्यापुढील मंत्रभाग पठण करावा. म्हणजे सूर्याच्या किरणांनी त्या उपांशुग्रहाला पवित्र केल्यासारखे होते. 'देवो देवानां पवित्रमसि' हा त्यापुढील भाग होय. हा भाग पठण करावा. कारण, उपांशु ग्रह हा स्वत:च देवरूप होऊन देवांना पवित्र करीत असतो. 'येषां भागोऽसि तेभस्त्वा हा पूर्वोक्त मंत्राचा अंतिम भाग पठण करावा. असे केले असता ज्या देवांचा भाग म्हणून हा ग्रह सोमरसाने भरून घ्यावा लागतो त्यांच्या करताच तो अध्वर्यूने भरून घेतल्यासारखे होते. प्रतिप्रस्थात्याच्या हातून सोमरसाने भरलेला उपांशु ग्रह आपल्या हाती घेताना अध्वर्यूने 'स्वांकृतोऽसि' असे म्हणावे. म्हणजे त्याने त्या ग्रहाच्या रूपाने प्राणालाच जणू स्वीकारल्यासारखे होते. त्या उपांशुग्रहाकडे न्याहाळून पाहताना 'मधुमतीर्न इषस्कृधि' हा मंत्र म्हणावा. त्या योगाने त्या उपांशु ग्रहाला अध्वर्यूने सर्वतोपरी स्वादिष्ठ केल्यासारखे होते. उपांशुग्रहाच्या बुडापासून मुखापर्यंत त्याच्यावर हात फिरविताना पूर्वोक्त मंत्राचा, 'विश्वेभ्यस्त्वेन्द्रियेभ्यो दिव्येभ्य: पार्थिवेभ्य:' हा अंतिम भाग पठण करावा. म्हणजे अध्वर्यूने जणू काय देव व मनुष्ये या दोघांच्याही ठिकाणी प्राणांचे धारण केल्यासारखे होते. उपांशु ग्रह हाती घेऊन उठते वेळी अध्वर्यूने 'मनस्त्वाऽष्टु' हा मंत्र म्हणावा. कारण, मन हेच उपांशु ग्रहाला व्यापून राहत असते. उपांशु ग्रह आहवनीयाकडे घेऊन जाताना 'उर्वन्तरिक्षमन्विहि' हा मंत्र म्हणावा. कारण, प्राण हा अंतरिक्ष देवतेच्या स्वामित्वाखाली असतो. उपांशु ग्रहातील सोमरसाची आहवनीयावर आहुती देताना 'स्वाहा त्वा सुभव: सूर्याय' हा मंत्र म्हणावा. कारण प्राणवायुरूपी देवच स्वत:च्या शरीरामध्ये अवस्थित होऊन राहिलेले असतात. यास्तव, आता सांगितलेल्या मंत्राने

उपांशु ग्रहाची आहुती दिली असता, अध्वर्यूने स्वतःच्या शरीरातील प्राणवायुरूपी देवांना अप्रत्यक्षपणे आहुती दिल्यासारखे होते. आहुती दिल्यानंतर उपांशुग्रहात उरलेला सोमरस मधल्या परिधीस चोपडताना 'देवेभ्यस्त्वा मरीचिपेभ्यः' हा मंत्र म्हणावा. सूर्याचे किरण हेच मरीचिप नांवाचे देव होत. अर्थात् परिधीला चोपडला जाणारा सोमरसाचा भाग हा त्या देवांचा असतो. म्हणून या मंत्राने उर्वरित सोमरस मधल्या परिधीस चोपडला असता 'मरीचिप' देवांना अपेक्षित असलेला भाग देऊन त्यांना तृप्त केल्यासारखे होते. पर्जन्याने वृष्टी करावी. अशी इच्छा असल्यास पालथ्या हाताने सोमरस परिधीला चोपडावा. म्हणजे पर्जन्यवृष्टीला अधोभागी म्हणजे पृथ्वीकडे वळविल्यासारखे होते. पर्जन्यवृष्टी होऊ नये, अशी इच्छा असल्यास उताण्या हाताने परिधीस सोमरस चोपडावा. म्हणजे पर्जन्यवृष्टीला खाली येऊ न देता वरच्यावर थोपविल्यासारखे होते. आपल्या शत्रूवर अभिचार करावयाची अर्थात् त्याला मारण्याची इच्छा असल्यास, 'हे प्राणरूपी सूर्यदेवा, अमुक नांवाच्या माझ्या शत्रूला तू प्रथम मार, नंतर मी तुला आहुती देईन', अशा अर्थाचा 'अमुं जहाथ त्वा होष्यामि' हा मंत्र म्हणावा. म्हणजे हा मंत्र ऐकल्याबरोबरच आहुतीची अपेक्षा करणारा प्राणरूपी देव त्या शत्रूला मारतोच. वैरी जर दूरदेशी राहत असेल तर श्वास कोंडून धरावा व तशी अवस्था टिकेपर्यंत उभे राहावे. म्हणजे अध्वर्यूने केलेला तो श्वासनिरोध वैऱ्याच्या प्राणाकडे धाव घेऊन त्याला निश्चयाने ठार करतो.

नंतर उत्तरवेदीकडे परत फिरावे व उपांशुग्रहात उरलेला सोमरसाचा अवशेष 'एष ते योनिः' हा मंत्र म्हणून आग्रयण स्थालीत ओतावा. नंतर त्या रिकाम्या उपांशु ग्रहावर सोमवल्लीची कांडी ठेवावी व तो ग्रह उपांशुसवन नामक बत्त्याच्या सन्निध 'प्राणाय त्वा' या मंत्राने ठेवावा.

यजमानाच्या शत्रूवर अभिचार करण्याची अध्वर्यूची इच्छा असल्यास पूर्वोक्त जागी तो उपांशुनामक ग्रह ठेवताना 'अमुष्य त्वा प्राणे सादयामि' हा मंत्र, पूर्वोक्त 'प्राणाय त्वा' या मंत्राऐवजी म्हणावा. मंत्रातील 'अमुष्य' या पदाच्या जागी शत्रूच्या नांवाच्या षष्ठ्यन्त उच्चार करावा. असे केले असता, यजमानाच्या प्राणाचा नाश न होता तो उपांशु ग्रह जणू त्याच्या वैऱ्याच्या प्राणांवरच दडपून ठेवून त्याचा प्राण घेतल्यासारखे होते.

सोमवल्ली कुटून निघालेला रस, प्रतिप्रस्थात्याने हाती घेतलेल्या उपांशुसंज्ञक पात्रात जेव्हा अध्वर्यू घेतो, तेव्हा ते उपांशुसंज्ञक ग्रहपात्र इतर सोमग्रहांच्याप्रमाणे दशापवित्र नामक वस्त्राने पुसून शुद्ध (स्वच्छ) न करता, सोमवल्लीच्या सहा कांड्यांनीच ते शुद्ध करावे. कारण, वर्षाचे ऋतू सहा असतात. अर्थात् सहा कांड्यांनी ते उपांशुग्रहपात्र पुसून शुद्ध केले असता, सहा ऋतूंच्याकडूनच जणू ते पात्र शुद्ध केल्यासारखे होते. एकदमच सहा कांड्या घेऊन ते पात्र पुसू नये. तर अनुक्रमे दोन दोन कांड्यांनी तीन वेळ ते पात्र शुद्ध करावे. कारण, ब्रह्मांडामध्ये पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु हे तीन लोक आहेत. यास्तव, दोन दोन कांड्यांनी ते पात्र शुद्ध केले असता पृथ्व्यादि तीन्ही लोकांच्या कडूनच जणू ते उपांशुपात्र शुद्ध केल्यासारखे होते.

ब्रह्मवादी असे म्हणतात की, पशूंच्या समुदायामध्ये तीनच जातीचे पशू हातांनी वस्तू उचलणारे कशामुळे निर्माण झाले? या शंकेचे उत्तर असे की, उपांशु ग्रहाखेरीजचे सोमग्रह जसे दशापवित्र नांवाच्या वस्त्राच्या नाभीवरून पडणाऱ्या सोमरसाच्या धारेने भरून घेतले जातात, तसा उपांशु ग्रह भरून घेतला जात नाही. 'उपांशु' नामक ग्रहपात्रात सोमरस भरून घ्यावयाचा तो अध्वर्यूकडून ओंजळीने तीनदा सोमरसाने भरून घेतला जातो. एवं च, उपांशु पात्रात अध्वर्यू आपल्या दोनही हातांच्या अंजुलीने त्रिवार सोमरस भरून घेत असल्यामुळेच पशूंच्या समुदायापैकी मनुष्य, हत्ती व वानर किंवा माकड या तीन जातीचे पशू हातांनी वस्तू उचलून घेणारे निपजले आहेत. (अनुवाक ५).

यज्ञामध्ये देव जसे अनुष्ठान करीत तसेच असुरही करीत. तेव्हा देवांनी असुरांना भ्रांती उत्पन्न व्हावी म्हणून, उपांशुनामक सोमग्रहाचे यजन झाले म्हणजे तेथेच सोमयज्ञाची समाप्ती करण्याचे योजिले. व त्याचप्रमाणे गुप्तपणाने अनुष्ठान केले. अर्थात् उपांशु ग्रहाचे यजन होताच यज्ञ संपविला. पण देवांनी केलेला हा प्रकार असुरांना न समजल्यामुळे ते देवांच्यावर क्रुध्द झाले आणि ते वज्र उगारून देवांच्यावर धावून आले. तेव्हा देव भ्याले व आपल्या संरक्षणासाठी त्यांनी इंद्राकडे धाव घेतली. इंद्राने 'अंतर्याम' संज्ञक सोमग्रहाने क्रुध्द झालेल्या त्या असुरांना अंतर्हित केले, म्हणजे झाकून टाकले. देवांचे शत्रू असलेल्या असुरांना अंतर्हित करणे, झाकून टाकणे, हेच अंतर्यामसंज्ञक

सोमग्रहाचे अन्तर्यामत्व म्हणजे स्वभावगुण होय. यास्तव, इंद्राप्रमाणे अध्वर्यूनेही अंतर्यामसंज्ञक सोमग्रहाचे ग्रहण करावे. अशा प्रकारे केलेले अंतर्याम ग्रहाचे ग्रहण यजमानाच्या शत्रूंना अंतर्हित करते, म्हणजे झाकून टाकते.

अंतर्याम ग्रह सोमरसाने भरून घेताना म्हणावयाच्या 'उपयाम गृहीतोऽस्यन्तर्यच्छ' या मंत्रामध्ये असलेल्या 'अन्तस्ते दधामि द्यावापृथिवी अन्तरुर्वन्तरिक्षम्' हा अंश अध्वर्यू पठण करतो. या मंत्रांशाच्या पठणप्रभावाने यजमान पृथिव्यादि तीन्ही लोकांच्याकडून आपल्या शत्रूंना अंतर्हित करू शकतो.

देवांना असे वाटले की, यज्ञाचे अनुष्ठान करून जे ऐश्वर्य प्राप्त करून घेण्याचे आम्ही इच्छित होतो, ते सर्वच ऐश्वर्य आता इंद्राचे झाले आहे. मग देव इंद्राला म्हणाले की, हे मघवन् तुला प्राप्त झालेल्या ऐश्वर्यामध्ये तुझ्याबरोबर आम्हालाही तू वाटेकरी कर. तेव्हा इंद्राने 'सजोषा देवैखेरै: परैश्च' या वाक्याचा उच्चार करून देवांच्यामध्ये श्रेष्ठ असलेले व कनिष्ठ असलेले जे देव होते, त्या दोहोप्रकारच्याही देवांना, त्यांच्या म्हणण्यास अनुमोदन देऊन आपल्या बरोबरच त्यांना ऐश्वर्याचे वाटेकरी केले. यास्तव, अध्वर्यूनेही अंतर्याम ग्रहाचे ग्रहण करताना 'सजोषा देवैरवरै: परैश्च' या मंत्रविभागाचे पठण करावे. म्हणजे त्याने अंतर्याम ग्रहाच्या ठिकाणी श्रेष्ठ व कनिष्ठ अशा दोन्ही प्रकारच्या देवांना इंद्राबरोबरच सहभागी केल्यासारखे होते. 'अन्तर्यामे मघवन् मादयस्व' हा 'उपयामगृहीतोऽसि' या पूर्वोक्त मंत्राचा शेवटचा अंश पठण करावा. असे केल्याने अध्वर्यूने यजमानाला यज्ञापासून न अंतरविल्यासारखे होते. म्हणजे यज्ञ निर्विघ्नपणे पार पडून यजमानाला आनंद होतो. अंतर्याम ग्रह सोमरसाने भरून घेताना पूर्वोक्त 'उपयामगृहीतोऽसि' हा मंत्र म्हणावा. म्हणजे तो सर्व प्राण्यांचे ठिकाणी अपानवायूचे धारण करण्यास कारणभूत होतो.

'उपांशु' व 'अंतर्याम' हे दोनही सोमग्रह जर दशापवित्रनामक वस्त्रावरून गाळलेल्या सोमरसाने भरून घेतले नाहीत, तर प्राण व अपान यांच्या गतीचा नियमितपणा बिघडेल, आणि प्राण मर्यादेबाहेर ऊर्ध्वसंचारी होऊन मस्तकातून बाहेर निघून जाईल व त्याच्या मागोमाग अपानही निघून जाईल व यजमान मरेल. यासाठी उपांशु ग्रहात जसा सोमरस ओंजळीने भरून घेतला, तसा अंतर्याम ग्रहात न घेता, दशापवित्रावरून गळत असलेल्या सोमरसाने भरून

घ्यावा. असे केले असता यजमानाचे प्राण व अपान यांची गती असावी तशी नियमित राहते आणि यजमानाला धोका उत्पन्न होत नाही. उपांशु व अंतर्याम हे दोन सोमग्रह अनुक्रमे प्राणरूप व अपानरूप असून उपांशुसवन नांवाचा बत्ता हा व्यानवायुरूप आहे. आपल्या यजमानाला मृत्यू यावा, असे ज्या यजमानाबद्दल अध्वर्यूला वाटत असेल, त्याने त्या यजमानाच्या यज्ञात उपांशु व अंतर्याम हे दोन ग्रह उपांशुसवनसंज्ञक बत्त्याच्या दोन्ही बाजूंना एक एक असे चिकटून न ठेवता किंचित् अंतर टाकून ठेवावेत. म्हणजे व्यान वायूकडून त्याने आपल्या यजमानाच्या प्राण व अपान या दोन वायूंचा विच्छेद केल्यासारखे होते व त्यामुळे तो तत्काळ मरतो. आपला यजमान संपूर्ण आयुष्यमर्यादेपर्यंत जगावा. असे ज्या यजमानाबद्दल अध्वर्यूला वाटत असेल, त्याने त्या यजमानाच्या यज्ञात उपांशु व अंतर्याम हे ग्रह उपांशुसवनाच्या दोन्ही बाजूंना अगदी चिकटून ठेवावेत. म्हणजे त्याने आपल्या यजमानाचे प्राण व अपान हे दोनही वायू व्यानवायूशी सुसंबद्ध केल्यासारखे होतात व तो यजमान संपूर्ण आयुर्मर्यादेपर्यंत जगतो. (अनुवाक ६).

ऐंद्रवायव नांवाचा सोमग्रह हा वाग्रूप आहे. यास्तव, प्रथम 'ऐंद्रवायव' ग्रह घेऊन नंतर मैत्रावरुण, आश्विन हे चक्षुरिंद्रियरूप व श्रोत्रेंद्रियरूप असलेले ग्रह घेतले, म्हणजे वाणीलाच अनुसरून चक्षू व श्रोत्र ही इंद्रिये आपल्या कार्यास प्रवृत्त होतात. वायूला देव म्हणाले की, तुझ्या साहाय्याने आम्ही सोमराजाला मारू. तेव्हा वायू देवांना म्हणाला की, ठीक आहे. परंतु, तुम्हाला साहाय्य केल्याबद्दल प्रथम माझा ग्रह घेऊन नंतर तुमचे ग्रह घेतले जावेत, असा वर तुम्ही मला द्यावयास पाहिजे. देवांनी त्याच्या मागणीस अनुमती दिली. आणि त्याच्या साहाय्याने त्यांनी सोमराजाला मारले. यास्तव, ऐंद्रवायव ग्रह प्रथम घ्यावा व नंतर मैत्रावरुणादि ग्रह घ्यावेत म्हणजे त्या ग्रहाला अधिष्ठाता असलेला वायू सोमराजाचे हवन करण्याच्या कामी देवांना साहाय्य करतो. सोमवल्लीला अभिषव म्हणजे कुटणे, हेच त्या सोमराजाचे हनन होय.

वायूच्या साहाय्याने वल्लीरूप सोमराजाचे देवांनी हनन केल्यानंतर त्यांच्या ठिकाणी दुर्गंध उत्पन्न झाला. तो दुर्गंध नाहीसा करून सोमाला ते स्वादिष्ठ करू शकले नाहीत. तेव्हा ते वायूला म्हणाले की, आमच्याकरिता या सोमाच्या ठिकाणी तू स्वाद निर्माण कर. वायू म्हणाला, मी तसे करीन पण तुमची

सर्व ग्रहपात्रे 'मद्देवत्य' म्हणून उच्चारली गेली पाहिजेत. म्हणजे तुमच्या ग्रहपात्रांची अधिष्ठात्री देवता मी आहे, असे सर्वत्र बोलले गेले पाहिजे. देवांनी त्याचे म्हणणे मान्य केले. यास्तव, निरनिराळ्या देवतांची जशी ग्रहपात्रे असली तरी ती सर्व पात्रे 'वायव्य' म्हणजे वायुदेवतात्मक आहेत, असे सर्व याज्ञिक म्हणत असतात. देवांच्या इच्छेस्तव वायूनेच वल्लीरूप सोमराजाच्या ठिकाणचा दुर्गंध दूर करून त्याला पुन: स्वादिष्ठ केले. आणि म्हणूनच लोकव्यवहारामध्ये एखादी वस्तू वाजवीपेक्षा अधिक वेळ ओलसर राहिली म्हणजे ती दुर्गंधयुक्त होते. आणि त्या वस्तूतील ओलसरपणा सुकून तिच्या ठिकाणी पुन: पूर्ववत् स्वाद उत्पन्न होण्यासाठी जेथे चांगला वारा वाहत असेल तेथे ती वस्तू लोक पसरून ठेवीत असतात. अर्थात् त्या वस्तूला शुद्ध करून तिच्या ठिकाणी स्वाद उत्पन्न होण्याचे कार्य वायूच करीत असतो, हे आपण पाहतोच.

निरनिराळ्या देवतांच्यासाठी सोमग्रह सोमरसाने भरून घेताना म्हणावयाजोगा सर्वसाधारण मंत्र देवांना आढळेना. तेव्हा अदिती म्हणजे भूदेवता देवांना म्हणाली की, माझ्या नांवाने युक्त असलेल्या मंत्राने तुम्ही आपापले सोमग्रह ग्रहण करा. होमाचे वेळी जरी ते तुम्हा देवांचे असले तरी, सोमरसाने भरून घेऊन योग्य जागी ठेवताना ते 'मद्देवत्य' असोत, म्हणजे त्यांचे ग्रहण व आसादन करताना त्यांची देवता मी आहे, असे समजले जावे. असे म्हणून त्या भूमिदेवतेने 'उपयामगृहीतोऽसि' हा मंत्र सर्वसाधारण म्हणून देवांना सांगितला. देवांनी तिचे म्हणणे मान्य केले. सारांश, 'उपयामगृहीतोऽसि' या मंत्रप्रयोगामुळे व देवांनी दिलेल्या वरामुळे सर्व सोमग्रहपात्रे अदितिदेवतात्मक गणली जाऊ लागली. सोमरस भरून घेण्याची पात्रे दोन प्रकारची असतात. 'ग्रह' या नांवाची जी पात्रे असतात, ती लाकडाची असतात. आणि इतर स्थाली वगैरे जी पात्रे असतात ती मातीची असतात. 'उपयामा' हे भूमीचे नांव आहे. लाकडाची जी ग्रहपात्रे असतात ती भूमीपासून उत्पन्न झालेल्या वृक्षाच्या लाकडाची असतात व स्थाली इत्यादि जी पात्रे असतात ती प्रत्यक्षच भूमीच्या मृत्तिकेपासून निर्माण केली जातात. यासाठी 'उपयामगृहीतोऽसि' हा मंत्र सोमग्रहपात्रे भरून घेताना म्हटला जाणे युक्तच आहे.

वैदिक मंत्ररूप वाणी पूर्वकाळी समुद्राच्या घोषाप्रमाणे एकसारखी सलग अशी होती. अर्थात् तिच्या ठिकाणी, वाक्य, पद, प्रकृती, प्रत्यय हे विकार

निर्माण झालेले नव्हते. व्याकरणरहित अशीच सर्व मंत्रवाणी बोलली जात असे. तेव्हा देव इंद्राला म्हणाले की, आमच्या या मंत्ररूप वाणीला तू व्याकृत कर, म्हणजे व्याकरणयुक्त कर. तिच्या ठिकाणी वाक्य, पद, प्रकृती, प्रत्यय इत्यादि विकार उत्पन्न होऊ देत. तेव्हा इंद्राने त्या देवांच्याजवळ असा वर मागितला की, तुम्ही वायूकरता म्हणून जो सोमग्रह प्रथम भरून घ्याल तो माझ्याकरिता व वायूकरता बरोबरच घ्या. देवांनी तसे केले. यास्तव, सांप्रतही इंद्र व वायू या दोघांचा मिळून ऐंद्रवायव ग्रह घेतला जातो. देवांना अभिवचन दिल्याप्रमाणे इंद्राने मंत्ररूप वाणीमध्ये ठिकठिकाणी वाक्य, पद इत्यादि रूपांनी भेद निर्माण केले. तेव्हापासून मंत्रवाणी व्याकरणबद्ध अशी उच्चारण्यात येऊ लागली.

इंद्राने स्वत:च्यासाठी व वायूसाठी मिळून एकच सोमग्रह भरून घेण्याविषयी देवांच्याकडून एकच वर मिळविला आणि त्याने मंत्रवाणीमध्ये वाक्यपदादि भेद निर्माण केले म्हणून ऐंद्रवावय ग्रह घेते वेळी प्रथमत: वायूसाठी, नंतर मध्येच एकदा इंद्रासाठी व नंतर पुन्हा वायूसाठी सोमरसाचे ग्रहण करावे. एवं च, इंद्रासाठी एकदा व वायूसाठी दोनदा ग्रहण करावे. कारण वायूने दोन वर देवांच्याकडून मिळविले आहेत. एक ग्रहग्रहणाचा अग्रमान मिळविल्याचा व दुसरा सर्व सोमपात्रांना आपले नांव देण्याबद्दलचा. अर्थात् त्याच्यासाठी दोन वेळ सोमरस भरून देणे योग्यच आहे. (अनुवाक ७).

मित्राला म्हणजे सूर्याला देव म्हणाले की, तुला बरोबर घेऊन म्हणजे तुझे साहाय्य घेऊन आम्ही सोमराजाला मारतो. तेव्हा मित्र म्हणाला की, नाही. सोमराजाला मारण्याच्या कामात मी तुमचा साहाय्यक होणार नाही. कारण, मी सर्वांचा मित्र आहे. देव त्याला म्हणाले की, तू आमचाही मित्र आहेस. यास्तव, मित्रकार्य म्हणून तू आम्हास साहाय्य करच. तुझ्या साहाय्याने आम्ही सोमराजाला मारू. तेव्हा मित्र त्यांना म्हणाला की, मी तुम्हाला साहाय्य करीन. पण तुम्ही मला एक वर दिला पाहिजे. तो हाच की, माझ्यासाठी सोमग्रह घेतल्यावर त्या सोमरसात तुम्ही दूध मिसळावे. देवांनी त्याचे म्हणणे मान्य केले. म्हणूनच मैत्रावरुण ग्रह सोमरसाने भरून घेतल्यानंतर त्यात दुधाचे मिश्रण करीत असतात. मात्र मित्राने सोमवधाचे क्रूरकर्म केल्यापासून पशू त्याला भ्याले व त्याच्यापासून दूर निघून गेले.

वल्लीरूप सोम कुटून त्याच्या रसाने जो कोणी यज्ञ करतो तो खरोखरच क्रूरपणाचेच कृत्य करतो. अर्थात् त्या यजमानापासून पशू दूर निघून जातात. परंतु, मैत्रावरुण ग्रहामध्ये अध्वर्यूच्या हस्ते जर त्याने दुधाचे मिश्रण केले तर ते मिश्रण मित्रदेवाला आणि यज्ञकर्त्या यजमानालाही पशूंच्या योगाने समृद्ध करते.

'सोमवधासारखे क्रूर कर्म करणाऱ्या मजपासून पशू दूर निघून जातील', हे मित्राने अगोदरच जाणले होते. आणि म्हणूनच तर मैत्रावरुण ग्रहातील सोमरसात दुधाचे मिश्रण करण्याविषयीचा वर देवांकडून त्याने मिळविला होता.

देव वरुणाला म्हणाले की, सोमाचा दायाद म्हणजे हिस्सेदार असणाऱ्या तुझ्या साहाय्याने आम्ही सोमराजाचा वध करू. तेव्हा वरुण त्यांना म्हणाला की, मी तुमचे साहाय्य करीन. पण मी तुम्हांजवळ इतकाच वर मागतो की, मित्रासाठी जेव्हा तुम्ही सोमरस घ्याल तेव्हा त्याबरोबर माझ्याकरिताही त्याच ग्रहपात्रात सोमरस भरून घ्या. देवांनी त्याच्या इच्छेला अनुमती दिली. यासाठी मित्र व वरुण या दोघांच्यासाठी मैत्रावरुण नामक ग्रहपात्रात बरोबरच सोमरस घेतला जातो. देवांनी सोमाचा हिस्सेदार भाऊ असलेल्या वरुणाच्या साहाय्याने जसा सोमराजाचा वध केला त्याचप्रमाणे राजाचा दायाद म्हणजे हिस्सेदार भाऊ असलेल्या राजाच्या साहाय्याने राजाला, वैश्याचा दायाद असलेल्या वैश्याच्या साहाय्याने वैश्याला, आणि शूद्राचा दायाद असलेल्या शूद्राच्या साहाय्याने शूद्राला लोक ठार मारीत असतात.

पूर्वी सृष्ट्यारंभकाळी काळाचे स्वरूप अविभक्त होते. हा दिवस व ही रात्र अशा प्रकारचा त्यात काहीच भेद नव्हता. तेव्हा देव, मित्र व वरुण या दोघांना म्हणाले की, काळाचे असलेले अविभक्त स्वरूप तुम्ही आमच्याकरिता विभक्त करा. तेव्हा मित्र व वरुण देवांना म्हणाले की, आम्ही तुमचे कार्य करू. परंतु, तुम्ही आम्हाला एक वर द्यावा. तो हा की, आम्हा उभयतांसाठी सोमग्रह भरून घेण्यापूर्वी एकच सोमग्रह भरून घेतला जावा. देवांनी त्यांचे म्हणणे मान्य केले. यास्तव मैत्रावरुण ग्रह घेण्यापूर्वी ऐंद्रवायव हा एकच ग्रह घेतला जात असतो.

येथे अशी शंका उत्पन्न होण्याचा संभव आहे की, उपांशु व अंतर्याम हे दोन ग्रह देखील मैत्रावरुण ग्रह घेण्यापूर्वीच घेतलेले असतात. परंतु,

ही शंका बरोबर नाही. कारण उपांशु व अंतर्याम हे दोन ग्रह प्राणरूप व अपानरूप आहेत. प्राण व अपान या दोन वायूंची निष्पत्ती झाल्यानंतरच इतर इंद्रियांची स्थिती होत असते. अर्थात् चक्षुरादिइंद्रियरूप अशा ऐंद्रवायवादि ग्रहांच्या ग्रहणापूर्वीच प्राणापानरूप उपांशु व अंतर्याम या ग्रहांचे ग्रहण करण्यात येणे हे निर्विवादच आहे. त्यांच्याखेरीज इतर जे ग्रह घेतले जातात त्यांमध्ये मैत्रावरुण ग्रह घेण्यापूर्वी ऐंद्रवायव हा एकच ग्रह घेतला जात असतो.

देवांच्या पासून इच्छित वर मिळविल्यानंतर मित्र व वरुण या दोघांनी काळस्वरूपाची विभागणी केली. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतचा काळ मित्राने 'दिवस' म्हणून कल्पिला आणि सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंतचा काळ 'रात्र' म्हणून वरुणाने निश्चित केला. आणि तेव्हापासून काळाचे मूळचे अविभक्त स्वरूप दिवस व रात्र या नांवांनी दोन ठिकाणी विभागले गेले. एवं च, मित्र व वरुण यांनी कालविभागाचे कार्य केल्याच्या स्मरणासाठी 'मैत्रावरुण' नामक सोमग्रह घेतला जात असतो. (अनुवाक ८).

पूर्वकाळी एकदा यज्ञपुरुषाने देवांची काही वस्तू घेतली आणि त्यांच्याशी युद्ध करण्यासाठी दोरी चढवून सज्ज केलेले आपले धनुष्य त्याने आपल्या डाव्या हातात धरून उभे केले. धनुष्याचे एक टोक खाली भूमीला टेकलेले असून वरच्या बाजूस जे त्या धनुष्याचे दुसरे टोक होते, ते आपल्या गळ्याशी धरून यज्ञपुरुष उभा होता. इतक्यात धनुष्याचे जे टोक भूमीवर होते त्याला जखडून बांधलेली त्या धनुष्याची दोरी वाळवीने खाऊन तोडून टाकली. त्याबरोबर धनुष्याच्या कांबीचा बाक ढिला होऊन त्याचे वरचे टोक ताडकन् वर उचलले गेले आणि त्याच्या जबर हिसक्याने यज्ञपुरुषाचे शिरही धडावेगळे होऊन अंतराळात उडाले. तेव्हा देव उभयता अश्विनीकुमारांना म्हणाले की, तुम्ही उत्कृष्ट वैद्य आहा, त्या अर्थी आमच्यासाठी तुम्ही या यज्ञपुरुषाचे शिर पुन्हा त्याच्या धडाला चिकटून त्याला सजीव करा. तेव्हा अश्विनीकुमार म्हणाले की आम्ही यज्ञपुरुषाचे शिर त्याच्या धडाला चिकटवून त्यास पुन्हा सजीव करू. परंतु, या कामगिरीबद्दल तुम्ही आम्हास एक वर दिला पाहिजे. तो हा की, तुम्ही इतर देवांच्या बरोबर आम्हा उभयतांच्यासाठीही एक सोमग्रह भरून घेत जावा. देवांनी त्यांची मागणी मान्य केली व त्यांच्यासाठी एक सोमग्रह भरून घेतला. आणि मग अश्विनीकुमारांनी विच्छिन्न झालेले यज्ञपुरुषाचे शिर पुन्हा त्याच्या धडास जोडून त्याला सजीव केले. यास्तव,

यज्ञपुरुषावर आलेल्या शिरच्छेदरूप दुष्प्रसंगाची निष्कृती होण्यासाठी उभयता अश्विनीकुमारांच्यासाठी एक सोमग्रह भरून घ्यावा.

अश्विनीकुमारांच्या संबंधी देव असे म्हणत की, रोगचिकित्सा करून औषधोपचार करण्यासाठी मनुष्यसमाजात संचार करणारे हे दोघे अश्विनीकुमार अपवित्र आहेत. यास्तव, ब्राह्मणाने वैद्यकीचा धंदा करू नये. वैद्यकीचा धंदा जो ब्राह्मण करतो, तो अपवित्र व यज्ञकर्माशी संबंध ठेवण्यास अपात्र असतो. 'बहिष्पवमान' नांवाचे सामगान, हे वैद्यकीच्या धंद्याने येणारी अपवित्रता व यज्ञकर्मसंबंधाविषयीची अपात्रता दूर करणारे आहे, हे ध्यानी आणून देवांनी आपल्या यज्ञात बहिष्पवमान नामक सामाचे उद्गात्यांनी गान केल्यानंतरच, अपवित्रतेचा दोष दूर झालेल्या उभयता अश्विनीकुमारांच्यासाठी सोमग्रह भरून घेतला. सारांश, देवांचेच अनुकरण करून बहिष्पवमान साम गाइले गेल्यानंतर अश्विनीकुमारांच्यासाठी सोमग्रह भरून घ्यावा. बहिष्पवमान सामगानाचे हे महत्त्व जाणणाऱ्या विद्वान् यजमानाने आपल्या यज्ञात बहिष्पवमान सामाचे गान अवश्य करवावे. बहिष्पवमान साम हे स्वभावत:च अत्यंत पवित्र असते.

अग्नी, उदक व ब्राह्मण या तिघांच्या ठिकाणी भैषज्य म्हणजे रोगनिदान व तद्विषयक उपचारसामर्थ्य हे स्वभावत:च निष्पन्न झालेले असते व तेच देवांनी अश्विनीकुमारांच्या ठिकाणी स्थापन केले होते. यास्तव, रोगनिदान व तद्विषयक उपचार यांमध्ये निष्णात असलेल्या अश्विनीकुमारांचा अनुग्रह संपादन करण्यासाठी वैद्यकीचा धंदा करणाऱ्या ब्राह्मणाने औषधे तयार करताना आपल्या शेजारी उदकाने भरलेले एक पात्र ठेवावे. त्याच्या दक्षिण दिशेस एक ब्राह्मण बसवावा. आणि त्याच्या सन्निध अग्नी प्रज्वलित करून ठेवावा. आणि नंतर करावयाचे असेल ते औषध करावे. असे केल्याच्या योगाने औषध उत्कृष्ट गुणकारक होण्याला ज्या साधनभूत अंगांचे साहाय्य आवश्यक असते त्या अंगांच्या साहाय्यानेच ते औषध तयार केल्यासारखे होते. आणि ते अत्यंत गुणकारी बनते.

ब्रह्मवादी असे म्हणतात की, ऐंद्रवायव, मैत्रावरुण व आश्विन हे तीन सोमग्रह वस्तुत: दोन दोन देवतांच्यासाठी घ्यावयाचे असताना ते एकाच ग्रहपात्रात भरून घेतले जातात. आणि त्यांचे हवन मात्र दोन पात्रांनी केले जाते, हे काय म्हणून? या शंकेचे समाधान असे की, नेत्र, नासिका आणि

कर्ण ही इंद्रिये बाह्यत: जरी द्विघा झालेली असतात तरी त्यांच्या ठिकाणची तत्तत्कार्यक्षमशक्ती अंतर्यामी एकच असते. यास्तव, दोन देवतांच्यासाठी घ्यावयाचे असलेले पूर्वोक्त सोमग्रह एकाच ग्रहपात्रात भरून घेतले जातात. आणि ही नेत्रादि इंद्रिये बाह्यत: द्विघा झालेली असल्यामुळे त्या द्विदेवत्य म्हणजे दोन देवतांच्या उद्देशाने व्हावयाचे यजन दोन पात्रांनी केले जात असते.

ऐंद्रवायव, मैत्रावरुण व आश्विन हे द्विदेवत्यसंज्ञक तीन सोमग्रह प्राणरूप आहेत. आणि 'इडा' ही पशुरूप आहे. यास्तव, 'द्विदेवत्य' ग्रहांच्या पूर्वी जर इडेचे उपाह्वान केले तर पशूंच्या सह यजमानाचे प्राण त्याला सोडून दूर होतात व त्यामुळे तो मरतो. यास्तव, प्रथम द्विदेवत्य ग्रहांचे भक्षण करून नंतर इडेचे उपाव्हान करावे. असे केले असता यजमानाने जणू प्राणांना आपल्या ठिकाणी स्थिरतेने धारण करून पशूंनाही आपल्याजवळ केल्यासारखे होते.

ऐंद्रवायव ग्रह वाग्रूप असून मैत्रावरुण ग्रह हा चक्षुरूप आहे. आणि आश्विनसंज्ञक ग्रह हा श्रोत्रेंद्रियरूप आहे. यास्तव, ऐंद्रवायव ग्रहाचे भक्षण करताना तो ग्रह आपल्या समोर धरूनच त्याचे भक्षण करावे. कारण समोरच असलेल्या मुखाने प्रत्येकजण बोलत असतो. मैत्रावरुण ग्रहाचे भक्षण करतानाही तो ग्रह आपल्या समोर धरूनच त्याचे भक्षण करावे. कारण, समोर असलेल्या नेत्रेंद्रियानेच प्रत्येक माणूस पाहत असतो. आश्विन ग्रहाचे भक्षण करताना तो ग्रह आपल्या मस्तकाभोवती एकवार फिरवावा आणि मग त्याचे भक्षण करावे. कारण, मस्तकाच्या दोन्ही बाजूस असलेल्या कानांनी माणूस सर्व बाजूंच्या शब्दांचे श्रवण करतो.

द्विदेवत्यसंज्ञक ग्रह प्राणरूप आहेत. यास्तव, यजन झाल्यानंतर ती ग्रहपात्रे अध्वर्यूने रिकामीच त्या त्या जागी ठेवू नयेत. कारण मनुष्याच्या शरीराच्या अंतर्भागी जे प्राण असतात ते रिकामे म्हणजे कोरडे नसून जीवनरसाने आर्द्र झालेल्या स्थानाशी चिकटून असतात. विस्तीर्ण अशा यज्ञानुष्ठानापैकी अध्वर्यू जेव्हा एखादे कर्म करावयाचे विसरतो, तेव्हा जेथून ते कर्म अंतरलेले असते, त्या स्थानाला अनुलक्षून राक्षस चाल करून येतात व यज्ञाचा विघात करतात. यास्तव, प्राणभूत असे द्विदेवत्यग्रह अध्वर्यूने रिकामे न ठेवता ऐंद्रवायव ग्रहामध्ये पुरोडाशशकल, मैत्रावरुण ग्रहामध्ये आमिक्षा व आश्विन

ग्रहामध्ये धाना ठेवून त्या ग्रहांचे त्या त्या जागी आसादन करावे. म्हणजे त्या योगाने यज्ञानुष्ठानातील विस्मृत झालेले कर्म केल्यासारखे होऊन यज्ञ सांग असा होतो. अर्थात् असे करणे राक्षसांच्या संचारालाही प्रतिबंधक होते.

हविर्धानमंडपामध्ये दक्षिण दिशेस जो शकट उभा केलेला असतो, त्याच्या उत्तर बाजूच्या चाकोरीवर हे द्विदेवत्य ग्रह ओळीने ठेवावेत. शकटाच्या चाकाची ही चाकोरी वाग्रूप आहे. अर्थात् तिच्या ठिकाणी ग्रह ठेवले असता अध्वर्यूने जणू काय वाणीच्याच ठिकाणी वाणीचे स्थापन केल्यासारखे होते. तृतीय सवनापर्यंत हे तीनही ग्रह तेथेच राहू द्यावेत. अशा प्रकारे ग्रहांचे तेथे राहू देणे, यज्ञानुष्ठानाचे सातत्य राखण्याला कारणभूत होते. (अनुवाक ९).

बृहस्पती हा देवांचा पुरोहित असून शंड व मर्क हे असुरांचे पुरोहित होते. देव व असुर हे दोघेही आपापल्या पुरोहितांनी अनुष्ठित केलेल्या मंत्रसामर्थ्याने संपन्न असल्यामुळे ते परस्परांचा पराभव करू शकत नव्हते. तेव्हा देवांनी असुरांमध्ये फितुर उत्पन्न करण्याच्या इच्छेने शंड व मर्क या त्यांच्या दोघा पुरोहितांना एकांतामध्ये बोलावून आणले. आणि 'आमच्याविरुद्ध असुरांना तुम्ही साहाय्य करू नका', अशी त्यांची आर्जवाने विनवणी केली. तेव्हा त्या दोघांनी, 'तुमच्या यज्ञामध्ये आम्हाला तुम्ही भाग देत नाही, तरी अग्निष्टोम यज्ञामध्ये तुम्ही जर आम्हा दोघांच्यासाठी दोन सोमग्रह भरून घ्याल, तर आम्ही तुमच्या इच्छेप्रमाणे असुरांचे साहाय्यक न होता, तुमच्यामध्येच मिळून जाऊ', असा देवांना वर मागितला. देवांनी त्याच्या म्हणण्यास मान्यता दिली व तीप्रमाणे त्यांनी अग्निष्टोम यज्ञात शंड व मर्क या दोघांच्या नांवाने अनुक्रमे 'शुक्र' व 'मंथी' हे दोन सोमग्रह भरून घेतले. अर्थात् शंड व मर्क या दोघांनी असुरांना साहाय्य करण्याचे बंद केल्यामुळे देव विजयी झाले आणि असुरांचा पराभव झाला. या वृत्तांताचे रहस्य जाणणारा जो कोणी यजमान आपल्या अग्निष्टोम यज्ञात शंड व मर्क यांच्या नांवाने शुक्र व मंथी हे दोन ग्रह घेतो तो विजयी होतो व त्याच्या शत्रूचा पराभव होतो.

देवांचे विजयरूप कार्य सिध्द होताच देवांनी फितुर झालेल्या त्या शंड व मर्क या दोघांना आपल्यातून दूर केले. आणि शंड व मर्क यांच्या

नांवाने घेतलेल्या शुक्र व मंथी या नांवाच्या दोन सोमग्रहांचे यजन स्वपक्षीय अशा इंद्राच्या नांवाने केले. यासाठी शुक्रसंज्ञक सोमग्रहाचे यजन करण्यापूर्वी त्या ग्रहपात्राच्या खाली टेकणासारख्या धरलेल्या काष्ठशकलाने त्या ग्रहाच्या बुडाशी लागलेली धूळ झाडून टाकताना अध्वर्यूने 'अपनुत्त: शंड: सहामुना' असे म्हणावे. त्याचप्रमाणे प्रतिप्रस्थात्यानेही मंथी नामक ग्रहपात्राच्या बुडाशी असलेली धूळ झाडताना 'अपनुत्तो मर्क: सहामुना' असे म्हणावे. आता सांगितलेले मंत्र म्हणून धूळ झाडताना अध्वर्यू व प्रतिप्रस्थाता या दोघांनी, यजमान ज्याचा द्वेष करीत असेल व जो यजमानाचा द्वेष करीत असेल त्या मनुष्याच्या नांवाचे स्मरण करावे. यजमानाचा द्वेष्य किंवा द्वेष्टा यांच्या नांवाचे स्मरण म्हणजे मनामध्ये त्याचे नामग्रहण करणे होय. हे नामग्रहण पूर्वोक्त मंत्रातील 'अमुना' या पदाच्या जागी करावे. असे केले असता, यजमान ज्याचा द्वेष करतो अथवा यजमानाचा जो द्वेष करतो त्या मनुष्यासह अध्वर्यू व प्रतिप्रस्थाता या दोघांनी शंड व मर्क या दोघा असुरांना दूर केल्यासारखे होते.

अध्वर्यू व प्रतिप्रस्थाता या दोघांनीही अनुक्रमे शुक्र व मंथी या ग्रहांचे यजन करताना 'स प्रथम: संकृतिर्विश्वकर्मा' या मंत्राने आपल्या यज्ञाचे मुख्य दैवत असलेल्या इंद्रासाठी ते करावे. कारण, विश्वकर्मा, मित्र, वरुण इत्यादि देवतांची स्वरूपे इंद्रानेच धारण करून ती ती महत्कार्ये केलेली आहेत.

शुक्रग्रह हा आदित्यरूप असून मंथीनामक ग्रह चंद्ररूप आहे. यास्तव, हे दोन्ही ग्रह समित्शकलांनी झाकून घेऊन अध्वर्यू व प्रतिप्रस्थाता या दोघांनी आहवनीयाच्या पश्चिमेकडून पूर्वेकडे त्यांचे यजन करण्यासाठी जावे. कारण पश्चिम दिशेस अस्तास गेलेले सूर्यचंद्र उदय पावण्यासाठी पूर्व दिशेस जात असताना कोणासही दिसत नाहीत. आहवनीयाच्या पूर्वेस पश्चिमाभिमुख उभे राहून अध्वर्यू व प्रतिप्रस्थाता या दोघांनी अनुक्रमे शुक्र व मंथी या ग्रहांचे यजन करावे. कारण, पश्चिमाभिमुख होऊन सूर्य व चंद्र अस्तास जाताना सर्व लोक त्यांना पाहत असतात.

शुक्र व मंथी हे दोन सोमग्रह जणू काय, यज्ञाचे दोन नेत्रच असून उत्तरवेदी ही जणू यज्ञाची नासिका आहे. अध्वर्यू व प्रतिप्रस्थाता या दोघांनी शुक्र व मंथी या ग्रहांचे यजन करताना आहवनीयाच्या पूर्वेस जाताना उत्तर

वेदीच्या दोहो बाजूंनी वळसा घालून जावे. अध्वर्यूने दक्षिण बाजूने व प्रतिप्रस्थात्याने उत्तर बाजूने वळसा घालून पूर्वेस जावे. कारण, नासिकेच्या दोन बाजूस दोन नेत्र असतात. व नासिकेकडूनच दोन्ही नेत्रांचे धारण केले जात असते. अशा प्रकारे उत्तरवेदीचे सर्व बाजूंनी परिक्रमण केल्याने ते, राक्षसांचा नाश करण्यास कारणभूत होते.

देवांनी उत्तरवेदीच्या पूर्वेस पश्चिमाभिमुख उभे राहून ज्या आहुती दिल्या त्यांच्या योगाने पूर्व दिशेस जे असुर होते त्यांना त्यांनी हाकून लावले. आणि पश्चिम दिशेस पूर्वाभिमुख उभे राहून ज्या आहुती दिल्या त्यांच्या योगाने पश्चिम दिशेस असलेल्या असुरांना देवांनी हाकून लावले. यास्तव, चमसाध्वर्यूंनी चमसांच्या आहुती उत्तरवेदीच्या पश्चिमेस प्राङ्.मुख उभे राहून द्याव्यात आणि शुक्र व मंथी या दोन ग्रहांच्या आहुती अध्वर्यू व प्रतिप्रस्थाता या दोघांनी उत्तरवेदीच्या पूर्वेस पश्चिमाभिमुख उभे राहून द्याव्यात. असे केल्याने यजमान पश्चिम दिशेस व पूर्व दिशेस असणाऱ्या शत्रूंना दूर हाकून लावतो. काही आहुती प्राङ्.मुख व काही आहुती पश्चिमाभिमुख देण्याचे कारण असे की, प्रजा गर्भधारणकाली मातृशरीरात पूर्वाभिमुख प्रवेश करतात व जन्मताना पश्चिमाभिमुख होऊन मातृशरीरातून बाहेर पडतात.

शुक्र व मंथी या दोन सोमग्रहांना अनुलक्षूनच प्रजा उत्पन्न होतात. शुक्रग्रहाला अनुलक्षून उपभोग्य अशा विषयांचा उपभोग घेणाऱ्या ब्राह्मणादि उच्च जातीच्या प्रजा निर्माण होत असून मंथी ग्रहाला अनुलक्षून सेवकाचे काम करणाऱ्या हीन जातीच्या प्रजा निर्माण होत असतात. अध्वर्यूने शुक्रग्रह हाती घेऊन त्याचे यजन करण्यासाठी उत्तरवेदीच्या दक्षिणेकडून पूर्वेस जाताना 'सुवीराः प्रजाः प्रजनयन् परीहि शुक्रः शुक्रशोचिषा' हा मंत्र म्हणावा. व प्रतिप्रस्थात्याने मंथीग्रह हाती घेऊन उत्तरवेदीच्या उत्तरेकडून वळसा घालून पूर्वेस जाताना 'सुप्रजाः प्रजाः प्रजनयन् परीहि मंथी मंथिशोचिषा', हा मंत्र म्हणावा. शुक्र ग्रहाच्या मंत्रामध्ये 'सुवीराः' म्हणजे अत्यंत शूर म्हणून गणल्या जाणाऱ्या ज्या प्रजा त्याच 'अत्री' म्हणजे उपभोग्य अशा भोगांचा उपभोग करणाऱ्या उच्चजातीय प्रजा अभिप्रेत असून मंथी ग्रहाच्या मंत्रात 'सुप्रजाः' म्हणजे सुस्वभावी व आज्ञाधारक अशा सेवकाचे काम करणाऱ्या हीनजातीय प्रजा अभिप्रेत आहेत. आता सांगितलेल्या दोनही मंत्रांचे मर्म जो जाणतो,

त्या यजमानाला सुखोपभोग घेणाऱ्या पराक्रमी प्रजा प्राप्त होतात, सेवकांचे कार्य करणाऱ्या प्रजा प्राप्त होत नाहीत.

प्रजापतीचे नेत्रेंद्रिय व्याधिग्रस्त अर्थात् निकामी होऊन ते भूमीवर गळून पडले. ते वेकळीच्या वृक्षात शिरले. परंतु, तेथे ते टिकून राहिले नाही. ते सातूमध्ये प्रविष्ट झाले व त्यामध्येच रमले, म्हणजे टिकून राहिले. प्रजापतीचे नेत्रेंद्रिय यवांमध्ये म्हणजे सातूमध्येच रमणात होऊन राहिले, हेच त्या यवांचे यवत्व किंवा अंगस्वभाव होय. यास्तव, मंथीनामक ग्रहपात्र जर वेफळीच्या लाकडाचे केले व त्या पात्रात भरून घेतलेल्या सोमरसात अध्वर्यूने जर सातूंचे पीठ मिसळले, तर त्याने जणू काय प्रजापतीच्या नेत्रेंद्रियाचेच संपादन मंथीग्रहाच्या ठिकाणी केल्यासारखे होते.

इतर सोमग्रहांचे यजन झाल्यानतर त्यांत उरलेल्या सोमरसाचे भक्षण जसे सदोमंडपात बसून करतात तसे, मंथीग्रहाचे यजन झाल्यावर त्या पात्रातील सोमरसाचे भक्षण सदोमंडपात का करीत नाहीत? अशी काही ब्रह्मवादी वाटाघाट करतात. परंतु, त्यांच्या वाटाघाटीचे उत्तर असे द्यावे की, 'मंथीसंज्ञक ग्रहपात्र हे प्रजापतीच्या व्यथेने ग्रसित झालेल्या नेत्राशी संबध्द झालेले आहे. त्या पात्रात उरलेला हुतशेष सोमरस जर अध्वर्यू सदोमंडपात भक्षण करील, तर त्याचे नेत्रेंद्रिय व्याधिग्रस्त होऊन तो आंधळा होईल. यास्तव, मंथीपात्रातील हुतशेष रसाचे भक्षण अध्वर्यू सदोमंडपात करीत नाही. सद व हविर्धान या दोन मंडपांच्या मधल्या जागत हे भक्षण तो करतो. (अनुवाक १०).

देव आपल्या यज्ञात जसे अनुष्ठान करीत, तसेच असुरही आपल्या यज्ञात करीत. प्रथम आग्रयणसंज्ञक सोमग्रह भरून घेतल्यानंतर जे सोमग्रह सोमरसाने भरून घेतले जातात, ते 'आग्रयणाग्र' ग्रह होत. देवांनी आपल्या यज्ञात हे आग्रयणाग्र ग्रह घेण्यास योग्य आहेत, असे आपल्या वैचारिक दृष्टीने पाहिले. आणि त्याप्रमाणे त्यांनी आग्रयणादि ग्रहांचे ग्रहण केले. त्यामुळे ते अग्रमानाला, अर्थात् श्रेष्ठतेला प्राप्त झाले. आग्रयणाग्र ग्रहांचे हे माहात्म्य जाणणारा जो यजमान आपल्या यज्ञात आग्रयण ग्रह प्रथम सोमरसाने भरून घेऊन नंतर इतर ग्रह भरून घेतो, तो यजमान बरोबरीच्या लोकांमध्ये अग्रमान संपादन करतो.

शत्रुपीडित अशा यजमानाने 'त्रिंशत् त्रयश्च गणिनः' या रुग्णवतीसंज्ञक

ऋचेने आग्रयण ग्रह सोमरसाने भरून घ्यावा. असे केले असता त्याच्या शत्रूलाच तो रोगग्रस्त करून स्वत: बरोबरीच्या लोकांत अग्रमानाला प्राप्त होतो.

शत्रुपीडित नसलेल्या यजमानाने आग्रयण ग्रह घेताना 'ये देवा दिव्येकादश स्थ' हा मंत्र म्हणावा. या मंत्रात जितक्या देवतांची संख्या प्रदर्शित केली आहे तितक्याच देवता त्रैलोक्यामध्ये आहेत. यास्तव, या ऋचेने आग्रयण ग्रह सोमरसाने भरून घेतला असता, तो त्रैलोक्यातील सर्व देवतांच्यासाठी भरून घेतल्याप्रमाणे होते. हा ग्रह योग्य स्थानी ठेवताना 'एष ते योनिर्विश्वेभ्यस्त्वा देवेभ्य:' हा मंत्र म्हणावा. कारण, आग्रयण ग्रह देवतेच्या दृष्टीने 'वैश्वदेव' म्हणजे सर्वदेवतात्मक आहे.

काही निमित्ताने वाग्देवता यज्ञासाठीच ग्रहण केलेले आपले स्वरूप अदृश्य करून देवांच्यापासून दूर गेली. वाग्देवता निघून गेल्यानंतर देवांनी 'तूष्णीं' म्हणजे मंत्रांचे पठण न करताच सोमग्रह भरून घेतले. तेव्हा वाग्देवतेने आपल्याशी विचार केला की, हे देव मला वर देऊन माझा संतोष करण्याचे कर्तव्य तर करीत नाहीतच, उलट पक्षी, माझी अपेक्षा न करताच हे आपले यज्ञकार्य करीत आहेत आणि माझा त्याग करीत आहेत, हे बरे नव्हे. यास्तव, देवांच्या बोलावण्याची वाट न पाहता आपणच त्यांच्याकडे जावे, हे योग्य आहे. नंतर देव, आग्रयण ग्रहाचे ग्रहण करीत असताना आपण होऊनच ती वाग्देवता आग्रयण ग्रहासमोर येऊन उभी राहिली. देवांनी बोलावल्यावाचूनच वाग्देवता आग्रयण ग्रहाच्या संमुख आली, हेच त्या आग्रयण ग्रहाचे आग्रयणत्व म्हणजे स्वभावगुण होय.

यास्तव, आग्रयण ग्रहाचे ग्रहण करीपर्यंतचे ग्रह जसे 'तूष्णीं' म्हणजे मंत्र न म्हणता घेतले, तसे न करता 'आग्रयण' ग्रह ग्रहण केल्यावर 'वाग्विसर्ग' करावा म्हणजे मौन सोडून द्यावे आणि पुढचे सर्व ग्रह मंत्र म्हणून घेत जावेत.

येथे अशी शंका उत्पन्न होण्याचा संभव आहे की, आग्रयण ग्रहापर्यंतचे सर्व ग्रह 'तूष्णीं' म्हणजे मंत्र न म्हणता घेतले, असे वर्णन आताच करण्यात आले आहे, व आग्रयणापर्यंतचे सर्व ग्रह मंत्रपठणपूर्वक घ्यावयाचे असल्याचे विधान मागे येऊन गेलेले आहे, शिवाय ते ग्रह घेताना म्हणावयाचे मंत्रही

पूर्वी पठित झाले आहेत. यावरून, आता केलेले मंत्र न म्हणता ग्रह घेतल्याबद्दलचे विधान व पूर्वीचे समंत्रक ग्रह घेतल्याचे विधान यांमध्ये विरोध दिसून येतो. परंतु, या शंकेचे समाधान असे की, आता केलेल्या मंत्रपठणरहित ग्रह घेण्याच्या विधानातील 'तूष्णीं' शब्दाचा अर्थ पूर्णांशाने न घेता स्वल्पांशाने घ्यावयाचा आहे. म्हणजे अजीबात मंत्रच पठण न करता ग्रह घ्यावयाचे, असा अर्थ न घेता, जे मंत्र म्हणावयाचे ते वाणीने न उच्चारता मनातच म्हणावयाचे, असा अर्थ घ्यावयाचा आहे. आणि हे लक्षात घेतले म्हणजे पूर्वीच्या व आताच्या विधानांत विरोध नाही हे दिसून येईल. एवं च, आग्रयण ग्रह घेईपर्यंतचे ग्रह मनात मंत्र म्हणून घ्यावयाचे व त्यानंतरचे ग्रह मंत्रांचा उच्चार वाचेने करून घ्यावयाचे आहेत.

अरण्यामध्ये लपत छपत हिंडून शिकार करणाऱ्या पारध्यास 'त्सारी असे म्हणत असून त्या पारध्याने रानडुकरे, रानहत्ती यासारखे पशू बेसावधपणे धावता धावता फसले जाऊन अचानक त्यात पडले जातील असा एक जो मोठा खड्डा खणून ठेवलेला असतो त्यास 'आख' हे नांव आहे. या खड्ड्यापासून किती दूर आपण उभे राहिलो असता, आपणास पाहून शिकार पळून जाणार नाही, अथवा शिकारच आपल्यावर चाल करून येणार नाही, याविषयीचा विचार आपल्या मनात पारधी प्रथम करतो. आणि खड्ड्यापासून इतक्या दूर उभे राहिले असता आपल्यावर दोनही प्रकारच्या आपत्ती न येता, आपण आपल्या शिकारीवर नेमका बाण मारू शकू, असे निश्चित करून शिकारी तेथे उभा राहतो आणि नंतर शिकार आपल्या बाणाच्या टप्प्यात आलेली पाहताच तिच्यावर बाण सोडतो. त्याचप्रमाणे अध्वर्यू हा मनातल्या मनात मंत्र म्हणून आग्रयणापर्यंतचे काही ग्रह प्रथम भरून घेऊन यज्ञ आपल्या आटोक्यात आणतो व त्यानंतर पुढचे ग्रह मोठ्याने म्हणजे प्रकट ध्वनीने मंत्र म्हणून सोमरसाने भरून घेतो, असे तात्पर्य आहे.

आग्रयण ग्रह घेताना अध्वर्यूने तीन वेळ हिंकार करावा. म्हणजे 'हिम्, हिम्, हिम्' असे म्हणावे. सामगानामध्ये हिंकार करावा लागत असतो, हे प्रसिद्धच आहे. यास्तव, त्रिवार हिंकार केल्याच्या योगाने अध्वर्यू जणू काय उद्गाता, प्रस्तोर्ता व प्रतिहर्ती या तिघा सामगायकांचेच 'वरण' करतो.

आग्रयण ग्रह हा प्रजापतिरूप आहे. यास्तव, आग्रयण ग्रह भरून घेऊन

अध्वर्यू हिंकार करतो त्या योगाने प्रजापतीच जणू काय यजमानाच्या प्रजांच्या मस्तकाचे अवघ्राण करतो, म्हणजे यजमानाच्या प्रजांची टाळू प्रेमाने हुंगतो. कारण, वासरू निपजताच त्याचे मस्तक गाय प्रेमाने हुंगत असते, असा लोकव्यवहारच आहे.

आग्रयण ग्रह हा यज्ञाचा जणू आत्माच आहे. यास्तव, तीन्हीपैकी प्रत्येक सवनात आग्रयण ग्रह घेत जावा. म्हणजे अध्वर्यूने आत्म्याच्या ठिकाणी यज्ञाला निगडित केल्यासारखे होते. आग्रयण ग्रहाच्यावर एका घडवंचीवर दशापवित्र या नांवाचे गाळणे पसरलेले असते. त्यावर सोमरस ओतावा. म्हणजे यजमानाच्या प्रजोत्पादनसमर्थ अशा रेताचेच धारण केल्यासारखे होते. त्या गाळण्यावरून पडणाऱ्या सोमरसाच्या धारेखाली आग्रयण ग्रह धरावा आणि भरून घ्यावा. असे केल्याने यजमानाच्या प्रजांचे जणू जननच केल्यासारखे होते.

ब्रह्मवादी म्हणतात की, छंदांमध्ये गायत्री छंद हा लहान असताना तो तीनही सवनांचा भार कसा वाहतो? म्हणजे तीनही सवनांमध्ये पवमानसंज्ञक स्तोत्र गायत्री छंदातील ऋचांच्या आधाराने काय म्हणून गाइले जाते? यावर उत्तर असे की, आग्रयण ग्रह गायत्रीचा अर्थात् गायत्री छंदाचा जणू वत्सच आहे. आपल्यापासून जन्मलेल्या वासराला पाहताच गाय जशी चारा खावयाचे देखील टाकून त्या वासराकडे धाव घेते, त्याचप्रमाणे गायत्रीछंदरूपी गाय ही आपल्या आग्रयणग्रहरूपी वत्साकडे पुन्हा पुन्हा धाव घेते. सारांश, तीनही सवनांमध्ये अध्वर्यूने आग्रयण ग्रह सोमरसाने भरून घेणे युक्तच आहे. (अनुवाक ११).

प्रपाठक ५

इंद्राने वृत्रासुराला ठार मारण्याकरिता त्याच्यावर वज्र उगारले. इंद्राने आपल्यावर उगारलेले ते प्रखर वज्र पाहताच वृत्रासुर भ्याला आणि इंद्राला म्हणाला, 'हे इंद्रा मजवर तू या वज्राचा प्रहार करू नकोस. माझ्या ठिकाणी असलेले वीर्य अर्थात् अत्यंत श्रेष्ठ असलेली वस्तू मी तुला देतो'. असे म्हणून आपल्याजवळ असलेल्या उक्थ्यस्थालीमध्ये मंत्रपूर्वक घेतलेला सोमरस त्याने इंद्राला दिला. इंद्राने पुन्हा दुसऱ्या खेपेस वृत्रासुरावर वज्र उगारले.

तेव्हा वृत्रासुर म्हणाला, 'माझ्यावर वज्राचा प्रहार करू नकोस. मजजवळ असलेली अत्यंत श्रेष्ठ अशी वस्तू म्हणजे उक्थ्यस्थालीमध्ये समंत्रक भरून घेतलेला सोमरस मी तुला देतो'. असे म्हणून त्याने आपल्याजवळचा 'उक्थ्य' (उक्थ्य स्थालीत घेतलेला सोमरस) इंद्राला दिला. इंद्राला वृत्रासुराला मारल्यावाचून राहवेना. तेव्हा इंद्राने पुनः तिसऱ्या खेपेस वृत्रासुरावर घाव घालण्यासाठी आपले वज्र उभारले. याच वेळी विष्णू इंद्राजवळ येऊन उभा राहिला व म्हणाला, 'इंद्रा, अरे बघतोस काय? मी तुझ्या मदतीला आहे. या वृत्रासुराला तू मारच' या प्रसंगीही भ्यालेला वृत्रासुर इंद्राला म्हणाला. 'माझ्यावर तुझ्या वज्राचा प्रहार करू नकोस, माझ्या जवळचे सामर्थ्य, अर्थात् श्रेष्ठ अशा प्रकारची उक्थ्यसंज्ञक सोमरसरूपी वस्तू मी तुला देतो.' असे म्हणून वृत्रासुराने आपल्याजवळचा उक्थ्यसंज्ञक सोमरस इंद्राला दिला. अशा प्रकारे आपल्या जवळची उक्थ्यसंज्ञक सोमरसरूपी श्रेष्ठ वस्तू तीनदा इंद्राला देऊन टाकल्यामुळे इंद्राला मोहित करण्यास असमर्थ झालेला वृत्रासुर इंद्राकडून मारला गेला. उक्थ्य ग्रहाचे समंत्रक ग्रहण करून अनुष्ठित केलेला यज्ञ, हीच वृत्रासुराची इंद्राला मोह पाडणारी माया होय. तात्पर्य हे की, उक्थ्यसंज्ञक सोमग्रहाचे तीन वेळ ग्रहण करावे. अशा प्रकारे त्रिवार उक्थ्यग्रहण हे जणू अत्यंत श्रेष्ठ असे इंद्रियसामर्थ्य आहे. म्हणून अध्वर्यूने हे सामर्थ्य संपादन केले असता यज्ञकाली यजमान या सामर्थ्याच्या जोरावर आपल्या शत्रूचा नाश करू शकतो.

उक्थ्य स्थालीमध्ये सोमरस भरून घेताना 'इंद्राय त्वा बृहद्वते वयस्वते' हा मंत्र म्हणावा. म्हणजे तो उक्थ्य ग्रह अध्वर्यूने इंद्राला दिल्यासारखे होते. या मंत्राच्या शेवटी 'तस्मै त्वा विष्णवे त्वा' असे म्हणावे. कारण विष्णू इंद्राजवळ येऊन उभा राहिला व वृत्रासुराला मार, असे इंद्राला म्हणाला. यास्तव, आता सांगितलेला मंत्रांश शेवटी म्हटला असता, अध्वर्यूने इंद्राबरोबर विष्णूलाही त्या उक्थ्य ग्रहातील भाग दिल्यासारखे होते. उक्थ्य ग्रहाचे यजन प्रत्येक सवनात एकेकदा याप्रमाणे एकंदर तीन वेळ केले जात असते. यास्तव, एका लाकडी पात्रात उक्थ्य स्थालीतील तृतीयांश सोमरस ओतून त्याचे यजन करावे. याप्रमाणे एकंदर तीन वेळ उक्थ्य स्थालीतील सोमरसाचा तृतीयांश लाकडी पात्रात घेऊन तीन वेळा त्याचे यजन करावे. कारण, वृत्रासुराने उक्थ्य ग्रह तीन वेळ इंद्राला दिला होता.

लाकडी पात्रात उक्थ्य स्थालीतील सोमरस ओतून घेतल्यावर ते पात्र खाली ठेवताना 'एष ते योनिः' असा मंत्र म्हणावा व उक्थ्य स्थालीला स्पर्श करून 'पुनर्हविरसि' हा मंत्र म्हणावा. कारण, त्या स्थालीतील सोमरस पुन्हा पुन्हा घ्यावयाचा असतो.

उक्थ्यसंज्ञक सोमग्रह हा जणू यज्ञाचे चक्षुरिंद्रियच आहे. आणि म्हणूनच आहुतीरूपाने अग्नीमध्ये दिलेल्या उक्थ्य ग्रहातील सोमरसाच्या आहुतीला अनुलक्षूनच चमसात असलेले सर्व सोमरस आहुतीरूपाने दिले जात असतात. कारण, सर्वावयवसंपन्न असलेला माणूस चक्षूंना अनुलक्षूनच संचार करीत असतो. दृष्टी पुढे पसरत असते व तिच्या मागून माणूस चालत जातो. लोकव्यवहारात देखील आपणास असे दृष्टीस पडते की, पुढारी पुढे चालू लागला की त्याच्या मागून त्याचे अनुयायी चालत जातात. त्याचप्रमाणे एकच भाग्यवान पुरुष अनेकांना हितकर्ता होत असतो. व एकच पुरुष अनेक स्त्रिया वरतो.

यज्ञाचे यश यजमानाला न मिळता आपल्यालाच मिळावे, असे अध्वर्यूला वाटत असेल तर अध्वर्यूने उक्थ्य ग्रहाची आहुती दिल्यानंतर उरलेला सोमरस आहवनीय व हविर्धान यांच्यामध्ये उभे राहून होतृचमसात ओतावा. असे केले असता स्वतः अध्वर्यूच यज्ञाच्या यशाने संपन्न होतो. मी आपल्या यजमानाला यज्ञाच्या यशाने संपन्न करीन असे अध्वर्यूस वाटत असेल तर त्याने उक्थ्य ग्रहातील हुतशेष सोमरस सद व हविर्धान या दोन मंडपांच्या मध्ये उभे राहून होतृचमसात ओतावा. म्हणजे त्याने आपल्या यजमानाला यज्ञाच्या यशाने संपन्न केल्यासारखे होते.

सदोमंडपात बसलेल्या ऋत्विजांना यज्ञाचे यश मिळवून देऊन मी त्यांना संतुष्ट करीन, असे जर अध्वर्यूस वाटत असेल, तर त्याने सदोमंडपाला स्पर्श करून हुतशेष सोमरस होतृचमसात ओतावा. असे केले असता त्याने सदोमंडपात बसलेल्या ऋत्विजांना यज्ञाचे यश मिळवून देऊन त्यांना संतुष्ट केल्यासारखे होते. (अनुवाक १).

'ध्रुव' नांवाचा सोमग्रह हा जणू यज्ञाचे आयुष्यच आहे. सर्व ग्रहांचे ग्रहण केल्यानंतर शेवटी हा ध्रुवसंज्ञक ग्रह घेतला जातो. कारण सर्व इंद्रियगत प्राणांच्याहून आयुष्य हे श्रेष्ठ आहे. अर्थात् इंद्रियगत प्राणरूप असलेल्या ऐंद्रवायवादि ग्रहांचे ग्रहण केल्यानंतर सर्वश्रेष्ठ अशा आयुष्यरूप ग्रहाचे ग्रहण

करणे युक्त होय. 'मूर्धानं दिवो अरतिं पृथिव्याः' हा मंत्र पठण करून ध्रुव ग्रह सोमरसाने भरून घ्यावा. त्या योगाने बरोबरीच्या सर्व पुरुषांमध्ये आपल्या यजमानाला अध्वर्यूने श्रेष्ठ केल्यासारखे होते. 'वैश्वानरमृताय जातमग्निम्' हा त्या मंत्राचा दुसरा चरण आहे. कारण देवतेच्या दृष्टीने आयुष्य हे वैश्वानरदेवतात्मक आहे. या मंत्रानंतर जो 'उपायामगृहीतोऽसि' इत्यादि यजुर्मंत्र म्हटला जातो, त्यामध्येही वैश्वानर हा शब्द आला आहे. यामुळे पूर्वोक्त मंत्राच्या उत्तरार्धापूर्वी व नंतर अशा दोन वेळ 'वैश्वानर' शब्दाचा उच्चार करण्यात येतो. आणि म्हणून ध्रुव ग्रहास 'उभयतो वैश्वानर' अशी संज्ञा आहे. या ग्रहाच्या ग्रहणमंत्रात पूर्वार्धात व उत्तरार्धानंतरच्या यजुर्मंत्रात अशा प्रकारे खाली (पूर्वार्धात) आणि वर (उत्तरार्धानंतर) वैश्वानर शब्द योजला जातो. कारण काही इंद्रियांच्या प्राणशक्ती नाभीच्या वर व काहींच्या नाभीच्या अधोभागी असतात. यज्ञाचा पहिला अर्धाभाग संपादण्यासाठी इतर ग्रह घेतले जात असून पुढचा अर्धा भाग संपादण्याकरिता ध्रुव ग्रह घेतला जातो. आणि म्हणूनच नाभीच्या वरचा शरीराचा अर्धा भाग काही प्राण सुरक्षित ठेवतात व काही नाभीच्या खालच्या अर्ध्या भागाचे संरक्षण करतात.

भूमीवर माती पसरून केलेल्या 'खर' नांवाच्या ओट्यावर सोमरसाने भरून घेतलेले इतर ऐंद्रवायवादि ग्रह ठेवले जात असून ध्रुव ग्रह मात्र त्या ओट्यावर न ठेवता नुसत्या भूमीवर ठेवला जातो. कारण काही प्रजा म्हणजे गाईसारखे पशू हाडांच्या प्रमाणे कठिण असलेल्या खुरांच्या आधारावर उभे राहतात व काही प्रजा अर्थात् मनुष्ये पायांच्या तळव्यात असलेल्या मांसाच्या आधारावर उभे राहतात.

असुरांनी उत्तर दिशेकडून पृथ्वीवर आक्रमण करण्याची इच्छा केली. परंतु, देवांनी त्या दिशेस ध्रुव ग्रहाचे आसादन करून असुरांच्या आक्रमणाला प्रतिबंध केला. स्वतः स्थिर राहून असुरांच्या आक्रमणाला प्रतिबंध करणे, हेच त्या ध्रुव ग्रहाचे ध्रुवत्व किंवा स्वभावगुण होय. यास्तव, उत्तर दिशेस उभ्या असलेल्या हविर्धान शकटाच्या सन्निध ध्रुवा ग्रह ठेवणे हे यज्ञभूमीरूपी पृथ्वीचे धारण करण्याला कारणभूत होते. ध्रुव ग्रह हा यज्ञाचा आयुष्यरूप असून 'होता' हे यज्ञाचे शरीर आहे. यास्तव, होत्याच्या चमसात ध्रुव ग्रहातील सोमरस ओतावा. म्हणजे अध्वर्यूने जणू यज्ञाच्या शरीराचे ठिकाणी आयुष्याचे

धारण केल्यासारखे होते.

कोणी म्हणतात की, उक्थ्यसंज्ञक शस्त्राच्या पूर्वभागाचे शंसन (पठण) चालू असताना होतृचमसात ध्रुव ग्रहातील सोमरस ओतावा. कारण, मनुष्य हा आपल्या आयुष्याच्या पूर्वभागात म्हणजे बाल्यावस्थेत वरचेवर थोडे थोडे अन्न सेवन करीत असतो. कोणी म्हणतात की, उक्थ्य शस्त्राचा मध्य भाग पठण केला जात असताना होतृचमसात ध्रुव ग्रह ओतावा. कारण मनुष्य आपल्या आयुष्याच्या मध्यभागात म्हणजे तारुण्यावस्थेत भरपूर अन्न एकाच वेळच्या भोजनाचे प्रसंगी सेवन करीत असतो. कोणी म्हणतात की, उक्थ्य शस्त्राचा उत्तरार्ध म्हणजे शेवटचा भाग पठण केला जात असताना होतृचमसात ध्रुव ग्रहातील सोमरस ओतावा. कारण मनुष्य आपल्या उत्तरायुष्यात पचनशक्ती कमी झाली असूनही पुष्कळ अन्न खाण्याची इच्छा करीत असतो. परंतु, सिद्धान्त असा की, उक्थ्य शस्त्रातील 'वैश्वदेवी' म्हणजे 'उत नोऽहिर्बुध्न्यः' ही विश्वदेवलिंगात्मक ऋचा पठण केली जात असताना होतृचमसात ध्रुवग्रहातील सोमरस ओतावा. कारण सर्व प्रजा या 'वैश्वदेव्य' म्हणजे विश्वेदेवदेवात्मक असतात. यास्तव, वैश्वदेवी ऋचेच्या पठणाच्या वेळी होतृचमसात ध्रुव ग्रहातील सोमरस ओतला असता सर्व प्रजांच्या ठिकाणी आयुष्य स्थापन केल्यासारखे होते. (अनुवाक २).

यज्ञाचे अनुष्ठान करून देव स्वर्गलोकाला गेले. परंतु, स्वर्गलोकाला जाते वेळी त्यांनी असा विचार केला की, मनुष्येही यज्ञाचे अनुष्ठान करून आमच्या मागोमाग स्वर्गलोकी येतील. तेव्हा तसे होऊ नये म्हणून देवांनी संवत्सरात्मक कालविलंबाच्या योगाने मनुष्यांना मोह उत्पन्न करून ते स्वर्गाला गेले. तथापि, ऋषींनी ऋतुग्रहांच्या योगाने देवांनी मनुष्यांना उत्पन्न केलेला कालविलंबरूप मोह ओळखला आणि ऋतुग्रहांच्या यजनाने युक्त अशा यज्ञानुष्ठानाच्या साधनाने देवांच्या प्रमाणेच सर्व मनुष्यांना स्वर्गलोकी जाण्याचा मार्ग मोकळा केला. यासाठी स्वर्गलोकाचे ज्ञान होण्यासाठी ऋतुग्रहांचे ग्रहण करून त्यांचे यजन करावे. ऋतुग्रह बारा घ्यावेत. कारण संवत्सराचे बारा महिने असतात. अर्थात् बारा ऋतुग्रह घेतले असता, ते संवत्सरात्मक कालाचे ज्ञान करून देण्यास कारणभूत होतात. अध्वर्यू व प्रतिप्रस्थाता यांनी पहिले दोन व शेवटचे दोन ग्रह बरोबरच भरून घ्यावेत. कारण दोन दोन महिन्यांचे ऋतू

असतात. ऋतुग्रह भरून घेण्याच्या पात्राला दोन बाजूस दोन मुखे असावीत. कारण ऋतूंचे मुख म्हणजे आरंभक काल नेमका कोण जाणणार आहे?.

अध्वर्यूने पहिल्या, तिसऱ्या व पांचव्या ऋतुग्रहाच्या यजनाचे वेळी व प्रतिप्रस्थात्याने दुसऱ्या, चौथ्या व सहाव्या ऋतुग्रहाच्या यजनाचे वेळी 'ऋतुना प्रैष्य' असा प्रैष द्यावा. म्हणजे दोघांनी मिळून आता सांगितलेला प्रैष सहा वेळ द्यावा. कारण, ऋतू सहा आहेत. यास्तव, आता सांगितल्याप्रमाणे प्रैष दिला असता अध्वर्यू व प्रतिप्रस्थाता यांनी सहा ऋतूंना संतुष्ट केल्यासारखे होते. सातव्या व नवव्या ऋतुग्रहयजनाचे वेळी अध्वर्यूने आणि आठव्या व दहाव्या ऋतुग्रहयजनाचे वेळी प्रतिप्रस्थात्याने 'ऋतुभिःप्रेष्य' असा प्रैष द्यावा. अशा प्रकारे दोघांनी मिळून चार वेळ प्रैष दिला असता अध्वर्यूने व प्रतिप्रस्थात्याने चतुष्पाद अशा सर्व पशूंना संतुष्ट केल्यासारखे होते. नंतर, अकराव्या व बाराव्या ऋतुग्रहाचे यजन करताना अनुक्रमे अध्वर्यू व प्रतिप्रस्थाता या दोघांनी मिळून पुनः 'ऋतुना प्रेष्य' असा दोन वेळ प्रैष द्यावा. म्हणजे अध्वर्यूने व प्रतिप्रस्थात्याने द्विपाद अशा सर्व मनुष्यांना व पक्ष्यांना संतुष्ट केल्यासारखे होते. 'ऋतुना प्रेष्य' असा सहा वेळ व 'ऋतुभिः प्रेष्य' असा चार वेळ प्रैष दिला जातो. यामुळे चतुष्पाद असे सर्व पशू सहा ऋतूंच्या आश्रयावर आपले उपजीवन चालवितात. नंतर पुन्हा 'ऋतुना प्रैष्य' असा दोनदा प्रैष देण्यात येतो. त्यामुळे द्विपाद अशी सर्व मनुष्ये चतुष्पाद अशा पशूंच्या पासून मिळणाऱ्या दुग्धादि रसांच्या आधारावर आपले उपजीवन चालवितात.

'ऋतुना प्रेष्य' असे सहा वेळ, 'ऋतुभिः प्रेष्य' असे चार वेळ, आणि पुन्हा 'ऋतुना प्रेष्य' असे दोन वेळ प्रैष देऊन ऋतुग्रहांचे यजन करणारा यजमान आपल्याला स्वर्गलोकाला जाण्यासाठी जणू काय पूल किंवा शिडीच तयार करतो. पुलाच्या कमानी तळाशी खूप रुंद व ऊर्ध्व भागी त्याहून अरुंद असतात. शिडीच्या पायऱ्या तळाशी रुंद व उत्तरोत्तर अरुंदच असतात. त्याप्रमाणे विशाल संख्येने प्रारंभ करून आकुंचित संख्येने समाप्त केलेले प्रैष एखाद्या पुलाप्रमाणे किंवा शिडीप्रमाणे यजमानाला स्वर्गलोकी सुखाने जाऊन पोचण्याला कारणभूत होतात. ऋतुग्रहांचे यजन करण्यसाठी अध्वर्यू व प्रतिप्रस्थाता यांनी एक पुढे व एक मागे अशा रीतीने जाऊ नये. एकाने आपल्या हातातील ऋतुग्रहाचे यजन करून परत यावे, नंतर दुसऱ्याने जावे व यजन करावे, असा क्रम ठेवावा. एका पाठीमागे दुसरा अशा रीतीने जाऊन दोघांनी

बरोबर यजन केले तर एका ऋतूमध्येच दुसरा ऋतू घुसेल आणि त्यामुळे सर्व ऋतूंच्या मध्ये सांकर्य उत्पन्न होईल. ऋतुग्रहांचे यजन करण्यासाठी आहवनीयाकडे जाताना अध्वर्यूने उत्तरवेदीच्या दक्षिणेकडून व प्रतिप्रस्थात्याने उत्तरेकडून वळसा घालून जावे, हे उघड आहे. कारण, सूर्य सहा महिने दक्षिणेकडून व सहा महिने उत्तरेकडून संचार करीत असतो.

एखाद्या संवत्सरात एक तेरावा महिनाही येतो, असे कालमानज्ञ विद्वान् म्हणत असतात. म्हणून 'उपयामगृहीतोऽसि संसर्पोऽस्यंहस्पत्याय त्वा' या मंत्राने तेरावा ऋतुग्रह भरून त्याचेही यजन करावे. म्हणजे अध्वर्यूने एखाद्या संवत्सरात येणाऱ्या तेराव्या अधिक मासालाही संतुष्ट केल्यासारखे होते. (अनुवाक ३).

यजमानाला स्वर्गलोक प्राप्त व्हावा म्हणून ऋतुग्रह घेतले जात असतात. इंद्राग्नी या देवता ज्योतिरूप म्हणजे प्रकाशरूप आहेत. यास्तव, अध्वर्यूने ऋतुग्रहाचे यजन करून ज्यामध्ये सोमरस उरलेला आहे, अशा 'ऋतु' संज्ञक ग्रहपात्रातच इंद्राग्नी देवतांच्या यजनासाठी ऐंद्राग्न नांवाचा ग्रह घ्यावा. म्हणजे इंद्राग्नींच्याकरिता त्या ऋतुपात्रात 'इंद्राग्नी आगतं सुतम्' या मंत्राने सोमरस भरून घ्यावा. आणि त्याचे यजन करावे. असे केले असता ऋतुग्रहांच्या यजनप्रभावाने यजमानाला प्राप्त होणारा स्वर्गलोक त्याला दिसावा म्हणून अध्वर्यूने जणू काय 'ऐंद्राग्न' ग्रहरूपी प्रकाशाची मशालच उंचावर स्थापन केल्यासारखे होते व प्रकाश यजमानाला स्वर्गलोकाचा मार्ग व स्वर्गलोक स्पष्ट दिसावयास कारणीभूत होतो.

देवांमध्ये इंद्र व अग्नी हे दोन्ही देव 'बल' धारण करणारे आहेत. यास्तव, ऐंद्राग्नी ग्रह घेतला असता अध्वर्यूने जणू बलाचेच संपादन केल्यासारखे होते. 'विश्वेदेव' संज्ञक देवांच्यासाठी शुक्र नांवाच्या ग्रहपात्रात वैश्वदेव नांवाचा ग्रह घ्यावा. कारण, सर्व प्रजा या विश्वेदेवांच्याच आधिपत्याखाली असणाऱ्या असून शुक्र ग्रह हा सूर्यरूप आहे. यास्तव, शुक्रपात्रात वैश्वदेवसंज्ञक सोमग्रह भरून घ्यावा. कारण, शुक्रग्रहाचा अभिमानी असणारा सूर्य सर्व प्रजांच्या संमुख होऊन उदयास येतो व त्यामुळेच प्रजांच्यापैकी प्रत्येकजण हा सूर्य माझ्याच संमुख उदित झाला आहे असे मानतो.

वैश्वदेव ग्रह शुक्रपात्रात भरून घ्यावा. कारण सर्व प्रजा विश्वेदेवतात्मक असून शुक्र हा मूर्तिमंत तेजच आहे. अर्थात् वैश्वदेव ग्रह जर शुक्रपात्रात

भरून घेतला तर अध्वर्यूने जणू काय सर्व प्रजांच्या ठिकाणी तेजच स्थापन केल्यासारखे होते. (अनुवाक ४).

इंद्राने मरुतांच्याशी संगनमत करून माध्यंदिन सवनाच्या अनुष्ठानाच्या वेळी वृत्रासुराला मारले. यास्तव, माध्यंदिन सवनामध्ये मरुतांच्यासाठी जर 'मरुत्वतीय' संज्ञक ग्रह घेतले तर ते यजमानाच्या शत्रूचा नाश करण्यासाठीच घेतल्यासारखे होतात. वृत्रासुराला मारणाऱ्या त्या इंद्राला ऋतूंनी मोहित केले. तेव्हा त्या इंद्राने ऋतुपात्रानेच मरुत्वतीय ग्रह घेतले. त्या योगाने इंद्राला ऋतूंचे स्वरूप ओळखता आले. यास्तव, ऋतुपात्रामध्येच मरुत्वतीय ग्रह भरून घेतले असता ते यजमानाला ऋतूंच्या स्वरूपाचे ज्ञान होण्याला कारणभूत होतात. 'मरुत्वतीय' ग्रहांचे ग्रहण करून यजमान जणू आपल्या शत्रूवर वज्राचा प्रहारच करतो. पहिला मरुत्वतीय ग्रह घेऊन यजमान जणू काय वज्र उचलून हाती घेतो, दुसरा मरुत्वतीय ग्रह घेतल्याने तो जणू आपल्या शत्रूवर वज्राचा प्रहार करतो, आणि तिसऱ्या मरुत्वतीय ग्रहाच्या योगाने तो जणू काय आपल्या शत्रूला ठार करतो.

मरुत्वतीय ग्रह घेण्याच्या मिषाने यजमान जणू काय आपल्या शत्रूचा वध करण्यासाठी आयुधच सज्ज करतो. त्याने घेतलेला पहिला मरुत्वतीय ग्रह म्हणजे जणू त्याचे आपल्या हाती घेतलेले धनुष्य असून दुसरा मरुत्वतीय ग्रह ही जणू काय त्याने आपल्या हाती घेतलेल्या धनुष्यावर चढविलेली दोरी किंवा प्रत्यंचा होय. आणि त्याने घेतलेला तिसरा मरुत्वतीय ग्रह म्हणजे जणू काय त्याने आपल्या धनुष्याला लावलेला बाणच होय.

पहिल्या मरुत्वतीय ग्रहाच्या योगाने यजमान आपल्या हाती घेतलेल्या धनुष्याला बाण जोडतो, दुसऱ्या मरुत्वतीय ग्रहाच्या योगाने धनुष्याला जोडलेला बाण तो आपल्या शत्रूवर सोडतो व तिसऱ्या मरुत्वतीय ग्रहाने तो आपल्या शत्रूला त्या बाणाने ठार करतो.

इंद्राने वृत्राला मारल्यानंतर प्रबल अशा शत्रुकुलाबरोबर प्रबलविराधरूप असा अत्यंत अपराध आपण केला आहे, असे त्याला वाटले आणि त्या अपराधामुळे त्याच्या मनास भय वाटू लागले. तेव्हा भयग्रस्त असा तो इंद्र अत्यंत दूर पळून गेला आणि त्या पळण्याच्या परिश्रमामुळे त्याचे शरीर हिरवे पिवळे झाले. तेव्हा आपली भीती नष्ट होऊन आपणास पुन्हा उल्हास

प्राप्त होण्याचा उपाय म्हणून त्याने तीन मरुत्वतीय ग्रह घेतले. पहिला मरुत्वतीय ग्रह घेतल्याने त्याची भीती कमी होऊन त्याच्या प्राणाला शांतता व समाधान वाटले. दुसऱ्या मरुत्वतीय ग्रहाच्या योगाने त्याची भीती त्याहूनही कमी झाली आणि त्याच्या अपानवायूला शांतता व समाधान वाटले. आणि तिसऱ्या मरुत्वतीय ग्रहाने त्याची सर्व भीती नष्ट होऊन त्याचे मनही शांत व उल्लसित झाले.

इंद्राने जेव्हा वृत्रासुराला मारले तेव्हा देव म्हणू लागले की, वृत्रासुरासारख्या प्रबल असुराच्या वधाचे कार्य करून इंद्र आता पूर्वीपेक्षाही महान् पराक्रमी झाला आहे. आता त्याला 'महेंद्र' या नांवानेच उल्लेखणे योग्य होईल. वृत्रवधासारखे महान् कृत्य करणे, हेच त्या महेंद्राचे महेंद्रत्व होय. वस्तुत: इंद्राने पूर्वकल्पातील महेंद्राच्या उद्देशाने महेंद्रनामक ग्रह घेतला होता व त्या ग्रहाच्या यजनप्रभावानेच वृत्रासुराचा वध करून इतर देवांच्यामध्ये तो अधिक श्रेष्ठतेला प्राप्त झाला. यास्तव, सांप्रतकालीन सोमयागातही जर माहेंद्र ग्रह अध्वर्यूने घेतला तर तो यज्ञकर्त्या यजमानाचा उद्धार करील व इतर लोकांहून तो अधिक योग्यतेला चढेल.

महेंद्र देवतेसाठी घेतला जाणारा 'महेंद्र' संज्ञक ग्रह 'महान् इंद्रो य ओजसा' या मंत्राने भरून घ्यावा. माहेंद्र ग्रह हा जणू यजमानदेवतात्मक असून शुक्रग्रह हा तेजोरूप आहे. यास्तव, शुक्रपात्रातच जर माहेंद्र ग्रह घेतला तर तो यजमानाच्या ठिकाणी तेजाचे धारण करतो. (अनुवाक ५).

अदितीने पुत्रप्राप्तीच्या इच्छेने 'साध्य' देवांना संतुष्ट करण्यासाठी 'ब्रह्मौदन' नांवाचा चरू शिजवून त्याचा होम केला. होम करून उरलेला चरू तिने घेतला आणि तो भक्षण केला. हुतशेष चरूच्या भक्षणाच्या प्रभावामुळे तिने आपल्या गर्भाशयात वीर्य धारण केले आणि ती गरोदर झाली. नंतर योग्य काली ती प्रसूत होऊन तिला 'आदित्य' नांवाचे चार पुत्र झाले.

होम करून उरलेल्या चरूचे भक्षण केल्याने जर मला चार पुत्र झाले तर होम न करता चरू भक्षण केला तर त्या चौघांच्यापेक्षाही धनवंत असे पुत्र मला होतील, असा विचार अदितीच्या मनात आला व तिने पुन्हा दुसऱ्या खेपेस ब्रह्मौदन शिजवून होम न करताच त्या चरूचे भक्षण केले. चरुभक्षणाच्या योगाने तिने आपल्या गर्भाशयामध्ये वीर्य धारण केले.

परंतु, होम करण्यापूर्वीच चरू भक्षण करण्याच्या अपराधामुळे तिने धारण केलेल्या वीर्यापासून गर्भनिष्पत्ती न होता तिचा तो गर्भाशय गर्भशून्य असाच राहिला.

गर्भाच्या अभावी माझा गर्भाशय प्रस्तुत जरी संतप्त झाला असला तरी आता त्याच्या ठिकाणी गर्भधारणा व्हावी व त्या गर्भापासून मला माझ्या उपभोगास योग्य असा पुत्र व्हावा, अशी इच्छा करून तिने आदित्यांच्याच साठी तिसऱ्या खेपेस ब्रह्मौदन चरू शिजविला. आणि आदित्यांना त्या चरूची आहुती दिली. तेव्हा आदित्य अदितीला म्हणाले की, आम्ही तुझ्याजवळ एक वर मागतो. तो असा की, प्रस्तुत गर्भशून्य असलेल्या गर्भाशयाच्या ठिकाणी आमच्यापैकीच एक आदित्य गर्भरूपाने राहील व त्यापासून तुला पुत्र होईल. मात्र तुझ्यापासून ही जी आदित्यसंज्ञक प्रजा निर्माण होईल तीमध्ये जो समृद्ध असा निपजेल तो आमच्या उपभोगासाठी तत्पर होवो. एवं च, देवांनी मागून घेतलेल्या वराला अनुसरून अदितीला जो गर्भ राहिला त्यापासून 'विवस्वान्' नांवाचा आदित्य उत्पन्न झाला. आज ज्या मानवी प्रजा आपण पाहतो, त्या सर्व प्रजा या विवस्वान् आदित्यापासूनच परंपरेने निर्माण झालेल्या आहेत. या प्रजांमध्ये जो कोणी यजन करतो, तोच समृद्ध होतो आणि देवांच्या उपभोगाला पात्र होतो. म्हणजे तो यजन करून हविर्द्रव्यांच्या आहुती देवांना देतो व त्यांना तृप्त करतो.

देवांनी यज्ञ केला. परंतु त्या यज्ञात रुद्राला आहुती देण्याचे देव विसरले. तेव्हा रुद्र रागावला आणि तो आदित्यांच्या जवळ जाऊन त्यांना पीडा करू लागला. तेव्हा ते आदित्य 'ऐंद्रवायव' इत्यादि द्विदेवत्यसंज्ञक ग्रहांना शरण गेले. त्या ग्रहांच्या अधिष्ठात्या देवांनी आपल्याला शरण आलेल्या आदित्यांना पुन्हा कधीही रुद्रांच्या तडाख्यात सापडू दिले नाही. शत्रूंनी वध्य म्हणून ठरविलेला जर कोणी शरण आला तर थोर अंत:करणाचे पुरुष त्याला पाठीशी घालून त्याचे रक्षण करतात, त्याला परत शत्रूच्या स्वाधीन करीत नाहीत, असा लोकव्यवहारच आहे.

ज्या अर्थी आदित्य हे द्विदेवत्य ग्रहांना शरण गेले, त्या अर्थी 'ऐंद्रवायव' इत्यादि द्विदेवत्यसंज्ञक ग्रहांच्या ठिकाणी उरलेला हुतशेष सोमरस ओतून घेऊनच 'आदित्य' संज्ञक ग्रह घ्यावा. हुतशेष अशा चरूच्या भक्षणापासूनच अदितीच्या

ठिकाणी आदित्यांचा जन्म झाला असल्यामुळे ऐंद्रवायव इत्यादि द्विदेवत्य ग्रहांतील हुतशेष सोमरसातूनच आदित्य ग्रह घेणे युक्त आहे.

'कदाचन स्तरीरसि' इत्यादि तीन ऋचांनी आदित्य ग्रह घ्यावा. माता व पिता यांचे पुत्रासह जसे तीन अवयवांनी युक्त असे जोडपे असते, किंवा गर्भाला वेष्टून राहणारे 'उल्ब' संज्ञक उदक व गर्भाला वेष्टून राहणारे वस्त्रासारखे 'जरायू' या दोघांचे गर्भासह होणारे तीन अवयवयुक्त जोडपे असते, त्याचप्रमाणे पूर्वोक्त तीन ऋचा म्हणजे त्र्यवयवी असे एक ऋचांचे मिथुन म्हणजे दांपत्य किंवा जोडपेच होय.

आदित्यापासून होणाऱ्या पर्जन्यवृष्टीपासूनच पर्यायाने पशूंची उत्पत्ती होत असल्यामुळे आदित्यग्रह हा जणू पशुरूपच असून दही हे पर्यायाने सेवनीय असे अन्नच होय. यास्तव, आदित्य ग्रहात घेतलेल्या सोमरसामध्ये दही मिसळावे. 'कदाचन स्तरीरसि' हा पहिला मंत्र म्हणून एकदा सोमरस ओतून घ्यावा. 'कदाचन प्रयुच्छसि' हा मधला म्हणजे दुसरा मंत्र म्हणून त्या सोमरसात दही ओतावे. आणि 'यज्ञो देवानां' या तिसऱ्या मंत्राने त्यावर पुन्हा सोमरस ओतून घ्यावा. सारांश, आदित्य ग्रहामध्ये दोन वेळ सोमरस घेण्याच्या मध्येच एकदा दही घेतल्याच्या योगाने अध्वर्यूने जणू काय पशूंच्या ठिकाणी अन्नाचेच धारण केल्यासारखे होते. आदित्य ग्रहातील सोमरसात जे दही मिसळावयाचे ते 'शृतातंक्य' असे असावे. दूध कडकडित तापल्यानंतर दुधाचे भांडे अग्नीवरून खाली उतरवितात आणि त्या भांड्याचे बूड चांगले थंड झाले. म्हणजे त्यामध्ये विरजण घालतात. अशा प्रकारच्या विरजणापासून जे दही तयार होते, त्याचा उपयोग करण्याचा एरवी प्रचार आहे. परंतु, तापलेल्या दुधाचे भांडे अग्नीवरून खाली उतरविल्यावर ते तसेच कढत असताना त्यात विरजण घातल्याने जे दही निर्माण होते त्यास 'शृतातंक्य' अशी संज्ञा आहे. यास्तव, आदित्य ग्रहातील सोमरसात शृतातंक्य दही ओतले असता ते यज्ञयोग्यत्वाला प्राप्त होत असते. कच्चे गवत खाणारी गाय परिपक्व असे धारोष्ण दूधच लोकांना देते, असे व्यवहारात आपण पाहतच असतो.

आदित्य ग्रह हा जणू पशुरूपच आहे. यास्तव, आदित्य ग्रह भरून घेताना दर्भांनी त्यावर झाकण घालून नंतर तो भरून घ्यावा. असे केल्याच्या योगाने अध्वर्यूने पशूंना प्रतिबंध करून केवळ यजमानासाठीच आदित्य ग्रहाचे

ग्रहण केल्यासारखे होते. आदित्य ग्रह हा पशुरूप असून अग्नी हा रुद्ररूप आहे. यास्तव, दर्भांनी आच्छादित करून आदित्य ग्रह घेतला असता, घातुक अशा अग्निरूपी रुद्रापासून पशूंना दूर ठेवल्यासारखे होते.

उपांशुसवन या नांवाचा सोमवल्ली कुटावयाचा दगडी बत्ता हाच जणू विवस्वान् आदित्य होय. हा दगडी बत्ताच आदित्य ग्रहात घेतलेल्या सोमरसाच्या शेजारी तृतीय सवनाचे अनुष्ठान संपेपर्यंत निजलेला असतो. यासाठी आदित्य ग्रहात घेतलेल्या सोमरसात 'विवस्व आदित्यैष ते सोमपीथः' हा मंत्र म्हणून तो उपांशुसवन नामक बत्ता ठेवून तो सोमरस ढवळावा. असे केले असता अध्वर्यूने जणू काय आदित्य ग्रहातील सोमरसाने विवस्वान् नामक आदित्यालाच समृद्ध केल्यासारखे होते.

यजमान जर पर्जन्यवृष्टीची इच्छा करीत असेल तर अध्वर्यूने दगडी बत्त्याने सोमरस ढवळण्यापूर्वी त्या सोमरसात 'या दिव्या वृष्टिस्तया त्वा श्रीणामि', या मंत्राने दही मिसळावे. नंतर तो दधिमिश्र सोमरस उपांशुसवनसंज्ञक दगडी बत्त्याने ढवळावा. तो ढवळताना जर त्या दधिमिश्र सोमरसातील काही अंश झटकन बाहेर सांडला तर, जरी कित्येक दिवस पर्जन्यवृष्टी झालेली नसली तरी सत्वर पर्जन्य पडेल असे समजावे.

आदित्य ग्रह घेतल्यानंतर तो खाली ठेवू नये. कारण भूमीला स्पर्श न करताच प्रजा जन्माला येत असतात. आदित्य ग्रहाचे यजन एकदा केल्यावर 'अनुवषट्कार' करून त्याचे पुन्हा यजन करू नये. अनुवषट्कार करून जर त्याचे पुन्हा यजन केले तर अध्वर्यूने यजमानाच्या प्रजा रुद्राच्या कोपाला बळी दिल्यासारखे होईल. आदित्य ग्रहाचे यजन केल्यावर त्याच्याकडे पाहू नये. जर पाहिले तर अध्वर्यूचे डोळे जातील व तो मरेल. यासाठी यजन केल्यावर त्या ग्रहाचे अवलोकन करू नये. (अनुवाक ६).

आग्रयण ग्रहातून अंतर्यामनामक ग्रहपात्राने सावित्र नांवाचा ग्रह घ्यावा. म्हणजे आग्रयण ग्रहात असलेल्या सोमरसातील सोमरस 'वाममद्य सवितर्वाममु॒श्वो' या मंत्राने अंतर्याम संज्ञक ग्रहपात्रात भरून घ्यावा. कारण आग्रयण हा प्रजापतिरूप आहे. यास्तव, आग्रयण ग्रहातून 'सावित्र' घेतला असता तो प्रजांच्या उत्पत्तीला कारणभूत होतो. सावित्र ग्रह भरून घेतल्यावर तो खाली भूमीवर ठेवू नये. कारण भूमीला स्पर्श न करताच प्रजा जन्मास येत असतात.

त्याचप्रमाणे सावित्र ग्रहाचे यजन झाल्यावर पुन्हा अनुवषट्कार करू नये. अनुवषट्कार करून त्याचे जर पुन्हा यजन केले तर उत्पन्न होणाऱ्या प्रजा रुद्राला प्राप्त होतील.

देवांमध्ये सविता हा देव गायत्र म्हणजे गायत्री छंदसंबद्ध आहे. गायत्री छंदाचे प्राधान्य असलेल्या प्रात:सवनामध्ये आग्रयण ग्रह घेतला जात असतो. यास्तव, आग्रयण ग्रहातून जर अंतर्याम पात्रात सावित्र ग्रह भरून घेतला तर तो त्याच्या स्वकीय अशा स्थानातूनच घेतल्यासारखे होते.

विश्वेदेव हे तृतीय सवनाचे निर्वाहक होत. परंतु, स्वकीय अशा तृतीय सवनाचा भार वाहण्यास ते असमर्थ झाले. प्रात:सवन हे गायत्रीछंदप्रधान असल्याने गायत्रीछंदसंबद्ध अशा सावित्र ग्रहाचे ग्रहण प्रात:सवनामध्येच वस्तुत: योग्य होय. परंतु, विश्वेदेवांनी आपल्याशी सहकार्य करण्याकरता, त्याला तृतीय सवनात ओढून घेतला व त्याच्या सहकार्याने तृतीय सवनाचा भार विश्वेदेव वाहू शकले. यास्तव, तृतीय सवनाचा भार सहकारित्वाने वाहण्यास विश्वेदेवांच्या उपयोगी पडण्यासाठी सावित्र ग्रहाचे ग्रहण तृतीय सवनात करणे योग्य आहे.

पूर्वीचा 'अंतर्याम' परंतु, त्यात सावित्र ग्रह घेतल्यापासून 'सवितृपात्र' या संज्ञेला प्राप्त झालेल्या ग्रहपात्राने द्रोणकलशातून वैश्वदेव नांवाचा ग्रह सोमरसाने भरून घ्यावा. सर्व प्रजांचे विश्वेदेवांच्याकडून पालन होत असल्याने त्या वैश्वदेव्य' म्हणजे विश्वेदेवदेवतात्मक असून सर्व देवांच्यासाठी ज्यामध्ये सोमरस साठविण्यात येत असतो तो द्रोणकलशही विश्वेदेवदेवतात्मकच असतो. प्रजांच्या जन्मांचा सवितादेव हा सत्ताधीश आहे. यास्तव, सवितृपात्राने जर द्रोणकलशातून वैश्वदेव ग्रह घेतला, तर तो सवितादेवाच्या प्रेरणेने युक्त होऊन यजमानाच्यासाठी प्रजांची उत्पत्ती करतो.

सावित्र ग्रहामध्ये उरलेल्या हुतशेष सोमरसावरच 'वैश्वदेव' ग्रह घ्यावा. असे केले असता अध्वर्यूने जणू काय हुतशेष सोमरसाच्या ठिकाणी वैश्वदेवग्रहरूपी प्रजोत्पादन रेत स्थापन केल्यासारखे होते. वैश्वदेव ग्रह घेताना 'सुशर्माऽसि सुप्रतिष्ठानः' हा मंत्र म्हणावा. म्हणजे हुतशेष अशा सोमरसाच्याच ठिकाणी नवा सोमरस ग्रहण केल्यासारखे होते. आणि असे करणे यजमानाच्या प्रतिष्ठेला कारणभूत होते.

या वैश्वदेव ग्रहातच मनुष्ये, देव व पितर यांच्यासाठीही सोमरसाचे

ग्रहण केले जात असते. आता सांगितलेल्या मंत्राचा 'सुशर्माऽसि सुप्रतिष्ठानः' हा भाग उच्चारला गेल्याने उत्कृष्ट सुखाची इच्छा करणाऱ्या मनुष्यांच्यासाठी सोमरस घेतल्यासारखे होते. पूर्वोक्त भागाच्या पुढचा 'बृहदुक्षे' हा भाग उच्चारल्याने देवांच्यासाठी सोमरस घेतल्यासारखे होते. नंतर त्यापुढचा 'नमः' इत्यादि शेवटचा भाग उच्चारल्याच्या योगाने पितरांच्यासाठी सोमरसाचे ग्रहण केल्यासारखे होते.

मनुष्ये, देव, पितर इतक्याच देवता सोमग्रहणास योग्य आहेत. अर्थात् पूर्वोक्त मंत्र म्हणून वैश्वदेव ग्रह भरून घेतला असता, तो सर्वच देवतांच्यासाठी घेतल्याप्रमाणे होते. सोमरसाने भरून घेतलेला वैश्वदेव ग्रह 'एष ते योनिर्विश्वेभ्यस्त्वा देवेभ्यः' असे म्हणून भूमीवर त्याच्या जागी ठेवावा. कारण, हा ग्रह वैश्वदेव म्हणजे सर्वदेवतात्मकच आहे. (अनुवाक ७).

उपांशु ग्रह हा प्राणरूप असल्याचे पूर्वी सांगितलेच आहे. यास्तव, 'वाचस्पतये पवस्व' या मंत्राने घेण्यात येणारा पहिला व 'बृहस्पतिसुतस्य' या मंत्राने घेण्यात येणारा शेवटचा, हे दोन उपांशुसंज्ञक ग्रह ग्रहपात्रानेच भरून घ्यावेत. म्हणजे त्या योगाने प्राणरूप उपांशुग्रहाला अनुसरूनच त्यांचा प्रारंभ आणि समापन केल्यासारखे होते.

आग्रयण हा ग्रह प्रजापतिरूप असून उपांशुग्रह प्राणरूप आहे. पत्नीपासून प्रजा जन्मास येतात. यास्तव, उपांशुनामक ग्रहपात्रानेच आग्रयण ग्रहातून 'पात्नीवत' नांवाचा ग्रह भरून घ्यावा. म्हणजे तो पत्नीपासून प्रजांचे जनन करविण्यास कारणभूत होतो. आणि त्या प्रजा प्राणाला अनुसरून अर्थात् प्राणयुक्त होऊन जन्मास येतात.

'पात्नीवत' ग्रहाची उपेक्षा करून देवांनी, या ग्रहापासून, त्या ग्रहापासून, अशा प्रकारे अनेक ग्रहांच्यापासून स्वर्गलोकाचे ज्ञान होण्याची इच्छा केली. परंतु, त्यांना स्वर्गलोकाचे ज्ञान झाले नाही. तेव्हा त्यांना पात्नीवत ग्रह स्वर्गलोकाचे ज्ञान करून घ्यावयाचे साधन आहे, असे आढळून आले. आणि त्याप्रमाणे त्यांनी पात्नीवत ग्रहाचे ग्रहण केले. त्या योगाने त्यांना स्वर्गलोकाचे ज्ञान झाले. यास्तव, यजमानाला स्वर्गलोकाचे ज्ञान होण्यासाठी अध्वर्यूने पात्नीवत ग्रह भरून घ्यावा.

पात्नीवत ग्रह स्त्रीदेवतांच्यासाठी घेतला गेला, हे त्या ग्रहात घेतल्या

गेलेल्या सोमाला सहन झाले नाही. आणि त्यामुळे त्याने आपले स्वरूप त्या ग्रहाच्या ठिकाणी प्रकाशित केले नाही. तेव्हा घृतरूपी 'वज्र' तयार करून त्या वज्राचा त्या सोमावर प्रहार करण्यात आला. म्हणजे त्या सोमरसात घृतसिंचन करण्यात आले. त्याबरोबर त्या सोमाने आपले स्वरूप पात्नीवत ग्रहाच्या ठिकाणी प्रकाशित केले. परंतु, ते निर्वीर्य म्हणजे सामर्थ्यरहित असे झाले. ज्या अर्थी स्त्रीदेवतांच्यासाठी पात्नीवत ग्रहात भरून घेतलेला सोमरस निरिंद्रिय म्हणजे सामर्थ्यरहित ठरला त्या अर्थी निःस्वार्थ अशा स्त्रिया म्हणजे मुली आपल्या मातापितरांच्या धनांमध्ये मुलांच्याप्रमाणे दायविभागाच्या अधिकारी होत नाहीत. कारण पतित अशा पुरुषांपेक्षाही स्त्रियांचे स्वरूप अत्यंत हीन आहे, असे लोक बोलतात. एवं च, पात्नीवत ग्रहात भरून घेतलेला सोमरस अध्वर्यूने जर घृताने मिश्रित केला तर त्याने जणू काय घृतरूपी वज्राने सोमाला वश करून त्याचे ग्रहण केल्यासारखे होते. 'पात्नीवत' ग्रह घेताना 'उपयामगृहीतोऽसि' इत्यादि मंत्र म्हणावा. उत्पादन व धारण इत्यादिकांनी प्रजांचे व्यवस्थापन करणारी ही भूमी म्हणजेच उपयाम होय. यास्तव, आता सांगितलेला मंत्र म्हणून पात्नीवत ग्रह घेतला असता, या भूमीला अनुलक्षून प्रजा जन्मास येतात. पूर्वोक्त मंत्रामध्ये 'बृहस्पतिसुतस्य ते' हा अंश पठण केला जात असतो. कारण, बृहस्पती हा देवांमधील ब्राह्मण आहे. यास्तव, या अंशाचे पठण करून अध्वर्यूने जणू देवांमधील ब्राह्मणाच्या अनुग्रहानेच यजमानाकरता प्रजांची निर्मिती केल्यासारखे होते. पूर्वोक्त अंशानंतर 'इन्द्रो' हे पद उच्चारले जाते. 'इन्दु' हा शब्द द्रवरूप अशा सोमाचा उपलक्षक आहे. द्रवरूप सोमरस हे जणू रेत म्हणजे प्रजोत्पादक असे बीजच आहे. अर्थात् या पदाचा उच्चार करून अध्वर्यूने यजमानाच्या ठिकाणी प्रजोत्पादक अशा बीजाचेच स्थापन केल्यासारखे होते. नंतर 'इंद्रियाव' इत्यादि मंत्रांश पठण केला जातो. या मंत्रांशातील 'इंद्रिय' शब्द तत्कार्यभूत अशा प्रजांचा उपलक्षक आहे. तात्पर्य, इंद्रिय म्हणजेच प्रजा होत. यास्तव, या मंत्रांशाचा उच्चार करून अध्वर्यू आपल्या यजमानासाठी प्रजा जन्मास घालतो. नंतर 'अग्ना इ' असे म्हटले जाते. कारण, अग्नी हा रेताचे धारण करणारा आहे. त्यानंतर 'पत्नीवाः' असे म्हटले जाते. अग्नी व पत्नी या दोन शब्दांच्या ठिकाणी दांपत्यभाव उत्पन्न होण्यासाठीच जणू अध्वर्यू अग्नी या शब्दानंतर पत्नी या शब्दाचे उच्चारण करीत असतो. 'सजूर्देवेन त्वष्ट्रा सोमं पिब' हा

पूर्वोक्त मंत्राचा शेवटचा अंश अध्वर्यू उच्चारतो. त्वष्टा हा पशूंच्या ठिकाणी निरनिराळी स्वरूपे निर्माण करीत असतो. यास्तव, या अंतिम अंशाचे पठण करून अध्वर्यू जणू काय त्वष्ट्याकडून यजमानाच्या पशूंच्या ठिकाणी निरनिराळी रूपे स्थापन करतो.

देवांनी त्वष्ट्याचा छळ केला. तेव्हा तो देवांच्या पत्न्यांना शरण गेला. त्यांनी त्याला पाठीशी घातले आणि पुन्हा त्याला देवांच्या छळाला बळी पडू दिले नाही. त्याचे रक्षण केले. शरण आलेल्याला कोणीही थोर पुरुष त्याच्या शत्रूच्या स्वाधीन करीत नाहीत, असा व्यवहारच आहे. यासाठी देवांच्या पत्न्यांच्या साठी घेतल्या जाणाऱ्या पात्नीवत ग्रहामध्ये अध्वर्यू त्वष्ट्यासाठीही भाग घेत असतो. पात्नीवत ग्रहाचे भूमीवर आसादन करू नये. कारण भूमीला स्पर्श न करताच प्रजा जन्मास येत असतात. पात्नीवत ग्रहाच्या यजनाचे वेळी अनुवषट्कार करू नये. जर अनुवषट्कार केला तर यजमानाच्या प्रजा अध्वर्यूने रुद्राला अर्पण केल्यासारखे होईल. उलटपक्षी, अनुवषट्कार न केला तर अग्नीला शांत न करताच सोमाचे भक्षण केल्यासारखे होईल. यास्तव, पात्नीवत ग्रहाचे एकवार यजन झाल्यावर होत्याने उपांशु स्वराने अनुवषट्कार करावा आणि अध्वर्यूने पुन्हा आहुती द्यावी. असे केले असता अध्वर्यूने यजमानाच्या प्रजा रुद्राला दिल्यासारखे होत नाही आणि अग्नीलाही शांत करून सोमाचे भक्षण केल्यासारखे होते.

अध्वर्यूने 'अग्नीन्नेष्टुरुपस्थमासीदनेष्टः पत्नीमुदानय' म्हणजे, 'हे आग्नीध्रा, तू नेष्ट्याजवळ येऊन बैस, नेष्ट्या, तू पत्नीला उठवून इकडे आण', अशा अर्थाचा प्रैष द्यावा. कारण, आग्नीध्रच नेष्ट्याच्या ठिकाणी व नेष्टा पत्नीच्या ठिकाणी प्रजोत्पादनसमर्थ असे रेत स्थापन करतो. नेष्ट्याने उद्गात्याकडून प्रजांच्या उत्पादनाविषयी पत्नीला खुणेने सुचवावे. कारण, उद्गाता हा प्रजापतिरूप आहे. पत्नीने पन्नेजनीसंज्ञक स्थालीतील उदक आपल्या गुह्य स्थानाच्या ठिकाणी सिंचित करावे. अशा प्रकारे उदक सिंचित केल्याने पत्नीने जणू काय आपल्या गुह्य स्थानाच्या म्हणजे योनीच्या ठिकाणी प्रजोत्पादनसमर्थ असे रेतच सिंचित केल्यासारखे होते. पत्नीने आपल्या मांडीवरून उदक सिंचित करावे. म्हणजे ते उदक योनीच्या ठिकाणी जाऊन पोचते कारण, पुरुषही आपल्या मांड्यांच्या हालचालीने स्त्रीच्या योनीच्या ठिकाणी रेताचे

सिंचन करीत असतो. मांडीवरचे वस्त्र दूर करून तिच्यावर उदक सिंचन करावे. वस्त्र बाजूस सारल्यावर मांडी जेव्हा उघडी होते तेव्हा मांडी व उदक ही दोघे स्त्रीपुरुषांच्या दांपत्यरूपाला प्राप्त होतात. त्यानंतर उदकरूपी रेत पत्नीच्या योनीमध्ये सिंचित केले जाते आणि त्यानंतर त्या रेतापासून पत्नीच्या ठिकाणी प्रजा जन्मास येतात. (अनुवाक ८).

इंद्राने जेव्हा वृत्रासुराचा वध केला, तेव्हा त्या वृत्रासुराच्या मस्तकाची कवटी उताणी झाली. वृत्रासुराच्या मस्तकाची उताणी झालेली कवटी हाच द्रोणकलश म्हणजे सोमरस गाळून तो साठविण्याचे द्रोणाकार असे मोठे पात्र होय. वृत्रासुराच्या कवटीपासून निष्पन्न झालेल्या द्रोणकलशापासून स्रवित झालेला जो सोमरस, तोच 'हारियोजन' या संज्ञेला प्राप्त झाला. यास्तव, द्रोणकलशातील सोमरसानेच 'हारियोजन' ग्रह घ्यावा.

हारियोजन ग्रहाचे यजन करावे की करू नये, याविषयी इंद्राला विचार पडला. त्याला असे वाटले की, जर मी या हारियोजन ग्रहाचे यजन केले, तर अपक्व अशा सोमरसाचे यजन केल्यासारखे होईल, आणि यजन न केले तर यज्ञाचाच विघात मी केल्यासारखे होईल. शेवटी, इंद्राने हारियोजन ग्रहाचे यजन करावे, असे ठरविले. तेव्हा अग्नी इंद्राला म्हणाला की, अपक्व अशा सोमरसाने युक्त असलेल्या हारियोजन ग्रहाचे तू माझ्या ठिकाणी यजन करू नको. मग, इंद्राने त्या हारियोजन ग्रहातील सोमरस धानांनी म्हणजे भाजक्या सातूंनी मिश्रित केला. अर्थात् त्या सोमरसात धाना टाकल्या. तेव्हा तो सोमरस परिपक्व असा झाला. आणि नंतर त्या परिपक्वसोमयुक्त अशा हारियोजन ग्रहाचे इंद्राने यजन केले. यास्तव, अध्वर्यूने हारियोजन ग्रहातील सोमरस परिपक्व होण्यासाठी त्यात धानांचे मिश्रण करावे आणि नंतर परिपक्व अशा सोमरसाने युक्त अशा हारियोजन ग्रहाचे यजन करावे. पुष्कळ धानांनी सोमरस मिश्रित करावा. अर्थात् सोमरसात पुष्कळ धाना टाकाव्यात. कारण, त्या धाना जितक्या असतील तितक्या धाना, यजमान स्वर्गलोकी गेल्यावर त्याला कामधेनूरूपाने प्राप्त होतील.

विद्वान् याज्ञिक असे म्हणतात की, हारियोजन ग्रहातील धाना याच इंद्राच्या ठेंगण्या कामधेनूसंज्ञक गाई होत. सारांश, हारियोजनात पुष्कळ धाना मिसळाव्यात.

ऋचा व साम हे दोन इंद्राचे सोमपान करणारे घोडे असून आहवनीयाभोवती घातलेले परिधी हे जणू त्या दोन घोड्यांच्या मुखात अडकविलेले लगाम होत. परिधींचे अग्नीमध्ये प्रहरण करण्यापूर्वी, अर्थात् परिधी कायम असतानाच जर हारियोजन ग्रहाचे यजन केले, तर मुखात लगाम अडकलेला असतानाच त्या इंद्राच्या घोड्यांना सोमरसरूप घास खावयास दिल्यासारखे होईल. अर्थात् त्यांना त्या घासाचे भक्षण नीट करता येणार नाही. यास्तव परिधींचे अग्नीच्या ठिकाणी प्रहरण केल्यानंतर हारियोजन ग्रहाचे यजन करावे. म्हणजे त्या इंद्राच्या घोड्यांच्या मुखांतील लगाम काढून त्यांना सोमरसरूप घास खावयास दिल्यासारखे होईल.

हारियोजन ग्रहाचे यजन अध्वर्यूने न करता उन्नेत्याने करावे. कारण, प्रधान ग्रहांचे यजन समाप्त करण्यापर्यंतचे परिश्रम करून तो आता थकून गेलेला असतो. अर्थात् अध्वर्यूने हारियोजन ग्रहाचे यजन करणे, म्हणजे गाडी ओढून थकल्यामुळे मोकळ्या सोडलेल्या बैलाला पुन्हा गाडीला जुंपल्यासारख होय. हारियोजन ग्रह उन्नेत्याने आपल्या मस्तकावर ठेवावा. व तशाच स्थितीत ओणव्याने हारियोजन ग्रहाची आहुती द्यावी. कारण, हारियोजन ग्रह ज्यामध्ये घेतला आहे, असा द्रोणकलश वृत्रासुराच्या मस्तकापासूनच उत्पन्न झाला आहे. हारियोजनाची आहुती देतेवेळी 'आश्रावण' केलेल्या स्थलाच्या पुढे दोन पावले टाकावीत आणि नंतर आहुती द्यावी. कारण, इंद्राने वृत्रासुरावर चाल करून जाऊन त्याचा वध केला आहे. एवं च, अशा रीतीने केलेले यजन यजमानाच्या फलसमृध्दीला कारणभूत होते.

हारियोजनात मिश्र केलेल्या धाना पशुप्राप्तीला कारणभूत होणाऱ्या असल्यामुळे, त्या पशुरूप आहेत. यास्तव, हुतशेष धानांचे भक्षण करताना, त्या दातांनी चावून जर खंडित केल्या तर दूध इत्यादिकांनी परिपालन करणारे असे थोडे पशू यजमानाला प्राप्त होतील. आणि दातांनी चावून खंडित न केल्या तर यजमानाला पुष्कळ पशू प्राप्त होतील. परंतु, ते दूध वगैरे देऊन यजमानाचा प्रतिपाळ करणार नाहीत. यास्तव, धानांचे भक्षण करताना प्रत्यक्षत: त्या दातांनी न चावता, मनानेच त्या चावल्या अशी भावना करावी. म्हणजे त्या चावल्यासारख्या व न चावल्यासारख्या होतात. त्या योगाने यजमानाला थोडे पशू मिळणार नाहीत तर पुष्कळ मिळतील व ते त्याचा दुग्धादिकांनी

दोन आहुती द्याव्यात. त्या योगाने अध्वर्यू आपल्या यजमानाला स्वर्गलोकाच्या ठिकाणी चढवितो. 'अग्ने नय सुपथा' या 'नय' शब्दाने युक्त असलेल्या ऋचेने अग्निप्रशालेतील अग्नीवर आहुती द्यावी. आहुती दिल्यानंतर दर्भाला बांधून स्रुचीच्या मुखावर लोंबत ठेवलेले सुवर्ण 'दिवं गच्छ सुवः पत' हा मंत्र म्हणून वर उचलावे. त्या योगाने यजमानाला जणू स्वर्गलोकाच्या ठिकाणी पोचविल्यासारखे होते.

दक्षिणा म्हणून देण्यात येणाऱ्या गाईंच्या जवळ येताना 'रूपेण वो रूपमभ्यैमि' हा मंत्र म्हणावा. त्या योगाने 'सुवर्णाशी सदृश असे जे रूप तुम्हाला प्राप्त झाले आहे, त्याच सुवर्णसदृश अशा तुमच्या स्वरूपाला मी प्राप्त होईन', असेच जणू यजमानाने त्या गाईंना म्हटल्यासारखे होते. 'तुथो वो विश्ववेदा विभजतु' हा मंत्र म्हणून दक्षिणेच्या रूपाने ऋत्विजांना देण्यात येणाऱ्या गाईचे यजमानाने चार विभाग करावेत. हा मंत्र म्हणून विभाग केले असता, सर्वज्ञ असा 'तुथ' नांवाचा देव जसा देवांना द्यावयाच्या. दक्षिणेचे विभाग करतो, त्याचप्रमाणे दक्षिणारूप या गाईंचेही तो विभाग करतो. त्या त्या ऋत्विजाला तो तो दक्षिणाविभाग देणाऱ्या यजमानाने 'एतत्ते अग्ने राध ऐति सोमच्युतं' हा मंत्र म्हणावा. त्या योगाने यजमानाचे ते दक्षिणाद्रव्य सोमयागाची दक्षिणा म्हणून ऋत्विजांना दिल्यासारखे होते. 'ऋतस्य पथा प्रेत चंद्रदक्षिणा' असा पूर्वोक्त मंत्रातील एक अंश पठण केला जातो. ऋत हेच सत्य आहे. यास्तव, या मंत्रांशाच्या पठणाने ऋतरूप अशा सत्याला अनुसरूनच गोरूप दक्षिणाद्रव्याचे यजमानाने विभजन केल्यासारखे होते. नंतर 'यज्ञस्य पथा सुविता नयन्तीः' हा पूर्वोक्त मंत्राचा शेवटचा अंश उच्चारला जात असतो. त्या योगाने दक्षिणा म्हणून दिल्या जाणाऱ्या गाई सदोमंडप व शालामुखीयसंज्ञक गार्हपत्य अग्नी यांच्या मधून असलेल्या यज्ञमार्गाने जातात.

ऋत्विजांना गोरूप दक्षिणा देण्यापूर्वी यज्ञमंडपात विद्यमान असलेल्या आणि गोत्रोत्पन्न विद्वान् ब्राह्मणाला यजमानाने हिरण्य द्यावे. ते देताना 'ब्राह्मणमद्य राध्यासमृषिमार्षेयं' हा मंत्र म्हणावा. अत्रिगोत्रोत्पन्न असा हा ब्राह्मण वेदार्थज्ञ, वेदार्थवित् पित्याचा पुत्र व पित्याने उत्कृष्ट शिक्षण दिलेला असा असतो. यास्तव, हा मंत्र म्हणून त्या अत्रिगोत्रोत्पन्न ब्राह्मणाला हिरण्य देणे योग्य आहे. नंतर 'वि सुवः पश्य व्यंतरिक्षं' हा मंत्र म्हणून सदोमंडपाकडे पहावे.

किंवा द्रोणकलशरूप अंग आग्रयणग्रहरूप शरीराच्या ठिकाणी पुन्हा व्यवस्थितपणे जोडल्यासारखे होते.

आग्रयण ग्रह हा 'ये देवा दिव्येकादश स्थ' या अविज्ञात म्हणजे कोण्या एका देवतेचे स्पष्ट नांव नसलेल्या मंत्राने घेतला जात असल्याने त्याला 'अविज्ञात' अशी संज्ञा आहे. हा अविज्ञात किंवा आग्रयणनामक ग्रह मृन्मय स्थालीने घेतला जात असून त्याचे यजन मात्र लाकडी ग्रहपात्राने केले जाते. 'ये देवा दिव्येकादश स्थ' इत्यादिमंत्रोक्त देवतांच्या उद्देशाने मृन्मय स्थालीत आग्रयण ग्रह घेतल्यानेच त्या मंत्रोक्त देवता तृप्त होतात हे जरी खरे असले, तरी त्या मृन्मय स्थालीने त्याचा होम केला जात नसल्याने तो एक प्रकारे इतर ग्रहसमुदायातून परित्यक्त झाल्यासारख होतो. पती ग्रामांतरास गेला असता, त्याच्या स्त्रीच्या ठिकाणी जारापासून राहिलेला गर्भ तिच्या पतीला अविज्ञातच असतो, म्हणजे आपल्या स्त्रीच्या ठिकाणी गर्भ राहिल्याचे त्याला माहीतच नसते. अशाप्रकारे अविज्ञात गर्भापासून झालेला पुत्र ब्राह्मणसमुदायाकडून परित्यक्तच केला जात असतो. जो आग्रयण ग्रह कोणत्या विशिष्ट देवतेसाठी घेतला आहे याचे ज्ञान होत नाही असा अविज्ञातदेवतात्मक आग्रयण ग्रह इतर ग्रहांच्या समुदायापासून परित्यक्त व्हावा हे क्रमप्राप्तच आहे.

अवभृथासाठी जलाशयावर जाताना आग्रयण, उक्थ्य, ध्रुव व आदित्य हे ग्रह ज्यांमध्ये घेतलेले असतात त्या चारही मृन्मय स्थाल्या अर्थात् स्त्रीरूप यज्ञपात्रे वेदीतच टाकून देऊन पुरुषरूप असलेली इतर ग्रहपात्रे बरोबर घेऊन जात असतात. आणि याच विधीस अनुसरून लोकव्यहारातही उत्पन्न झालेली स्त्रीरूप प्रजा विवाहसंस्काराने पतिकुलात टाकून देतात, आणि पुत्ररूप पुरुषसंततीचे मात्र आपल्या घरी, उत्कृष्ट रीतीने परिपालन करीत असतात.

'उपयामगृहीतोऽसि' या मंत्राच्या पूर्वी 'आ वायो भूष शुचिपा:' अशा सारखी एखादी ऋचा म्हटली जात असते. म्हणून त्या ऋचेस 'पुरोऋक्' अशी संज्ञा आहे. या पुरोऋक्संज्ञक ऋचेचे पठण म्हणजे राजासारख्या श्रेष्ठ पुरुषाला भेटीदाखल अर्पण करण्यासाठी आणलेल्या वस्तूसारखे असून 'उपयामगृहीतोऽसि' या मंत्राने घेतला जाणारा ग्रह म्हणजे जणू भेटीदाखल आणलेली वस्तू ही मी आपणास भेट आणली आहे, असे म्हणून राजासारख्या श्रेष्ठ पुरुषापुढे ती वस्तू ठेवण्यासारखे होय. घेतलेला ग्रह 'एष ते योनि:'

या मंत्राने योग्य जागी ठेवणे, हे जणू काय भेट अर्पण केल्यानंतर आपल्या घरी परत जाण्यासारखे होय.

यज्ञाचे जे जे अंग सामाने किंवा यजुर्मंत्राने केले जाते, ते शिथिल असते. आणि ऋचेने जे अंग केले जाते ते दृढ म्हणजे घट्ट असते. यास्तव, 'उपयामगृहीतोऽस्यन्तर्यच्छ' इत्यादि यजुर्मंत्राने घेतल्या जाणाऱ्या ग्रहांना 'पुरस्तादुपयाम' अशी संज्ञा असून 'आ वायो भूष शुचिपाः' इत्यादि ऋचेचे प्रथम पठण करून नंतर 'उपयामगृहीतोऽसि' इत्यादि यजुर्मंत्र म्हणून घेतल्या जाणाऱ्या ग्रहांना 'उपरिष्टादुपयाम' अशी संज्ञा आहे. अशा दोन प्रकारांनी ग्रहांचे ग्रहण करणे हे, यजुर्मंत्राने शिथिल झालेल्या यज्ञांगाचे ठिकाणी ऋङ्.मंत्राच्या योगाने दृढता उत्पन्न होण्याला कारणभूत होते. (अनुवाक १०).

उपांशु व अंतर्याम या दोन ग्रहपात्रांचा उपयोग प्रातःसवनात केल्यानंतर पुन्हा तृतीय सवनातही केला जातो. आणि ऐंद्रवायव इत्यादि जी ग्रहपात्रे आहेत त्यांचा एकदाच उपयोग केल्यानंतर पुन्हा उपयोग केला जात नाही. ज्या ग्रहपात्रांचा उपयोग पुन्हा न करता एकवारच केला जातो त्यांच्या प्रभावाने यजमान स्वर्गलोकाला जिंकतो. स्वर्गलोक हा एकप्रयत्नसाध्य असा आहे. म्हणजे स्वर्गलोकी राहणाऱ्या यजमानाला पुढच्या जन्मीही स्वर्गलोकप्राप्तीचा कोणताही उपाय तेथे करता येत नाही. ज्या ग्रहपात्रांचा पुन्हा उपयोग केला जातो त्यांच्या प्रभावाने यजमान ह्या भूलोकाच्या ठिकाणी जय मिळवितो. भूलोक हा पुनःप्रयत्नसाध्य आहे. म्हणजे या भूलोकी राहणाऱ्या यजमानाला जन्मांतरी पुन्हा इहलोकाची प्राप्ती करून घेण्याचा प्रयत्न करता येतो.

एकदा उपयोग केल्यानंतर पुनः उपयोगात आणली जाणारी व एकदाच उपयोगात आणली जाणारी अशा दोन प्रकारची ग्रहपात्रे आहेत. एकदाच उपयोगात आणलेल्या ग्रहपात्रांच्या योगाने काही वनस्पती त्यांना येणारी फळे पिकल्यानंतर नष्ट होतात आणि पुनः उपयोगात आणल्या जाणाऱ्या ग्रहपात्रांच्या यजनप्रभावाने नष्ट झालेल्या त्या वनस्पती पुढच्या वर्षी पुनः उगवतात.

पुन्हा उपयोगात आणली जाणारी व एकदाच उपयुक्त केली जाणारी अशी दोन प्रकारची ग्रहपात्रे असल्याचे आताच सांगितले आहे. यांपैकी एकदाच उपयुक्त केलेल्या ग्रहपात्रांच्या यजनप्रभावाने सिंह, वाघ इत्यादि अरण्यसंचारी पशू केवळ अरण्यातच संचार करतात, गावात येत नाहीत. आणि पुनः

उपयोगात आणल्या जाणाऱ्या ग्रहपात्रांच्या यजनप्रभावाने गाई, म्हशी इत्यादि ग्राम्य पशू गवत खाण्यासाठी अरण्यात संचार करून पुन्हा गावांमध्ये परत येतात.

जो कोणी ग्रहांचे निदान म्हणजे मूळ कारण जाणतो, तो सर्व गोष्टींचे मूळ कारण जाणणारा होतो. आज्य, उक्थ्य, प्रउग अशा प्रकारची नांवे धारण करणारी शस्त्रे, म्हणजे प्रशंसात्मक अशा ऋचांचा समूह हेच त्या त्या ग्रहाचे मूळ कारण असते, हे जो ओळखतो, तो दीर्घायुषी अशा मातापित्यांनी संयुक्त होतो. शस्त्रांमध्ये देखील जे जे शस्त्र उपांशु म्हणजे हलक्या स्वराने पठण केले जाते, ते ते उपांशु व अंतर्याम या दोन ग्रहांचे, आणि जे जे शस्त्र उच्च स्वराने पठण केले जाते ते ते शस्त्र इतर सर्व ग्रहांचे मूळ कारण असते, हे सुद्धा जो जाणतो त्यालाही आता सांगितलेले फळ प्राप्त होते.

ग्रहांचे ठिकाणी असणारे मिथुन म्हणजे स्त्रीपुरुषात्मक दांपत्यभाव जो जाणतो तो अजा व पशू यांच्या योगाने उत्कर्षाला प्राप्त होतो. आग्रयण, उक्थ्य इत्यादि ग्रह स्थालीमध्ये घेतले जात असल्यामुळे ते स्त्रीरूप असून जे 'वायव्य' या सामान्य संज्ञेने ओळखल्या जाणाऱ्या ग्रहपात्रांच्या ठिकाणी घेतले जातात ते पुरुषरूप होत. सारांश, एकंदर ग्रहांमध्ये असलेले मिथुन किंवा स्त्रीपुरुषदांपत्यभाव जो जाणतो, तो प्रजा व पशू यांच्या अनेक दांपत्यांनी युक्त अशा समृद्ध स्थितीला प्राप्त करून घेतो.

इंद्राने त्वष्ट्याच्या विश्वरूपनामक पुत्राला मारले. त्यामुळे क्रुध्द झालेल्या त्वष्ट्याने इंद्राचा त्याग करून अर्थात् इंद्राचा सोमाहुती न देण्याचे ठरवून सोमयाग करावयास आरंभ केला. तेव्हा इंद्राने त्या सोमयागामध्ये येऊन बळजबरीनेच सोमपान केले. इंद्राने जबरदस्तीने व घाईघाईने गटागट प्राशन केलेला सोमरस त्याच्या उदरात चहूकडे पसरल्यामुळे इंद्राच्या उदरात अनेक प्रकारे पीडा उत्पन्न झाली व त्या पीडेने इंद्र व्याकुळ झाला. त्याला चैन पडेनासे झाले. काही केल्याने त्याला समाधान वाटेना. तेव्हा आपल्या पीडेचा निरास होऊन आपणास सुख होण्याला सवनीय पुरोडाश उपयुक्त होतील असे त्याच्या वैचारिक दृष्टीला आढळले. आणि त्याने त्याप्रमाणे सोमयागाच्या तीनही सवनांत पूर्वकल्पातील इंद्राच्या उद्देशाने सवनीय पुरोडाशांचा निर्वाप

करून त्यांचे यजन केले. आणि नंतर त्या हुतशेष पुरोडाशांचे जेव्हा त्याने भक्षण केले तेव्हा त्याच्या उदरातील पीडा नाहीशी होऊन त्याच्या अंत:करणास सुख उत्पन्न झाले. यास्तव, सोमयागातील तीनही सवनांमध्ये सवनीय पुरोडाशांचे निर्वपण करून त्यांचा याग करावा. आणि नंतर उरलेल्या त्या सवनीय पुरोडाशाचे भक्षण करावे. त्या योगाने भक्षण करणाराच्या मनाला सौख्य वाटते. अर्थात् प्राशन केलेला सोमरस उदरात चहूकडे पसरला गेला तरी तो पीडा देत नाही.

ब्रह्मवादी असे म्हणतात की, पांच संख्येने युक्त अशा समूहाला 'पंक्ति' अशी संज्ञा आहे. सोमयागामध्ये उपयुक्त केल्या जाणाऱ्या ऋचांच्या व यजुर्मंत्रांच्या ठिकाणी पांच संख्येचा नियमित असा समुच्चय कोठे आढळत नाही असे असताना यज्ञाचे पांक्तत्व म्हणजे पंक्तिस्वरूपता कशी ओळखावी? यज्ञ हा पांक्त किंवा पंक्तिरूप आहे, अशी घोषणा सर्वत्र कानी येते आणि त्यामध्ये योजिल्या जाणाऱ्या ऋग्यजुरूप मंत्रांमध्ये तर पांक्तत्व दिसत नाही. ब्रह्मवाद्यांच्या या प्रश्नाचे समाधान असे की, धाना (भाजलेले सातू), करंभ (भाजक्या सातूंचे तुपात कालविलेले पीठ), परिवाप (धानाच्या लाह्या), पुरोडाश आणि पयस्या म्हणजे तापलेल्या दुधात दही मिसळून ते नासल्यानंतर निर्माण होणारा पदार्थ, या पांच हविर्द्रव्यांचे सोमयज्ञात यजन केले जात असते. पांच या संख्येने युक्त असलेल्या हविर्द्रव्यसमूहाच्या यजनाने अनुष्ठित केला जाणे, हेच त्या यज्ञाचे पांक्तत्व म्हणजे पंक्तिस्वरूप होय. (अनुवाक ११).

प्रपाठक ६

स्वर्गलोक प्राप्त व्हावयासाठी करण्यात आलेल्या सोमयागाची सफलता व्हावी म्हणून अनुष्ठान करणाऱ्या सर्व ऋत्विजांना दक्षिणा देणाऱ्या यजमानाने पुढे सांगण्यात येणाऱ्या मंत्रांनी 'दाक्षिण' संज्ञक आज्याहुती द्याव्यात. दोन ऋचांनी गार्हपत्यावर दोन आहुती द्याव्यात. त्या आहुती द्विपाद असा यजमान सामाजामध्ये प्रतिष्ठेला प्राप्त होण्याला कारणभूत होतात. एका ऋचेने आग्नीध्रशालेतील अग्नीवर आहुती द्यावी. तिच्या योगाने यजमान अंतरिक्षलोकाचे आक्रमण करतो. ह्याप्रमाणे दोन ठिकाणी आहुती दिल्यानंतर 'सद' नामक मंडपात यावे. असे केले असता अध्वर्यू यजमानाला स्वर्गलोकी पोचवितो. 'उदुत्यं जातवेदसं' व 'चित्रं देवानां' या 'सौरी' म्हणजे सूर्यदेवतात्मक ऋचांनी गार्हपत्यावर

प्रतिपाळ करणारे होतील. उन्नेत्याच्या हाती असलेल्या हुतशेष धाना भक्षण करण्यासाठी इतर ऋत्विजांनी त्याची अनुज्ञा घेण्याची इच्छा करावी. असे केले असता ज्या धानांच्याशी हुतशेष सोमरस एकरूप झालेला असतो, तोच त्यांनी प्राप्त करून घेतल्यासारखे होते.

भक्षण केल्यानंतर द्रोणकलशात उरलेल्या सोमरससंयुक्त धाना उत्तरवेदीच्या ठिकाणी ओताव्यात. कारण, उत्तरवेदी ही पशुरूप असून हारियोजन ग्रहात टाकलेल्या धानाही पशुरूप आहेत. यास्तव, हुतशेष धाना उत्तरवेदीच्या ठिकाणी ओतल्या असता पशूंच्या समुदायातच पशूंची स्थापना केल्यासारखे होते. (अनुवाक १).

उपांशु इत्यादि ग्रहांना अनुसरूनच मानवी प्रजा व पशू उत्पन्न होतात. उपांशु व अंतर्याम या दोन ग्रहांच्या अनुरोधाने मनुष्ये उत्पन्न होतात. मुळात असलेला 'पुरुष' शब्द स्त्रीपुरुषरूप सर्व मनुष्यांचा उपलक्षक आहे. ऋतुग्रहांना अनुसरून एकखुराचे पशू जन्मतात व आदित्यग्रहास अनुलक्षून गाई जन्मास येतात. आदित्यग्रह हा अधिक ऋचांनी घेतला जातो. व त्यामुळेच आदित्य ग्रहाच्या अनुरोधाने उत्पन्न होणाऱ्या गाई इतर पशूंच्याहून अधिक गुणसंपन्न असतात. उपांशुग्रह हा दोन्ही हातांच्या ओंजळीने तीनदा घेतला जात असतो. आणि म्हणूनच शेळी तर खेपेस दोन किंवा तीन कोकरांना प्रसवते. अंतर्याम ग्रहाच्या ठिकाणी संकोचनिदर्शक असा संख्याविशेष श्रुतीमध्ये पठित नसल्यामुळे अंतर्याम ग्रहास अनुसरून उत्पन्न होणाऱ्या प्रजा अधिक संख्येने उत्पन्न होतात.

आग्रयण हा पिता असून द्रोणकलश हा जणू पुत्र आहे. यास्तव, आग्रयण ग्रहातील सोमरस जर ग्रहपात्रात जिरून कमी झाला, तर द्रोणकलशातून आग्रयण ग्रहात पुन्हा सोमरस भरून घ्यावा. वार्धक्याने शक्तिहीन झालेला पिता आपल्या जीवनासाठी आपल्या पुत्राजवळ जातो, तशाच प्रकारचे हे उदाहरण आहे. द्रोणकलशातील सोमरस जर कमी झाला तर आग्रयण ग्रहातील सोमरसाची त्यात भर घालावी. शक्तिहीन झालेला पुत्र आपल्या जीवनासाठी आपल्या पित्याकडे धाव घेतो तसाच हा प्रकार आहे. आग्रयण ग्रह हा जणू यज्ञाचा आत्मा म्हणजे शरीरच आहे. यास्तव, ग्रहातील किंवा द्रोणकलशातील सोमरस क्षीण झाला तर आग्रयण ग्रहातील सोमरस त्या क्षीण झालेल्या ग्रहात किंवा द्रोणकलशात ओतून घ्यावा. असे केल्याने क्षीण झालेले ग्रहरूप

म्हणजे तो आपल्याकडे अवलोकन करणाऱ्या यजमानाला स्वर्गलोकाला नेऊन पोचवितो. या मंत्राचा 'यतस्व सदस्यैः' असा शेवट आहे. त्याच्या पठणाने सदोमंडप जणू काय 'मंडपात बसलेल्या सदस्यांच्याशी तू मित्रत्व संपादण्याचा प्रयत्न कर' असेच यजमानाला म्हणतो.

ऋत्विज आपापल्या दक्षिणा म्हणून मिळालेल्या गाई आपल्या घरी नेत असताना 'अस्मद्दात्रा देवत्रा गच्छत मधुमतीः प्रदातारमाविशत' हा मंत्र त्या गाईंना अनुलक्षून म्हणावा. त्या योगाने 'आम्ही यज्ञकर्ते यजमान इहलोकी यज्ञ करून ऋत्विजांना तुमचे दान करीत असतो व आम्ही स्वर्गलोकी गेल्यावर तुम्ही मधुर अशा दुग्धरसाने संपन्न अशा होऊन आमच्या सन्निध येता', असेच त्या गाईंना यजमानाने म्हटल्यासारखे होते.

गोरूप दक्षिणेचा विभाग देण्यापूर्वी ऋत्विजाला प्रथम हिरण्य द्यावे. कारण, हिरण्य हे प्रकाश देणारे आहे. यास्तव, ऋत्विजाला दक्षिणेच्या पूर्वी हिरण्य दिले असता यजमान स्वर्गलोकी जाईल तेव्हा त्याला स्वर्गलोक स्पष्ट दिसण्यासाठी त्याच्यापुढे ते हिरण्य आपल्या ठिकाणच्या प्रकाशाची जणू मशालच धरते.

सर्व ऋत्विजांच्या पूर्वी आग्नीध्राला दक्षिणा द्यावी. म्हणजे ती आग्निप्रमुख अशा वसंतादिऋतूंना संतुष्ट करते. निरनिराळ्या यज्ञकर्मप्रसंगी ब्रह्म्याने अनुज्ञा द्यावयाची असते. म्हणून ब्रह्म्याला दक्षिणा द्यावी. होता हा जणू यज्ञाचा आत्मा आहे. आणि इतर ऋत्विजही त्या यज्ञशरीराची अंगेच आहेत. यास्तव, होता व इतर ऋत्विज यांना दक्षिणा देऊन यजमान जणू काय सर्वांगसहित अशा यज्ञाच्या आत्म्याला दक्षिणाद्रव्यरूपी गाईंच्या योगाने समृध्द करतो. (अनुवाक १).

यज्ञाचे यजन समिष्ट म्हणजे यथार्थफलदायी असे होण्याची जे योजना करतात, ते 'समिष्ट यजु' संज्ञक मंत्र होत. यासाठी यज्ञविषयक यजन यथार्थ फलप्रद व्हावयासाठी 'समिष्ट यजु' संज्ञक होम करावा. म्हणजे त्या मंत्रांनी आज्याहुती द्याव्यात. यज्ञामध्ये पशुहिंसा इत्यादि जे क्रूर कर्म केले जाते, त्याचप्रमाणे पदार्थन्यूनत्व, विहित कालाच्या अगोदर किंवा नंतर केले जाणारे कर्म, काही अधिक करण्यात येणारे अथवा अजीबात विसरून राहिलेले कर्म इत्यादि प्रमादामुळे यज्ञाच्या ठिकाणी जे अनिष्टत्व प्राप्त होत असते

त्याचे निवारण होऊन, सर्व यज्ञ यथार्थ फलदायी होईल अशी योजना करणाऱ्या समिष्ट यजूंच्या आहुतींनी अध्वर्यू यजमानाचा यज्ञ यथार्थफलप्रद होईल असे करतो. अर्थात् यजमानाला संतुष्ट करतो. 'धाता राति: सवितेदं' इत्यादि नऊ मंत्रांनी नऊ आहुती द्याव्यात. कारण, पुरुषाच्या ठिकाणी नऊ प्राण असतात. आणि यामुळे यज्ञ हा पुरुषाशी समप्रमाण असा असतो. आता सांगितलेल्या प्रमाणे नऊ आहुती देऊन अध्वर्यू जणू काय जेवढा यज्ञ आहे तेवढ्या सर्व यज्ञाला संतुष्ट करतो. पूर्वोक्त नऊ मंत्रांमध्ये सहा ऋड्.मंत्र असून तीन यजुर्मंत्र आहेत. सहा ऋड्.मंत्रांच्या आहुती देऊन वसंतादि नांवे धारण करणारे जे सहा ऋतू, त्या सर्वच ऋतूंना अध्वर्यूने संतुष्ट केल्यासारखे होत असून तीन यजुर्मंत्रांनी दिलेल्या तीन आहुतींनी पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु हे जे तीन लोक आहेत त्या तीनही लोकांना तो संतुष्ट करतो.

तीन यजुर्मंत्रांपैकी 'यज्ञ यज्ञं गच्छ यज्ञपतिं गच्छ स्वां योनिं गच्छ स्वाहा' हा पहिला मंत्र म्हणून अध्वर्यू आहुती देत असतो. या योगाने तो जणू काय यज्ञाला व यज्ञपती अशा यजमानाला स्वकीय अशा योनीला प्राप्त करतो. 'एष ते यज्ञो यज्ञपते सहसूक्तवाक: सुवीर: स्वाहा' हा दुसरा यजुर्मंत्र म्हणून अध्वर्यू आहुती देतो. त्या योगाने तो जणू आपल्या यजमानाच्या ठिकाणी पराक्रमसामर्थ्य स्थापन करतो.

वसिष्ठ गोत्रात उत्पन्न झालेल्या 'सत्यहव' नामक पुरुषाचा पुत्र 'देवभाग' नांवाच्या मुनीला विचारू लागला की, 'सृंजय नामक देशात राहणाऱ्या व अनेक सोमयागांचे यजन करणाऱ्या यजमानांच्याकडून जेव्हा तू यजन करविलेस तेव्हा तू 'यज्ञं स्वाहा' असा अंश ज्यामध्ये अंतर्भूत झाला आहे, अशा 'देवा गातुविदो गातुं वित्त्वा' या मंत्राने 'समिष्ट यजु' संज्ञक मंत्रांनी होम संपविलास की, 'यज्ञपतिं गच्छ' अशा प्रकारे 'यज्ञपति' शब्दाने युक्त अशा 'यज्ञ यज्ञं गच्छ' या मंत्राने समिष्ट यजु होम संपविलास ?' तेव्हा देवभागाने त्याला असे उत्तर दिले की, 'यज्ञपति' शब्दाने युक्त अशा 'यज्ञ यज्ञं गच्छ' मी 'समिष्ट युजु' होम समाप्त केल्याने सृंजय देशातील ते यज्ञकर्ते यजमान पराभव पावले. यानंतर तो म्हणाला की, यज्ञाच्या ठिकाणी यज्ञ स्थापन करणे योग्य असते. व तसे करणे यजमानाचा पराभव न होऊ

देण्याला कारणभूत असते. यास्तव, 'देवा गातुविदो गातुं वित्त्वा गातुमित' या मंत्राचे पठण करून जो 'समिष्ट यजु' होमाची समाप्ती करतो त्याने यज्ञाच्या ठिकाणी यज्ञाचे स्थापन केल्यासारखे होते. व तसे करणे यजमानाचा पराभव न होण्यास कारणभूत होते. सारांश, 'देवा गातुविदो' या मंत्राने 'समिष्ट यजु' संज्ञक होम संपवावा म्हणजे यजमानाचा पराभव होत नाही. (अनुवाक २).

अवभृथासाठी जलप्रवाहावर जाण्यापूर्वी 'आयुर्दा अग्ने' इत्यादि 'अवभृथ यजु' संज्ञक मंत्रांनी होम करावा. त्या योगाने यजमानाकडून यापूर्वीच्या एक वर्षाच्या काळात केव्हाही पाप घडले असेल, तर त्या पापाचा अध्वर्यूने नाश केल्यासारखे होते. नंतर अवभृथासाठी उदकप्रवाहावर जावे. उदकांच्या ठिकाणी वरुण राहत असतो. यास्तव, अवभृथासाठी उदकप्रवाहावर गेले असता प्रत्यक्ष वरुणाचेच पूजन केल्यासारखे होते. अवभृथासाठी उदकप्रवाहावर जाण्याच्या मार्गावर राक्षस आडवे येऊन यज्ञाचा विघात करतात. यास्तव, उदकप्रवाहावर जाताना मार्गाने प्रस्तोत्याने साम गात गात सर्वांच्या बरोबर चलावे. कारण, सामगान हे राक्षसांचा नाश करण्याला कारणभूत होते. साम गाताना त्याचा 'निधन' संज्ञक अंतिम भाग तीन वेळ गावा. कारण, ब्रह्मांडामध्ये पृथ्वी, अंतरिक्ष व द्यौ हे तीन लोक अंतर्भूत झालेले आहेत. यास्तव, तीन वेळ 'निधन' संज्ञक अंतिम भागाचे गान केले असता तीन्ही लोकांतून राक्षसांना हाकून लावल्यासारखे होते. केवळ प्रस्तोत्यानेच 'निधन' भागाचे गान न करता अवभृथासाठी जाणाऱ्या प्रत्येक पुरुषाने ते करावे. कारण, प्रत्येक पुरुष राक्षसांची बाधा होण्यास पात्र असतो. अर्थात् प्रत्येक पुरुषाने केलेले 'निधन' भागाचे गान राक्षसांच्या नाशाला कारणभूत होते.

महावेदीपासून किंवा चात्वालापासून जलप्रवाहावर जाण्याच्या मार्गावर पाऊल टाकताना, 'उरु हि राजा वरुणश्चकार' हा मंत्र म्हणावा. म्हणजे तो जलप्रवाहावर जाणाऱ्यांना त्यांच्या मार्गावर प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याला उपयुक्त होतो. उदकप्रवाह दृष्टीस पडला म्हणजे 'शतं ते राजन् भिषजः' हा मंत्र म्हणावा. म्हणजे तो यजमानाला होणाऱ्या, त्याने केलेल्या पापाच्या उपद्रवाचे निराकरण करण्यास औषधाप्रमाणे उपयोगी पडतो. उदकप्रवाहाच्या तीरावर येऊन पोचल्यावर 'अभिष्ठितो वरुणस्य पाशः' असे म्हणावे. म्हणजे

वरुणाचा पाश दूर करून उदकप्रवाहासन्निध उभे राहिल्यासारखे होते. उदकांवर दर्भ टाकावेत. आणि त्यांवर आहुती द्याव्यात. म्हणजे ते दर्भ आहुतींना स्थिरता प्राप्त करून देतात. शिवाय, दर्भसमूह अग्निसंयुक्त असतो, या श्रुतिवचनाप्रमाणे दर्भांवर आहुती दिल्या असता त्या अग्नीवरच दिल्यासारखे होते.

'बर्हिरग्र आज्यस्य' या मंत्राने दिली जाणारी प्रयाजाहुती वर्ज्य करून चारच प्रयाजाहुती द्याव्यात. कारण प्रजा या बर्हिरूपच आहेत. यास्तव, 'बर्हि' शब्दाने युक्त अशा मंत्राने दिलेली प्रयाजाहुती वर्ज्य केल्याने प्रजांनाच वरुणपाशातून मुक्त केल्यासारखे होते. 'अप्सु' शब्दाने युक्त अशा पुरोनुवाक्यांच्या योगाने आज्यभागांच्या दोन आहुती द्याव्यात. म्हणजे यज्ञाच्या दोन्ही नेत्रांना अंतरल्यासारखे होत नाही.

अवभृथाची प्रधान देवता असलेल्य वरुणाचे यजन करावे. असे केले असता अध्वर्यूने जणू वरुणपाशापासून यजमानाला मुक्त केल्यासारके होते. 'स्विष्टकृत्' संज्ञक आहुती अग्नी व वरुण या दोघांना उद्देशून द्यावी. म्हणजे अध्वर्यूने यजमानाला वरुणपाशापासून त्वरित मुक्त केल्यासारखे होते. 'अनूयाज' करताना देखील 'देवं बर्हिर्वसुवने' या मंत्राने दिली जाणारी अनूयाजाहुती वर्ज्य करून दोनच अनूयाजांचे यजन करावे. कारण प्रजा या बर्हिरूप आहेत. यास्तव, 'बर्हि' शब्दाने युक्त अशा याज्यामंत्राने दिली जाणारी आहुती वर्ज्य केली असता सर्व प्रजांना वरुणपाशापासून मुक्त केल्यासारखे होते.

एवं च, अवभृत कर्मामध्ये चार प्रयाज व दोन अनूयाज यांचे यजन करावे. प्रयाज व अनूयाज यांची मिळून सहा ही संख्या होते. ऋतू सहाच आहेत. यास्तव प्रयाज व अनूयाज मिळून सहा आहुती दिल्याने सहा ऋतूंच्या ठिकाणी अध्वर्यूने यजमानाला प्रतिष्ठित केल्यासारखे होते.

सोमरसाने जी जी पात्रे किंवा इतर वस्तू लिप्त झालेल्या असतील, त्या सर्व उदकप्रवाहात टाकताना 'अवभृथ निकुंचण' हा मंत्र म्हणावा. म्हणजे ज्या शब्दांचे उच्चारण करून वरुणाचे पूजोपचार करावे लागतात, त्या शब्दांचा उच्चार करून वरुणदेवाचे पूजोपचार केल्यासारखे होते. उदकप्रवाहावर स्रुची ठेवताना 'समुद्रे ते हृदयमप्स्वन्तः' हा मंत्र म्हणावा. कारण, समुद्राच्या अन्तर्भागीच वरुण वास्तव्य करीत असतो. स्रुचीमध्ये उदक भरून घेऊन त्या उदकाची उदक प्रवाहाच्या ठिकाणीच आहुती देताना 'सं त्वा दिशन्त्वोषधीरुताऽऽप'

हा मंत्र म्हणावा. त्या योगाने अध्वर्यूने जणू काय उदके व ओषधी या दोघांच्याही योगाने यजमानाला समृध्द केल्यासारखे होते. ओंजळीमध्ये भरून घेतलेले उदक, आपला द्वेष्टा ज्या दिशेस असेल त्या दिशेस सिंचन करताना 'सुमित्रा न आप ओषधय:' इत्यादि मंत्र म्हणावा.

कुटलेल्या सोमवल्लीचा चोथा उदकप्रवाहात टाकून दिल्यावर त्याच्या प्रहाराने जे उदकबिंदू वर अंतराळात उसळतील त्यांना स्पर्श करून 'देवीराप एष वो गर्भ:' हा मंत्र म्हणावा. म्हणजे त्या मंत्रात व्यक्त झालेल्या अर्थाला अनुसरून इच्छित उद्दिष्ट साध्य होते. सोमवल्ली ही पशुरूप आहे. यास्तव, सोमवल्लीच्या चोथ्याच्या प्रहाराने अंतराळात उसळणारे उदकबिंदू जर भक्षण केले, तर यजमान पुष्कळ पशूंचे संपादन करणारा होईल. पण त्या यजमानाला वरुण आपल्या पाशाने बद्ध करील. अर्थात् यजमान जलोदर नांवाच्या रोगाने पछाडला जाईल. बरे, या उदकबिंदूंचे भक्षण न केले, तर यजमान पशुरहित होईल. त्याला पशूंची प्राप्ती होणार नाही. ह्यासाठी अंतराळात उसळणाऱ्या त्या उदकबिंदूंना पूर्वोक्त मंत्राने नुसता स्पर्श करावा. म्हणजे यजमान पुष्कळ पशूंनी समृद्ध होईल आणि त्याला वरुणही आपल्या पाशाने बद्ध करणार नाही. उदकप्रवाबाहेर येताना 'प्रतियुतो वरुणस्य पाश:' हा मंत्र म्हणावा. म्हणजे वरुणपाशापासून स्वत:ला मुक्त करून घेतल्यासारखे होते. नंतर उदकप्रवाहाकडे मागे वळून न पाहता सर्वांनी तडक यज्ञमंडपात परत यावे. अशा प्रकारचे येणे वरुणाचे दर्शन न घडण्याला कारणभूत होते. अवभृथाहून यज्ञमंडपात परत आल्यावर 'एधोऽस्येधिषीमहि' इत्यादि तीन मंत्रांनी अग्नीवर तीन समिधा द्याव्यात. म्हणजे समिधांचे अर्पण करून त्याला नमस्कार करीतच अग्नीच्या सन्निध आल्यासारखे होते. पूर्वोक्त मंत्रांतील 'तेजोऽसि तेजो मयि धेहि' हा तिसरा मंत्र आहे. त्याचे पठण करून तिसरी समिध द्यावी. म्हणजे स्वत:च्या ठिकाणी अग्नीचे तेज स्थापन केल्यासारखे होते. (अनुवाक ३).

'स्फ्य' ने महावेदीचे 'उध्दनन' करावे. म्हणजे मापून घेतलेल्या वेदीच्या मर्यादेतील जमिनीवर असणारा अपवित्र असा थर स्फ्यने खणून काढावा. सोमयागामध्ये 'पश्वैकादशिनी' करावयाची असेल, म्हणजे अकरा पशूंपासून त्यांच्या वपादि अंगांचे यजन करावयाचा पक्ष स्वीकारला असेल, तर एरवीप्रमाणे पावलांनी वेदीचे मापन म्हणजे मोजणी न करता, रथाच्या कण्याने करावी.

आणि नंतर योग्य वेळी तिच्या दक्षिणांसापासून उत्तरांसापर्यंत 'यूप' नांवाचे अकरा खांब पशूंना बांधण्यासाठी पुरावेत. इंद्राने वृत्रासुरावर जे वज्र फेकले, त्याचे तीन तुकडे झाले. एका तुकड्यापासून स्फ्य, दुसऱ्या तुकड्यापासून रथ व तिसऱ्या तुकड्यापासून यूप निर्माण झाल्याचे वर्णन अन्यत्र आले आहे. त्याला अनुसरून स्फ्यने वेदी खणणे, रथाच्या कण्याने वेदीच्या जागेची मापणी करणे व तिच्याजवळ क्रमाने एक एक असे अकरा यूपस्तंभ उभे करणे, अशा तीन प्रकारांनी अध्वर्यूने जणू वज्रच तयार करून यजमानाच्या शत्रूचा नाश करण्यासाठी ते त्याच्यावर फेकल्यासारखे होते.

वेदीच्या अंतर्भागी जर यूप पुरले तर यजमान फक्त देवलोकामध्ये विजयी होईल. आणि वेदीच्या बाहेर पुरले तर मनुष्यलोकामध्येच फक्त तो जय मिळवील. यास्तव, वेदीच्या अंतिम मर्यादेच्या संधीवर यूप पुरावेत. म्हणजे ते यजमानाला देवलोक व मनुष्यलोक या दोन्हीही ठिकाणी विजय प्राप्त करून देण्याला कारणभूत होतील.

यूपांचा जो भाग भूमीत पुरला जातो त्यास 'उपर' अशी संज्ञा आहे. पितृलोकप्राप्तीची कामना असलेल्या यजमानाच्या यज्ञात ज्यांचे उपरसंज्ञक भाग सारख्याच घेराचे आहेत अशा अकरा यूपांची रांग पुरावी. यूपाला जेथे दोरी गुंडाळावयाची असते तो मध्य भाग समप्रमाण घेराचा असलेल्या अकरा यूपांची रांग मनुष्यलोकप्राप्तीची इच्छा करणाऱ्या यजमानाच्या यज्ञात पुरावी. मापट्यासारख्या आकाराचे एक लाकडी पात्र यूपाच्या अग्रभागी खोचून बसवावयाचे असते. या पात्रास 'चषाल' असे म्हणतात. इंद्रियसामर्थ्य प्राप्त व्हावे अशी इच्छा करणाऱ्या यजमानाच्या यज्ञात चषाल खोचण्याच्या जागी, ज्यांच्या वर्तुळाचा घेर समप्रमाण आहे, अशा अकरा यूपांची रांग पुरावी. प्रतिष्ठा प्राप्त होण्याची इच्छा करणाऱ्या यजमानाच्या यज्ञात उपर, मध्य व चषालखोचण्याचे ठिकाण या तिहींचे घेर समप्रमाणात आहेत अशा अकरा यूपांची रांग उभी करावी. आणि पशुप्राप्तीची इच्छा करणाऱ्या यजमानाच्या यज्ञात अकरांपैकी मधले तीनच यूप पूर्वोक्त तीन्ही ठिकाणी समप्रमाण घेराचे असतील अशा यूपांची रांग उभी करावी.

आता सांगितलेल्या समप्रमाण अशा मधल्या तीन यूपांना अनुसरूनच यजमानाला पशू प्राप्त होतात आणि तो पशुसंपत्तीने युक्त होतो.

मधल्या तीन यूपांच्या खेरीज असलेले आठ यूप परस्परांच्याशी संलग्न म्हणजे चिकटलेले असावेत. त्या योगाने अध्वर्यूने यजमानाला प्रजा व पशू यांच्याशी संलग्न केल्यासारखे होते.

दक्षिण दिशेस उत्तरोत्तर उतरती जमीन असलेले स्थल स्मशानभूमी म्हणून योग्य असून त्याला 'गर्त' अशी संज्ञा आहे. आपल्या यजमानास मृत्यू यावा अशी अध्वर्यूची इच्छा असल्यास त्या यजमानाच्या यज्ञात सर्वांच्या मध्ये असलेल्या 'अग्रिष्ठ' संज्ञक मुख्य यूपाच्या उत्तरभागी असलेले पांच यूप अग्रिष्ठ यूपापेक्षा पुष्कळ उंच असे पुरावेत. आणि दक्षिण भागी असलेले पांच यूप अग्रिष्ठ यूपापेक्षा ठेंगणे असलेले असे पुरावेत: अशाप्रकारे केलेल्या यूपांच्या उभारणीला 'गर्तमित' अशी संज्ञा आहे. ज्याच्या यज्ञात गर्तमित पध्दतीने यूपांची उभारणी केली जाते, तो यजमान सत्वर मृत्यू पावतो. आपल्या यजमानाला स्वर्गलोक प्राप्त व्हावा अशी ज्या यजमानाविषयी अध्वर्यूची इच्छा असेल त्या यजमानाच्या यज्ञामध्ये अध्वर्यूने अग्रिष्ठ यूपाच्या दक्षिण भागी असणारे पांच यूप अग्रिष्ठ यूपांहून उंच, व उत्तरभागी असणारे पांच यूप अग्रिष्ठ यूपापेक्षा ठेंगणे असे पुरावेत. अशा पद्धतीने यूप उभारले असता, अध्वर्यूने आपल्या यजमानाला स्वर्गलोकी आरोहण करावयास सुलभ व्हावयासाठी यूपांचा जणू काय पूलच तयार केल्यासारखे होते व तो यूपांचा पूल यजमानाला स्वर्गलोकी सुलभतेने आरोहण करावयास उपयुक्त होतो.

रशना म्हणजे मोळाची दोरी, एका यूपाला मोळाच्या दोन दोऱ्या गुंडाळल्या जातात, त्या अर्थी एक पुरुष विवाहसंस्काराने दोन स्त्रियांचा परिग्रह करतो. दोन यूपांना मिळून एक दोरी गुंडाळली जात नाही. आणि म्हणूनच एक स्त्री दोन पतींचे संपादन करू शकत नाही. अर्थात् दोन पुरुषांशी विवाह करू शकत नाही.

ज्या यजमानाला स्त्रीरूप प्रजा प्राप्त व्हावी, म्हणजे मुलीच व्हाव्यात अशी अध्वर्यूची इच्छा असेल त्याने यूपाला गुंडाळल्या जाणाऱ्या दोनही रशनांचे उपांत्य भाग परस्परांच्याशी संलग्न करावेत. म्हणजे त्या यजमानास मुलीच होतात. ज्या यजमानाला पुत्र व्हावेत अशी अध्वर्यू इच्छा करीत असेल त्याने यूपाला गुंडाळल्या जाणाऱ्या दोनही रशनांचे अग्रभाग परस्परांच्या अग्रभागाच्या ठिकाणी शिरकवावेत. म्हणजे त्या यजमानाला पुत्रच होतात.

पूर्वी एकदा असुरांनी देवांना वश करून अग्निष्ठ यूपाच्या दक्षिण भागी आणून बसविले. तेव्हा देवांनी त्या ठिकाणी उभारलेल्या अकरा यूपांच्या जवळच आणखी एक 'उपशय' नांवाचा यूप आडवा निजवून ठेवला. आणि त्या यूपाच्या योगाने असुरांना आपल्यापासून दूर केले. अकरा यूपांच्या समीप आडवे निजून राहणे, हेच त्या 'उपशय' नामक यूपास 'उपशय' हे नांव पडण्याचे कारण होय. सारांश, अकरा यूपांच्या शेजारीच दक्षिणेकडे एक उपशय नांवाचा यूप आडवा निजवून ठेवावा. म्हणजे तो यूप यजमानाच्या शत्रूंना त्याच्यापासून दूर करण्यास कारणभूत होतो. 'उपशय' नामक यूपाखेरीज बाकीचे सर्व यूप पशुमंत असतात. म्हणजे त्या सर्व यूपांना पशू बांधले जातात. उपशय यूपाला मात्र पशू बांधला जात नाही. परंतु, यजमानाने या उपशयसंज्ञक यूपाला जर एक पशू निर्दिष्ट केला नाही म्हणजे दाखवून दिला नाही, तर तो यूप यजमानाला पीडा उत्पन्न करील. यास्तव, यजमानाने आपल्याशी द्वेष करणारा जो कोणी असेल, त्याचा नामनिर्देश करून, 'हा पुरुष तुझा पशू आहे', असे त्या उपशय यूपाला उद्देशून म्हणावे. असे केले असता, यजमान ज्याचा द्वेष करतो अथवा यजमानाचा जो द्वेष करतो, त्या पुरूषाला उपशय यूपाचा पशू म्हणून निर्दिष्ट केल्याप्रमाणे होते. आणि मग तो उपशय यूप यजमानाला पीडा करीत नाही.

यजमानाचा कोणी द्वेष्टा नसेल किंवा यजमान कोणाचा द्वेष करीत नसेल तर, 'आखुस्ते पशुः' म्हणजे उंदीर तुझा पशू आहे, असे त्या उपशय यूपाला उद्देशून म्हणावे, म्हणजे तो यूप यजमानाच्या ग्राम्य व आरण्य अशा दोनही प्रकारच्या पशूंचा नाश करीत नाही.

प्रजापतीने प्रजा निर्माण केल्या. परंतु, तो प्रजांच्या निर्वाहासाठी सेवनीय असे अन्न संपादन करू शकला नाही. तेव्हा अन्नप्राप्तीला 'यूपैकादशिनी' म्हणजे अकरा यूपांची रांग उपयुक्त होईल असे त्याला आढळून आले. व त्याप्रमाणे त्याने अकरा यूपांची रांग उभी केली. तिच्या योगाने प्रजांच्या निर्वाहास पुरेसे व सेवनीय असे अन्न त्याने संपादन केले. अकरा यूपांपैकी जे दहा यूप असतात ते जणू दशाक्षरी चरणांनी युक्त असलेल्या विराट्छंदासारखे असतात. विराट्छंद हा अन्नरूप आहे. विराट् छंदाशी स्वरूपसाम्य असलेल्या दहा यूपांच्या योगाने प्रजापतीला अन्न संपादन करता आले. दहा यूपांचा

समुदाय म्हणजे विराट्छंदरूपी जणू धेनूच असून उरलेला एक अकरावा यूप हा त्या धेनूचा स्तनच होय. सारांश, अकरा यूपांची उभारणी करावी. म्हणजे अध्वर्यूने जणू काय आपल्या यजमानासाठी एकस्तनयुक्त अशा विराट्छंदरूपी कामधेनूची धार काढल्यासारखे होते.

अकरा यूपांची जी ओळ उभी करण्यात येते ती ओळ म्हणजे यज्ञाच्या पूर्व दिशेस जणू वज्रच निर्माण केल्याप्रमाणे होत असून ती वज्ररूप अशी अकरा पशूंची ओळ तिच्या पश्चिमेस चालू असलेल्या यज्ञाचा चुराडा करण्यास समर्थ होत असते. यासाठी 'पात्नीवत' नांवाचा आणखी एक यूप उभारावा. अशा प्रकारे पात्नीवत नांवाचा यूप जर उभा केला तर तो वज्ररूप अशा यूपपंक्तीकडून चुराडा केल्या जाणाऱ्या यज्ञाचे पुन्हा उत्कृष्ट प्रकारे दृढीकरण करण्याला कारणभूत होतो. (अनुवाक ४).

प्रजापतीने प्रजा निर्माण केल्या. परंतु, त्या प्रजा निर्माण करण्याच्या परिश्रमाने त्याचे वीर्य अत्यंत क्षीण झाले. आणि त्यामुळे, 'मी आता अगदी सामर्थ्यशून्य झालो' असे त्याला वाटू लागले. आपल्याला पूर्वीप्रमाणे प्रजोत्पादनाचे सामर्थ्य उत्पन्न व्हावयासाठी ही पश्वैकादशिनी म्हणजे निरनिराळ्या अकरा देवतांच्यासाठी अकरा पशूंचा याग करणे, हाच उत्कृष्ट उपाय आहे, असे त्याला दिसून आले. आणि त्याप्रमाणे त्याने पश्वैकादशिनीचे अनुष्ठान केले. आणि तिच्या प्रभावाने त्याने आपल्या ठिकाणी आयुष्य, इंद्रियसामर्थ्य व प्रजोत्पादनसमर्थ असे वीर्य संपादन केले. सारांश, पश्वैकादशिनीचे जो कोणी यजन करतो, तो निश्चयाने प्रजा उत्पन्न करतो. 'मी वीर्यशून्य झालो आहे', असे ज्याला वाटत असेल त्याला ही पश्वैकादशिनी पुन्हा वीर्यशाली करते. जो यजमान पश्वैकादशिनीचे अनुष्ठान करील, तो यजमान त्या पश्वैकादशिनीच्या अनुगत प्रभावाने आयुष्य, इंद्रियशक्ती व प्रजोत्पादनसमर्थ असे वीर्य आपल्या ठिकाणी पुन्हा संपादन करील.

अग्निदेवतेसाठी केलेल्या पशुयागाने यजमान स्वतःच्या ठिकाणी प्रजोत्पादक असे बीज संपादन करतो. सरस्वती देवतेसाठी केल्या जाणाऱ्या मेषीच्या यागाने संपादन केलेल्या बीजाच्या ठिकाणी तो स्त्रीपुरुषरूप मिथुनभाव निर्माण करतो. सोमदेवतेच्यासाठी केलेल्या पशुयागाने स्त्रीच्या ठिकाणी रेताचे धारण करतो. पूषादेवतेसाठी केलेल्या पशुयागाने त्या रेतापासून प्रजा उत्पन्न करतो.

बृहस्पतिदेवतेसाठी केलेल्या पशुयागाने त्या प्रजेला वैदिक ज्ञान उत्पन्न होण्याचे साधन निर्माण करतो. देवांमध्ये बृहस्पती हा ब्राह्मण आहे. यास्तव, त्याच्यासाठी पशुयाग करून अध्वर्यू जणू देवामधील ब्राह्मणाकडून यजमानासाठी वैदिक ज्ञानाने युक्त अशी प्रजा निर्माण करतो. सर्व प्रजा विश्वेदेवदेवतात्मक असल्यामुळे विश्वेदेवदेवतांच्यासाठी केलेला पशुयाग यजमानाच्या त्या प्रजेला सर्व देवताच्या अनुग्रहाने युक्त करतो. इंद्रदेवतेसाठी केलेल्या पशुयागाने तो यजमान प्रजांच्या ठिकाणी इंद्रियपाटव उत्पन्न करतो. मरुत्‌देवतांच्यासाठी केलेल्या पशुयागाने तो प्रजांना वस्तीला योग्य असा देश प्राप्त करून देतो. इंद्राग्नी देवतेसांठी केलेल्या पशुयागाने तो प्रजांना बल आणि पुष्टी संपादन करून देतो. सवितादेवतेसाठी केलेला पशुयाग त्या प्रजांच्या ठिकाणी स्वकर्तव्य करीत राहण्याची प्रेरणा करतो. आणि वरुणदेवतेसाठी केलेल्या यागाने तो आपल्या प्रजांना उपद्रवरहित करतो.

'वैश्वदेव' व 'मारुत' या दोन यागांच्या मध्यंतरी 'ऐंद्राग्र' याग करून अध्वर्यू आपल्या यजमानाच्या मध्यम वयात त्याच्या ठिकाणी विशेष बल निर्माण करतो. 'ऐंद्र' यागापूर्वी 'वैश्वदेव' पशूचे आलभन करून अध्वर्यू यजमानाच्या प्राणांना भक्षण करावयास योग्य असे अन्न त्याच्यापुढे ठेवतो. कारण अन्न हे विश्वेदेवदेवतात्मक असते. अर्थात् विश्वेदेवांचा याग करून त्यांच्या अनुग्रहाने भक्षणयोग्य असे अन्न प्रजांच्या पुढे ठेवणे योग्यच आहे. व त्यामुळेच सर्व प्रजा शरीराच्या पुरोभागी असलेल्या मुखाने अन्न संपादन करीत असतात. 'ऐद्र' पशूचे आलभन करून नंतर 'मारुत' पशूचे आलभन अध्वर्यू करीत असतो. प्रजा या मरुत्‌देवतांच्या आधिपत्याखाली असतात. यास्तव, ऐंद्र यागाने इंद्रदेवतेच्या अनुग्रहाने युक्त असलेल्या व मरुतांच्या कृपेने सुखाने आपापल्या गावी राहणाऱ्या यजमानाच्या सर्व प्रजा अध्वर्यू जणू यजमानाला अनुकूल अशा करतो.

ऐश्वर्याला प्राप्त झालेल्या आपल्या यजमानाला त्या ऐश्वर्यापासून क्लेश उत्पन्न व्हावेत, अथवा ऐश्वर्याच्या अभावी क्लेश भोगणाऱ्या आपल्या यजमानाला ऐश्वर्य प्राप्त व्हावे, अशी अध्वर्यूची इच्छा असेल, तर त्याने 'ऐंद्र' पशूच्या जागी 'वारुण' पशूचा व वारुण यागाच्या जागी ऐंद्र पशूचा याग करावा. त्या योगाने जो यजमान ऐश्वर्यसंपन्न असेल तो त्या ऐश्वर्यापासून क्लेश भोगणारा होतो, व जो ऐश्वर्याच्या अभावी क्लेश भोगणारा होतो, व जो ऐश्वर्याच्या

अभावी क्लेश भोगीत असेल तो ऐश्वर्ययुक्त होतो. प्रजांच्या ठिकाणी अनेक प्रकारे व्याकुलता उत्पन्न व्हावी असे अध्वर्यूला वाटत असेल तर त्याने अकरा पशूंच्या अनुक्रमात सांकर्य म्हणजे फेरबदल करावा. म्हणजे त्या योगाने यजमानाच्या प्रजा नाना प्रकारे व्याकुलतेने व्याप्त होतात. पाणी वाहत जाणारा जो सखल प्रदेश असतो त्यास 'अभिवाह' असे नांव आहे. उदकसंस्थ अशी जी अकरा यूपांची रांग उभी केलेली असते तिचा उत्तर भाग सखल असतो. म्हणजे त्या भागातील यूप उतरते असतात. या उत्तर भागातील यूपाला जर वरुणदेवतात्मक पशू बांधून त्याचे आलभन केले तर यजमानाची प्रजा वरुण ग्रासून टाकील. यास्तव, दक्षिण भागातील यूपाच्या ठिकाणी वरुणदेवतेसाठी उदङ्.मुख असा पशू बांधून त्याचे आलभन केले असता दक्षिण भागातील ते स्थान जलप्रवाहा प्रमाणे उतरते नसल्यामुळे, त्या ठिकाणी केले जाणारे 'वारुण' पशूचे आलभन यजमानाची प्रजा वरुणाकडून ग्रासली न जाण्याला कारणीभूत होते. (अनुवाक ५).

इंद्राने 'पात्नीवत' संज्ञक यूपाला बांधलेल्या त्वष्ट्रदेवतात्मक पशूच्या योगाने मनूकडून याग करविला. 'पर्यग्निकरण' संस्कार झाल्यानंतर त्वष्ट्रदेवतेला अर्पण केलेल्या त्या पशूला सोडून देण्यात आले. अशा प्रकारे केलेल्या पशुयागाच्या योगाने मनू मोठ्या वैभवाला प्राप्त झाला. यास्तव, पात्नीवत यूपाला निबध्द केलेला त्वष्ट्रदेवतात्मक पशू 'पर्यग्निकरण' संस्कार झाल्यानंतर जर सोडून देण्यात आला, तर ज्या प्रकारच्या वैभवाने मनू समृद्ध झाला, त्याच वैभवाने यजमानही समृद्ध होतो.

पशूला सोडल्यानंतर त्याच्या शरीरातील वपा आणि हृदयादि अंगे यांचे यजन करून सर्व अनुष्ठान पूर्णपणे समाप्त न केल्याने त्या यज्ञाला अप्रतिष्ठितत्व म्हणजे असंपूर्णत्व हा दोष प्राप्त होतो. व त्या दोषापासून यज्ञ पराभूत अर्थात् निष्फळ असा होतो. आणि पराभूत अशा त्या यज्ञाच्या अनुरोधाने यजमानही पराभूत होतो. परंतु, 'पात्नीवत' यूपाला निबद्ध केलेल्या त्वष्ट्रदेवतात्मक पशूला सोडून दिल्यानंतर तत्संबंधी केले जाणारे वपा व अंगादिकांचे यजनकार्य आज्याने करून जर अनुष्ठान संपविले, तर ते यज्ञाला प्रतिष्ठितत्व म्हणजे संपूर्णत्व प्राप्त करून देण्याला कारणभूत होते. आणि त्या प्रतिष्ठितत्वाला प्राप्त झालेल्या यज्ञाला अनुसरून यजमानही प्रतिष्ठेला प्राप्त होतो.

अनूबंध्या' नामक वांझ गाईच्या वपेचा याग झाल्यानंतर आणि तिच्या

हृदयादि अंगांच्या यजनापूर्वीच्या संधिकालात 'पात्नीवत' पशूचा म्हणजे पात्नीवतसंज्ञक यूपाला बांधल्या जाणाऱ्या त्वष्ट्रदेवतात्मक पशूच्या यागाचे अनुष्ठान करावे. म्हणजे त्या यागाचे अनुष्ठान योग्य अशा काळाच्या ठिकाणी केल्यासारखे होते. कारण अनूबंध्यासंज्ञक वांझ गाईचा याग पूर्ण झाल्यानंतर सोमयज्ञ समाप्त होत असतो. यास्तव, तो याग पूर्ण होण्यापूर्वीच पात्नीवत पशूचा याग होणे इष्ट आहे.

पात्नीवत संज्ञक यूपाला बांधला जाणारा हा पशू 'त्वाष्ट्र' म्हणजे त्वष्ट्रदेवतात्मक असतो. कारण स्त्रीच्या गर्भाशयाचे ठिकाणी सिंचित झालेल्या पुरुषरेताच्या ठिकाणी त्वष्टा देवच स्त्रीपुरुषभावात्मक स्वरूपे निर्माण करीत असतो. आणि तोच त्वष्टा देव रेत:सिंचन करणाऱ्या यजमानाला पत्न्यांच्या ठिकाणी संयोजित करीत असतो. एवं च, पूर्वोक्त यागाचा अधिष्ठाता असणारा त्वष्टा यागकर्त्या यजमानासाठी अनेक स्त्रीपुरुषरूपे निर्माण करीत असतो. (अनुवाक ६)

यज्ञकर्ते यजमान वल्लीरूप सोमराजावर दगडी बत्त्याचे घाव घालून त्याला कुटतात. म्हणजे ते जणू त्याचा वधच करीत असून सोमदेवतेसाठी शिजविलेल्या चरूचे जे हवन केले जाते, ते जणू मृत दीक्षिताच्या शवाच्या हृदयादि अवयवांच्या ठिकाणी गोशरीरातील हृदयादि अवयव ठेवण्यासाठी 'अनुस्तरणी' संज्ञक गाईचा वध केल्यासारखेच होय.

आहवनीयाग्नीच्या उत्तरार्धाचे ठिकाणी किंवा मध्यभागी जर सौम्य चरूची आहुती दिली तर देवतांच्याशी पितरांचा कलह उत्पन्न केल्यासारखे होईल. यास्तव, आहवनीयाच्या दक्षिणार्धाचे ठिकाणी सौम्य चरूची आहुती द्यावी. कारण, दक्षिण दिशा ही पितरांची दिशा म्हणून प्रसिद्ध आहे. अर्थात् पितृरूप अशा सोमदेवतेसाठी दिली जाणारी चरूची आहुती दक्षिण दिशेस देऊन पितरांचे यजन करणे युक्त आहे.

सौम्य चरूचे हवन केल्यानंतर उरलेला चरू सामगान करणाऱ्या उद्गात्यांना द्यावा. कारण, या सौम्य चरूची 'साम' हीच अधिष्ठात्री देवता असते. यास्तव, सामगानापैकी जो काही अंश उद्गाते नष्ट करतात म्हणजे गाण्याचे विसरतात आणि सामगानाच्या ठिकाणी दोष उत्पन्न करतात त्या दोषाची शांती त्यांना दिलेला तो हुतशेष करू शकतो.

आज्याचे परिपूर्ण अशा त्या हुतशेष चरूच्या ठिकाणी उद्गात्यांनी आपल्या मुखाचे प्रतिबिंब पडलेले पहावे. कारण, सौम्य चरू हा स्वभावतःच पवित्र असतो. यास्तव, त्याच्या ठिकाणी आपल्या मुखाची छाया किंवा प्रतिबिंब अवलोकन केले असता उद्गात्यांनी स्वतःच्या शरीराला पवित्र केल्यासारखे होते.

हुतशेष अशा चरूच्या ठिकाणी भरपूर आज्य ओतलेले नसल्यामुळे त्या आज्याच्या ठिकाणी अवलोकन करणाऱ्या ज्या सामगायकाला आपले प्रतिबिंब दिसणार नाही, तो गतप्राण होतो. यास्तव, हुतशेष सौम्य चरूच्या ठिकाणी प्रतिबिंब पडण्याइतके भरपूर आज्य ओतले गेले नाही असे आढळून आल्यास त्या चरूवर प्रतिबिंब पडण्यास पुरेसे भरपूर आज्य अगोदर ओतावे आणि नंतरच त्या आज्यामध्ये सामगायक उद्गातृप्रभृति ऋत्विजाने आपले प्रतिबिंब अवलोकन करण्याचा प्रयत्न करावा. म्हणजे तो यशस्वी होतो. आणि त्या योगे त्याने आपल्या शरीराला पवित्र केल्यासारखे होते.

सामगान करणाऱ्या उद्गात्यांपैकी जर कोणा एखाद्याचे मन आज्यपूरित अशा सौम्य चरूच्या ठिकाणी आपले प्रतिबिंब अवलोकन करण्याच्या वेळी कोणत्याही कारणाने अस्वस्थ झाले असेल, तर त्याने, 'माझे जे मन माझ्यापासून दूर झाले असेल, अथवा दूर जाऊ पाहत असेल, ते मन सोमराजाकडून आम्ही आमच्या आत्म्याच्या ठिकाणी पुन्हा स्थिर करीत आहोत'. अशा अर्थाचा 'यन्मे मनः परागतं यद् वा मे अपरागतं राज्ञा सोमेन तद्वयं अस्मासु धारयामसि' हा मंत्र म्हणून त्या आज्यपूरित सौम्य चरूच्या ठिकाणी आपले प्रतिबिंब अवलोकन करावे. म्हणजे त्या मंत्रसामर्थ्याने त्याच्या मनात आलेली अस्वस्थता दूर होऊन ते स्वस्थ होते.

तृतीय सवनाचे अनुष्ठान चालू असताना यज्ञकर्त्या यजमानापासून यज्ञ दूर होऊन यज्ञ न केलेल्या पुरुषावर लक्ष ठेवून त्याच्याकडे जात असतो. यास्तव, 'अग्नाविष्णू महि धाम' या 'आग्ना वैष्णवी' म्हणजे अग्नाविष्णूदेवतात्मक ऋचेने घृताचे यजन करावे. कारण, अग्नी हा सर्वदेवतात्मक असून विष्णू हा मूर्तिमंत यज्ञच असतो. अर्थात् आता सांगितलेल्या ऋचेने घृताचे यजन केले असता यजमानाने सर्व देवता व यज्ञ यांना आपल्यापासून दूर न जाऊ देता आपल्याच ठिकाणी धारण केल्यासारखे होते.

घृताचे यजन उपांशु स्वराने करावे. असे केले असता सौम्य चरूच्या यजनाच्या वेळी उपयुक्त केलेला उच्च स्वर व आताच्या घृतयजनाचे वेळी उपयोगात आणलेला 'उपांशु' स्वर यांच्यामध्ये स्त्रीपुरुषरूप मिथुनभाव उत्पन्न केल्यासारखे होते.

यज्ञाचे जे अंग प्रमादरहित असे केले जाते त्यास 'स्विष्ट' अशी संज्ञा असून जे अंग प्रमादयुक्त केले जाते त्यास 'दुरिष्ट' अशी संज्ञा आहे. ब्रह्मवादी असे म्हणतात की, यज्ञाचे जे अंग स्विष्ट होते, त्याचा अधिपती 'मित्र' नांवाचा देव असतो. परंतु, त्या मित्रदेवाला आहुती देऊन त्याचे आराधन न घडल्यामुळे रागावलेला तो मित्रदेव यज्ञाच्या स्विष्ट अशा अंगाचे दुरिष्ट अशा अंगाशी मिश्रण करून टाकतो. दुरिष्ट अशा यज्ञांगाचा अधिपती वरुण असतो. आहुतिदानाने त्याचे आराधन न घडल्यामुळे कुपित झालेला तो वरुणदेव दुरिष्ट असे झालेले यज्ञांग स्विष्ट अशा यज्ञांगाशी मिश्र करून टाकतो. अर्थात् मित्र व वरुण या दोघांच्या या कृतीमुळे यज्ञाच्या स्विष्ट अशा अंगाचा पूर्णपणे नाश होत असतो. अशाप्रकारे स्विष्ट अंगाचा पूर्णपणे नाश झाल्यावर यज्ञ तरी कसा शिल्लक राहणार? अर्थात् तोही नष्ट होणार. आणि यज्ञच नष्ट झाल्यावर यजमानाला त्याचे फळ कोठून मिळणार ? यास्तव, ही आपत्ती टाळण्यासाठी 'मैत्रावरुणी' वशेचे आलभन करावे. म्हणजे मित्र व वरुण या दोघा देवतांच्या उद्देशाने एक वांझ गाय मारून तिच्या अंगांचे यजन करावे. असे जर केले तर, यजनाने संतुष्ट झालेल्या मित्रदेवाकडून यजमानाने आपल्या स्विष्ट अशा यज्ञांगाचे पालन केल्यासारखे होते. आणि यजनाने संतुष्ट झालेल्या वरुणदेवाकडून दुरिष्ट अशा यज्ञांगाच्या ठिकाणचा दुरिष्टत्वाचा दोष नष्ट करविल्यासारखे होते. अर्थात् यजमानाचा यज्ञ सुस्थित होतो आणि तो यजमान निष्फलतेच्या संकटाने ग्रासला जात नाही.

सर्व प्रकारचे धान्य पिकणारी जमीन शेतकरी प्रथमत: नांगराने नांगरतात व नंतर नांगरट केलेल्या जमिनीत निकोप अशा धान्याचे पीक उत्पन्न करण्याची शक्ती येण्यासाठी शेणखत घालतात. त्याचप्रमाणे ऋचा व सामे यांच्या पठणरूप नांगराने ऋत्विज यज्ञरूपी भूमी प्रथम नांगरतात आणि नंतर त्या नांगरलेल्या यज्ञभूमीत 'मैत्रावरुणी' वशेचे आलभनरूपी शेणखत घालतात यास्तव, यज्ञकर्त्या यजमानाने मैत्रावरुणी वशेचे आलभन करून तिच्या अंगांचे यजन केले तर,

ऋक्सामरूप नांगराने नांगरलेल्या यज्ञरूपी भूमीत उत्कृष्ट फलरूपी पीक देण्याचे सामर्थ्य देणारे शेणखतच घातल्यासारखे होते. आणि ते यज्ञरूप भूमीच्या ठिकाणी इच्छित फळ देण्याविषयीची अशक्तता दूर करण्याला कारणभूत होते.

जो यजमान यज्ञ करतो त्याचे सर्व छंदोमंत्र गतसार म्हणजे नि:सत्त्व होत असतात. 'वशा' संज्ञक गाय ही छंदोमंत्रांचा सारभूत असा रसच आहे. यास्तव, 'मित्र व वरुण' या दोन देवतांच्यासाठी जर 'मैत्रावरुणी' वशेचे आलभन केले तर, यजमानाने छंदांच्या ठिकाणचे गतसारत्व नष्ट करून त्यांच्यावर प्रीती केल्यासारखे होते. एवं च, मैत्रावरुणी वशेचे आलभन छंदांच्या ठिकाणचे नि:सत्त्वत्व नाहीसे करण्याला कारणभूत होते. इतकेच नव्हे तर ते छंदांच्या ठिकाणी सारभूत असा रस अधिकच स्थापन करते.(अनुवाक ७)

इंद्र, वायू, मित्रावरुण इत्यादि देवांनी इंद्रियाच्या ठिकाणी असणाऱ्या कार्यक्षम सामर्थ्याची आपापसात विभागणी केली. त्यांनतर जे इंद्रियसामर्थ्य शिल्लक राहिले तेच 'अतिग्राह्य' संज्ञक ग्रहांच्या रूपाने उपयुक्त करण्यात आले. अतिशेष म्हणजे उर्वरित अशा इंद्रियसामर्थ्यापासून निर्माण होणे, हेच त्या 'अतिग्राह्य'संज्ञक ग्रहाचे 'अतिग्राह्यत्व' म्हणजे स्वाभाविक स्वरूप होय. यासाठी अतिग्राह्य संज्ञक ग्रहाचे जर ग्रहण केले तर त्या योगाने यजमान आपल्या ठिकाणी इंद्रियसामर्थ्य स्थापन करतो.

'आग्नेय' संज्ञक अतिग्राह्य ग्रह घेतल्याने शरीरकांती, ऐंद्रनामक अतिग्राह्य घेतल्याने इंद्रियबल आणि 'सौर्य' संज्ञक अतिग्राह्य ग्रह घेतल्याने यजमान आपल्या ठिकाणी ब्रह्मवर्चस् संपादन करतो.

अतिग्राह्य ग्रह हे जणू यज्ञरूपी रथाच्या खाली टेकण म्हणून लावले जाणारे काष्ठच असून रथंतर, बृहत्, वैरूप इत्यादि 'पृष्ठ्य' संज्ञक स्तोत्रे म्हणजे सामे ही त्या यज्ञरूपी रथाची जणू चक्रेच होत. यासाठी सहा दिवस चालू राहणाऱ्या 'पृष्ठ्य षडह' नामक यज्ञामध्ये 'अतिग्राह्य' संज्ञक ग्रह घेऊन त्यांचे टेकण जर त्या यज्ञरूपी रथाला लावले नाही तर, त्या 'पृष्ठ्य षडह' यज्ञरूपी रथाची पृष्ठ्यस्तोत्ररूपी चक्रे स्थिर राहत नाहीत, त्यांना गती मिळते, आणि ती चक्रे त्या यज्ञरूपी रथाला जोराने पुढे ढकलीत नेतात आणि त्याला खड्यात घालून त्याचा चुराडा करतात.

'उक्थ्य' संज्ञक यज्ञामध्ये अतिग्राह्य ग्रह घेऊ नये. जर ते घेतले तर त्या यज्ञरूपी रथाला पुढच्या बाजूने उंच टेकण लावल्यासारखे होते. आणि यज्ञरूपी रथ पुढच्या बाजूने वर उचलला जातो. आणि उंच टेकणाप्रमाणे ते अतिग्राह्य ग्रह उक्थ्यसंज्ञक यज्ञरूपी रथाला मागे ढकलून त्याचा नाश करतात.

रथंतर इत्यादि सर्व पृष्ठ्य स्तोत्रे ज्यामध्ये गाइली जातात अशा 'विश्वजित्' नामक सर्वपृष्ठ यज्ञात अतिग्राह्य घ्यावेत. म्हणजे ते त्या यज्ञाला यथार्थफलदानसमर्थ करतात.

प्रजापतीने देवांना यज्ञ वाटून दिले. परंतु, त्याला अत्यंत प्रिय अशी काही यज्ञविषयक अंगे वेगळी करून ती त्याने गुप्त ठेवली. ही वेगळी करून ठेवलेली अंगे म्हणजेच 'अतिग्राह्य' संज्ञक ग्रह होत. ज्या यजमानाचा अग्निष्टोम यज्ञात अतिग्राह्य घेतले जात नाहीत, त्या यजमानाच्या अग्निष्टोम यज्ञ 'वितनु' म्हणजे प्रजापतीने स्वत:ला प्रिय म्हणून बाजूस ठेवलेल्या अर्थात् महत्त्वाच्या अंगांनी रहित होतो, असे विद्वान् म्हणतात. यासाठी अग्निष्टोम यज्ञात 'अतिग्राह्य' संज्ञक ग्रह अवश्य घ्यावेत. म्हणजे ते त्या अग्निष्टोम यज्ञाला 'सतनु' म्हणजे प्रजापतिप्रिय अशा महत्त्वाच्या अंगांनी युक्त अर्थात् सर्वांगपरिपूर्ण करण्याला कारणभूत होतात.

पूर्वी सर्व देवता सारख्याच ऐश्वर्याने युक्त होत्या. त्यामुळे त्यांच्यामध्ये न्यूनाधिक्यरूप असा भेद निष्पन्न होण्याचा संभवच नव्हता. तेव्हा इतर देवांच्याहून आपल्या ठिकाणी विशेष ऐश्वर्य असावे व त्यामुळे आपली गणना इतरांहून भिन्न म्हणून केली जावी, या इच्छेने अग्नी, इंद्र व सूर्य या तिघा देवांनी आपली इच्छा पूर्ण करण्यास योग्य असे तीन सोमग्रह आहेत, असे पाहिले. अग्नीने 'आग्नेय', इंद्राने 'ऐंद्र' व सूर्याने 'सौर्य' नामक ग्रह पाहिला व त्याप्रमाणे तिघा देवांनी अनुक्रमे पूर्वोक्त तीन ग्रहांपैकी एक एक सोमग्रह घेतला. त्या ग्रहांच्या प्रभावाने ते तीनही देव अधिक ऐश्वर्याला प्राप्त होऊन इतर देवतांच्याहून भिन्न गणले जाऊ लागले. यास्तव, आग्नेय, ऐंद्र व सौर्य हे तीन ग्रह अवश्य घ्यावेत. म्हणजे त्या योगाने यजमान पातकी अशा आपल्या शत्रूच्याहून अधिक ऐश्वर्याला प्राप्त होईल व त्या शत्रूहून वेगळेपणाने गणला जाऊ लागेल.

पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु हे तीन लोक प्रकाशयुक्त व समानसामर्थ्ययुक्त करावेत, असे विद्वान् म्हणत असतात. आग्नेयसंज्ञक अतिग्राह्य ग्रहाने या भूलोकाचे ठिकाणी प्रकाशाचे धारण केले जाते. ऐंद्रनामक अतिग्राह्य ग्रहाच्या योगाने अंतरिक्ष लोकाच्या ठिकाणी प्रकाश धारण केला जातो. येथे कोणी अशी शंका घेईल की, अंतरिक्ष लोकाची देवता वायू आहे. तेव्हा इंद्रदेवतात्म अशा ऐंद्र ग्रहाने अंतरिक्ष लोक कसा प्रकाशित होणार? परंतु, ही शंका बरोबर नाही. कारण, इंद्र व वायू परस्परांचे मित्र असून ते दोघे एकत्रच राहत असतात. ऐंद्रवायवसंज्ञक द्विदेवत्य ग्रहाच्या ठिकाणी इंद्र व वायू यांचे सहावस्थान असल्याचे आपण पाहिले आहे. अर्थात् ऐंद्रग्रहाच्या योगाने अंतरिक्ष लोकाच्या ठिकाणी प्रकाश धारण केला जातो, हे विधान योग्यच आहे. सौर्यसंज्ञक अतिग्राह्य ग्रहाच्या योगाने द्युलोकाच्या ठिकाणी प्रकाशाचे स्थापन केले जाते. एवं च, हे तीन अतिग्राह्य ग्रह अध्वर्यूने घेतले असता पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु हे तीनही लोक त्याने प्रकाशित केल्यासारखे होऊन त्यांना त्याने समानसामर्थ्ययुक्त केल्यासारखे होते. ह्या अतिग्राह्य ग्रहांचा महिमा बम्ब व विश्ववय या नांवाच्या देवांनी जाणला असल्यामुळे त्या दोनही प्रकारच्या देवांनी अतिग्राह्य ग्रहांचे ग्रहण करून त्यांच्या प्रभावाने हे तीनही लोक वरून व खालून प्रभावंत केले. हे जाणणाऱ्या ज्या यजमानाच्या यज्ञात हे तीन अतिग्राह्य ग्रह घेतले जातात त्याच्यासाठी हे तीन लोक वरून व खालून उत्कृष्ट प्रभेने प्रकाशवंत होतात. (अनुवाक ८).

यज्ञामध्ये देव जे जे अंगभूत कर्म करीत ते ते अंगभूत कर्म देवांच्या विषयी मात्सर्यग्रस्त असलेले असुरही करीत असत. तेव्हा देवांनी असुरांना फसविण्यासाठी अशी युक्ती केली की, गायत्री, त्रिष्टुप् व जगती या तीन छंदांनी निष्पन्न होणारी प्रातःसवन, माध्यंदिन सवन व तृतीय सवन ही तीनही सवने प्रातःसवनात घेतल्या जाणाऱ्या अदाभ्यसंज्ञक ग्रहाच्या ठिकाणीच समाप्ती केली. म्हणजे गायत्र्यादि तीनही छंदांचे उच्चारण होत असलेल्या 'वसवस्त्वा प्र बृहन्तु'. इत्यादि तीनही मंत्रांनी अदाभ्यसंज्ञक ग्रह देवांनी घेतला. त्या योगाने देव विजयी झाले व असुर पराभव पावले. अदाभ्य ग्रहाचे हे माहात्म्य जाणणाऱ्या ज्या यजमानाच्या यज्ञात अदाभ्य ग्रह घेतला जातो तो यजमान विजय संपादन करतो व त्याचा शत्रू पराभव पावतो. ज्या अर्थी अदाभ्य ग्रहाच्या योगाने देवांनी असुरांचा नाश केला त्या अर्थी असुरांचा

नाश करणाऱ्या अदाभ्य ग्रहाला अदाभ्य हे नांव रूढ झाले. सारांश, असुरांचा नाश करणे हेच त्या अदाभ्य ग्रहाचे अदाभ्यत्व म्हणजे स्वभावगुण होय. अदाभ्य ग्रहाचे माहात्म्य जो जाणतो तो यजमान आपल्या शत्रूचा नाश करतो पण शत्रू मात्र त्याचा नाश करू शकत नाही.

अदाभ्य ग्रह ही जणू पापापासून अत्यंत मुक्त करणारी अशी प्रजापतीची तनूच आहे. यास्तव, वस्त्रामध्ये गुंडाळून ठेवलेल्या सोमवल्लीतूनच या 'अतिमोक्षिणी' म्हणजे पापापासून अत्यंत मुक्त करणाऱ्या प्रजापतीच्या अदाभ्यग्रहरूपी तनूचे ग्रहण करावे. म्हणजे अदाभ्य ग्रह घेण्यासाठी सोमवल्लीच्या कांड्या काढून घ्याव्यात. अदाभ्य ग्रह घेण्याविषयीची ही युक्ती जो जाणतो, तो आपल्या ठिकाणच्या अतिपापरूपी शत्रूपासून होणाऱ्या उपद्रवातून मुक्त होतो.

कुटण्याच्या निमित्ताने सोमराजावर दगडी बत्त्याचे घाव घालून ऋत्विज जणू त्याचा प्राणघातच करीत असतात. अशा प्रकारे सोम निष्प्राण झाला म्हणजे यज्ञ निष्प्राण होतो. आणि यज्ञ निष्प्राण झाला असता यजमानही मृतवत् होतो. यास्तव, सोमराजाचा वध करविल्याचा दोष यजमानाला न लागता त्याला स्वर्गलोकाची प्राप्ती व्हावयाचा उपाय म्हणून ब्रह्मवाद्यांनी अदाभ्य ग्रह घेण्याचे निश्चित केले. अदाभ्य हा जीवनोपेत ग्रह आहे. कारण, दगडी बत्त्याने सोमवल्ली न कुटता त्याच्या कांड्या एका पात्रात घेतलेल्या दह्यामध्ये ढवळून जेवढा त्यांच्यातील सोमरसाचा अंश त्या दह्यात येईल तेवढाच अदाभ्य ग्रहात भरून घेतला जात असतो. सारांश, कुटण्याच्या रूपाने वध न केलेल्या अर्थात् सजीव अशा सोमाच्या रसाने अदाभ्य ग्रह भरून घ्यावा. म्हणजे तो सजीव अशा यजमानाला स्वर्गलोकी पोचवितो.

असुरांची वंचना करण्याकरता देवांनी ज्याप्रमाणे वस्त्रात बांधून ठेवलेल्या सोमामधून 'वसवस्त्वा' इत्यादि मंत्रांनी कांड्या काढून घेऊन अदाभ्य ग्रह घेतला व त्या ग्रहाच्याच ठिकाणी तीनही सवनांची समाप्ती केली, त्याचप्रमाणे जर इतर यजमान करतील तर पुढे घ्यावयाच्या उपांशु, अंतर्याम इत्यादि ग्रहांच्या अनुष्ठानाच्या अभावी त्यांचा यज्ञ विच्छिन्न होईल. यास्तव, यज्ञाचा विच्छेद तर होऊ नये व अदाभ्य ग्रहाचा तर तीनही सवनांच्याशी संबंध घडावा, म्हणून सोमातून वेगळ्या काढलेल्या कांड्यांपैकी एक एक कांडी प्रत्येक सवनातील सोम कुटावयाच्या प्रसंगी कुटल्या जाणाऱ्या सोमात मिसळीत

जावे. असे केल्याच्या योगाने उपांशु, अंतर्याम इत्यादि ग्रह घेतले जातील व यज्ञाचा विच्छेद होणार नाही. अदाभ्य ग्रहासंबंधी असलेल्या सोमवल्लीच्या कांड्यांचे आता सांगितल्याप्रमाणे सोमामध्ये केले जाणारे मिश्रण यज्ञाचे सांतत्य राखण्याला कारणभूत होईल (अनुवाक ९).

ज्यांच्या ग्रहणाचा विधी सारख्याच स्वरूपाचा आहे अशाच ग्रहांचे देवांनी ग्रहण केले. परंतु, प्रजापतीने मात्र आपल्याला समृद्धी प्राप्त होण्यासाठी, ज्याचा ग्रहणविधी इतर ग्रहांच्याहून भिन्न आहे, असा 'अंशु' नांवाचा ग्रह योग्य आहे असे पाहिले आणि तो ग्रह घेतला. त्या योगाने तो समृद्ध झाला. अंशु ग्रहाचे हे माहात्म्य जाणणाऱ्या ज्या यजमानाच्या यज्ञात अंशु ग्रह घेतला जातो, तो यजमान प्रजापतीप्रमाणेच समृध्दतेला प्राप्त होतो.

सोमवल्लीवर दगडी बत्त्याचे अनेक घाव घालून निघालेल्या त्याच्या रसाने इतर ग्रह भरून घेतले जातात. परंतु, अंशु ग्रह सोमवल्लीवर एकच घाव घालून निघालेल्या रसाने भरून घ्यावा. कारण प्रजापतीने सोमवल्लीवर एकच घाव घालून निघालेल्या सोमरसाने अंशु ग्रह घेतला होता व तशा प्रकारे घेतलेल्या ग्रहानेच तो समृद्ध झाला. अंशु ग्रह घेताना म्हणावयाचा मंत्र मोठ्याने न म्हणता मनात म्हणावा. कारण, मन हे प्रजापतीसारखेच आहे. यास्तव, अंशुग्रह घेताना मनामध्ये म्हटलेला मंत्र यजमानाला प्रजापतीच्या अनुग्रहाची प्राप्ती करून देण्याला कारणभूत होतो.

अंशुग्रह उंबराच्या लाकडाच्या ग्रहपात्राने भरून घ्यावा. कारण उंबर हा मूर्तिमंत अन्नरूप आहे. यास्तव उंबराच्या ग्रहपात्रात घेतलेला अंशुग्रह यजमानाच्या ठिकाणी अन्नाचे संपादन करतो. हे ग्रहपात्र चतुष्कोण असावे. त्या योगाने यजमान चारही दिशांना प्रतिष्ठित होतो. 'आयतन' म्हणजे वसतीगृह होय. जो कोणी अंशुग्रहाचे वसतीगृह जाणतो तो वसतीगृहसंपन्न होतो. वामदेव ऋषींनी दृष्ट केलेल्या 'कथा नश्चित्र आ भुवत्' ह्या ऋचेच्या आधारे गाइल्या जाणाऱ्या सामाला 'वामदेव्य' अशी संज्ञा आहे. वामदेव्य साम हे त्या अंशुग्रहाचे वसतीगृह होय. यास्तव, मनामध्ये 'वामदेव्य' सामाचे गान करीत असतानाच अध्वर्यूने अंशुग्रह सोमरसाने भरून घ्यावा. म्हणजे तो वसतीगृहसंपन्न होतो. अंशु ग्रह भरून घेताना श्वास न सोडता त्याचा निरोध करून घेणे ही त्या अंशुग्रहाची समृध्दी होय. अध्वर्यू जर अंशुग्रहाला समृद्ध न करील,

म्हणजे श्वासनिरोध करून त्याचे ग्रहण करणार नाही तर तो, अध्वर्यू व यजमान या दोघांनाही समृध्द करणार नाही. सारांश, श्वास न सोडता अंशुग्रहाचे ग्रहण करावे. कदाचित् श्वासनिरोध करणे अशक्य होऊन श्वास सोडण्याचा प्रमाद घडलाच तर, त्या दोषाच्या परिहारासाठी अध्वर्यूने आपल्या नाकासमोर सुवर्ण धरावे व त्यावरून श्वास आकर्षण करावा. सुवर्ण हे अमृत असून प्राण हा आयुष्यरूप आहे. यास्तव, सुवर्णावरून अध्वर्यूने प्राणवायूचे आकर्षण केले असता सुवर्णरूपी अमृताला श्वासरूपी प्राणाकडून संतुष्ट करविल्यासारखे होते. आपणासमोर जे सुवर्ण धरावयाचे ते शंभर निष्क वजनाचे असावे. कारण पुरुष शतायू म्हणजे शंभर वर्षे जगणारा असून तो शंभर इंद्रियांनी युक्त असतो. यास्तव, शंभर निष्क वजनाचे सुवर्ण आपणापुढे धरल्याने तो अध्वर्यू किंवा तो यजमान स्वत:ला शंभर वर्षांच्या आयुष्याच्या व कार्यक्षम अशा शंभर इंद्रियांच्या ठिकाणीच जणू स्थापन करतो. (अनुवाक १०).

प्रजापतीने यज्ञांचे विभाग करून ते देवांना वाटून दिले. तेव्हा आता स्वत: आपल्याला कोणताच यज्ञ राहिला नाही, आपण अगदी रिकामे झालो, असे त्याला वाटले. मग त्याने देवांना वाटून दिलेल्या सोळा यज्ञांपैकी प्रत्येक यज्ञातील इंद्रियसामर्थ्यप्रद असा थोडा थोडा अंश आपणाकडे ओढून घेतला. आणि तो एकत्र केला. सोळा यज्ञांतील सारभूत अशा त्या एकत्रित अंशांपासून 'षोडशी' नांवाचा यज्ञ निर्माण झाला. हा 'षोडशी' नांव धारण करणारा यज्ञ म्हणजे सोमयागाव्यतिरिक्त असा एखादा नवाच यज्ञ निर्माण झाला, असे नव्हे तर, या यज्ञात सोळा 'स्तोत्रे' गाइली जातात आणि सोळा 'शस्त्रे' पठण केली जातात, यामुळेच या सोमयागाला 'षोडशी' हे नांव प्राप्त झाले आहे. सोळा स्तोत्रांनी व सोळा शस्त्रांनी युक्त असणे, हेच त्या षोडशी नामक यज्ञाचे षोडशित्व होय. यास्तव षोडशीनामक सोमयज्ञामध्ये षोडशी नांवाचा एक सोमग्रह घ्यावा. षोडशी ग्रह जर घेतला तर, यजमानाने आपल्या ठिकाणी सामर्थ्यसंपन्न असा इंद्रियसमुदाय संपादन केल्यासारखे होते.

काही केल्या स्वर्गलोक देवांच्या स्वाधीन होईना. तेव्हा विचाराअंती स्वर्गलोक स्वाधीन होण्याला हा षोडशी ग्रह उपयोगी पडेल, असे त्यांना आढळून आले. त्याप्रमाणे त्यांनी षोडशी ग्रह घेतला आणि त्याचे यजन केले. तेव्हा त्याच्या प्रभावाने स्वर्गलोक देवांच्या स्वाधीन झाला. यासाठी,

षोडशी यज्ञात षोडशी ग्रह अवश्य घ्यावा म्हणजे तो यजमानाला स्वर्गलोकाच्या ठिकाणी विजयी करण्यास कारणभूत होतो.

देवांमध्ये इंद्र हा सर्वांच्याहून लहान अर्थात् अल्पवयी होता. तो प्रजापतीकडे गेला. तेव्हा प्रजापतीने त्याला षोडशी ग्रह दिला. तो त्याने घेतला. त्या ग्रहाच्या प्रभावाने सर्वांत लहान असलेला इंद्र सर्व देवांच्यापेक्षा श्रेष्ठत्वाला प्राप्त झाला. षोडशी ग्रहाचे हे माहात्म्य जाणणाऱ्या ज्या यजमानाच्या यज्ञात अध्वर्यू षोडशी ग्रह घेतो तो यजमान बरोबरीच्या सर्व लोकांमध्ये अग्रमानाला प्राप्त होतो.

षोडशी ग्रह प्रात:सवनामध्ये घ्यावा. षोडशी हा वज्ररूप असून प्रात:सवन हेही वज्ररूपच आहे. यास्तव, प्रात:सवनात षोडशी ग्रह घेतल्याने स्वकीय अशा स्थानाच्या ठिकाणी त्याचे ग्रहण केल्यासारखे होते. अथवा प्रत्येक सवनात षोडशी ग्रह घेत जावा. असे केल्याने अध्वर्यूने जणू काय सवनासवनापासून त्या ग्रहांना उत्पन्न केल्यासारखे होते.

पशुप्राप्तीची इच्छा करणाऱ्या यजमानाच्या यज्ञात तृतीय सवनामध्ये षोडशी ग्रह घ्यावा. कारण, षोडशी ग्रह वज्ररूप असून तृतीय सवन हे पशुरूप आहे. यास्तव, तृतीय सवनात षोडशी ग्रह घेतला असता, अध्वर्यूने आपल्या यजमानाकरता षोडशीरूप वज्राच्या धाकाने पशुरूप तृतीय सवनापासून पशूंचे संपादन केल्यासारखे होते.

'उक्थ्य' यज्ञात षोडशी ग्रह घेऊ नये. कारण, त्या यज्ञात पठण केली जाणारी 'शस्त्रे' ही प्रजारूप व पशुरूप असतात. यास्तव 'उक्थ्य' यज्ञात जर अध्वर्यू षोडशी ग्रह घेईल तर, त्याने यजमानाच्या प्रजांना व पशूंना जाळून टाकल्यासारखे होते.

क्षत्रिय यजमानाच्या अग्निष्टोम यज्ञातही षोडशी ग्रह घ्यावा. कारण ब्राह्मण व वैश्य यांच्याहून अधिक उत्कर्ष होण्याच्या इच्छेनेच क्षत्रिय यजमान अग्निष्टोम यज्ञाचे यजन करीत असतो. एक दिवसात निष्पन्न होत असलेल्या सोमयागास 'साह्न' असे नांव आहे. साह्न अशा प्रकारच्या सोमयज्ञात यजमानाच्या उत्कर्षासाठी अध्वर्यू षोडशी ग्रहाचे ग्रहण करतो. वज्ररूप असा तो षोडशी ग्रह यजमानाच्या शत्रूचा नाश करण्यासाठीच अध्वर्यू घेत असून ऐश्वर्यप्राप्तीसाठी यजमानाला

तो प्रकाशितही करीत असतो. अथवा, अध्वर्यू हा षोडशीग्रहयुक्त अशा आपल्या अनुष्ठानकौशल्याने यजमानाला वेढून राहिलेल्या सर्व पापाचे दहन करतो. यजमानाला वेढून राहिलेल्या पापाच्या नाशासाठी व यजमानाला समाजात प्रतिष्ठा प्राप्त होण्यासाठी षोडशी ग्रहाचे 'स्तोत्र' 'उद्गात्यांनी एकविंशति' नामक स्तोमाच्या आश्रयाने गावे. म्हणजे ते 'स्तोत्र' यजमानाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याला कारणभूत होते. 'षोडशी' ग्रहासंबंधाने होत्याने जे 'शस्त्र' पठण करावयाचे ते 'हरिवत्' म्हणजे 'हरि' शब्दाने युक्त अशा 'इंद्रमिध्दरी वहतः' इत्यादि ऋचांनी युक्त असे पठण करावे. असे केले असता यजमान 'हरिवत्' शस्त्रपठणाने संतुष्ट झालेल्या इंद्राच्या लोकाला प्राप्त होतो.

ह्या 'हरिवत्' शस्त्रामध्ये अनेक प्रकारच्या छंदांतील ऋचांचे पठण होत असते. देवांच्या संबंधी जे छंद असतात ते अक्षरसंख्येच्या दृष्टीने लहान असतात व असुरांच्या संबंधी जे छंद असतात ते अक्षरसंख्येच्या दृष्टीने मोठे असतात. देवांनी आपल्या लहान छंदाने असुरांच्या मोठ्या छंदाला मागून व पुढून व्याप्त करून षोडशी ग्रहासंबंधी शस्त्र पठण केले. त्या योगाने त्यांनी असुरांच्या स्थानाचा नाश केला. यास्तव, होता जर षोडशी शस्त्राचे पठण करताना लहान छंदाने मोठ्या छंदाला अभिव्याप्त करून शस्त्र पठण करील तर ते षोडशी शस्त्र यजमानाच्या शत्रूचे स्थान नष्ट करण्यास कारणभूत होईल.

षोडशी शस्त्रामध्ये ज्या ऋचा पठण केल्या जातात त्यांमध्ये एके ठिकाणी ओळीने ज्या तीन ऋचा आहेत त्यापैकी पहिली अठ्ठावीस अक्षरांची, दुसरी अडतीस अक्षरांची व तिसरी तीस अक्षरांची आहे. या तीन ऋचांच्या ठिकाणचे अक्षरवैषम्य दूर करून त्या समानाक्षरी म्हणजे अनुष्टुप् छंदाच्या होतील अशा प्रकारे जोडणी करून त्यांचे पठण करीत जावे. ते असे की, बत्तीसअक्षरी अनुष्टुप् छंदाच्या दृष्टीने मधल्या अडतीस अक्षरी ऋचेत सहा अक्षरे अधिक आहेत. त्या सहा अक्षरापैकी पहिली चार अक्षरं, अठ्ठावीस अक्षरी असलेल्या पहिल्या ऋचेत संयुक्त करावीत म्हणजे ती ऋचा अनुष्टुप्छंदात्मक होईल. आणि उरलेली दोन अक्षरे, तीसअक्षरी असलेल्या तिसऱ्या ऋचेत संयुक्त करावीत म्हणजे तीही ऋचा अनुष्टुप्छंदात्मक होईल. या योजनेप्रमाणे मधल्या ऋचेत अधिक असलेली सहा अक्षरे अजीबात न वगळता त्यांचे पठण केल्याने होत्याने जणू काय प्रसिद्ध अशा सहा ऋतूंना संतुष्ट केल्यासारखे

होते. त्या सहांपैकी पहिली चार अक्षरे पहिल्या ऋचेशी संयुक्त केल्याने होत्याने चतुष्पाद अशा पशूंचे संपादन केल्यासारखे होते. व उरलेली पुढची दोन अक्षरे तिसऱ्या ऋचेशी संयुक्त करून द्विपाद अशा मनुष्यांचे संपादन केल्यासारखे होते.

एवं च, षोडशी शस्त्रातील अनुष्टुप्छंदेतर तीन ऋचांना आता सांगितल्याप्रमाणे केलेल्या अक्षरयोजनेने अनुष्टुप्छंदस्वरूप करून त्यांचे पठण करावे. कारण वाणी ही अनुष्टुप्छंदस्वरूप असल्यामुळे ती प्राणभूत अशा सर्व इंद्रियांमध्ये श्रेष्ठ आहे.

सूर्याचे अर्धे मंडल अस्तास जाण्याचे सुमारास 'षोडशी' ग्रहाविषयी गाइल्या जाणाऱ्या स्तोत्राचे उपाकरण करावे. म्हणजे 'षोडशी' संज्ञक सामाचे गान करावयास उद्गात्यांना सुचवावे. कारण, अर्ध्या सूर्यास्तसमयासच इंद्राने वृत्राचा वध केला. यास्तव, अध्वर्यूने त्या समयास षोडशी सामाचे उपाकरण केले असता त्याने जणू आपल्या यजमानाच्या शत्रूवर 'षोडशी' स्तोत्ररूपी वज्रच फेकल्यासारखे होते.

षोडशीसामगानाची विशिष्ट दक्षिणा म्हणून उद्गात्याला तांबूस पिवळ्या रंगाचा एक घोडा द्यावा. कारण तोच वर्ण वज्राचा असतो. अर्थात् दक्षिणा म्हणून दिलेला तांबूस पिवळ्या रंगाचा घोडा षोडशीस्तोत्ररूपी वज्राला यथार्थ असे स्वरूप प्राप्त करून देण्याला कारणभूत होतो. (अनुवाक ११).